सूरज गाताडे



# लायबेशन

अ
मिस्टर वाघ
स्टोरी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

मिस्टर वाघ कथा

# लायबेशन

## लेखक : सूरज काशिनाथ गाताडे

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# लायबेशन

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# लायबेशन


## लेखक : सूरज काशिनाथ गाताडे

चिंगळे गल्ली, पेठ वडगांव, ता. हातकणंगले,

जि. कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२

ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : ८ फेब्रुवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# "लायबेशन - एन अनादर् मिस्टर वाघ स्टोरी"

## (लेखक - सूरज काशिनाथ गाताडे)

### (स्क्रिन रायटर्स् असोसिएशन मेंबरशिप नंबर - 21831)

प्रस्तावना :-



'मिस्टर वाघ' लिहावं की नाही असा प्रश्न होता. त्याचं उत्तर 'नाही!' असंच होतं. का तर वाघ लिहून समाजात काही बदलणार आहे का तर नाही. म्हणून मग लिहिणं थांबवलं होतं. शेवटी एक सर्वांत व सर्वांपासून वेगळा असा सत्यांन्वेषी (डिटेक्टिव्ह) तयार करायचा होता, तो करून झाला होता. शिवाय मिस्टर वाघ 'अमानवीय', 'अलौकिक' असा होत चालला आहे असं मला वाटलं. म्हणून पण वाघ लिहिणं थांबवलं. पण वाचकांच्या सततच्या मागणीने त्याला पुन्हा आणणं भाग पडलं. यात त्याला पुन्हा 'मानवी' पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला आहे. बरं, वाघ परत परत येत राहील का? तर किमान आणखी एकदा तरी नक्की येईल!

या कथेने मात्र माझा खूप वेळ घेतला. पूर्ण व्हायला उणेपूरे दोन महिने लागले. इतर कथांपेक्षा माझा सर्वांत जास्त काळ ही कथा लिहिण्यात गेला. मिस्टर वाघच्या सायकॉलॉजी मध्ये एक-दीड वर्षांच्या अंतराने शिरणं म्हणजे खूप व कमालीचं अवघड गेलं. पण अंतत: कथा घेऊन हजर झालो. वाघची कथा लिहिताना नेहमी प्रश्न

पडतो, की पुढील मिस्टर वाघ कथा लिहिली जाईल का माझ्याकडून? पण यात मला असे काही करावेच लागते नाही. मिस्टर वाघ स्वतः सगळं घडवत राहतो. ते फक्त मला बघ्याची भूमिका घेऊन पहात रहायचं व लिहून काढायचं असतं. मागे 'अंतःपुर' मध्ये देखील 'शक्तीसेन' याने हेच केलं होतं. डॉक यांचे पण तसेच. नव्हे तर माझी सर्वच पात्रं त्यांच्या कथा स्वतःच घडवतात. ही माझी पात्रं असूनही माझ्या म्हणण्यानुसार वागत नाहीत. मला जे लिहायचं असतं, ते न समोर येता यांच्या घडवण्याने कथा जशी घडेल तशी मला ती उतरावे लागते. असो यामुळेच संबंधित कथांचा लेखक असून मला देखील प्रत्येक माझी हरेक कथा तितकीच फ्रेश असते, जेवढी ती कथा नव्याने वाचणाऱ्या वाचकांना...

काही दिवसांपूर्वी कोणी वाचकाने 'डॉक' यांची आठवण काढली. त्यांना नांव लक्षात नव्हते म्हणून त्यांनी डॉक यांचा 'डिटेक्टिव्ह काका' म्हणून उल्लेख केला होता. डॉक यांचीही नवीन कथा यावी अशी इच्छा त्यांनी जाहीर केली. खूप छान वाटलं ते वाचून, की एकच कथा असून डॉक अजून काहींच्या मनात खोल रुजले आहेत. आता त्यांना देखील परत आणावे लागेल. तो प्रयत्न आहेच गेल्या तीन वर्षांपासून डॉकना परत आणण्याचा प्रयत्न करतोय. अनेकदा प्रयत्न करून पण कथा काही केल्या पूर्ण होत नाही... ती तशीच पडून आहे... पुढील कथा मागील कथेपेक्षा सरस

असली पाहिजे हा माझा अट्टहास असतो. म्हणून काही कथा अर्ध्या राहतात. आतापर्यंत आलेल्या कथा या मागील कथांपेक्षा अधिक जटिल होत जातात ही एक गंमत आहे. त्यामुळेच थ्रिल अधिक वाढत जातं व लिहिताना माझं डोकं जड होत जातं. डॉक येतील... वाघ देखील आणखी एकदा का होईना नक्की परतेल. असो तूर्त आपण वाघच्या कथेचा आस्वाद घ्यावा...

'लायबेशन...' या नांवाचे दोन वेगळे अर्थ आहेत, एक 'मुक्ती' तर एक 'देवाला दिलेला मद्याचा नैवेद्य'. आता त्यातील कोणता अर्थ तुम्ही कथेतून घ्याल हे तुमच्यावर सोपवतो. कदाचित दोन्ही सार्थ वाटतील... कथा आपल्या पसंतीस पडेल अशी आशा करतो. चुका वा सुधारणा असल्यास किंवा काही सूचना असल्यास नक्की कळवा... धन्यवाद!

सूरज काशिनाथ गाताडे

संपर्क -

नांव - सूरज काशिनाथ गाताडे.

पत्ता - चिंगळे गल्ली, पेठ वडगांव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२

ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सॲप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

# १. रिव्हिजिट...

मिस्टर वाघकडे यायचं नाही असं मी मनाशी पक्कं केलं होतं... पण वाचकांच्या अतिआग्रहानं त्याच्याकडं येणं मला भाग पडलं...

मी त्याच्या घराच्या पायरीवर बसून होतो... पावसाची थोडी रिपरिप चालू होती म्हणून छतावर बारीक असलेल्या पन्हाळी खाली मी सावरून मागील वेल ग्रायंडेड् अँड वेल फर्निश्ड् अशा चकचकीत केलेल्या कातळ दगडी भिंतीवर डोळे मिटून विसावलो होतो... तरी मनात एक विचार मात्र होता, की मिस्टर वाघने पाळलेल्या विषारी सापांपैकी एखादा साप कुठून तरी सरपटत येऊन आपला चावा घेईल... पण याची आज मला चिंता नव्हती... चावला तर चावेना का... आपल्या पापांचं हेच प्रायश्चित्त असेल...

"सूरज! बऱ्याच दिवसांनी!" हा आवाज कानावर पडला.

कोणाचा...?

'मिस्टर वाघ!'

त्याने हाक मारून मनःशांतीत बुडू पाहण्याच्या माझ्या प्रयत्नात खंड पाडला होता...

मी हळूवार डोळे उघडून डाव्या बाजूला त्याच्याकडे पाहिलं. पावसात भिजलेला तो माझ्यासमोर उभा होता...

"आलास? मला वाटलं तू कधीच येणार नाही माझ्याकडं!" तो त्याचं मोहक स्मित चेहऱ्यावर घेऊन उभा होता.

त्याचं राखाडी रेग्झिनचं जर्कीन अर्धवट भिजलेलं होतं. वॉटरप्रूफ असल्याने त्याच्यावर पाणी थांबत नव्हतं. पण बारीक केलेले त्याचे केस पूर्णतः ओलेचिंब झाले होते. बारीक केसांतून घाम गळावा तसे पावसाचे थेंब त्याच्या पापण्यांवरून डोळयांमध्ये उतरत होते, नाकावरून व गालांवरून ते खाली ओघळत होते. डाव्या हाताने चेहऱ्यावर जास्त झालेलं पाणी त्याने जर्कीनच्याच हतोब्याने टिपले.

"काय करू? मला नाही वाटत आपण वेगळे होऊ शकतो...?" मी अनुत्साही बोललो.

तशी त्याच्या ओठांवरची स्मिताची रेषा अधिक गडद झाली...

"तुम्ही हसताय?" मी नाराजीने पण आवाज न चढवता शांतपणे विचारलं...

माझ्या प्रश्नाला त्याने उत्तर दिलं नाही. फक्त माझ्या बाजूला पडलेला कोकमचा कॅन त्याने आनंदाने उचलला.

"अरे व्वा! माझ्यासाठी गिफ्ट आणलंयस?!" तो उत्साही बोलला.

"कोकणातील आईकडून आणलाय!" मी तितकाच निरुत्साही...

"तुला दोन आई आहेत?" मिस्टर वाघने माझ्याकडे पाहत विचारलं.

"मी माझ्या दाईबद्दल बोलतोय! मी थोडा मोठा झाल्यावर ती तिच्या गांवी परत गेली. तिचं माझ्यावर खूप प्रेम आहे. परवा आली होती. तेव्हा माझ्यासाठी घेऊन आली होती. म्हंटलं आईचं प्रेम थोडं तुमच्याशी वाटावं..." मी थोडाही उत्साह न दाखवता बोललो.

"हा! प्रेम! हीच गोष्ट तर आहे, जी वाटायची आहे!" तो गोड हसत म्हणाला.

आणि त्याने कॅनचं सील व टोपण काढून तसाच कॅन तोंडाला लावला. घट्ट, गुळच्याट कोकम सिरपचे काही घोट तो घुटघुट प्यायला. कॅन बाजूला करून स्लीव्ह्जनेच पुन्हा तोंड पुसलं.

"चल आत!" मला म्हणाला व नुसतं ओढून घेतलेलं दार ढकलून तो आत शिरला.

मिस्टर वाघचं घर नेहमी असं उघडं असतं. खरं आहे म्हणा! याच्या घरात शिरायची हिंमत कोण करेल?

मी एकदा त्याला याबद्दल विचारलं होतं. पण यावर त्याचं उत्तर होतं, की 'त्याचं घर हे त्याच्या मनासारखंच सर्वांसाठी खुलं आहे. निर्मळ भावनेनं कोणीही आत यावं याचसाठी!'

त्याचं हे उत्तर माझ्या मनाला तेव्हा खूप भावलं होतं...

"साप?" त्याच्या मागून घरात येत मी त्याला विचारलं.

"सोडून दिले जंगलात. जगण्याचा सगळ्यांना अधिकार आहे. नाही?!" दिवे लावत असतानाच माझ्याकडे पाहत तो हसून म्हणाला.

"चांगलं आहे, तुम्ही असा विचार करता!" मी उपहासाने म्हणालो.

तेव्हा मिस्टर वाघचं हसू अधिकच दाट झालं. त्याला माझं हे उपरोधिक बोलणं लक्षात आलं होतं, पण त्याच्या हसण्यावरून सांगतो; त्याला ते बोचलं मात्र नक्कीच नव्हतं!

"एवरीवन इज लिविंग इन देअर ओन ड्रीम, सूरज! अँड सो; दे आर लिविंग इन दि हेल दॅट दे हॅव क्रिएटेड्! दे आर सफरींग फॉर देअर एंटायर लाईव्ह्ज इन दॅट हेलीज् फॉल्स ड्रीम!" दिवे लावत तो बोलला. मग माझ्याकडे बघून गोड हसला.

'Helly' हे 'Hell' या शब्दाशी सार्धरम्य ठेवणारं वा त्याचं वैशिष्ट्य सांगणारं विशेषण. पण मिस्टर वाघने 'हेली' हा शब्द इथं 'कर्ता' म्हणून वापरला आहे. आणि हा 'हेली' कोण तर स्वतः 'माणूस'!

'मिस्टर वाघच्या म्हणण्यानुसार माणूस स्वतःच्या कल्पक स्वप्नांनी त्याचं जग विणतो व त्या खोट्या जगात तो आयुष्यभर जगतो, जे त्याच्यासाठी एक नरक आहे!'

"बस!" सर्व दिवे लावून झाल्यावर माझ्याकडे वळून तो मला म्हणाला,

"कोकम करून आणतो." म्हणत तो किचनकडे चालता झाला.

"थंडीत नको." मी त्याला म्हणालो.

"डोन्ट वरी! तुला थंडी वाजणार नाही याची मी काळजी घेईन!" असं बोलत तो उजव्या बाजूला ओठावर स्मितरेषा कोरत आत गेला...

मी सोफ्यावर विसावलो. तसाच... नाराज... निरुत्साही...

मिस्टर वाघ असं का म्हणाला, की मला थंडी वाजणार नाही याची काळजी तो घेईल... काय तो काही गंभीर सांगण्याच्या विचारात आहे का? सांगू शकतो! तो काहीही सांगू शकतो... आणि त्याला मलाच तोंड द्यायचं आहे... मी त्याचा कन्फेशन बॉक्स जो आहे... पण... पण माझा कन्फेशन बॉक्स कोण आहे...? कोण आहे...?

ग्लासचा टीपॉयवरचा आवाज माझी तंद्री भंग करून गेला. मी डोळे उघडले. त्याने आईस बकेट देखील सोबत आणले होते. तेही त्याने टेबलवर आदळले.

"बाहेर ये!"

"अं?!"

"अपराधीपणाच्या भावनेतून बाहेर ये!" मिस्टर वाघ आता गंभीर झाला होता.

आपल्या शांत व मिश्किल स्वभावाने माझ्या मनातील चलबिचल दूर करण्याचा त्याचा प्रयत्न गडबडला असल्याने तो असा झाला असावा...

"कसा? तुमच्यासाठी ते सोपं आहे... पण मी... मी एक सामान्य माणूस आहे..." मी कळकळलो.

"का? मी माणूस नाही?" वाघने मला विचारलं.

"तुमच्या सवयीचं आहे हे! माझ्या नाही!" मी नाराजीत बोललो.

"सूरज बरेच महिने कदाचित वर्षचं झालं असेल त्याला. तू अजून त्या विचारात आहेस?"

"हो! मी जे काही... मला ते विसरणं शक्य नाही..." मी अपराधी बोललो.

"सो बी विथ ईट! ॲक्सेप्ट ईट अँड लिव्ह फर्दर!" तो थोडं चिडूनच म्हणाला.

मी काहीच बोललो नाही. मला जोरात ओरडायचं होतं... पण मी गप्प राहिलो...

माझी अवस्था बघून तोच पुढं म्हणाला...

"अजूनही मी हेच म्हणेन, की तू योग्य तेच केलंस! तुझी काही चूक नव्हती...!"

"योग्य! तुमच्या दृष्टीने! अशी भावना माझ्या मनाला कशी शिवू शकते?" अखेर माझा वैताग फुटला.

"मघाशी तूच म्हणालास, तू माणूस आहेस!" कोकमचा ग्लास ओठांना लावत तो बोलला.

"पण तुमच्या दृष्टीत प्रत्येक गुन्ह्याला शिक्षा आहे! मग मला का जिवंत ठेवलंय?" मी आसवं ढाळत अतीव वेदनेनं विचारलं.

"कारण माझ्या नजरेत तू गुन्हेगार नाहीस! यु आर इनोसेंट! आणि हेच तुझ्या जिवंत असण्याचं मुख्य कारण आहे! तू निष्पाप आहेस सूरज! तू जो निर्णय घेतलास, तो कोणाच्या तरी भल्यासाठी होता... अशा व्यक्तीच्या... जिला तू कधी पाहिलं देखील नव्हतंस... इतका उदात्त तर मीही अजून झालो नाही... तू खूप मोठं पद प्राप्त केलं आहेस..." तो गंभीर सुरातच म्हणाला.

"मी आपल्याला आग्रह केला होता, की याबद्दल आपण सर्वांना सांगावं... पण आपण माझं ऐकलं नाही...!" मी नाराजीत बोललो.

"नाही मित्रा! प्रत्येकाने आपल्या कर्माचा भार स्वतः व्हायचा असतो! आणि शिवाय सत्याने वागणं हे माझं काम आहे. आणि

तुझं काम आहे ते सत्य सर्वांना सांगणं!" मिस्टर वाघ गोड मनमोहक हसत म्हणाला.

तर अशा प्रकारे आमची पुनःभेट झाली. माफ करा आम्ही कशाविषयी बोलतोय हे आपल्याला समजत नसेल... पण जोपर्यंत माझ्यात हिंमत येत नाही, कदाचित तोपर्यंत ही घटना सर्वांसाठी कदाचित अनभिज्ञच राहील... तर त्यामुळे मिस्टर वाघने आमच्या या भेटीत सांगितलेली घटना मी येथे विदित करत आहे...

## २. ब्लडी नाईफ...

एक गजबजलेलं अनामिक रेल्वे स्टेशन... गावाहून येणारे, गावी जाणारे, तर काही पुढच्या स्टेशनपर्यंत जाणारे सारे प्रवासी आपापल्या गडबड धांदलीत होते...

आणि अशीच धांदल त्या भाऊगर्दीत हरवू पाहणाऱ्या आणखी एकाची चालली होती... पण त्याची ही गडबडच त्याला रेल्वे पोलीस ऑफिसर्सच्या नजरेत भरवून गेली. त्याला बाजूला घेतलं गेलं. इंटेरोगेशन रूममध्ये त्याची बॅग चेकिंग साठी घेतली गेली...

बॅगमध्ये कपड्यांच्या मधोमध एक रक्ताने माखलेला चाकू ऑफिसरच्या हाती लागला. त्याने त्या व्यक्तीवर एक नजर टाकली. त्या व्यक्तीसाठी हे अनपेक्षित होतं. आणि ते त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं... पण काही प्रतिक्रिया देण्यासाठी तोंड उघडण्याची त्याच्यात शक्ती नव्हती... तो सुन्न पडला होता. उभारलेला तो तोल जाऊन त्याच्यामागे असलेल्या खुर्चीत आदळला. त्याची नजर व स्वाभाविकपणे मान खाली गेली. तो शोकात बुडाला होता. हा शोक त्याच्या दुर्दैवी प्रारब्धाचा होता...

"आपल्याला शस्त्र बाळगल्याच्या आरोपावरून व संभावित खुनाच्या आरोपावरून अटक करत आहोत. शांत बसण्याचा

तुम्हाला पूर्ण अधिकार आहे. जे बोलाल, ते तुमच्या विरोधात वापरले जाण्याची शक्यता आहे. तुम्ही वकील करू शकता. तुमच्याकडे तेवढी क्षमता नसेल व आपली इच्छा असेल, तर सरकार तुम्हाला वकील देईल!" ऑफिसरने कायदा पढवला.

पण बोलण्याची सूद त्या व्यक्तीला होती कुठे हे त्या ऑफिसरच्या लक्षात आले नसावे. आणि आले असले तरी त्याला आपले कर्तव्य पार पाडणे आवश्यक होते. आरोपीला अटक का केली जात आहे हे त्या आरोपीला माहिती असायला हवे हा नियम आहे त्यामुळे कॉन्स्टिट्यूशनल लॉच्या कठीण सेक्शन्स व क्रिमिनल लॉ प्रोसिजरच्या किचकट कोडांत न शिरता त्याने सोपे करून सांगितले होते...

आणि त्यानं तो चाकू उचलून सोबतच्या ऑफिसरला हँड ओव्हर केला.

"यांना पोलीस स्टेशनला घेऊन जा. आणि हा चाकू फॉरेन्सिकला पाठवायला सांगा...!"

खरं ऑफिसरचा एकही शब्द त्या व्यक्तीच्या कानात शिरला असेल यात शंका होती...

त्याचा चाकू घेऊन जाण्यास जेव्हा ऑफिसर वळला, तेव्हा तो माणूस हरकतीत आला. तो त्या ऑफिसरकडे धावला. त्याचा हात

वळवून त्याने त्याच्या हातातील चाकू स्वतःच्याच मानेत घुसवून घेतला!!!

धारोष्ण रक्ताच्या चिळकांड्या अंगावर उडूनही इंटेरोगेशन रूममधील दोघे ऑफिसर्स गोठलेले!!!

पोलीस हेडक्वॉर्टर्समधून एसपीच्या समोर बसलेल्या मिस्टर वाघ समोर एक भला मोठा जाडजूड रिपोर्ट आदळला गेला... वाघने धावती भेट घ्यावी तशी चिमटीतच त्या रिपोर्टची पानं पकडून झर्र्कन पालटली... त्याच्या भुवया उंचावल्या होत्या.

"इतके मर्डर्स...? ही एकच केस आहे?" वाघने विचारलं.

"सत्तावीस मर्डर्स! पॅटर्न्स वेगळे आहेत, पण एकाच व्यक्तीने हे केलंय असं वाटतं..."

"मग इतके दिवस मला न बोलावता का गप्प बसलात?"

मिस्टर वाघ समोर रिपोर्ट आपटलेला एसपी सुशांत नेने याने उत्तर दिलं नाही.

"फाजील आत्मविश्वास! अं?" वाघ त्याचा उपहास करत उद्गारला.

"तुम्ही मदत करणार आहात, की नाही तेवढं सांगा!" नेने रागाने बोलला.

"त्यासाठीच मी इथं आहे! पण हे एकच व्यक्तीने केलं आहे असं तुम्हाला कशावरून वाटतं?"

"रिपोर्ट पाहिल्यावर तुमच्या लक्षात येईल." नेने थेट उत्तर न देता खोचक बोलला.

मिस्टर वाघला केस कळावी यासाठीच तर त्याला तो रिपोर्ट दिला होता हे त्याचे मत!

वाघ हसला आणि त्यानं ती भलीमोठी फाईल उघडून पाहिली. खरडलेली पानं वळगून तो अटॅच्ड् फोटो पाहू लागला. मेलेल्या सत्तावीस लोकांचे ते फोटो. कोणी स्त्री, कोणी पुरुष, कोणी वृद्ध, कोणी तरुण... कोण सापडेल त्याला मारले गेले होते... मारण्यासाठी वापरलेली शत्रं ही नक्कीच वेगळी होती हे घावांवरून व पंचनामा व नंतर पोस्टमार्टम वेळचे फोटोज पाहून देखील समजत होते... फोटोत एकसारखं वाटणारं काही नव्हतं... फक्त एक गोष्ट सोडून...

त्या डेडबॉडीज तुकडे तुकडे करून दीड फूट रुंद, अडीच फूट लांब व सव्वा फूट खोली असलेल्या आयताकृती टिनच्या बॉक्सेसमध्ये बंद करून ते जिल्ह्याच्या वेगवेगळ्या निर्जन ठिकाणी सोडून देण्यात आले होते... आणि त्यांतील काही टिनबॉक्सेसवर

लाल ऑईल पेंटने गोलाकार करून त्याच पेंटने काही नंबर लिहिले होते... सिरीयल नंबर्स्...

पण त्या नंबर्सचा अर्थ लागणं सहज नव्हतं. त्याला काही अर्थ तरी होता, की नव्हता हेच समजत नव्हतं. प्रत्येक प्रोबॅबिलिटी ते ते स्थानिक पोलीस, फॉरेन्सिक, लोकल क्राईम ब्रँच सर्वांकडून चेक करण्यात आली होती... पण काही अर्थ लागला नव्हता... तरीही ते निर्थक रिपोर्ट्स देखील फाईलला पिनअप केले गेले होते.

मिस्टर वाघ ते सगळं टाळून मृतांचे फोटो जवळून पाहण्यात गुंग होता...

सुशांत नेनेला ते फोटोज पाहवतही नव्हते. रिपोर्ट आणणारा कॉन्स्टेबल तर ते रिपोर्ट टाकून तत्क्षणीच निघून गेला होता. प्रत्यक्षदर्शी एक घटना पाहिल्यावर त्याला न राहवून उलटी झाली होती आणि अजूनही त्याच्या पोटात ढवळत होते. म्हणून फोटो उघडण्याआधीच त्याने सुशांतची परवानगी देखील न घेता त्याचे केबिन त्यागले होते. पण विचलित होईल तो मिस्टर वाघ कसला? तो निवांत ते घृणीत फोटो पाहत होता...

"तर यामुळेच तुम्हाला वाटतंय, की हे कोणा एकाच व्यक्तीचं काम आहे...?"

"होय!"

"हा फोटो! अक्युज्ड्चा आहे!" वाघ रेल्वे स्टेशनवर सापडलेल्या माणसाचा फोटो पाहून बोलला.

"हो. त्याने इंटेरोगेशन दरम्यान आत्महत्या केली. त्याच्याकडे सापडल्या चाकूवरील ब्लड सॅम्पल्स नवीन सापडलेल्या बॉडीच्या ब्लडशी जुळतायत. हा त्या बॉडीचा फोटो." नेने माहिती पुरवत बोलला व त्याने वाघच्या हातातील फाईलचे पान पालटत वाघला एका डेडबॉडीचा फोटो दाखवला.

"आणि त्यानंतरही खून थांबले नाहीत." वाघ बोलला.

"हो. शिवाय इतर खूनांशी अक्युज्ड्चा काही संबंध नाही. म्हणून हे एका व्यक्तीचं काम नाही हे स्पष्ट होतं!" नेनेने चित्र पूर्ण केले.

"पण वाहत्या गंगेत हात धुणारे पण असतात खरं..." वाघने वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला.

"तुम्हाला नक्की काय म्हणायचं आहे...?" सुशांतनं पुढं सरकत विचारलं.

"या घटनेबद्दल कळलेले लोक ही पद्धत वापरून खून करू शकतात..." वाघने तर्क दिला.

"म्हणजे तुम्हाला असं म्हणायचं आहे, की होमिसाईडची ही सेम पद्धत वापरून काही लोक आपले स्वार्थ साधत आहेत?" सुशांत चकित होत बोलला.

"मी फक्त शक्यता बोलून दाखवतोय!" मिस्टर वाघ म्हणाला,

"बरं माझ्या राहण्याचं काय?" वाघने विचारलं.

"पोलीस कॉर्टर्समध्ये आपली सोय केली आहे." नेने उतरला.

"डोन्ट बॉदर्! माझी मी सोय करतो. बिलाचे तेवढे बघा!" वाघ बोलला.

आणि त्यानं नेनेचं केबिनच नाही, तर पोलीस हेडकॉर्टर्स सुद्धा त्यागलं. त्याचं असं विक्षिप्त वागणं त्याच्यासाठी सहज व स्वाभाविक असलं, तरी नेनेला हा न कळणारा प्रकार होता.

अजून खूप काही चर्चिलं जाणं बाकी होतं आणि हा निघून गेला होता... फाईल्स् पण तिथंच सोडून...

## ३. अनादर मेटल कॅस्केट...

मिस्टर वाघ सकाळच्या शुभप्रहरी एका सुबक घरासमोर उभा होता... सुरक्षेसाठी काही वर्दीवाले भोवती तैनात होतेच. त्याने बेल वाजवली. दार एका सव्वीस - सत्तावीस वर्षांच्या तरुणीने उघडले.

"सुशांत नेने आहेत?" मिस्टर वाघने विचारलं.

"हो! आपण?" तिने विचारलं.

"त्यांनीच बोलावलं आहे." वाघनं सरळ उत्तर दिलं नाही.

"बघते!" असं म्हणून ती मुलगी मिस्टर वाघला दारातच ठेवून आत गेली.

त्याने मान डोलवून स्मित केलं आणि तो इतस्ततः पाहू लागला. ज्या लॉनमधून तो आला होता, तिथेच एकजण झाडफुलांना पाणी घालत असलेला त्याला दिसला. तो रोखून मिस्टर वाघकडेच पाहत होता. गेटमधून मुख्य दरवाज्याकडे येत असताना कदाचित मिस्टर वाघने त्याला नोटीस केले नव्हते. (पण नाही त्याच्या ध्यानातून काही सुटत नाही. बहुदा वाघने मुद्दाम त्याच्याकडे पाहणं टाळलं असेल...)

पण आत्ता मिस्टर वाघ त्याच्याकडे पाहत असताना देखील त्या तरुणाची वाघ वरील नजर ढळली नव्हती.

"आपण मिस्टर वाघ का?"

वाघला सुमधूर आवाजात प्रश्न कानी पडला. तसा त्याने आवाजाच्या दिशेने रोख केला. मघासची ती तरुणी मिस्टर वाघला पृच्छा करून त्याच्या उत्तराची वाट पाहत उभी होती.

"हो!" त्या मुलीकडे बघून वाघ उद्गारला.

आणि त्याने पुन्हा त्या झुडपांना पाणी घालणाऱ्या मुलाकडे नजर टाकली. आता तो त्याच्याकडे न पाहता या मुलीकडे टक लावून पाहत होता.

"आत या!" त्या मुलाकडे पाहत उभ्या मिस्टर वाघला ती म्हणाली.

मिस्टर वाघ तिच्या मागून लिव्हिंग रूममध्ये आला.

"बसा! दादा येतोय!" ती म्हणाली आणि आत निघून गेली.

मिस्टर वाघ बसला. सुशांत येईपर्यंत त्याचा नेहमीचा चाळा चालू झाला... समोरील टेबलवर पडलेले काही पेपर्स घेऊन तो चाळू लागला.

"वेलकम मिस्टर वाघ!" आतून येत सुशांत नेने बोलला.

तसा वाघ उभा राहिला.

"हॅलो!" वाघने अभिवादन केलं.

सुशांतने वाघकडे येत त्याच्याशी हस्तांदोलन केलं.

"तातडीने बोलवून घेतलंत?" वाघने विचारलं.

"तुम्ही फाईव्ह-स्टार मध्ये राहताय असं समजलं. एवढा खर्च आमच्या डिपार्टमेंटला सोसणारा नाही याचा तरी विचार करायचात?" शुशांत हसत पण खोचक बोलला.

"आपल्याला परवडत नसेल, तर आपण दुसरा कोणी पाहू शकता. मीच हवा असा काही नियम नाही!"

"कामाचं बोलूयात?" वाघला प्रतिउत्तर देणं टाळत नेने विषयाचं बोलला!

यावर मिस्टर वाघ नेहमीचं स्मित करत हसला.

"आत्ता तुम्ही नेमकं बोललात! आधी कामचंच बोलूया! पर हेड फाईव्ह लॅक्स्!" वाघ लालची हसत बोलला.

"हे जास्ती होतायत!" सुशांतने विरोध दर्शविला.

"मी तर वीस लाख चार्ज करणार होतो! पण आधीच तुम्ही खर्चाचे रडणे रडलात! आणि हो; जितकी माणसं अधिक मरतील, तितके पैसे वाढत जातील!" वाघने स्पष्ट केलं.

"केस सॉल्व्ह होईपर्यंत तुम्ही आमच्या डिपार्टमेंटला कंगाल करून सोडाल..." नेने वाघ सोबत सोफ्यावर बसला.

"माझ्या कामाचं झालं, आता तुमच्या कामाचं बोला!" वाघ लोभी हसत म्हणाला.

सुशांतने इरिटेटेड् डोकं हलवलं आणि टेबलवर तयार ठेवलेला लॅपटॉप उघडला. त्याला पेनड्राईव्ह जोडलेलाच होता.

"एवढ्या केसेस झाल्या, पण त्याचे एकही सीसीटीव्ही फुटेज सापडले नाही. मर्डरर कॅसकेट्स आणून टाकण्याआधी सर्व कॅमेरे तोडत होता." लॅपटॉप चालू करत नेने बोलला.

"पण फोडतानाचे फुटेज असेलच की!" वाघचा प्रश्न.

"हो! पण त्याचाही काही उपयोग नाही. कॅमेऱ्याच्या टप्प्यात न येता ते फोडले जायचे! त्यामुळे आधीच्या फुटेजेसचाही काही उपयोग नाही!" नेनेचं स्पष्टीकरण.

"मग यावर काय दाखवणार आहेत? पिक्चर?" वाघची चेष्टा.

मिस्टर वाघच्या विचारण्याने नेनेच्या मुखमंडलावर चिडीची एक रेषा उमटली, पण तिने ज्या वेगाने नेनेच्या मुखाचा ताबा घेतला होता, तेवढ्याच लवकर ती मावळली देखील!

"एक फुटेज आहे! यावेळी कॅमेरा फोडताना तो खूनी दूरवर पण कॅमेऱ्यासमोरच उभा होता!" सुशांत नेने बोलला!

"गुड! मग तर तुम्हाला तो सापडेलच! आता माझी गरज नाही!" वाघ तिथून जाण्याच्या बेतात होता.

"आधी फुटेज पाहून घ्या!" सुशांतने त्याला रोखलं.

नेनेच्या बोलण्यावर वाघ पुन्हा सोफ्यावर स्थिर झाला. नेनेनं फुटेज प्ले केलं.

व्हिडीओमध्ये एक इसम दगड फेकून सीसीटीव्ही कॅमेरा फोडताना दिसत होता... पण त्याने स्वतःला नखशिखांत झाकून घेतलं होतं!

"आत्ता तुम्हीच सांगा, काय अर्थ आहे या व्हिडिओला? यातून काहीच माहिती मिळत नाहीए! एव्हीडेन्स असून नसल्यासारखा आहे. म्हणून म्हंटलं एकदा तुम्हाला दाखवावा!" नेने चिंतित भावमुद्रा करून बोलला.

"आशा आहे जिथे ही घटना घडली आहे, त्या एरियातील असले सर्व फुटेजेस आपण गोळा केले असतील?" वाघने प्रश्न केला!

"हो!"

"थँक्स! तेवढे डोके चालवल्याबद्दल!" वाघ डिवचत बोलला!

राग येऊन चिडण्याची मुभा नेनेला नव्हती. तो फक्त चरफडू शकत होता, तेही मनातल्या मनात!

"प्ले करा!" त्याची स्थिती लक्षात येऊन देखील दुर्लक्ष करत वाघ म्हणाला.

मग नेनेने पुढील व्हिडीओ प्ले केले. वाघ प्रत्येक व्हिडिओ नीट पाहत होता. हार्डली आठ-दहा फुटेजेस असतील आणि त्याही प्रत्येक काही दहा - वीस सेकंदाच्या. पाहायला जास्त वेळ जाणार नव्हता... गेला नव्हता. प्रत्येक व्हिडीओ सारखा होता. स्वतःला

पूर्णपणे झाकून घेतलेल्या व्यक्तीने लांबून दगड फेकून कॅमेरे फोडले होते.

लांब उभारण्याचा उद्देश मिस्टर वाघच्या लक्षात आल्याशिवाय राहिला नाही... पण नेनेला हे अनाकलनीय होतं...

"मला कळत नाही; याला कॅमेरे फोडायचे आहेत तर हा लांबून दगडं का फेकतोय? तसही याने स्वतःला इतकं झाकून घेतलं आहे, की हा कॅमेऱ्याच्या जवळ आला, तरी काही फरक पडणारा नव्हता..." नेनेचा गोंधळ उडाला होता.

"तो जवळ आला असता, तर त्याच्या डोळ्यांचा रंग दिसला असता! म्हणून त्याने ही काळजी घेतली आहे! न पाहता कॅमेरे तर तो फोडू शकत नाही ना!" वाघ हसत म्हणाला.

"ओह! आयसी! पण याला शोधायचा कसा? जरुरी नाही, की हा त्याच एरियात राहत असावा!" नेनेचा प्रश्न.

"अजिबात जरुरीचं नाही!" वाघ तडख म्हणाला.

"मग?"

"हा इन्सिडेंट कुठे झाला आहे?"

"माधवनगर!"

"तिथेही पूर्वीसारखे मेटल कॅस्केट मध्येच डेडबॉडी सापडली?"

"हो! तिचेही तुकडे केले गेले होते!"

"आणि ते पाहून तुमचा हेडकॉन्स्टेबल पुन्हा ओकला असेल?" वाघ चेष्टा करत म्हणाला.

"ते जाऊ दे!" नेनेला वाघशी कसं डील करावं तेच समजत नव्हतं. त्यामुळे तो थोडा रागाने म्हणाला.

"बरं सिरियस्ली. विक्टीम कोण आहे?" वाघने विचारलं.

"तेवीस वर्षांची एक मुलगी. चिकित्सा त्यागी!"

"ओह! तर मृतांची ओळख पटली तर! खूपच फास्ट आहे आपली यंत्रणा! आय मस्ट से!" वाघ प्रशंसा करत म्हणाला.

पण यातही सुशांत नेनेला वाघचा उपहास जाणवलाच!

"पाच लाख एड करा!" वाघ मागे रेलत डोक्यामागे हात घेऊन बोलला!

"ते पाहता येईल! इन्वेस्टीगेशन बद्दल आधी बोला!" नेने उखडून म्हणाला.

इतक्यात दरवाजा उघडलेली मुलगी सुशांतची बहीण चहापाण्याचं घेऊन आली. तिने एक कपबशी नेने समोर ठेवली आणि दुसरी वाघला ऑफर केली.

"सुंदर!" वाघ कपबशी हातात घेत त्या तरुणीकडे एकटक रोखून पाहत ओठांवर तेच मोहक स्मित घेत उद्गारला.

पण कदाचित त्याच्या तोंडून निघालेले हे शब्द त्या तरुणीला संकोचून गेले असावेत कारण वाघने कपबशी हाती घेताच ती तशीच आत पळाली होती!

मिस्टर वाघची नजर तिला फॉलोव्ह करत असतानाच त्याची नेने सोबत नजरानजर झाली. तो जरा रागानेच वाघकडे पाहत होता.

"डोन्ट टेक मी रॉन्ग. आय हॅड नो बॅड इंटेन्शन! आय वॉज जस्ट एप्रिशिएटिंग हर् ब्युटी. प्लिज लेट हर् नो!" वाघ मृदू आवाजात बोलला.

"शी इज माय सिस्टर!" नेने म्हणाला. चेहऱ्यावर राग तसाच.

"नांव?" वाघने विचारलं.

"रिद्धीमा!"

"लक्ष्मी-सरस्वतीचं नांव! फुल ऑफ लव! पर्ल! त्यांच्या नांवातच प्रेम आहे!" वाघ हरवल्यासारखा ओठांवर स्मित घेऊन बोलला.

तो असा हरवण्यामागचं कारण त्यावेळी फक्त त्याला माहित होतं. त्याला त्या मुलीच्या दुर्दैवाची जाणीव झाली होती!

"हं? काय?" नेनेने गोंधळून विचारलं.

"त्यांच्या नांवाचे अर्थ!" वाघ भानावर येत नेनेकडे पाहून बोलला.

"शी इज प्रिशियस लाईक अ पर्ल! टेक केअर ऑफ हर्!" वाघ बोलला आणि जाण्यास उठला!

"निघाताय?"

"हो का मी इथं रहावं अशी इच्छा आहे का काय तुमची?" वाघ मिश्किल बोलला.

"एक्च्युअली येस!" सुशांतने मात्र ते सिरियस्ली घेतलं.

"का खर्च वाचवण्यासाठी?" वाघ मस्करी करत विचारता झाला.

"नाही आपल्याला पूर्णवेळ काम करता येईल यासाठी!" सुशांत ठाम बोलला.

"तुम्हाला चालेल, पण तुमच्या बहिणीला चालेल का?" वाघ स्वतःच हसला,

"नको! आपल्या बहिणीला माझ्या इथं असण्यानं अवघडल्यासारखं होईल! मी आहे तिथं ठीक आहे. हा; पण तुम्हीच माझ्या हॉटेलला शिफ्ट होऊ शकता!" वाघने ऑफर दिली.

"नको!"

"आणखी खर्च झेपायचा नाही!" वाघ सुहास्य घेऊन सुशांतच्या मनातील वाक्य बोलला.

मिस्टर वाघ लोकांच्या मनातलं ओळखतो म्हणजे त्याच्याकडे काही दैवी शक्ती वगैरे आहे असे नाही. परिस्थिती पाहून कोण काय विचार करत असेल हे तो ठीक ताडतो एवढंच. बहुदा त्या बिकट परिस्थितींमध्ये लोकांना यानेच टाकलेले असते. मग याला लोकांच्या मनातील ओळखायला काय अवघड? हा; तुम्ही त्याला 'मनकवडा' म्हणू शकता, पण दैवी नाही!

मात्र सुशांत आश्चर्याने वाघकडे पाहू लागला. पण वर म्हंटल्याप्रमाणे यात चमत्कार असा काही नव्हता. सुशांत खर्चाचा विचार करतोय हे वाघला माहीतच होतं.

"आत्ता तरी थोडावेळ थांबा! शिवाय तुम्ही माझ्या प्रश्नाचं उत्तर दिले नाही. आपला प्लॅन ऑफ एक्शन काय असणार आहे?"

इतक्यात तो बाहेर झाडांना पाणी घालणारा मुलगा उजव्या पायाने लंगडत आत निघून गेला. तो आत जाईपर्यंत वाघ त्याच्याकडे पाहत होता. आणि तो वाघकडे...!

नेनेला हा प्रकार समजेना तो चेहऱ्यावर गोंधळ घेऊन मिस्टर वाघकडे पाहत होता.

"मला सोडायला येताय ना?" वाघ म्हणाला आणि घराबाहेर पडला.

सुशांत पण मग नाईलाजाने त्याच्यामागे गडबडीने धावला.

लॉनमध्ये वाघ थांबला. सूंदर टपोऱ्या उमलेल्या गुलाबाच्या फुलांपाशी तो थांबला म्हणून मग नेनेला देखील थांबावे लागले.

"फूलं सूंदर आहेत. रिद्धीमा यांनी लावलीत?"

"नाही. निशांतनं!"

"म्हणजे तो मुलगा?"

"हो!"

"त्याचा काय सिन आहे? तुमचा घरगडी!"

"तो घरगडी नाही. एक बेवारस मुलगा आहे. चार महिन्यांपूर्वी एका ट्रिप वरून येताना रस्त्यात जखमी सापडला होता. त्याला मदत करावी म्हणून घेऊन आलो. सोबत रिद्धीमा होतीच. ती डॉक्टर आहे. म्हणून मग त्याला सोबतच घेऊन आलो. इंज्युरी डोक्याला होती. कोणीतरी मोठा आघात केला होता. जखम होती, पण जिव्हारी लागण्यासारखी खोल नव्हती. लवकर रिकव्हर झाला, पण मग नंतर डायग्नोस झालं, की तो एमसीएमने ग्रसीत आहे. त्याचं नांव पण आम्हीच ठेवलेलं आहे. त्याची ओळख अजून कळलेली नाही." सुशांतने माहिती पुरवली.

"एमसीएम, म्हणजे माईल्ड कॉग्निटीव्ह इम्पॅरमेण्ट?" वाघनं विचारलं.

"येस! तो दैनंदिन गोष्टी करायच्या सोडल्या, तर सगळं काही विसरला आहे. इव्हन भाषा! म्हणून मग त्याच्या फॅमिलीचा शोध

लागेपर्यंत त्याला सोबत ठेवण्याचा निर्णय घेतला. रिद्धीमाचं म्हणणं होतं, की तो सोबतच राहिल्याने तिला त्याला चांगली ट्रीटमेंट देता येईल."

"त्याला हृदयाचा काही आजार?"

"माझ्या माहितीत तर नाही."

"त्याच्यावर लक्ष ठेवा!" मिस्टर वाघचा सतर्क सल्ला.

"का? तुम्हाला काही संशय?" सुशांत जरा शंकीत व चिंतित झाला.

"नाही. नाही. मला वाटतं तो तुमच्या बहिणीवर प्रेम करतो. द वे ही लुक्स एट हर्, इट डिफाईन्स एव्हरीथिंग." वाघ स्मित करत म्हणाला.

"तसं काही नाही." नेने हसला,

"तो तिच्याबद्दल कृतज्ञ आहे इतकंच." तो म्हणाला.

"हो असेल. बरं निघतो!" वाघने सुशांतशी हातमिळवणी केली.

हे नुसतं शेकहॅन्ड नक्कीच नव्हतं. मिस्टर वाघनं नक्कीच मनाशी काही ठरवलं होतं!

वाघ त्याच्या 'मर्सिडीज-बेंझ इक्यूसी' या इलेक्ट्रिक कॉम्पॅक्ट एसयूव्हीमध्ये बसला आणि त्याची गाडी निघाली... कुठे...? सुशांत नेनेही त्याच विचारात होता...!

माधवनगरला (बदललेले नांव) मिस्टर वाघची गाडी येऊन थांबली. ज्या ज्या ठिकाणीचे सीसीटीव्ही फुटेज त्याने पाहिले होते, त्या त्या ठिकाणी त्याने भेटी दिल्या.

त्या रस्त्यावर भटकत शेवटी तो त्या पार्कमध्ये आला, जिथे शेवटची ट्रंक सापडली होती. वाघ फुटेजमध्ये त्याने पाहिलेल्या ठिकाणी आला. त्याने समोर नजर टाकली. सीसीटीव्ही अजूनही फुटलेल्या अवस्थेतच होता. तो बदलण्यात आला नव्हता. मिस्टर वाघ हसला. त्याच्या हसण्याचे कारण हे होते, की हा सीसीटीव्ही आता वर्षानुवर्षे असाच राहणार होता... फुटलेल्या अवस्थेत... शेवटी सार्वजनिक ठिकाणी हे... कोण लक्ष देतो...?

असो, त्या फुटेजमध्ये दिसलेल्या एका सूचना फलकापाशी वाघ उभा होता. फुटलेल्या सीसीटीव्हीवरून नजर हटवून त्याने त्या साइन बोर्डवर नजर वळवली. स्वतःचा मोबाईल खिशातून काढून त्याने मोजपट्टीचे एप चालू केले. वर्चुअली त्याने त्या साइन बोर्डची उंची मोजली आणि तो पार्क बाहेर निघून गेला. बाकी रेकी करण्याची त्याला आवश्यकता नव्हती. त्याला हवी ती माहिती त्याने मिळवली होती आणि त्यामुळे त्याला पार्कमधील क्राईम स्पॉट पाहण्याची आवश्यकता देखील वाटली नव्हती!

पार्कमधून बाहेर पडून त्याने सुशांत नेनेला फोन लावला...

"हा, नेने! वाघ बोतोय!"

"बोला!" पलिकडून नेनेचा प्रतिसाद.

"तुमचं इन्वेस्टीगेशन नॅरो करतोय. तुम्हाला पाच फूट सात इंच उंचीचा माणूस शोधायचा आहे! तोच तुमचा गुन्हेगार आहे!" वाघने सूचना वजा हुकूम दिला!

"तुम्ही हे कसं..." नेने अविश्वासाने बोलणार तोच वाघनं त्याला टोकलं,

"ते सोडा. सांगतोय तेवढं करा!" आणि त्याने फोन कट केला.

फुटपाथला लागूनच असलेल्या पार्किंग मधील कार मग वाघने जवळ केली आणि तो निघाला...

"तुम्हाला गुन्हेगाराची उंची कशी कळली?" मी आश्चर्याने विचारलं.

मिस्टर वाघ नेहमीचं गोड हसला. तो कोरडा होऊन कपडे वेगळे करून त्याची अलीकडची कामगिरी उलगडत माझ्या समोर बसला होता. एक लिटरचा कोकम कॅन त्याने एकाचवेळी सरबत करून आणला होता. सोबत बर्फाची बकेट होती. मी समजलो होतो, खूप वेळ जाणार आहे...

"ज्या साइन बोर्डजवळून तो पास झाला होता, त्यामुळे साइन बोर्डची उंची मोजल्यावर त्या माणसाची उंची लक्षात आली. एवढं सोपं आहे हे!" तो कोकमचा शिप घेत म्हणाला.

त्यावेळी माझं माझ्या हातातील कोकमकडे लक्ष नव्हतं, पण आता आठवल्यावर जाणवतं आहे, की कोकम नॉर्मल रूम टेम्प्रेचरला आलं होतं...

"त्या ट्रंक्सच्या बद्दल काही लिंक्स? म्हणजे त्यावरील ते लाल अक्षरातील काही लिहिलेलं... ते कसले संदेश होते? की आणखी काही?" मी विचारलं.

"विशेष असं काही नव्हतं! सगळ्याच ट्रंकवर ते लिहिलेलं होतं असंही नाही. ते कोणतं कोडिंग नव्हतं. म्हणून क्राईम ब्रँच आणि फॉरेन्सिकला पण त्याचा अर्थ लागला नाही!"

"मग रँडम्ली लिहिलं होतं का?"

"रँडमली असंही नाही!" वाघ म्हणाला.

"मग काय?" मी विचलित होऊन ओरडलो.

आणि मग माझा मलाच प्रमाद लक्षात आला. मी मिस्टर वाघवर आवाज चढवण्याची चूक केली होती...

पण मी तरी काय करू तो सरळ काही सांगतच नव्हता...

"मला अजूनही लिंक लागत नाही... नक्की तुम्ही ही केस सोडवलीत कशी? कारण मुळात घडत काय आहे हेच समजत नाही आहे..." मी शांत होत म्हणालो.

मला जे वाटत होतं ते शब्दांत व्यक्त होत नव्हतं... काय वाक्यरचना करावी हे समजत नव्हतं... पण कदाचित मिस्टर वाघला माझी मनःस्थिती लक्षात आली असावी...

तो म्हणाला,

"सुरवातीला मीही अंधारातच होतो. कसं पुढे जावं हे मलाही समजत नव्हतं..." तो बोलला.

मला माहित आहे मिस्टर वाघला सर्वसाधारण व पारंपरिक मार्गाने गुन्हेगाराचा शोध घेणे आवडत नाही. त्याचं सगळंच वेगळं असतं. तो 'सुशांत आणि टीम'ला कामाला लावून त्यात त्यांना गुंतवून ठेवून इकडे आपली स्वतःची वेगळी शोध मोहीम राबवणार होता...

"तुम्ही माझी थट्टा करताय!" मी त्याच्याकडे टक लावून पाहत विचारलं.

तो पुन्हा हसला...

"काही ट्रेसेस?" मिस्टर वाघ सुशांतच्या केबिनमध्ये बसून त्याला विचारत होता...

"नाही. पाच सात उंचीची किती तरी माणसं जिल्ह्यात असतील. त्यांतील नेमका कसा ओळखणार आणि तेही इतक्या लवकर?" नेने हताशेने म्हणाला.

इतक्यात चहा येऊन वाघसमोर ग्लास ठेवला गेला. चहावाला इसम दुसरा ग्लास सुशांत समोर ठेवणार तोच सुशांतने हात पुढे करून ग्लास आपल्या हातात घेतला.

"घ्या. चहा घ्या!" आपल्या ग्लास ओठांजवळ करत नेने वाघला म्हणाला आणि त्याने घोट घेतला.

"या जिल्ह्यात तशा मेटल ट्रंक्स कोण आणि कितीजण बनवत असतील? ते तर जास्त नसतील... सात पाच उंची असणाऱ्यांपेक्षा तर कमीच असतील नाही?" वाघ चहावाल्याच्या एप्रनच्या खिशातून घेऊन कॅशु कुकीजचं पाकीट फोडत म्हणाला.

वाघने नेनेला बिस्कीट घेण्यासाठी हात पुढे केला. 'नको' नेने मानेनेच म्हणाला.

"कॅस्केट्स ज्या ठिकाणी आढळली आहेत त्या भागात आधी चौकशी होऊ देत. आणि मग टप्प्याटप्प्याने सर्चिंग एरिया वाढवत न्या!" वाघने प्लॅन ऑफ एक्शन ठरवून दिला.

"पण मिस्टर वाघ, तुम्ही म्हणता त्या व्यक्तीबद्दल त्याची उंची सोडली, तर अजून काही स्पेसिफिक माहिती तुम्हाला सांगता येईल का? त्याला स्पॉटआऊट करणं सोपं जाईल." सुशांतने प्रश्न केला.

"सध्या तरी नाही. तुमच्या टीमला लास्ट क्राईम स्पॉट पुन्हा सर्च करायला सांगा. मेबी त्यांना अजून काही माहिती मिळेल." वाघने सुचवले.

"गुड पॉईंट! मी आत्ताच सर्व डिव्हिजन्सना त्यांच्या एरियात चौकशी करायची ऑर्डर देतो!" नेने घाईने ग्लास खाली ठेवत म्हणाला आणि त्याने रिसिव्हर उचलला,

"कंट्रोल, जिल्ह्यातील सगळ्या डिव्हिजन्सना आपल्याला सापडलेल्या स्पेसिफिक ट्रंक्स सारख्या ट्रंक्स त्यांच्या एरियात कोण कोण बनवतं ते पाहायला सांगा! त्यांना ट्रंक्सची मापं द्या. लवकरात लवकर ही माहिती मिळाली पाहिजे म्हणावं!" सुशांत नेने रिसिव्हरच्या स्पीकरमध्ये बोलत होता,

"ट्रंक्सचे फोटो पण पाठवा आणि त्यावर जी अक्षरं आहेत, ती देखील ट्रंक्स बनवणारे कोणी त्यांच्या ट्रंक्सवर लिहितात का ते पहायला सांगा!"

"गुड! थँक्यू!" काही काळाच्या अवकाशांतर नेने बोलला. समोरून त्याला येणाऱ्या प्रतिसादाला ऐकण्यासाठी तो मधे थांबला होता.

त्याने रिसिव्हर रिप्लेस केला.

"तुमची खूप मदत होते आहे. आपण इतके सपोर्टिव्ह आहात तरी बरेच ऑफिशियल्स तुमच्यावर नाराज का असतात?" सुशांत रिलॅक्स होत जरा अवांतर झाला.

"कदाचित मी त्यांची स्पॉटलाईट चोरतो असं त्यांना वाटत असेल..." मिस्टर वाघ हसत म्हणाला व पुढे सूचना करत बोलला,

"असो, ट्रंक्स कारागिरांची लिस्ट आली, की काम संपत नाही, तर तेथून पुढं खरं काम चालू होतं. कारण गुन्ह्यांत वापरलेल्या ट्रंक्स एकाच व्यक्तीकडून किंवा दुकानातून खरेदी केल्या असतील असं नाही. शिवाय ही 'मेटल कॅस्केट मर्डर केस' आत्तापर्यंत या कारागिरांपर्यंत माध्यमांच्या मार्फत पोहोचली असेल. त्यामुळे ते माहिती देण्यास कुरकुरतील. का-कु करतील."

"मग?" सुशांतचा प्रश्न.

"त्यांच्याकडून फक्त लिस्ट घ्या. अंदाजे सात पाचवाल्यांची!" वाघ हसून म्हणाला,

"त्यांना विश्वास द्या. त्यांना काही होणार नाही!" तो पुढे बोलला.

"के!" नेने विचारांती उद्गारला!

"आणि त्यांच्यातील कोणी आपल्याला मिळालेल्या सिम्बल्स प्रमाणे त्या कॅसकेट्सवर साईन्स करायला सांगितले होते का ते पहा. जर तसा कारागीर व दुकानदार सापडला, तर

बाकीच्यांच्या चौकशा करत बसण्याचा वेळ वाचेल." वाघने पुढील सूचना केली.

"आणि तसे कोणी लिहायला सांगितले नसेल, तर? म्हणजे विकत घेणाऱ्या व्यक्तीने स्वतः कॅसकेट्समध्ये मृतदेह बंद करण्याआधी त्यावर ती जीबरीश लिहिली असतील तर?" नेनेचा प्रश्न.

"तर मग सर्वच लोकांच्या तुम्हाला चौकशा कराव्या लागतील!" वाघने दुसरा पर्याय नसल्याचे संकेत दिले,

"आणि एक! हा पाच फूट सात इंच उंचीचा माणूस सापडला, तरी तो एकटाच या खूनांच्या मागे असेल असे नाही!" वाघ आठवण करून देत पुढे म्हणाला.

"म्हणजे; अजूनही बरेच गुन्हेगार असल्याचा तुम्हाला संशय आहे का?" सुशांत विचलित होऊन विचारता झाला.

"सर्टन्ली!" वाघ दाताने बिस्कीट तोडत बोलला.

बिस्किटाच्या चुरा टेबलवर उडाला. त्याकडे पाहत नेने पुढे बोलला,

"कसं?"

"इंटेरोगेशन रूम मधील व्यक्ती नंतर हा दुसरा सापडलाय. फक्त दोघे असून वेगवेळ्या ठिकाणी इतक्या कमी वेळात इतकं मोठं हत्याकांड ते करू शकत नाहीत. शिवाय मेटल कॅस्केट्स जरी सारखे

असले, तरी त्या प्रत्येकावर लिहिलं गेलेलं नाही! काही ट्रंक्सवरच ती ठराविक अक्षरे आहेत.

"तुम्ही आणखी एक देखील करू शकता. ती विशिष्ट अक्षरं ज्या एरियात ट्रंक्सवर सापडली, त्या एरियात तुम्ही जास्त जोर देऊन शोध घेऊ शकता. हा मी आधीच सांगतो, की ती अक्षरे लिहून कॅस्केट्स त्या एरियात सोडणारा गुन्हेगार त्या एरियातीलच असेल असेही नाही. तो पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी देखील असे करू शकतो. हे ध्यानात ठेवून तपास व्हावा.

"आणखी एक महत्त्वाचं! मेटल कॅस्केट बनवणारा व्यक्तीच यांतीलच एक गुन्हेगारही असू शकते. त्यामुळे सर्व कारागिरांवर चौकशी दरम्यान व चौकशी नंतर लक्ष ठेवलं जावं!" वाघनं खाण्यासोबतच बोलणं संपवलं.

एव्हाना त्याने संपूर्ण बिस्किटपुडा संपवला होता. आणि आता तो उरलेल्या चहावर ताव मारणार होता.

"तुम्ही को-ऑपरेट करत नाही असं देशभरातील सर्वच तपास यंत्रणांचं म्हणणं आहे." नेने पुन्हा मूळ पदावर.

बहुदा मिस्टर वाघची कीर्ती ऐकता त्याचं इतकं सपोर्टिव्ह असणं सुशांत नेनेला पचत नसावं.

"माणसानं ऐकिवावर नाही, तर अनुभवावर विश्वास ठेवावा. काय?" मिस्टर वाघ जिभेने टोकरून दातातील चिकटलेले बिस्कीट काढण्याचा प्रयत्न करत बोलला.

"हो बरोबर आहे!" नेने हसला.

"मला वाटतंय आता आपला माझ्याविषयीचा पूर्वग्रह दूर झाला असेल!" म्हणत एका घोटात वाघने तो थंड झालेला चहा संपवला. शेवटी तो बिस्किटामुळे राहिलाच किती होता...

"सॉरी!" नेने हसत म्हणाला.

"निघतो!" वाघ ग्लास टेबलवर आपटत उठला.

"निघाताय?" नेनेने वर त्याच्याकडे पाहत विचारलं. नकळत त्याच्या ओठांजवळचा ग्लास खाली आला होता. मिस्टर वाघचं ऐकण्याच्या नादात त्याच्या चहाही उरला होता.

"का? जेवण ऑफर करताय? डोन्ट वरी मी बाहेर खाल्लं, तरी ते बिल मी जोडेनच!" वाघ चेष्टा करत म्हणाला.

"तसंही तुम्ही तुमच्या हॉटेलवर खाल्लंत तरी ते बिलात एड होणारच आहे." सुशांत धुसपुसला.

"मग? का थांबवताय? मिस्टर नेने, इतकं इनफॅच्युएशन बरं नाही!" सुशांतची खोचक मस्करी करत मिस्टर वाघ डावी भुवई उडवत बोलला. मुखावर तेच मधाळ स्मित.

सुशांत नेनेला वाघ कोणता रोख ठेवून चेष्टा करतोय त्यातील टोमणा कळाला. पण राग न येता यावेळी तो मनमुराद हसला.

"काम आहे. एका पार्टीला भेटायचे आहे. इथं आलोच आहे, तर एक बिझनेस डीलही करावं म्हणतोय." वाघने जाण्याचं कारण स्पष्ट केलं,

"येतो. कीप मी इंफॉर्म!" म्हणून वाघ बाहेर पडला...

## ४. डील विथ डेव्हील...

मिस्टर वाघ एका कंपनीच्या रिसेप्शन काऊंटरला उभा होता.

"एक्स्क्यूज मी, आपल्या कंपनी ओनरला भेटायचं होतं. सुजय शहांना." वाघ रिसेप्शन वरील महिलेला म्हणाला.

"आपली अपॉइंटमेंट आहे का?" तिने मधाळ आवाजात विचारलं.

"नाही!" वाघ बोलला.

"मग सर, आधी आपल्याला त्यांची अपॉइंटमेंट घ्यावी लागेल. असंच नाही भेटता येणार. एक मिनिट मी चेक करून आपल्याला डेट देते. पण आधी आपले काम जाणून घेणं आवश्यक आहे. त्यानुसार इंपॉर्टन्स लक्षात घेऊन मला अपॉइंटमेंट देता येईल. आपल्याला बॉसना कशा संदर्भात भेटायचं होतं?" तिने विचारलं.

"एक बिझनेस प्रपोसल आहे त्यांच्यासाठी!" वाघ म्हणाला.

"ओके. प्लिज मला थोडा वेळ द्या. मी चेक करते." ती म्हणाली आणि कम्प्युटर स्क्रिनकडे वळली.

"त्याची गरज नाही. मला नंतर यायला वेळ नाही. आपले बॉस आत्ता इथे नाहीयेत का?"

"आहेत. पण आजचे पूर्ण शेड्यूल बिझी आहे." ती माफीच्या सुरात म्हणाली.

"ओके. त्यांना फक्त एकदा फोन करून सांगा, विजय वाघ आलेत. ते स्वतः जो वेळ देतील त्यावेळेत मी पुन्हा हजर होईन."

रिसेप्शनिस्ट जरा विचार करू लागली.

"प्लिज!" वाघने इन्सिस्ट केलं.

"ठीक आहे!" ती नाराजीनेच म्हणाली आणि जरा कचरतच तिने रिसिव्हर उचलून कानाला लावला.

इंटरप्ट केल्याने किंवा शेड्यूल डिस्टर्ब केल्याने बॉस चिडतील ही विवंचना... आणि इंफॉर्म नाही केलं आणि हा समोरचा माणूस काही महत्त्वाची डील घेऊन आला असेल व आपण भेट करवली नाही, तर पुन्हा आपल्यालाच ओरडा बसेल ही दुहेरीक मानसिकता घेऊन ती पलिकडून कॉल रिसिव्ह केला जाण्याची वाट पाहू लागली.

इंटरकॉम वरील बटन मेन केबिनचे साइन लक्षात घेऊन वाघनेच दाबले होते. त्यामुळे तिला सुजयशी बोलणे आता भागच होते...

"हॅ... हॅलो सर... इथे विजय वाघ म्हणून कोणी आले..." तिचे बोलणे पूर्ण होण्याआधीच पलिकडून कनेक्शन कट झालं होतं.

आता आपली खैर नाही! बॉस नक्कीच आपली खरडपट्टी करणार या विचारातच तिचा रिसिव्हर असलेला हात खाली आला.

"काय?" वाघने विचारलं.

"माहीत नाही. कॉल कट केला!" ती घाबरत म्हणाली.

"आयसी!" वाघ नाराजीत म्हणाला.

"मी तुम्हाला विनंती करते सर, प्लिज मी उद्याची वेळ देते. प्लिज तुम्ही उद्या या. आज सर खूप बिझी आहेत!"

"आणि उद्या नसतील का?" वाघने विचारलं.

"उद्याही त्यांना वेळ नाही, पण मी आपल्यापासाठी पाच मिनिट तरी वेळ काढून ठेवेन. आशा आहे आपण समजून घ्याल. सॉरी!" ती गयावया करत होती.

"फाईन!" वाघ समजुतीने बोलला.

"थँक्यू सर!" तिचा जीव भांड्यात पडला.

वाघ जाण्यास वळला तोच त्याला त्याच्या नांवाची हाक ऐकू आली!

"मिस्टर वाघ!" एक उत्साही आवाज आला.

वाघ आवाजाच्या दिशेने वळला. हाक मारणारी व्यक्ती दोन्ही हात समानांतर उंचावून गालांच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत चेहऱ्यावर प्रसन्न हसू घेऊन त्याच्या दिशेने येत होती.

त्याला पाहून रिसेप्शनिस्ट आदराने व त्याहून आश्चर्याने उठून उभी राहिली. भीतीने स्तब्ध!

"अहो भाग्य! वर्ल्ड्स ग्रेटेस्ट डिटेक्टिव्ह आमच्या दारी! वेलकम मिस्टर वाघ! वेलकम!" सुजय नामक ती व्यक्ती प्रसन्न उच्चारतच वाघ जवळ आली.

"डिटेक्टिव्ह नाही! सत्यान्वेषी!" वाघ स्मित करत बोलला.

"सत्यान्वेषी?"

"हो! सत्यान्वेषी! सत्याचा शोध घेतो मी! आणि हा शोध न संपणारा आहे. अगदी जीवनाच्या अंतापर्यंत!" वाघ त्याला उत्तर देत म्हणाला.

"हा!" सुजय सुस्कारा सोडत हसला,

"बरोबर आहे. सत्य काळ परत्वे, व्यक्ती परत्वे बदलतं!" तो म्हणाला.

"हो आणि स्थान परत्वे देखील!" वाघ त्याच्याकडे पाहून हसला.

स्मितवदन सुजय शहाने होकारार्थी मान डोलावली.

"चला. आत चला!" वाघच्या पाठीवर हात ठेवत तो दुसऱ्या हाताने त्याला केबिनची दिशा दर्शवत म्हणाला.

जाता जाता तो रिसेप्शनिस्टला बसण्यास सांगायला विसरला नाही. समोरील प्रसंग पाहून तिचा श्वास रोखला गेला होता. कारण तिने जे अज्युम केलं होतं तसं काहीच घडलं नव्हतं. उलट तिचा बॉस तर किती सौदार्याने वाघला भेटला होता.

ती अक्षरशः तिच्या खुर्चीत पडली. अटकेला श्वास मोकळा करत ती रिलॅक्स झाली.

आत केबिनमध्ये सुजय मोठ्या आदराने मिस्टर वाघला घेऊन आला.

"बसा!" म्हणत तो त्याच्या खुर्चीकडे गेला.

पण मिस्टर वाघ वर्किंग टेबल जवळच्या खुर्चीवर न बसता सोफ्यावर रेलला.

हे पाहून मग सुजयच्या मुखावर एक स्मित खेळलं आणि तो आपली मागे ओढलेली खुर्ची पुन्हा टेबल खाली सारून वाघ समोर बसला.

सुजय शहा. वय साधारण चाळीस पंचेचाळीशीचं असेल. वेशभूषा निव्वळ समाजसेवकाची. पांढरा झब्बा त्यावर पुढारी खादी जॅकेट आणि पांढरी विजार. दाढी थोडी वाढलेली पण कोरलेली. उंची साधारण. जास्त उंच नाही. जास्त बुटका नाही. थोडं पोट सुटलेलं, पण म्हणजे अगदीच नाही. चेहऱ्यावर तेज. आकर्षक

उभट चेहरा. पायी बिना लेसचे काळे फॉर्मल लेदर शूज, खूप महागातले नाहीत. कुठल्याही आठवडी बाजारात मिळतील असे. सॉक्स मात्र नाहीत.

"बोला! आमची आठवण कशी झाली? काय काम काढलंय?" त्याने वाघला प्रश्न केला.

"मला आधी सांगा, आपण मला इतकं चांगलं कसं ओळखता?" वाघने विचारलं.

"अहो तुम्हाला कोण नाही ओळखत?" असे म्हणून सुजयने सोबतच्या टेबलावरील कॉड रिसिव्हर उचलला,

"दोन कॉफी पाठवा!" पलिकडील व्यक्तीला सूचना करून सुजयने रिसिव्हर ठेवला आणि तो वाघकडे दृष्टीक्षेप टाकत बोलला,

"आता सांगा! काही विशेष काम असल्याशिवाय आपण कोणासमोर यायचे नाहीत!" सुजय हसून वाघला म्हणाला.

"अहो, मी काही कायमस्वरूपी सत्यशोधक नाही! ती माझी हौस आहे म्हणा हवं तर. त्यामुळे त्या संदर्भात काही नाही!" वाघ पण हसून उत्तर देऊ झाला.

"मग माझ्याकडे काम?"

"बिझनेस!"

"बिझनेस? तो काय?"

"आपण एक एनजीओ चालू करत आहात असं समजलं!"

"हो पण त्याचं काय? तुम्हाला तर माहीतच असेल, की एनजीओतून उत्पन्न नाही. नॉन प्रोफिटेबल आहे ते. तुमच्या स्वतःच्याच किती तरी एनजीओ आहेत. मग यात तुम्हाला काय बिझनेस दिसतोय?" सुजय विचारता झाला.

"तोच जो तुम्हाला दिसतोय!" वाघ कुटील हसत म्हणाला.

"मी समजलो नाही!" सुजय शंकीत बोलला.

"अहो आपल्यासारखी लोकं एनजीओ का काढतात? बिझनेससाठीच ना? पाहुण्या रावळयांच्या नांवे प्रॉपर्टी ठेवणं जुन्या पद्धतीचं झालं. नाही?!" वाघने बेरकी हसत डोळा मारला.

मिस्टर वाघला काय म्हणायचं आहे हे त्याचा रोख लक्षात घेऊन एक हसू सुजयच्या चर्येवर तरळलं. 'मी ऐकतोय!' अशी त्याने मानेनेच वाघला पुढे प्रोसिड करण्याची खूण केली.

"गृहउद्योग, लघुउद्योग, कुटिरोद्योग, इत्यादी तुम्ही या अंतर्गत चालू करालच! तुम्हाला माहीत असेल, की मी एक्सपोर्टचं काम पण करतो, तर आपल्या एनजीओ मार्फत बनलेल्या वस्तूंचं मार्केटिंग आणि डिस्ट्रिब्युशनचं काम मला माझ्या कंपनीसाठी हवं आहे! देशांतर्गत आणि देशाबाहेर देखील. माझी कंपनी जवळपास एकशे आठ देशांत कार्यरत आहे. एक्सपोर्ट सोबत आम्ही बऱ्याच वस्तूंचं प्रोडक्शन पण करतोच. पण ती वेगळी डिपार्टमेंट्स आहेत.

हा, पण आपल्याला कोणत्याही गोष्टींचं मास प्रोडक्शन करायचं असेल, तर आपण त्यासाठी पण कोलॅब करूच शकतो!" वाघने प्रस्ताव मांडला.

"आपलं प्रपोसल मान्य होण्यासारखं आहे खरं..." सुजय विचार करत म्हणाला.

"मग मान्य करूनच टाका!" कॉफी घेऊन एकजण आत आलाच होता. ट्रेमधील कॉफी मग उचलत वाघ सुजयला बोलला.

"डन!" सुजयने देखील मग उचलला.

तो कॉफी घेऊन आलेला माणूस निघून गेला.

"आता दुसरं प्रपोसल!" वाघ कॉफीचा घोट घेत म्हणाला.

"दुसरं? कोणतं?" सुजय बुचकळ्यात.

"मिस्टर सुजय! एनजीओचा मुख्य उद्देश काय असतो?" वाघने भुवई उडवत खोचक प्रश्न केला.

"जनतेची सेवा!" सुजयचं भोळा चेहरा करून उत्तर.

"अहं. ते गांवाला सांगायला! आपल्या सारख्या लोकांसाठी काय आहे?" वाघ मिश्किल व बेरकी स्मितात म्हणाला.

त्याच्या या वाक्यावर सुजय शहा मोठ्याने हसला.

"टॅक्स कन्सेशन!"

"नाईस! पण नुसतं टॅक्स कन्सेशन नाही. टू हाईड ब्लॅक मनी! नो?!" कॉफीचा मग बाजूला घेऊन वाघ म्हणाला,

"तर; तुम्ही यातून जो टॅक्स वाचवलाय, त्यातील पंचवीस टक्के माझे!" वाघ आता खूप गंभीर झाला होता!

"कोणत्या आनंदात?" सुजयने जरा आवाजात कठोरता आणली,

"तुम्ही काय आता मला इन्कम टॅक्सची धमकी देणार आहेत की काय?" त्याने चिडून विचारले.

"मी धमक्या देत नाही मिस्टर शहा! मी बिझनेस करतो. प्योर् बिझनेस! तुमच्या वाचवलेल्या पैशांतून मी पंचवीस टक्के तर घेईनच, पण तुमच्या या नव्या एनजीओला जे फंड्स रेज होतील, त्यांतीलही पन्नास टक्के माझे असतील. शिवाय..."

"अजून आहेच का?" वाघला मधेच टोकत सुजय आवाजात वजन आणत म्हणाला.

"आहे!" वाघ मुर्दाड हसला,

"तुम्ही या एनजीओंतील उद्योगांतून जी कमाई कराल त्यावरही तुम्हाला टॅक्स भरावा लागणार नाही त्यामुळे त्यांतील पन्नास टक्के देखील माझे असतील. आणि यासाठीच मी तुम्हाला माझी फ्री सर्व्हिस ऑफर करत आहे!" वाघने आपला येण्याचा उद्देश स्पष्ट केला.

सुजय मख्ख बसून फक्त ऐकत होता, मिस्टर वाघ काय बोलतोय ते... आणि मिस्टर वाघचं बोलणं अजून झालं नव्हतं...

"हे मीही जाणतो, की येणारा पैसा गरजूंना मदत या नांवाखाली किती खर्च होणार आहे, आणि किती आपल्याकडे राहणार आहे!" वाघने कारस्थानी हसत समारोप केला.

सुजयला काय बोलावं हे कदाचित सुचत नव्हते. त्याचा पैसे कमावमण्याचा सगळा प्लॅन वाघ टेक ओव्हर करू पाहत होता आणि तेही त्याच्याच ऑफिस केबिनमध्ये त्याच्याच समोर बसून...!!!

काही काळ असाच गेला आणि सुजय शहाची प्रतिक्रिया आली! पण अनपेक्षित!

तो जोराने हसला! आणि काय आश्चर्य! त्याने मिस्टर वाघच्या सगळ्या मागण्या झटक्यात मान्य केल्या.

"फाईन! मला मान्य आहे! बोर्डला मनवावं लागेल, पण त्याला कष्ट पडणार नाहीत!" सुजय प्रसन्न चेहऱ्याने म्हणाला,

"आपण सोबत जुडलात तर मोठ्या प्रमाणावर उत्पाद आणि विक्री करता येईल. आपल्याला सोबत घेतल्याने प्रोफीटच आहे! सो आईल मेक इट हॅपन!" सुजय वाघला आश्वासित करत म्हणाला.

"थँक्स!" वाघने आभार मानले.

शेवटचा घोट घेऊन त्याने मग समोरील टी-पॉयवर ठेवला. ते पाहून मग आपला पण अर्धवट राहिलेला मग सुजयने खाली ठेवला. त्याने हस्तांदोलन करण्यासाठी सस्मित हात पुढे केला,

"मला खात्री आहे आपल्याशी असोसिएट होऊन आमच्या कंपनीची मार्केट व्हॅल्यू देखील वाढेल!" सुजय म्हणाला.

"मी पण हीच अपेक्षा ठेवतोय, की आपल्यामुळे आमची व्हॅल्यू देखील नक्कीच वाढेल!" वाघ हसत हात मिळवता झाला!

"बरं चला येतो आता. डॉक्युमेंट्स बनवून आपल्याला पाठवतो. वाचून सही करा!" वाघ उठता उठता म्हणाला.

"अरे वाचायचं काय त्यात!" सुजय पण उठला,

"आपल्या अपेक्षा तर आपण सांगितल्याच आहेत. आता त्यापेक्षा अजून आपण काय ॲग्रिमेंटमध्ये एड करणार?" सुजय सहज बोलून गेला.

"हो आधीच याने सगळं लुबाडलंय. असंच म्हणायचं आहे ना?!" मिस्टर वाघ मस्करीत म्हणाला.

"नाही नाही तसं नाही. मी विश्वासाने म्हणालो इतकंच!" सुजय माफीच्या स्वरात खजील हसून म्हणाला.

"माहितेय. चेष्टा केली!" वाघ हसला,

"बरं चला निघतो. पुन्हा एकदा आभार!" वाघने आपला हात बाजूला घेतला आणि दरवाजाकडे वळला.

"या बाहेरपर्यंत सोडतो!" सुजय देखील हसत म्हणाला.

आणि पुढे होऊन त्याने स्वतः मिस्टर वाघसाठी दरवाजा उघडला.

"थँक्स!" म्हणत वाघ केबिनबाहेर पडला.

सुजय त्याच्या मागून होताच. केबिन बाहेर वाघने स्माईल करत पुन्हा सुजयचा निरोप घेतला आणि तो मेन एग्झिटकडे निघाला.

जाताना त्याला रिसेप्शन काऊंटर पासून जाणे भाग होते. तो पास होत असतानाच...

"सॉरी सर..." असा माफीचा स्वर त्याच्या कानावर पडला.

रिसेप्शनिस्ट मघाशी वाघला थांबवून ठेवल्याबद्दल वाघची माफी मागत होती. वाघ थांबला. तो तिच्याकडे बघून गोड हसला,

"आपण आपलं काम करत होतात. माफीची आवश्यकता नाही. एक प्रेमळ सल्ला देतो मात्र, जमल्यास लक्षात ठेवा व अमलात आणा. कामासोबतच सोशल लाईफवर पण ध्यान द्या. जगात काय चाललंय ते कळेल. म्हणजे माणसं ओळखायला आपण चुकणार नाही. शेवटी माणूस काम करतो कशासाठी? मनाप्रमाणे जगता यावं म्हणूनच. स्वातंत्र्यासाठी! आणि कामातून तेच मिळत नसेल, तर?!..." मिस्टर वाघने वाक्य पूर्ण केलं नाही. गाळलेली जागा त्याने रिसेप्शनिस्टला भरण्यासाठी रिकामी ठेवली होती.

आणि आता चिंतन करून तिने ती भरून काढायची होती...! तो मंद स्मित करत तिला एवढंच म्हणाला,

"कामाचा जास्त स्ट्रेस घेऊ नका. आपला दिवस शुभ जावो!" अशी शुभेच्छा देऊन मग वाघनं सुजय शहाचं ऑफिस सोडलं.

'केस सोडून याचं मधेच हे काय चाललं आहे?' त्याचं ऐकताना माझ्या मनात हा प्रश्न उपस्थित झाला. मग माझं मलाच उत्तर मिळालं, 'हा कसाही भरकटलेला आपल्याला दिसला, तरी अल्टिमेट्ली हा त्याचं ध्येय पूर्ण करतोच. सुरवातीला सगळं विस्कळीत दिसत असलं, तरी शेवटी समअप करताना सर्व पॉईंट्स एकमेकांना जुळतातच!' म्हणून मग काही न बोलता मी पुढचं ऐकायचं ठरवलं.

मिस्टर वाघ पुन्हा सुशांत नेनेच्या घरासमोर बेल वाजवत उभा होता... यावेळीही रिद्धीमानेच दरवाजा उघडला.

"इकडून जात होतो, म्हंटलं भेट घेऊन जावं." वाघ म्हणाला.

तिलाही ते पटलं. त्या बिचारीला काय नाहीत, की मिस्टर वाघ मुद्दाम लांबडी लांबडी वाट वाकडी करून खास तिला भेटायला आला होता...

समोर वाघला बघून मुळातच चिंतित असलेली ती अजूनच इंटेन्स झाली.

"दादा हेडकॉर्टर्सलाच आहे." असं तुटक बोलून ती दरवाजा बंद करण्याच्या प्रयत्नात होती.

तोच...

"तुम्हाला लंचला नेण्यासाठी तुमच्या भावाने सांगितले आहे." वाघ झाकला जाणारा दरवाजा अडवून बोलला.

"घडीत तुम्ही वाक्य बदलतात." जोर लावून दरवाजा बंद करण्याचा प्रयत्न करत रिद्धीमा बोलली.

"खरंच सांगतोय! बरं ठीक आहे; तुमच्या भावाच्या तोंडून ऐकाल, तेव्हा तर तुम्हाला विश्वास बसेल?" वाघ तिला विश्वासात घेण्यासाठी थापा मारत बोलला.

रिद्धीमाचे भाव जरा मवाळ झाले. ती जरा विचारात पडली.

"पण त्यासाठी मला दारावरचा हात काढावा लागेल. आणि मी हात तेव्हाच काढेन, जेव्हा तुम्ही मला वचन द्याल, की तुम्ही माझ्या तोंडावर दरवाजा बंद नाही करणार!" वाघ ओठांच्या काडांची उजवी बाजू लांबवत स्मित करत म्हणाला.

रिद्धीमा दरवाजा मागे करून उभी राहिली.

"गुड!" म्हणत वाघने खिशातून मोबाईल काढला आणि रिद्धीमा समोर धरला.

"सुशांतचा नंबर बोला." तो तिला म्हणाला.

रिद्धीमा नंबर सांगत गेली, तसा तो वाघने डायल केला. कॉल लावून स्पीकर करून पलिकडून कॉल उचलला जाण्याची तो वाट पाहू लागला. रिंग होऊन काही वेळाने...

"हॅलो, कोण?" पलिकडून सुशांतने विचारलं.

"युअर्स बिलेवेड्, मिस्टर वाघ!" तो हसून म्हणाला.

"बोला! मिस्टर वाघ!"

"मी तुमच्या सोबत काम करतोय आणि तुम्ही माझा नंबर अजून सेव्ह् केला नाही?" वाघ त्याला दोष देत मस्करीत बोलला.

"बोला ओ!" सुशांत उद्गारला.

"बरं ते लंचचं नक्की ना? म्हणजे मी जातोय म्हणून म्हंटलं?"

"होय ओ! बिल पेड् केलं जाईल! बरं ठेवू का मला कामं आहेत, जी तुम्हीच मागे लावली आहेत!" नेने पलिकडून बोलता झाला.

"ओके. ठेवतो!" वाघ हसत म्हणाला.

आणि तो रिद्धीमाकडे वळला.

"आता तरी याल? तुमच्या भावाच्या तोंडूनच ऐकलंय आता तुम्ही खरं!" वाघ बोलला,

"आणि आता प्लिज तुमच्या होम पेशनटचं कारण काढू नका. काही तास त्याचं तो मॅनेज करू शकतो. नाही?!" वाघने तिच्या नकाराचं आणखी एक कारण तिने ते देण्याआधीच हाणून पाडलं.

आपलं मन हा वाचू शकतो का? असा एक प्रश्न भाव रूपाने रिद्धीमाच्या गोड चेहऱ्यावर उमटला आणि तो पाहून वाघ हसला.

"चला." तो तिला म्हणाला.

"मी जरा आवरून येऊ का?" ती पर्याय नाही पाहून बेमनानेच म्हणाली.

"आपण अशा आलात तरी भारीच दिसाल. पण जर आपल्याला आवरायचे असेल, तर मी वाट बघतो." तो एक पायरी वर चढला.

आणि मग रिद्धीमा आत निघून गेली, तिच्या खोलीत. तिने वाघला आत येण्याचा आग्रह तर सोडाच, पण आत येण्यास विचारणा देखील केली नाही. पण वाघच आत गेला.

त्याने स्वतःला सोफ्यावर झोकून दिलं. पण काही वेळाने त्याच्या कानावर काही आवाज पडले आणि तो उठून रिद्धीमाच्या खोलीकडे चालता झाला...

काहीवेळ तो तेथेच पडदा धरून उभारला. आतून काही बोलल्याचा आवाज येत होता...

"काय गरज आहे जायची?" एक पुरुषी आवाज विचारत होता.

"जावं लागेल. दादाने सांगितलं आहे. नाही गेले, तर दादा चौकशी करेल आणि मग तूच अडचणीत येशील. तुला हवंय का ते?" रिद्धीमाचा आवाज.

"शीट! बरं जा! पण त्या माणसाला काही कळता काम नये! समजलं?" तोच पुरुषी आवाज बोलला.

वाघ थोडावेळ कानोसा घेत थांबला. पण आतून आवाज बंद झाले होते. जो कोणी आत रिद्धीमाशी बोलत होता, तो कदाचित खिडकीतून उडी मारून बाहेर पडला होता! किंवा आतच दडून बसला होता. वाघ पुन्हा सोफ्यावर येऊन बसला. रिद्धीमा बाहेर येण्याची वाट पाहत...

आणि ती आली. चांगली पंधरा मिनिटं लावून...

असो, सुंदर मुलीची वाट पाहण्यात कोण थकतो? आणि ती अधिकच सूंदर दिसणार असेल, तर नक्कीच कोणी नाही!

ती तिच्या रूम मधून बाहेर आली, तसा वाघ उठून उभा राहिला.

"चला!" तो म्हणाला.

रिद्धीमाचा चेहरा अजून मख्खच होता. ती काहीच न बोलता, न थांबता घराबाहेर पडली.

मिस्टर वाघला त्याच्या या गुन्हे अन्वेषण प्रवासात आजपर्यंत खूप वेगवेगळ्या प्रकारच्या महिला भेटल्या, सर्वच गूढ होत्या! पण

हिच्याइतकं त्याला कोणी टाळलं नव्हतं. मिस्टर वाघ पुन्हा स्वतःशीच हसला आणि तो तिच्या मागून बाहेर पडला...

रिद्धीमा मिस्टर वाघ पासून अंतर ठेऊन पुढे चालत होती. लॉनमधून गाडीकडे जाताना वाघला सुशांतच्या घरी असलेला व त्यांनीच त्याचं 'निशांत' म्हणून नामकरण केलेला युवक गेट मधून घराकडे येताना दिसला. तो पूर्वीसारखाच वाघकडे रोखून पाहत होता. निशांत वाघच्या काही अंतर पुढे असलेल्या रिद्धीमापाशी थांबला होता. पण त्याची नजर तिच्या मागे काही अंतर दूर उभ्या वाघवरच होती...

रिद्धीमाने हातवारे करत आणि तोंडाने बोलून देखील घराकडे लक्ष देण्यास सांगितले आणि ती पुढे चालती झाली.

मग निशांत वाघकडे रोखून बघत त्याच्यापासून पास होत आत निघून गेला.

वाघ हसला आणि वेग वाढवून तो रिद्धीमाच्या मागे गेला.

"हा कुठे गेला होता?" वाघने रिद्धीमाला विचारलं.

"औषधं आणायला." त्याच्याकडे न पाहता ती रुक्ष बोलली.

"हे भारी आहे! म्हणजे तुम्ही पेशंटलाच औषध आणायला पाठवता!" वाघने तिची चेष्टा करण्याची चेष्टा केली.

"त्याला बोलता येत नसलं, तरी हातीपायी धड आहे तो!" ती कठोर बोलली.

यानं वाघचं हसूच गायब झालं. 'हिच्याशी डील करणं कठीण जाणार दिसतंय...' तो मनात बोलला.

दोघे वाघच्या गाडीपाशी पोहोचले होते. वाघने तिच्यासाठी गाडीचा दरवाजा उघडला.

"पण कदाचित तो औषधंच आणायचा विसरला!" वाघ कुचकट बोलला.

ती काही न बोलता आत बसली. वाघ मग ते दार बंद करून बॉनेटला वळसा घालून ड्रायव्हिंग सीटवर विराजला.

गाडी हलली. वाघ गाडी चालवत रिअर व्ह्यू मिरर एडजस्ट करून त्यामध्ये बाजूलाच बसलेल्या रिद्धीमाकडे पाहत होता. ती बाहेर पाहत होती. वाघ सोबत असणं तिला असह्य झालंय हे तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट होतं आणि हे वाघला स्पष्ट दिसत होतं. मग त्याने नजर खाली केली व लगेच ती पुढे लावून तो लक्षपूर्वक गाडी चालवू लागला...

"आपण इंट्रोव्हर्ट दिसता." वाघने काय बोलावं म्हणून विषय काढला.

"मला माझी पर्सनल लाईफ बद्दल अनोळखी व्यक्तीशी शेअर करायला आवडत नाही!" ती बाहेर पाहतच म्हणाली.

"सो दॅट्स हाऊ यू प्रुव्ह्ड् माय पॉईंट!" तो हसून म्हणाला.

"मिस्टर प्लिज!" ती कळकळीने म्हणाली.

"मिस्टर वाघ. विजय वाघ!" वाघने स्वतःची ओळख सांगितली.

ती अधिकच वैतागली. कपाळावर आठ्या घेऊन ती "मित्चस्स्" असं काहीसं उद्गारली व कपाळावर हात घेऊन बाहेर पाहू लागली. तिचा कोपर विंडोव्हवर होता.

"प्लिज हात आत घ्या!" वाघ तिला म्हणाला.

तिने इरिटेटेड् चेहऱ्यानेच त्याचे ऐकले.

"थँक्स." वाघ म्हणाला,

"बरं. पर्सनल नाही तर तुमच्या सोशल लाईफ बद्दल बोललं तर चालेल?" वाघने पुढं जोडलं.

(याला लोकांना इरिटेड् करायला काय मजा येते कोण जाणे...)

ती गप्पच होती. याला बोलून काही उपयोग नाही हे तिच्याही लक्षात आलं असेल...

"आपली एप्रेंटीसशिप अजून चालू आहे का?" वाघने शांत न बसता प्रश्न केला.

"नाही. माझं स्वतःचं क्लिनिक आहे." ती म्हणाली.

"मग आज आपण घरी?" त्याने विचारलं.

"क्लिनिक घरातच चालू केलंय. आज जरा अनइजी वाट होतं म्हणून बंद ठेवलं आहे."

"आ..." मिस्टर वाघ आठवल्यासारखा उद्गारला व म्हणाला,

"तरीच आपल्या भ्राताश्रींनी मला आपल्याला बाहेर नेण्याचा आग्रह केला तर. खरं तर मिस्टर सुशांतच आज लवकर घरी येणार होते, पण त्यांना काही काम लागलं आणि मग हेड ऑफिसलाच थांबावं लागलं. म्हणून त्यांनी मला आग्रह केला. आपला भाऊ आपली खूप काळजी करतो. खूप प्रेम आहे सुशांत यांचं तुमच्यावर." वाघ समोर पाहून गाडी चालवतच रिद्धीमाला म्हणाला.

रिद्धीमाने वाघकडे दृष्टीक्षेप टाकला. तिच्या नजरेत वाघसाठी थोडा विश्वास डोकावला...

तिच्या भावाचा आपल्यावर खूप विश्वास आहे. इतका, की तो त्याचे पर्सनल लाईफ देखील वाघशी डिस्कस करतो असे मिस्टर वाघ रिद्धीमाला भासवण्यात यशस्वी झाला होता आणि हे मिस्टर वाघने तिच्या नजरेत वाचलं.

पुढचा प्रवास न बोलता पार पडला.

गाडी एका फाईव्ह स्टार हॉटेलला लागली होती, पण हे वाघ उतरलेले हॉटेल नव्हते. तो दुसऱ्याच हॉटेलला रिद्धीमाला घेऊन आला होता.

गाडी आलेली पाहून एक कर्मचारी धावत आला. मुळातच स्लो होणारी गाडी त्या कर्मचाऱ्याला पाहून थांबली.

"नो निड. थँक्यू!" वाघ त्या कर्मचाऱ्याला म्हणाला.

आणि त्याने स्वतःच गाडी पार्किंगला घेतली.

पार्किंग लॉटला वाघची गाडी पार्क झाली. वाघ उतरला. रिद्धीमाच्या बाजूला येऊन त्याने तिच्यासाठी दरवाजा उघडला आणि ती बाहेर येण्याची वाट पाहत दार धरून उभा राहिला.

रिद्धीमा उतरली. मिस्टर वाघने तिला थोडं पुढं जाऊ दिलं. आणि मग दरवाजा ढकलून तो ऑटोमॅटिक कीने लॉक करून तिच्या मागून गेला.

दोघे बेसमेंट पार्किंगमधून बाहेर पडले आणि हॉटेलमध्ये प्रवेशकर्ते झाले.

दरबानाने त्यांच्यासाठी काचेचा दरवाजा उघडून धरला होता व तो आदराने कमरेत वाकला होता. दोघे आत गेल्यावर दरवाजा व तो दोन्ही पूर्ववत झाले.

आतमध्ये मिस्टर वाघने एक फॅमिली टेबलसाठी चौकशी केली. त्या कर्मचाऱ्याने मिस्टर वाघ व रिद्धीमाला रिकाम्या कम्पार्टमेंटकडे लीड केलं. वाघने नजरेनेच पुढे चालण्यास रिद्धीमाला खूण केली.

कम्पार्टमेंटचा दरवाजा कर्मचाऱ्याने मोठ्या अदबीने त्यांच्यासाठी होल्ड केला. दोघे आत गेले.

"वेटर थोड्यावेळात येईल सर, मॅम! टील देन्, मेक युअर सेल्फ कम्फर्टेबल." तो कर्मचारी हसून म्हणाला व निघून गेला.

200-250 स्केअर फिटचे ते फॅमिली कम्पार्टमेंट एका स्युट पेक्षा काही कमी नव्हतं. एखाद्या राजवाड्यातील 'ग्रेट चेंबर' (सोलर) सजवावी तशी ती गडद लाल पडद्यांनी ज्याला गोंडे असलेली सोनेरी जाड झालर लटकत होती, सजवली होती. मधोमध वर झुंबर लटकत होते. दुपार होती म्हणून, नाही रात्र असती, तर इथं कॅंडलच्या मंद प्रकाशात जेवण्याचा अनुभव वेगळा असता... तरी दुपार असून ती फॅमिली कम्पार्टमेंट जरा अंधारीच होती. रोमॅंटिक वातावरण निर्मितीसाठी अशी रचना असावी बहुतेक. भिंतीवर असलेल्या आयताकृती पण बारीक खिडक्यांतून कडक सूर्यप्रकाश आत तीव्र येत होता. पण तो बैठकीपर्यंत पोहोचत नव्हता. त्यामुळे मेजवर जेवण करणाऱ्या व्यक्तींना त्या

सूर्यप्रकाशाचा काही त्रास होणार नव्हता याची काळजी इंटेरियर डिझायनरकडून नक्कीच घेण्यात आली होती.

जेवणाची मेज त्या खोलीच्या बरोबर मध्यावर होती. वाघने रिद्धीमासाठी खुर्ची मागे खेचली. रिद्धीमा बसली. वाघ तिच्या समोर बसला. दरवाज्याकडे तोंड करून.

त्याने मेनुकार्ड हाती घेतलं.

"तुमचा स्वभाव पाहता तुम्ही स्वतः ऑर्डर द्याल असं वाटत नाही. सो मीच विचारतो, व्हेज की नॉनव्हेज?"

"मी वेगन आहे!" ती चेहऱ्यावर काही भाव न आणता म्हणाली.

"अरे वा! मी पण व्हेजीच आहे!" तो मेनू बंद करत म्हणाला,

"आपलं चांगलं जमेल!" त्याने तिच्याकडे पाहिलं.

"सॉरी!" ती क्षणाचा विलंब न लावता उद्गारली. ही तिची सडन रिएक्शन होती.

"माफी मागण्यायोग्य चूक अजून आपण करायचा आहात! मग माफी कसली मागताय? का केलीय आधीच?" तो नजरेत चमक आणत विचारत म्हणाला.

"चूक माझ्या नाही, आपल्या बोलण्यात झाली म्हणून म्हणाले!" ती जरा रागात बोलली.

एवढ्यात वेटर आला. म्हणून मग ती स्वतःला शांत करत बसली.

"व्हॉट वूड यू लाईक टू हॅव सर?" वेटरने मोठ्या अदबीने विचारलं.

"स्टार्टर्ससाठी टोमॅटो सूप. आणि व्हेजमध्ये इथं जे स्पेशल असेल ते आणा! आणि हो, ऑरेंज ज्यूस पण!" वाघ त्याला म्हणाला.

"ठीक सर!" वेटर म्हणाला व निघून गेला.

त्याला लिहून घेण्याचेही कष्ट पडले नाहीत. ऑर्डर साधी व लक्षात राहण्यासारखीच होती.

स्टार्टर्ससाठी टोमॅटो सूप सोबत एंचीलाडज, केसिडियाज, वेगन स्टेक, गार्डन ग्रीन अँड पंपरनिकल पॅन्झानेला, बीट-मशरूम-अवकाडो सलाड हा मेन कोर्स व डिजर्टसाठी पीच क्रिस्प व टार्ट चेरी अँड मिंट सॉर्बे असं बरंच काही वेटर टेबलवर मांडून गेला होता. सोबत वाघचं ऑर्डर केलेलं ऑरेंज ज्यूस होतंच.

दोघांचं जेवण चालू होतं. मिस्टर वाघने काही न बोलता चार घास रिद्धीमाच्या पोटात जाऊ दिले. बरेच दिवस ती नीट जेवली नसणार हे त्याने बरोबर ओळखले होते. तोही खात होता. पण त्याची नजर रिद्धीमा वर नव्हती. तो रोखून तिला पाहत बसला

असता, तर ती निर्धास्त जेवली नसती हे त्याच्या लक्षात आलं होतं... आणि तीही त्याची नजर चोरून जेवण करत होती... एक नजर फक्त कधीतरी तिच्याकडे करून तो पाहत होता, त्यावेळेस वाघच्या चेहऱ्यावर नेहमीचे मंद स्मित...

सुखलेल्या रिद्धीमाच्या चेहऱ्यावर तेज दिसू लागल्यावर वाघ बोलू लागला...

"बरेच दिवस तुम्ही स्ट्रेसमध्ये आहात असं आपले बंधू सांगत होते. काही प्रॉब्लेम आहे का?"

तिने काही उत्तर देणे टाळले.

"फाईन! आपल्याला आपल्या पर्सनल लाईफबद्दल चर्चा करणं आवडत नाही. ठीक आहे. मग आपण आपल्याला घरगुती पेशंटबद्दल बोलूयात?" वाघने डोळयांत चमक आणत विचारलं.

त्याच्या या प्रश्नावर रिद्धीमा जरा सावरली. डिशमध्ये चालणारे काटे चमचे थांबले.

"सुशांत म्हणाले, की त्याला माईल्ड कॉग्निटीव्ह इम्पॅरमेण्ट हा आजार आहे. पण त्याला कार्डीओवॅस्क्युलर डिसिस नाही, हा आजार होण्याइतक त्याचं वयही नाही. मग आनुवंशिक असेल का?" वाघने प्रश्न केला.

"माहीत नाही! त्यांच्या कुटुंबाचा अजून शोध लागलेला नाही." ती म्हणाली.

"पण यात अवघड असे काहीच नाही. तो ज्या भागात सापडला, त्या भागातील पोलीस चौकीत मिसिंग रिपोर्टची चौकशी केली असती, तरी त्याचा शोध लागला असता!" वाघने सुचवलं.

"दादाने तो प्रयत्न केला आहे, पण कोणी तशी रिपोर्ट दाखल केलेली नाही." ती म्हणाली,

"आणि जरुरीचं नाही की तो तिथंच सापडला याचा अर्थ तो तेथिलच असेल..." रिद्धीमा पुढे बोलली.

"नक्कीच नाही! पण काही तरी लिंक्स असणारच. नाही तर तो त्या ठिकाणी का असला असता? आपल्या भावाने त्याचा विचार व पाठपुरावा करायला हवा होता!" तोंडातील घास संपवून मिस्टर वाघने काचेच्या ग्लासमधील ज्यूसचा घोट घेतला. नजर रिद्धीमावरच!

"तुम्हाला असं नाही वाटतं?" वाघने तिला प्रश्न केला.

"मी सांगेन दादाला!" ती त्याची नजर चुकवून म्हणाली.

"आणिही एक शक्यता असू शकते... दॅट ही माईट बी एन अनवॉन्टेड् चाईल्ड्!" वाघने सर्व कृती थांबवल्या,

"म्हणून पण त्याच्या हरवण्याची कोणी तक्रार केली नसेल!" तो नजर बारीक करून पुढे म्हणाला.

वाघ जसजसे एकेक पदर उलघड जात होता, तसतसे रिद्धीमा अस्वस्थ होत गेली होती. वाघने बोलून दाखवलेल्या या शक्यतेवर ती काहीच बोलली नाही...

"आय थिंक ही हॅस ए स्पेशल अफेक्शन अबाऊट यू!" वाघ काटा चमचा डिशमध्ये ठेवून दोन्ही हात हनुवटी जवळ दुमडून म्हणाला.

हे वाक्य मात्र रिद्धीमाला खरंच सहन झालं नाही. ती ताडकन उठली आणि आपली पर्स उचलून बाहेरच्या दिशेने चालू लागली.

"आत्ताच वेळ आहे जे आहे ते सांगण्याची! कारण इथून पुढे आपले आयुष्य अधिक कठीण होऊन जाणार आहे!" वाघ आपल्या जागी तसाच बसून होता. तो तिला ताकीद करत म्हणाला.

पण वाघ काय बोलतोय हे एकण्यासाठी थबकलेली ती मागेही न बघता निघून गेली.

"तुम्ही त्या मुलाच्या का पाठी लागला होतात?" मी मिस्टर वाघला प्रश्न केला.

"सूरज, डोन्ट यू नो, वाघ हॅव स्ट्रॉंग सेन्सेस टुवर्ड्स इविल फोर्सेस!" मिस्टर वाघ हसून म्हणाला.

त्याने आणखी एक ग्लास स्वतःसाठी ओतून घेतला. आणि त्यात बर्फ टाकला. बाहेर भयानक पाऊस... तशात अंधार पडत चालेला... काळे मेघ व रात्रीचा अंधार याने मिस्टर वाघचे आधीच शांत धीर गंभीर घर अजूनच भयाण वाटत चालले होते. शिवाय गार वारे, पाऊस याने हवेत मरणाचा गारठा वाढला होता. अशात हा कोकम मध्ये बर्फ टाकत होता...

माझ्या हातात ग्लास मात्र तसाच... वाघ म्हणाल्याप्रमाणे हातातील थंड कोकम माझ्या हाताच्या उष्णतेने कोमट झाला होता...

पण अजून तर खऱ्या विदारक सत्याला तर सुरवात देखील झाली नव्हती... आताच ही अवस्था, तर पुढील परिस्थिती काय असेल याचा मी विचारही करू शकत नव्हतो...

"तो तुम्हाला खुन्नस देत होता म्हणून तुम्ही त्याच्या मागे लागला होता ना?" मी त्याला खोचक विचारलं.

"तू मला ओळखत नाहीस का सूरज?" त्याने हसून विचारलं.

"ओळखतो; म्हणूनच विचारतोय!" मी म्हणालो.

"अलीकडे कोणीतरी जरा जास्तच धीट होत चाललंय असं दिसतंय!" तो कोकम सीप करत बोलला.

"आपल्या संगतीचा परिणाम आहे!" मी म्हणालो,

"पण खरंच, आपण त्याच्यामागे का लागला होतात? तो कोणी गुन्हेगार तर..." मी सिरियस्ली विचारलं. अडखळलो, कारण आणखी काही आठवलं होतं,

"आणि तो रिद्धीमासोबत तिच्या घरी बोलत होता तो माणूस कोण होता? आणि रिद्धीमा? ती देखील सस्पिशियस वागत होती... ती पण गुन्हेगार होती का? मग एसपी सुशांत? त्याला हे माहीत होतं, की नव्हतं...? की तो देखील सर्वांना सामील होता...?"

"अरे हो हो...! किती ते ओव्हर थिंकिंग!" वाघ मला थांबवत म्हणाला.

"पण आता तर मेटल कॅस्केट केस मागे पडून एक वेगळेच गूढ निर्माण झालं होतं..." मी विचलित होऊन म्हणालो,

"आणि हो! त्या केसबद्दल पुढे काही प्रोग्रेस झाली की नाही मग?" मी पुढे प्रश्नांची सरबत्ती चालू ठेवली...

"की रिद्धीमच्या खोलीतील व्यक्तीच या केसचा सूत्रधार असेल... की मग त्यांचा तो पेशंट निशांत? तो तर हे करत नसेल...? नक्की गुन्हेगार कोण होता...? की या परस्पर भिन्न घटना आहेत...?"

"अरे बास ना. बास ना. ऐक की पुढं!" मिस्टर वाघ जरा वैतागून म्हणाला.

"पण..." पण मी पुढं काही बोलणार तोच मिस्टर वाघने त्याची '.32' बोअर रिव्हॉल्व्हर उजव्या बाजूच्या होलस्टर मधून खेचून पुढे टेबलवर ठेवली. त्यावर 'सत्यमेव जयते' व त्या खालोखाल 'अनमोल रिव्हॉल्व्हर' असं देवनागरीत लिहिलं होतं व त्या खाली मग रिव्हॉल्व्हरची इतर माहिती. त्यानुसार 'स्मॉल आर्म्स् फॅक्टरी, कानपुर, मध्यप्रदेश' मध्ये ती बनली होती. भारतीय ऑर्डिनन्स फॅक्टरी, कोलकताचं हे एक युनिट. ही नक्की अलिकडेच कोणाला तरी मारून याने आपल्याकडे ठेवली असणार. कारण मी प्रथमच पाहत होतो ती.

'पण' नंतरचे माझे शब्द माझ्या नरड्यातून बाहेर पडले नाहीत. 'यह डर होना चाहीए! अच्छा लगा!' असं काहीसं वाघ मनात बोलला असणार हे नक्की! कारण त्याच्या श्रीमुखावर त्याचं ठेवणीतलं हास्य तरारलं होतं!

मिस्टर वाघ त्याच्या हॉटेल रूमवर सुजय शहाच्या बोर्ड ऑफ डिरेक्टरशी व्हिडीओ कॉंफेरेन्सद्वारे बोलत होता...

"आपले प्रपोसल मिस्टर सुजय यांच्याकडून ऐकले. ते या कंपनीचे फाऊंडर आहेत म्हणून आम्ही त्यांची सुचना टाळू शकत

नाही. त्यांच्या आग्रहास्तव आम्ही आपलं म्हणणं समजून घेण्याचा प्रयत्न करतोय." एक बोर्ड मेंबर म्हणाला.

"आय एम सिंसीयर्ली थँकफुल फॉर दॅट." वाघ नम्रपणे म्हणाला.

"नाही ते ठीक आहे, पण आपण कशात काही नसताना आमच्या प्रॉफिट मध्ये हिस्सा मागताय त्याचं काय?" दुसरा एक बोर्ड मेंबर जरा गुस्स्यातच बोलता झाला.

"त्यासाठीच मी ग्रेटफुल आहे!" वाघने हसतच त्या उद्दाम व्यक्तीची खिल्ली उडवली. 'शाल जोडीतले' म्हणतात तसं!

"तुमचा आम्हाला गोत्यात आणण्याचा विचार तर नाही ना मिस्टर वाघ?" बोर्ड मेंबर्स मधील जरा सिंसीयर वाटणाऱ्या एकाने प्रश्न केला.

"माझं तसं इंटेन्शन असतं, तर मी आपल्याकडे आलोच कशाला असतो? आपल्याला न माहीत होऊ देता मी आपला प्लॅन हाणून पाडू शकलो नसतो का? माझ्यासाठी ते अधिक सोपं होतं!"

बोलता बोलता मिस्टर वाघ त्याच्या पीसीवर देखील काहीतरी करण्यात व्यग्र होता. आणि हे बोर्डमधील काहींना खटकत होतं. आपल्याला हा किंमतच देत नाहीये असा काहींचा समज झाला होता... मग याला आम्हाशी बिझनेस तरी का करायचा आहे असा

त्यांच्या चेहऱ्यावर प्रश्न स्पष्ट दिसत होता. आणि एकाने तसे विचारलेही,

"आपल्याला आमच्याशी बोलाण्यात इंटरेस्ट नाहीये का विजय वाघ?"

"अरे तसे काही नाही. आपल्यासोबत अलायन्स जोडताना मला हे कसे विसरून चालेल, की मी अजून बऱ्याच लोकांसोबत असोसिएशनमध्ये आहे. माझे स्वतःचेही काही उद्योग आहेतच. सगळं एकावेळी पहावं लागतं!"

"मग तेच करा. आमच्याशी जुडण्याचा अट्टहास का?" एक रागाने म्हणाला.

त्याला हाताने अडवत एकजण बोलला,

"पण आपण आमच्यासोबत मिटिंगमध्ये आहात आता! मग तुम्ही दुसऱ्या कोणाशी चर्चा करूच कसे शकता? हे बिझनेस एथिक्समध्ये न बसणारे आहे!" एकजण ओरडला.

"अरे वा! म्हणजे मी आपलं डील पक्कं समजू?" वाघ उत्साहित बोलला.

"आम्ही असं म्हंटलेलं नाही अजून!" खोचक बोलणारा मधे घुसला.

"पण तुम्हीच आत्ता मला तसे म्हणालात! आणि जर तसे नसेल, तर आपल्या चिडण्याला काही अर्थ उरत नाही. आपण जर

माझ्याशी बिझनेस करण्यात इंटरेस्टड् नसाल, तर मी यावेळी काहीही करेन आपल्याला बॉदर् होण्याची आवश्यकता काय?"

"आम्ही आपल्याशी डील करू न करू, ही वेळ तुम्ही आमच्यासाठी ठेवली आहे!" वाघला टोकणाराच पुन्हा ओरडला. पण त्याला मधेच रोखत...

"चला! तुम्ही म्हणता ते मान्य केलं, तरी यात आमचा काय फायदा? सगळा तर तुमचाच फायदा दिसतोय!" तो सिंसीयर टाइप वयस्क बोर्ड मेंबर उच्चारता झाला.

"रियल इस्टेट!" स्क्रिनकडे रोख करत पीसीवरून लक्ष हटवत मिस्टर वाघ बोलला.

"रियल इस्टेट?" वाघवर चिडलेल्या मेंबर्स पैकी एक उच्चारला.

"हो रियल इस्टेट! आपल्या एनजीओचे प्रकल्प ज्या ज्या जमिनींवर उभे राहतील, त्या सर्व जमिनी तुमच्याच असतील! आणि जमिनीचे भाव तर फक्तन् फक्त वाढतच जातात...!!!" वाघ त्यांचा फायदा दाखवून देत म्हणाला,

"शिवाय या एनजीओ मार्फत आपण तुमच्या मूळ बिझनेस ग्रुपचा जो टॅक्स वाचवू पाहताय, त्यांतील पंचाहत्तर टक्के तर तुमचेच असणार आहेत. माझ्यापेक्षा तुमचाच मुनाफा अधिक आहे. शेवटी जमीन तुमची आहे, त्यामुळे तुम्हालाच पिकाचा भाग

जास्त येईल. मी तर आपला वाटेकरी!" वाघ उसना नम्रपणा आणत शेवटच्या वाक्यातून शेतकी उदाहरण देत त्यांना त्यांचा फायदा दाखवून देत होता...

"माझ्याकडून मिळणाऱ्या सर्व सर्व्हिसेस फ्री! कारण मी तुमच्या कंपनीकडे माझीच कंपनी म्हणून बघतोय!" वाघने आणखीन एक फायदा गिनवला.

"ठीक आहे! तुमच्या पासून काहीच लपून राहिलेलं नाही आहे... ठीक आहे! मान्य आहे!" त्या सिंसीयर वयस्क व्यक्तीने मिस्टर वाघ समोर हतबल होऊन मिस्टर वाघचा प्रस्ताव मान्य केला.

बहुदा त्याच्या समोर बोलायची वा त्याला काउंटर करण्याची कोणाची ऐपत नसावी. त्याच्या निर्णयापुढे कोणी काहीच बोलले नाही.

एव्हढा वेळ सुजय मात्र एखादा क्विझ काँटेस्ट पहावा तसा हा प्रश्न उत्तरांचा खेळ पाहत बसून राहिला होता. आता तो उत्साहाने बोलला,

"ओके देन्, काँग्रेचुलेशन्स मिस्टर वाघ फॉर एन्टरींग आवर् ग्रुप!"

"काऊंट मी आऊट ऑफ इट! मी फक्त माझा हिस्सा घेईन! तुमची कंपनी सर्वस्वी तुमचीच राहील. मलाच तुम्ही आपला सर्व्हन्ट समजा!" मिस्टर वाघ अगदी नम्रतेने बोलता झाला.

"आपला हाच नम्रपणा मला आवडतो!" सुजय हसून म्हणाला.

"ओके देन् वी कॉल इट अ डे! आपण पुन्हा भेटू फेस टू फेस!" सुजय बोलला.

"काँट्रॅक्ट साइन करायला!" वाघ लोभी हसून उच्चारला!

"हो!" सुजयही हसून बोलला आणि त्याने कॉन्फरन्स व्हिडीओ कट केला!

पण मिस्टर वाघच्या स्क्रिन वरील त्यांचे चेहरे हटले नव्हते! त्याला ते अजूनही राऊंड कोंफेसेन्स टेबलवर दिसत होते!

"नाईस जॉब!" सुजय त्या लोकांना म्हणाला,

"खूप छान एक्ट केलात तुम्ही! नाऊ गो! आपले पैसे माझे अकाऊंटट तुम्हाला पोहोचते करतील!" सुजयने वाक्य पूर्ण केलं.

काय? हा काय प्रकार होता...? मिस्टर वाघने जेव्हा मला हे सांगितले तेव्हा मात्र मी भन्न झालो! सुजयने त्याचे बोर्ड मेंबर्स म्हणून एक्टर्स् उभे केले होते...! पण का?

मी तर हे ऐकताना स्तंभित होतो. मिस्टर वाघ मात्र हसत होता...

तो त्यावेळीही हसत होता जेव्हा तो त्याच्या स्क्रिनवरील लाईव्ह स्ट्रीमिंग पाहत होता...

"सर, हे सगळं का?" ते एक्टर्स् बाहेर गेल्यावर आत आलेल्या सुजयच्या पीएने त्याला प्रश्न केला होता.

"विजय वाघ हा खूप खतरनाक माणूस आहे. त्याला कोणत्याही अडचणी शिवाय सम्मिलित करून घेतलं असतं, तर त्याला संशय आला असता म्हणून."

"पण मग याला भविष्यात खरं कळलेलं तर?" पीएचा प्रश्न.

"तो पर्यंत हा जिवंत रहायला हवा ना! पण एक ध्यानात ठेवा, तो मरेपर्यंत कामं बंद ठेवा." सुजय म्हणाला.

मिस्टर वाघला पुढं काही जाणून घ्यायची गरज वाटली नाही. त्याने त्याची स्क्रिन बंद केली.

मी सुन्न होतो! सुन्न! कोणतीही भावना, वेदना, संवेदना त्यावेळी मला जाणवत नव्हती... जाणवणार नव्हती...

"काय अजून थंडी वाजतीए?" वाघ माझ्याकडे हसून पाहत विचारत होता!

"क... काय आहे हे...? कशाचा कशाला संदर्भ तर नाहीच... पण... पण... हे असं..." मला काय बोलावं सुचत नव्हतं...

"बघ! तुला म्हणालो होतो, की नाही; तुला थंडी वाजणार नाही याची मी काळजी घेईन म्हणून!" वाघ चेष्टा करत म्हणाला. पण त्याचा आवाज खूप गंभीर होता.

"सुजय काहीशा फायद्यासाठी तुम्हाला मारणार होते? ही काय मानसिकता आहे? आणि तुम्हाला तर काय गरज होती त्याच्या हिश्यात वाटणी मागायची?" मी जाब विचारत बोललो. ही माझी त्याच्या विषयीची काळजी बोलत होती.

"तो एनजीओच्या नांवाखाली लोकांची, जनतेची फसवणूक करणार होता आणि तुला हे मान्य आहे?" त्याने मला प्रश्न केला!

मी गप्प राहिलो. माझी चूक माझ्या लक्षात आली... मी मान खाली घेतली.

"कोणाच्याही बद्दल इतकं प्रेम असू नये सूरज, की ज्याच्यापुढे चूक सुध्दा चूक वाटू नये! मला माहित आहे, तू माझ्या काळजीपोटी असं बोलला आहेस. त्यामुळे मी तुला सूट देतो. पण यापुढे लक्षात ठेव, प्रेम इतकं मोठं होऊ देऊ नको, की चूक बरोबरच्या परिभाषा बदलायला लागशील! तू हे समजू शकतोस म्हणून सांगतोय!" वाघ गंभीर मुद्रेने तो बोलला.

"माफ करा!" मी सहज बोलून गेलो. पण ही सहजता बेफिक्रीतून नाही, तर सामंजस्यातून आली होती.

"चालू करा, रसवंती चालू करा!" तो वातावरण निवळण्यासाठी मस्करीच्या सुरात म्हणाला.

"या सुजयचा नक्की व्यवसाय काय होता?" मी मूड बदलत विचारलं.

माझ्या वाक्यरचनेवर मिस्टर वाघ हसला. मी 'होता' हे क्रियापद वापरलं होतं. आणि ते इतकं लिलया माझ्या तोंडून बाहेर पडलं होतं, की त्याचंच त्याला हसू आलं होतं. 'आहे' हे क्रियापद मी वापरणारच कसा होतो, कारण त्याने या सुजय शहाला जिवंत ठेवला नसणार हे लक्षात यायला कोणी ब्रह्मज्ञानी असण्याची आवश्यकता तर नव्हती... वाघ माझ्यासमोर जिवंत आहे म्हंटल्यावर तो शहा नक्कीच मेला असणार! आता तो कसा गेला ते ऐकणे बाकी होते इतकंच...

"तो एज्युकेशन फिल्ड् मधला माणूस होता! बऱ्याच प्रकारच्या इन्स्टिट्यूट्स त्याची कंपनी रन करत होती. आणि सर्वांत महत्त्वाचं, तो देशभरात काही अनाथाश्रम चालवत होता!" मिस्टर वाघने माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं.

"हा नक्कीच त्याचा हाईड आऊट असणार! नक्की तो असं काय करत होता, जे तुम्हाला खटकलं आणि तुम्ही त्याच्या मागे लागलात?" मी डोळे बारीक करून विचारलं.

"मर्डर्स!" वाघने एका शब्दातच मला गार केलं!

'ते कसं?' हा मी प्रश्न विचारण्या आधीच तो साहजिक ताडून मिस्टर वाघने घटना पुढे सांगण्यास सुरुवात केली...

मिस्टर वाघ गाडी चालवत होता... त्याचा मोबाईल घणाणला... त्याने गाडी बाजूला लावली आणि तो कॉल घेतला. फोन सुशांत नेनेचा होता.

"बोला काय अपडेट?" पलिकडून सुशांत काही बोलण्याआधीच वाघने त्याला प्रश्न केला,

"सांगितलेली माहिती गोळा झाली?"

"होतीये! आपल्या टीमकडून डेटा प्रोसेस देखील केला जातोय. पण आपल्याला कळवायचे हे होते, की आणखी एक बॉडी सापडली आहे. माझं मत आहे, की यावेळी तुम्ही स्वतः ती पहावी!" सुशांत बोलला.

"याआधीही मी जॉईन झाल्यावरच एक घटना घडली होती, त्यावेळी तुम्हाला नाही वाटलं, की प्रत्यक्ष मला दाखवावं, मग आत्ता का?" वाघने खोचक विचारलं.

सुशांतला खजील करण्याचा मिस्टर वाघचा बेत होता, तो यशस्वी ठरला होता! त्याचा बाण वर्मी लागला होता, कारण सुशांत शांत होता. इयरपीस मधून फक्त वारं जात असल्याचा आवाज ऐकू येत होता...

"त्यावेळी माझ्यावर पूर्व विश्वास नव्हता. हं?! असो, पत्ता मेसेज करा पोहोचतो!" वाघने कॉल कट केला.

तो गाडीतच बसून राहिला. काही वेळाने मेसेज टोन वाजली. सुशांतने मॅप सेंड केला होता. तो मॅप गाडीच्या नेव्हीगेशनशी कनेक्ट करून मग वाघ त्या मॅपला फॉलोव्ह करू लागला...

तासाभराचा रस्ता ओलांडून तो एका गांवात शिरला होता. ते गांव देखील त्याला ओलांडून गांवाबाहेर जावं लागलं होतं. एका शेताच्या विहरीतून ती ट्रंक काढण्यात आली होती.

मिस्टर वाघ येईपर्यंत ती ट्रंक विहिरीतून फक्त बाहेर काढून ठेवली होती. पण तिला उघडले गेले नव्हते. सुशांत खरंच मात्र वाघला सिरियस्ली घेत होता, त्याला महत्त्व देत होता हे याचं द्योतक होतं.

वाघची गाडी येताना दिसताच तो ट्रंक जवळची जागा सोडून वाघच्या गाडीकडे धावला होता. एव्हाना गांवात माहिती झाल्याने गांवातील रिकामी डोकी देखील तिथं जमा झाली होती. म्हणून मग 'पोलीस कॉशन लाईन' चहू बाजूंनी टाकण्यात आली होती. जी कोणाला क्रॉस करण्याची परवानगी नव्हती.

पंचनामा करणारे, फॉरेन्सिकवाले सर्व आधीच हजर होते, पण वाघ यायचा असल्याने त्यांना त्यांचे काम चालू करता आले नव्हते.

म्हणून तेही ताटकळले होते. वाघची गाडी त्यांना माहीत नसली, किंवा समोरील गाडीतून कोण येतंय हे माहीत नसले, तरी ती गाडी येताच सुशांत तडख जागचा हलल्यामुळे ते सर्व देखील सावध झाले.

मिस्टर वाघ गाडीतून उतरला. आता त्याची ती गाडी जमलेल्या लोकांच्या विरंगुळ्याची केंद्र झाली होती. गांवचे जमलेले लोक सापडलेला मृतदेह विसरून वाघची 'मर्सिडीज-बेंझ इक्यूसी' पाहण्यात व त्याविषयी चर्चा करण्यात गुंतले. त्यांचा गाडीभोवती घोळका झाल्याने सुशांत व त्याचे सहकारी देखील त्या जमावाला अडवण्याच्या कष्टापासून इथून पुढे विसावले गेले.

"बोला!" विहिरीजवळच समोर दिसणाऱ्या मेटल कॅस्केटकडे पाहत वाघने सुशांतला विवरण देण्याचा इशारा केला.

सुशांत देखील न थांबता वाघपाशी पोहोचला तसाच त्याच्यासोबत परत मागे चालू लागला होता...

"सुमारे साडेपाच वाजता फोन आला. शेताचा मालक सकाळी पाणी पाजायला आला होता, तेव्हा त्याला ही पेटी त्याच्या विहिरीत अडकलेली दिसली. पेटीत पूर्ण पाणी भरले गेले नसावे म्हणून ती तरंगत असावी. टाकणाऱ्याचे फक्त टाकून लवकरात लवकर निघून जाण्याकडे लक्ष असावे! पेटी बुडेपर्यंत थांबला

असता, तर पकडला गेला असता. सो त्याने ती टाकताक्षणी पोबारा केला असणार!" सुशांतने निष्कर्ष ऐकवला.

"ही रहदारीची जागा नाही. तुम्ही येण्याआधी गाडीचे मार्किंग्स् वगैरे काही मिळाले?" वाघने विचारले.

"हो! आपला एक माणूस ते मार्क्स फॉलोव्ह करतोय!" नेने बोलला.

"गुड!" वाघने गल्व्हससाठी हात पुढे केले. डोळे त्या ट्रंकवरच. ट्रंक मधील पाणी रिसून त्या ट्रंक भोवती वेडंवाकडं ओलीतं झालं होतं. विहिरीच्या सभोवार गवत असल्याने ते पाणी त्यात जिरत होतं. दव जमावे तसे ते पाणी त्या गवतावर चढले होते.

एका फॉरेन्सिक एक्स्पर्टने त्याला एक गल्व्हसची जोडी हॅन्ड ओव्हर केली. ते हातात चढवून मिस्टर वाघने गुडघ्यांत वाकून बसत त्या ट्रंकचे लॅच खोलले.

आतील परिस्थिती बघून ज्यांच्या नजरा मिस्टर वाघ व त्या ट्रंकेकडे होते, त्यांतील काही विचलित झाले.

डेडबॉडीचे तोंड ठेचले होते. हात पाय धडापासून कापून, ते धड देखील दोन भागांमध्ये कापले गेले होते. मग ते धड व त्याचे कापलेले हातपाय एकावर एक रचून त्या ट्रंकेत कोंबले होते.

"नक्कीच ही व्यक्ती सहा फुटांपेक्षा जास्त असणार! नाहीतर मधून देखील कापले नसते." वाघ म्हणाला.

तो उठला.

"तुमच्या टायर मार्क्स फॉलोव्ह करणाऱ्या माणसाला फोन करा आणि त्याला काही लीड मिळाली का पहा!" वाघ सुशांतकडे न बघता म्हणाला. तो अजूनही त्या बिभत्स मृतदेहकडे पाहत होता.

हे विदारक दृश्य पाहून बरेच पांगले होते. तिथं थांबण्याची बव्हंशींची इच्छा राहिली नव्हती. काही चांडाळ चौकडी पद्धतीचे चार - आठ राहिले होते इतकेच.

सुशांतने त्याच्या ऑफिसरला कॉल लावला होता.

"हं! ठीक आहे! कीप ऑन द टेल!" सुशांतने माहिती घेऊन फोन कट केला.

तो वाघकडे परत आला.

"असं कळलंय की..." तो काही बोलणार तोच वाघने त्याला रोखलं.

"चला तिकडे जाऊनच पाहू!" तो आपल्या गाडीकडे वळला. चालू लागला.

"आपलं काम करा. रिपोर्ट्स माझ्या टेबलवर ठेवा! वेळेनुसार बघून घेईन!" पंचनामा करणाऱ्या टीम व फॉरेन्सिक डिपार्टमेंटला हुकूम सोडून सुशांत देखील वाघ मागून गेला.

मिस्टर वाघने एव्हाना त्याच्या गाडीच्या स्टेअरिंगचा ताबा घेतला होता. सुशांत नेने त्याच्या शेजारी बसला. मिस्टर वाघने गाडी हलवली...

गाडी सुशांत सांगेल त्या दिशेने धावत होती. नेव्हीगेशन मॅप त्याच्या हाती मोबाईलवर होता. एका क्षणाला मग मिस्टर वाघने त्याचा फोन त्याच्या हातून घेतला व पुढं स्टँडला अटॅच केला. पण वाघच्या या वागण्याला प्रतिक्रिया न देता सुशांत पुढे पाहत गप्प बसला.

"आपल्या बहिणीला काल मी लंचला घेऊन गेलो होतो, आपल्याला राग तर नाही आला?" वाघ बोलला.

"काय?" सुशांत नेने ताडकन उडाला.

"म्हणजे तुम्हाला रिद्धीमा यांनी काही सांगितलेलं दिसत नाही." वाघ पुढं पाहूनच हसत म्हणाला.

"न... नाही!" नेने उद्गारला.

"त्या तशाच आहेत म्हणा. कोणाशी काही न बोलणाऱ्या." वाघ बोलला.

सुशांत मात्र थोडा चिडलाच होता.

"मिस्टर वाघ! आपण एकत्र काम करतोय, मी तुम्हाला हायर केलंय इथं र्यंत आपलं प्रोफेशनल रिलेशन ठीक आहे. पण माझ्या

बहिणीबद्दल जर आपल्या मनात काही वेडंवाकडं असेल, तर मी ते खपवून घेणार नाही!" सुशांत डोळे लालेलाल करत रागाने बोलला.

"बरं वाटलं, आपल्याला आपल्या बहिणीची काळजी आहे हे पाहून! बरं वाटलं. पण तुम्हाला हे माहीत आहे का, की तुमची बहीण ही डिप्रेशनमध्ये आहे?" वाघने हसू चेहऱ्यावर घेऊन सुशांतकडे पाहिलं.

मिस्टर वाघचं हे वाक्य सुशांतच्या रागावर कमालीचं काम करून गेलं. सुशांतचा चेहरा क्षणार्धात निवळला.

"त्यांना पहिल्यांदाच पाहिल्यावर मला हे लक्षात आलं होतं. म्हणून मी विचार केला, की त्यांना बाहेर घेऊन जावं. त्यांना बरे वाटेल. त्यांना काही त्रास आहे का?"

"त्रास असं काही नाही. अलिकडे जरा स्ट्रेस्ड् असते हे मलाही जाणवलं आहे, पण त्याहून अधिक काही नाही असंच मला वाटत होतं..." सुशांत आवाजात मृदुता आणत आपल्याच विचारात बोलला.

"त्यांच्यात हा बदल कधीपासून झाला काही अंदाज?" वाघने विचारलं.

"तिची एक मैत्रीण जोत्स्ना कर्णिक हिच्या मृत्यूपासून. तेव्हापासूनच ती जरा कोशात असल्यासारखी वागते आहे. म्हणूनच मी तिचं क्लिनिक घरातच हलवलं. तिचा कामाचा

व्यापही कमी होईल याची काळजी घेतली. निशांतची ट्रीटमेंट करणं हा तिचा हट्ट तिनं सोडला नाही म्हणून तेवढी मुभा मी तिला दिली..." सुशांत म्हणाला.

"असाय तर!" वाघला हवी ती माहिती मिळाली होती.

परंतु त्याला अजून खोलात जावे लागणार होते... आणि असे काही जाणून घ्यावे लागणार होते, जे सुशांत नेनेला माहीत नाही... आणि जे मिस्टर वाघच्या तोंडून ऐकून मी देखील शहारून गेलो होतो!!!

वाघ नेव्हीगेशनची पाठ धरत एका ठिकाणी येऊन थांबला. निर्जन स्थळ! हे देखील एका शेताजवळच. त्या स्थळाच्या मधोमध एक जळलेली चारचाकी. इतका वेळ ते शेतातून प्रवास करत आले होते. दोहो बाजूंनी तण पुरुषभर उंच होते. ते जणू प्रत्येक शेतांच्या तटरक्षक भिंतीच होत्या. शिवाय प्रत्येक मालकाचे क्षेत्र रक्षणाचे काम देखील हे तण करत असल्याने कोणी कदाचित ते कापण्याची तसदी घेतली नसावी. त्याची वेळोवेळी हवी तेवढी काटछाट करण्यात येत होती ते त्याकडे पाहून लक्षात येत होते. दुरून कुठून तरी पाण्याच्या झुळझुळीचा आवाज कानी येत होता. कोणी कोणी प्राणी ओरडल्याचे आवाज देखील येत होतेच. दोन्ही बाजूंना या तणांच्या भिंतीपलिकडे लोक शेतात काम करत असणार पण या

तणामुळे त्यांचे जग आणि हा दुपदरी गवती रस्ता ही वेगवेगळी भिन्न विश्वं निर्माण केली होती जणू...

भर दुपारी देखील भयाण व किर्र् शांत भागातून ते प्रवास करत एका गवताळ मैदानात पोहोचले होते. महिनाभर पावसाने गवत वाढलं होतं. त्या पावसातच इथलं गवत पुष्ट झालं होतं. पण मागील एक-दोन आठवडे पावसाची दडी पडली होती.

मिस्टर वाघने गाडी थांबवली होती, पण तो गाडीतच बसून होता. नेने मात्र उतरला. आपल्या माणसाला सर्व बाजूंना नजरेनेच धुंडाळत तो त्या जळक्या गाडीच्या दिशेने सरकत होता. वाघ देखील उतरला आणि काही ढेंगांतच तो नेनेजवळ पोहोचला. सुशांत नेने गाडीची पाहणी करत होता.

"काही उपयोग नाही. काही एव्हीडेन्स गाडीत सुटले असतील, तरी या आगीने जळून नष्ट झाले असतील!" वाघ बोलला. तो खिशात हात खालून निवांत उभा होता.

सुशांत गाडी भोवती फिरून पाहत होता. मग तो खिशातून मोबाईल काढून फोन लावत मिस्टर वाघपाशी आला.

"रिंग जातीये पण तो उचलत नाही!" तो म्हणाला.

"आपला ऑफिसर?" वाघने विचारलं.

"हो! इथंच असायला हवा होता. कुठं गेला असेल?" नेने चिंतित मुद्रेने म्हणाला.

"ही गाडी त्याची नाही?" वाघने विचारले.

"नाही!" नेने चिंतित भावाने फोन कानाला पुन्हा लावला.

"कदाचित पुढील काही लीड मिळाली असेल." वाघ म्हणाला.

"हो असेलही!" फोन कट करत नेने बोलला.

"एक काम करा, पुढील नेव्हीगेशन पाठवलंय का ते पहा. नसेल तर त्याचं लास्ट लोकेशन ट्रेस करा!" वाघने पर्याय सुचवला.

"हो!" म्हणत सुशांतने मॅप पाहिला. पुढील लोकेशन शो होत होतं.

"आहे आहे. निघुयात!" तो गाडीकडे धावला व त्याने मिस्टर वाघच्या मर्सिडीज स्टेरिंगचा ताबा घेतला.

वाघ त्याच्या मागून आरामात चालत बाजूच्या सीटवर जाऊन बसला.

मोबाईल स्टॅण्डला अडकवून सुशांत मोबाईलवर दर्शवलेल्या रस्त्याचा पाठलाग करू लागला.

गाडी पुन्हा मघासारख्याच घनदाट तणकटातून धावू लागली. यावेळी मघापेक्षा जास्तच वेळाने. गाडी सटकून समांतर जाणाऱ्या खड्यांत ढासळेल, याची चिंता सुशांत नेनेला नव्हती. त्याला काळजी त्याच्या ऑफिसरची होती.

वाघ मात्र काहीच न बोलता निवांत मागे रेलून बसला होता. सीटबेल्ट असून त्याचं शरीर खळग्यांमुळे हिंदकळत होतं. सुशांत मात्र ड्रायव्हिंग सीटवर टिकून होता. त्याचं पूर्ण ध्यान त्याच्या ऑफीसरच्या सेफ्टीकडे होतं आणि म्हणूनच तो रस्ता लवकरात लवकर पार करण्यात!

ते पुन्हा एकदा निर्जन अशा मैदानात पोहोचले होते. हे मैदान फार मोठे नव्हते. मधोमध एक मजली जुने आरसीसी घर होते. त्याच्या भोवतीचा पन्नासभर फुटांचा व्यास मोकळा असेल, जे इथं राहणाऱ्याने कापलं असेल, नाही तर बाकी चहूबाजूंनी उंचच उंच गवताळ. एकच रस्ता होता ज्याला तोडीत वाघची गाडी सरळ रेषेत येऊन त्या घराजवळ थांबली.

सुशांत उतरून हाती त्याची पिस्टल सज्ज ठेवून तो त्या घराकडे पळाला. दार बंद होते, त्याने खांद्याचा धक्का देऊन ते उघडले आणि तो आत घुसला. दाराचा भिंतीला थडकलेला आवाज झाला फक्त आणि अचानक सगळं शांत झालं.

ही जागा होतीही तशीच इथे वाढलेल्या गवताने या ठिकाणाला वास्तव विश्वाशी वेगळं केलं होतं. जणूकाही हे वेगळंच जग असावं. ते जसं काही आभाळाला टेकलेलं गवत त्या जागेला प्रवाही जगाशी तोडत होतं!

मिस्टर वाघ शांतपणे पायऱ्या चढत आत प्रवेशाला. पाहतो, तर सुशांत क्षुब्ध असा उभा होता. त्याची पिस्टल खाली झाली होती. तो शून्यात होता... कारण त्याचा तो ऑफिसर मेलेल्या अवस्थेत त्या ठिकाणी पडला होता!

त्याच्या छातीतच खोल घाव केला गेला होता! इतका की तो त्याच्या हृदयाला देखील चिरून गेला होता. घाव वरून खाली करण्यात आला होता.

वाघच्या डोक्यात चक्रं फिरली. समोरील माहिती त्याच्या मेंदूने क्षणात प्रोसेस केली होती. त्याला कोणते हत्यार वापरले गेले असावे हे घाव पाहून लक्षात आले होते. खूनी दिसायला कसा असेल, त्याची अंगकाठी, उंची काय असेल या सगळ्याचा त्याला अंदाज आला होता.

मिस्टर वाघने हे चित्र बघताच त्याचे डोळे सावध झाले. रक्ताने बरबटलेल्या बूटाचे ठसे एका दुसऱ्या दरवाज्याकडे जात होते. मिस्टर वाघने तो दरवाजा उघडला. ठसे बारीक व अदृश्य होत गेले होते... पण खूनी व्यक्ती नेमकी कुठं गेली असेल याचा अंदाज लावणं अवघड नव्हतं. समोर एक दरवाजा होता. वाघने तो दरवाजा उघडला.

समोरील उंचच्या उंच गवत मधेच वाकत सरळ रेषेत दूरवर गेलं होतं... मिस्टर वाघने बाहेर उडी घेतली आणि तो त्या मोडलेल्या गवतामधून पळत गेला...

त्याची 'कोल्ट पायथन' त्याच्या हाती कधीची विसावली होती. मिस्टर वाघच्या हाती त्याची ही आवडती रिव्हॉल्व्हर आली, की ती त्याच्या शरीराचाच एक भाग होऊन जाते हे सांगणे न लगे...

त्याला कसलासा आवाज ऐकू आला. सरसरणाऱ्या त्या गवतामधून वाघ सोबत आणखी कोणीतरी धावत होतं... पण ते वाघच्या विरुध्द दिशेला नाही; तर वाघच्या दिशेने...

मिस्टर वाघ जागीच थांबला. त्याने कानोसा घेतला. त्या गवतात पुढचं काही दिसत नसल्याने त्याला आपल्या तीक्ष्ण श्रवण क्षमतेवर अवलंबून रहाणं भाग होतं, पण त्याची ऐकण्याची शक्ती मुळातच प्रचंड तीक्ष्ण असल्याने त्याचे कानच त्याचे डोळे बनले होते.

वाघने ठाव घेत एक गोळी झाडली. त्या शांततेत जोराचा आवाज घुमला. ती गोळी गवत चिरत कोणाला तरी घुसली होती हे नक्की! पण कोणाच्या ओरडण्याचा आवाज मात्र आला नाही. फक्त काहीतरी गवतात आदळल्याचा सौम्य आवाज आला एवढंच!

मिस्टर वाघ त्याने गोळी चालवलेल्या दिशने सरकला. एक साधारण सहा फूट दोन इंच उंचीचा, धिप्पाड अजस्त्र माणूस मिस्टर वाघच्या कोल्ट पायथन मधून निघालेली '.357' मॅग्नम कॅलिबर बुलेट लागून मृत झाला होता. वाघच्या गोळीने नेमका त्याच्या हृदयाचा ठाव घेतला होता.

त्याच्या हातातील कुऱ्हाड बाजूला गवतातच पडली होती. त्याला लागलेलं रक्त वाळलं होतं. सहा इंची पोलादी पातं त्या वाळलेल्या रक्तानं लालभडक झालं होतं!

साहजिक याच कुऱ्हाडीने तो विहिरीत फेकलेला मृतदेह तोडला होता. आणि ऑफिसरला देखील यानेच मारण्यात आलं होतं!

या विराण, भयाण जंगल सदृश्य जागी वाघची शिकार करण्यास कोणीतरी धजावत होता... पण त्याला हे माहीत नव्हतं, की हा 'वाघ' माणसांची शिकार होणाऱ्यातला नाही, तर शिकार करणाऱ्यातला आहे!

"गॉड!" मी अर्धमेला बसून होतो... मला काही सुचत नव्हते.

असंख्य मुंग्या माझ्या मेंदूवर वळवळत तो झाकोळून टाकत आहेत असा आभास होऊन माझ्या डोळ्यांसमोर अंधारी पसरत चालली होती...

"सूरज! सूरज!" मिस्टर वाघने मला भानावर आणण्यासाठी हाक मारली.

"अजूनही वाजतीए थंडी?" त्याने परत चिडवत विचारलं...

"म्हणजे खूनी सापडला?... म्हणजे मेला... तुमच्या हातून?" मी त्याचा प्रश्न टाळून त्यालाच प्रश्न केले.

"सॉर्ट ऑफ!" मिस्टर वाघ मंद स्मित करत म्हणाला.

त्याने पुन्हा आपला रिता ग्लास कोकमने भरून घेतला. माझा तर अजून पहिलाच ग्लास संपला नव्हता. मी तो तसाच धरून होतो. सगळं ऐकत असताना एकदाही तो तोंडाला लावण्याचं भान मला नव्हतं.

"तुम्ही त्या माणसाला न पाहता कसं काय उडवलंत?" माझी घाबरगुंडी उडाली होती. मी थरथरत विचारलं.

"त्या शांततेत त्याच्या पळण्यामुळे होणाऱ्या गवताच्या सळसळी शिवाय कसलाच आवाज नव्हता. त्यामुळे त्या दिशेला त्याच्या हृदयाची धडधड ऐकणं व त्याचा वेध घेणं माझ्यासाठी सोपं गेलं!" वाघ नेहमी सारखं सहज बोलला.

नेहमी सारखं आत्ताही आपण एखाद्या माणसाला मारल्याविषयी बोलतोय हे त्याच्या गांवी देखील नव्हतं, की काय इतक्या सहज तो बोलला होता.

"त्याचं विहिरीत फेकलेल्या माणसाला मारण्याचं कारण?" माझी शंका.

"त्याने काही फरक पडतो का?" वाघने झडखडून हसला.

हो! बरोबरच. तो त्याच्या फायनल डेस्टिनेशनला पोहोचला होता. माध्यम; मिस्टर वाघ! आता त्याने पूर्वी जो गुन्हा केला, त्याला काय कारण होतं, याला काय महत्त्व होतं...! आणि ते न कळणंच जास्त श्रेयस्कर होतं, कारण मिस्टर वाघला या माणसाला आता दुसऱ्याच कारणासाठी वापरायचं होतं!

"तो इतका धीट होता, की ते लास्ट नेव्हीगेशन त्या अपराध्यानेच पाठवलं होतं! एक ऑफिसर आलाय म्हंटल्यावर त्याच्या पाठोपाठ बरेच जण आपला शोध घेत इथं येतील हे तो जाणून होता, म्हणून हे नेव्हीगेशन फॉलोव्ह करून जे येतील त्यांना त्या ऑफिसर सारखेच संपवण्याचा त्याने बेत आखला होता!" वाघ शांत भाव ठेवून म्हणाला.

"पण... पण जर त्याला तुम्हाला मरायचंच होतं, तर तो त्या घरातच का नाही थांबला?" मी बळ एकवटून विचारलं.

"त्या ऑफिसरचा पाठलाग करत किती लोक येतील हे त्याला माहित नव्हतं. म्हणून गवतात एकेकट्याला गाठून मारावा हा त्याचा प्लॅन होता!" वाघ स्पष्टता देत होता,

"म्हणूनच तो त्या गवतात लपून होता. मी शेवटी जिथे पोहोचलो, तिथून तो गवत तुडवत पुढे गेला होता खरा, पण मध्येच छेद देऊन त्याने दुसरा मार्ग पकडला होता. असे बरेच ट्रेसेस त्याने तिथं तयार करून ठेवले होते. वरून पाहिलं गेलं असतं, तर ती एक सूंदर वृक्ष सदृश्य सुंदर नक्षी त्याने त्या गवतात रेखाटली होती म्हणायला हरकत नाही."

एवढं गंभीर बोलत असताना सुद्धा तो त्याची सौंदर्य दृष्टी जोपासून होता. जीवनाकडे व मृत्यूकडे समकक्ष व तटस्थ राहून सकारात्मक पाहण्याच्या त्याच्या विचारसरणीचं इथं मला दर्शन झालं. पण त्याक्षणी मला याचं आश्चर्य, की हा एवढं जीवघेणं काही तरी सांगतोय, आणि त्यातही त्याला सूंदरता दिसते?!

"म्हणजे वेगवेगळे रस्ते तयार करून त्याने तुम्हा लोकांसाठी ट्रॅप्स तयार केले होते?" मी थरकापत विचारलं.

"हो! अशाने त्याला जितके लोक त्याच्या मागावर येतील त्या सर्वांना विभक्त करून मारणं सोपं झालं असतं. बट हिज बॅड, त्याच्या मागे मी गेलो!" वाघ क्रूर हसला.

त्याच्या अशा विचकण्याने मला त्याचीच अधिक भीती वाटली...

मिस्टर वाघ त्या घरात परतला होता.

"सॉरी नेने साहेब! माझ्यावर त्या खून्याने हल्ला केला. म्हणून मला त्याला मरावं लागलं." वाघ बोलला.

तो यावेळीही काही तरी बनाव करू शकला असता, म्हणजे माझ्यावर गोळी झाडून मला डिस्ट्रॅक्ट करून खूनी पळून गेला, अथवा तो खूनी पळून जात असताना एखाद्या हिंस्र जनावराने आधीच त्याला मारले होते व त्याचे भक्ष्य ते श्वापद चघळत बसले होते. त्याला खून्याची डेडबॉडी तेथेच सोडून हाकलवून लावण्यासाठी मिस्टर वाघने फायर केले होते, पण ते जंगली श्वापद खुन्याच्या मृतदेहासकट पळाले, इत्यादी काहीही... पण तो खरं बोलला.

"काळजी करू नका. कव्हर केलं जाईल. तुम्हाला काही अडचण येणार नाही!" एव्हाना सुशांतने स्वतःला सावरले होते. उठत सुशांत म्हणाला!

डोळयांत आलेले पाणी गन असलेल्या उजव्या हातानेच टिपून सुशांत त्या घराबाहेर पडला. मिस्टर वाघ त्याच्या पाठी होताच!

यावेळी गाडी वाघ चालवू लागला. सुशांतची गाडी चालवण्याची अवस्था नव्हती आणि आता त्याला तशी निकड देखील राहिली नव्हती.

"सो आय गेस, आवर् केस इज क्लोज्ड्!" वाघ थंड स्वरात बोलला.

"कदाचित हो! आपली खूप मदत झाली." निराश सुशांत बोलला,

"आणि तुम्ही खरंच काळजी करू नका! आपल्याला यात कुठेही अडकवले जाणार नाही!" नेने मिस्टर वाघला आश्वस्त करत बोलला. त्याचा तो स्वर इतका थंड व धीर गंभीर होता, की तो त्या शांततेत रेजोनेट होत होता.

मग काहीतरी ध्यानात घेत त्याने आपला मोबाईल खेचला. आपल्या हेडकोर्टर्सला फोन केला,

"मी पाठवतोय त्या लोकेशनवर तुकडी पाठवा. एक डेडबॉडी ताब्यात घ्या! ती संभाव्य आरोपीची आहे!" पुढील व्यक्तीला इन्स्ट्रक्शन्स देत सुशांत नेने फोनमध्ये बोलला.

"एक मिनिट!" मी उद्गारलो!

"आत्ता काय? तू फ्लो तोडत जाऊ नको रे!" वाघ चेहऱ्यावर वैताग आणत म्हणाला.

"माफ करा यावेळी मी जास्तच टोकतोय... पण तुम्ही तर म्हणाला होतात, की खूनी पाच फूट सात इंच असेल, पण हा तर सहा फुटांच्यावर निघाला... हे कसं? म्हणजे आणखी कोणी इतर खूनी होता का?"

"खूनी एकापेक्षा जास्त असतील हे देखील मी म्हणालो होतो. आठवतंय?" वाघने डोळे बारीक करत मला प्रश्न केला.

"हो. म्हणाला होतात खरे..." मी डोळे खाली करत म्हणालो, पण पटकन मला काही लक्षात आलं,

"मग तुम्ही केस संपली असं कसं म्हणलात सुशांतला? आणि त्यानेही ते मान्य केलं?" मी पुन्हा शंका विचारली.

"गुड! आमचा शंकासुर जागा झाला!" मिस्टर वाघने उपहास केला.

"शिवाय आपण खून केल्याचं स्पष्ट कबूल करून टाकलंत? तुम्ही असे तर कधी वागत नाही! मग तुम्ही तो न लपवता सुशांत नेनेला मान्य का केलात?" मी काळजीपोटी विचारले.

"आधी शेवटच्या प्रश्नाचं उत्तर देतो!" वाघ बोलला,

"कारण त्याची डेडबॉडी सुशांतने ताब्यात घ्यावी अशी माझी इच्छा होती. मी जर खून कबूल केला नसता, तर ती सुशांतच्या ताब्यात कशी गेली असती?" वाघ म्हणाला.

"पण का?" मी कासाविस होत विचारलं.

"कारण मला ती केस तिथं संपवायचीच होती!" वाघने स्पष्टीकरण दिलं!

"ते का? आणि जरी तुम्हाला तेच करायचं होतं, तर मग तुम्हाला पाहून त्या इसमानं स्वतःलाच ठार केलं किंवा तुम्ही तिथं पोहोचताच त्या व्यक्तीला इतर कोणी मारून पसार झालं असं खोटं तुम्ही का नाही सांगितलंत?" मी काळजीने बोललो.

"कारण त्या शांत परिसरात गोळीचा आवाज घुमला होता आणि तो सुन्न असलेल्या सुशांतनेही नक्की ऐकला असणार हे लक्षात येण्यासारखं होतं, नाही का? तू म्हणतोस तशी बाळबोध कारणं मी दिली असती, तर मीच त्याला ठार केलंय आणि सुशांत समोर खोटं बोलतोय हे स्पष्ट झालं असतं!" वाघ माझ्या काळजीची थट्टा करत म्हणाला.

"ते कसं?" मी कळवळलो.

"कारण जो माणूस नेनेच्या ऑफिसरचा खून करू शकतो, तो मला घाबरून स्वतःला का संपवेल? आणि तिथं एका पेक्षा जास्त किमान दोघे जरी असते, तरी त्यांना मला मारणे सोपे नाही का? त्यांतील एक उगाच आपल्याच साथीदाराला मारून का पळेल? दोघे मिळून मलाच संपवणार नाहीत काय? आणि पळण्याइतका त्याच्याकडे वेळ असेलच, तर तो माझ्यावर किंवा स्वतःच्या साथीदाराला गोळी झाडण्यासाठी तिथं थांबलाच का असता? दोघे आधीच सोबत पळाले नसते का? मला खून कबूल करण्याशिवाय पर्याय नव्हता. नाही तर त्या गनफायरच्या आवाजाचे उत्तर देण्यासाठी माझ्याकडे काही तर्क राहिला नसता!" वाघने स्पष्ट केले.

बापरे! किती गोष्टी, किती विचार एकाचवेळी याने करून, आखून ठेवलेले असतात...!!!

"शिवाय आणि जसं मी तुला म्हणालो, की मला स्वतः त्या गुन्हेगाराला मारल्याचे दाखवायचेच होते. ही पुढील घटनेची मी

बनवलेली एक पार्श्वभूमी होती!" वाघ डोळे बारीक करून कपाळावर आठ्या आणत बोलला.

आता हा पुढे काय सांगणार आहे...?

मी एक दीर्घ श्वास घेतला! आणि स्वतःला पुढील धक्क्यांसाठी सज्ज केलं...

# ५. टू फॉर्म्युलेटर्...

"मला तुम्ही सांगितलं नाहीत, की तुम्ही आणखी एका केसवर काम करत आहात?" मिस्टर वाघने सुशांत नेनेला पृच्छा केली.

"ती केस स्वतंत्र आहे!" सुशांत मिस्टर वाघचा प्रश्न उडवत म्हणाला.

"की ती अनोफिशियली तुम्ही हाताळताय म्हणून?" वाघने डोळे किलकिले करत बेरकी नजरेने सुशांतकडे पाहत विचारलं.

"विल यू शट अप? इथं मी माझा एक ऑफिसर गमावलाय आणि तुम्हाला माझं इंटेरोगेशन करायचंय?" सुशांत ओरडला.

"ती केस पण तितकीच महत्त्वाची आहे, तुमच्या बहिणीशी..." वाघ बोलत असतानाच...

"माझ्या बहिणीशी तुमचा काही संबंध नाही!" नेने वाघचे वाक्य कापत पुन्हा ओरडला.

"ठीक आहे, मी आता तुम्हाला याबाबत काही विचारणार, बोलणार नाही! पण एवढं सांगेन, की तुमची बहीण; तिच्या जीवाला धोका आहे!"

सुशांतचे भयचकित डोळे वाघकडे अविश्वासाने वळले.

"आणि अजूनही तुम्हाला असं वाटत असेल, की मी या बाबत दूर रहावं, तर..." वाघ अर्धवट बोलला. सुशांतला निर्णय घेण्यास वेळ देण्यासाठीचा हा त्याचा पॉज.

"माझी बहिण संकटात आहे म्हणजे?" नेनेच्या चेहऱ्यावरील भाव अचानक बदलले आणि ते काळजीयुक्त झाले. त्याचं मुखमंडल चिंतेने झाकोळून गेले.

"तुम्ही मला त्या घटनेबद्दल सांगितले, त्याची मी चौकशी केली." वाघ शांतपणे म्हणाला.

"म्हणजे तुम्हाला सगळं काही कळालं, तर?" सुशांत निराश मनाने बोलला.

"हो! रिद्धीमा आणि जोत्स्ना जोत्स्नाच्या लग्नाआधी ट्रिपला गेले होते, तेव्हा तिथं जोत्स्नाचा खून झाला. हो ना? आणि त्याचाच तुम्ही शोध घेत आहात!" वाघ शांत मुद्रेने बोलला. त्याची स्थिर नजर सुशांतवरच!

"हो! जोत्स्नाच्या वडिलांचीच तशी इच्छा होती; त्यांच्या मुलीची बदनामी होऊ नये म्हणून..." सुशांत बोलत होता तोच...

"तसा सल्ला तुम्हीच त्यांना दिलात, कारण रिद्धीमाच्या बदनामीला पण तुम्हाला थांबवायचं होतं. नाही?!" वाघ बेरकीपणे नजर बारीक तीक्ष्ण करून बोलला.

"तर तुम्हाला सगळंच माहीत झालंय तर..." सुशांत खाली मान घालत खिन्न बोलला.

"सगळं नाही! त्यासाठी मला तुमच्या भगिनी साहेबांशी बोलावं लागणार आहे! मला ते जाणून घ्यायचं आहे, जे त्यांनी तुम्हाला सांगितलं नाही!"

"पण असं काय असेल, जे तिनं तिच्या भावाला, मला सांगितलं नाही? आणि असं काही असलेच तरी मला जे सांगितलं नाही, ते ती तुम्हाला का आणि कसं सांगेल?"

"अशी गोष्ट असूच शकते, जी त्यांना तुम्हाला सांगणं अवघड गेलं असेल, आणि म्हणून सांगू शकल्या नसतील. आणि तुम्ही माझी चिंता करू नका. त्या अनामिक गोष्टी त्यांच्याकडून कशा काढून घ्यायच्या ते मी चांगलंच जाणतो!" वाघ कुटील छद्मी हसला.

"असं खरंच काही असेल असं तुम्हाला खरंच वाटतं?" सुशांत शंकीत बोलला.

"नक्कीच! नाहीत तर त्या अशा अचानक बुजल्यासारख्या वागू लागल्या नसत्या!" वाघ म्हणाला.

सुशांत विचारात पडला...

"पण यात रिद्धीमा यांना मानसिक त्रास भरपूर होण्याची शक्यता आहे, त्यासाठी मी तुम्हाला याची आधीच कल्पना देतोय!" वाघ बोलला.

"म्हणजे तुम्ही मला विचारत नाही आहात, सांगत आहात!" सुशांत थोडा रागाने बोलला.

"ते तुम्ही काही समजा?! आणि एक; याचे मी काही चार्जेस घेणार नाही. आपल्याविषयी मला एक आत्मियता वाटते म्हणून मी हे करणार आहे." वाघने फायनल निर्णय सुनावला,

"मला आत्ता एक महत्त्वाची मिटिंग आहे. निघतो मी!" म्हणत मिस्टर वाघ सुशांतच्या केबिन मधून बाहेर पडला.

मिस्टर वाघने वर्तमानपत्र सुजय समोर टेबलवर फेकलं.

"हे काय?" सुजयने भुवई उडवत विचारलं.

"तुमच्या खोट्या बोर्डच्या प्रश्नाचं उत्तर! की मला तुम्ही तुमच्या प्रॉफिट मधील हिस्सा का द्यावा!" वाघ कुटील स्मित करत म्हणाला.

मग सुजयने काही न बोलता पेपर पाहिला, तो वरवरच. कारण मूळ बातमी आधीच त्याने वाचली असणार हे नक्की आणि साहजिक होतं!

"तुमचा मोठा प्रश्न मी सोडवला आहे!" वाघ त्याला म्हणाला.

तो वाघकडे 'खाऊ की गिळू' या अर्थाने डोळयांतून आग ओकत पाहत होता. परंतु मिस्टर वाघच्या चेहऱ्यावरचं ते कुटील हसू तसूभरही हाललं नव्हतं. आणि यानेच सुजय शहाच्या डोक्यात

आणखीनच तिडीक जात होती. पण काही न बोलता फक्त जळजळीत नजरेने तो वाघकडे पाहत होता... कदाचित वाघच्या त्याच्यासाठी महत्त्वाचं असणाऱ्या पुढील बोलण्याला तो ऐकण्याची इच्छा ठेवून होता. आणि वाघ बोलण्याची म्हणूनच तो वाट पाहत होता. मिस्टर वाघनेही त्याला निराश केलं नाही,

"द वेरी फेमस मेटल कॅस्केट केस! मला माहित आहे; त्या खूनामागे आपला हात होता! समाजसेवेसोबत देखील वेगळ्याप्रकारची समाजसेवा आपण करतात हे मी जाणून आहे!" मिस्टर वाघ सर्वज्ञ भाव चेहऱ्यावर घेऊन हसत होता. मग वाघची मुद्रा अजूनच कुटील झाली!

आणि सुजय शहाची अजूनच रागीट...!

"काय?" मी किंचाळलो!

"यात आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे? मी तुला आधीच सांगितलं होतं, तो मर्डर्स करतो म्हणून!" मिस्टर वाघ कोकम सीप घेत मला बोलला.

"पण मला वाटलं तुम्ही दुसऱ्या कोणत्या तरी केस संदर्भात बोलत असाल... पण हा इतका मोठा उद्योगपती, शिक्षणासाठी, समाजासाठी काम करणारा वगैरे... हा असा माणूस सनकी,

मेनिएक, सायकोपॅथ सारखे खून का करत होता...? आणि त्याची उंची मग सात पाच होती का?"

"झाली? का आणखी काही विशेषणं लावायची आहेत त्याला अजून?" वाघ कुचेष्टा करत म्हणाला...

तेवढ्यात मला एक प्रश्न स्ट्राईक झालाच. तोही मी त्याच्या कुचकट बोलण्याला बाजूला सारून विचारून मोकळा झालो,

"आणि मग त्या गवताळ जागेत तुम्ही ज्या माणसाला मारले तो कोण होता मग? तोच खरा मेटल कॅस्केट मर्डरर होता ना? की नव्हता...?" माझा तर पुरता गोंधळ उडाला होता...

"इझी बॉय! इझी!" मला इझी म्हणत त्याने स्वतः एक घोटात अर्धा कोकम ग्लास त्याच्या घशात रिकामा केला होता.

त्याने ग्लास टेबलवर आदळला...

"मला कळू नये म्हणून तुम्ही खूप काळजी घेतलीत, आय मस्ट एप्रिशिएट युअर् हार्ड वर्क!" समोरील कोल्ड्रिंक उचलत वाघ सुजयला म्हणाला.

सुजयच्या नजरेतील राग काही अजून कमी झाला नव्हता. तो उत्तरोत्तर वाढतच चालला होता...

"पोलीस तुमच्यापर्यंत पोहोचण्याआधी मी वेगळ्याच व्यक्तीला मेटल कॅस्केट मर्डरर म्हणून उभे केले आणि त्याला

मारूनही टाकले. कारण त्याला जर फक्त पोलीसांच्या हवाली केलं असतं, तर चौकशी दरम्यान तो खरा मेटल कॅस्केट मर्डरर नाही हे पोलिसांना समजलं असतं. आणि त्यांचा शोध पुन्हा चालू झाला असता. आणि पोलीस कधी न कधी तुमच्यापर्यंत पोहोचलेच असते! मी वाचवलंय तुम्हाला!" मिस्टर वाघ उपकाराच्या स्वरात बोलला.

"थँक्स फॉर दॅट!" सुजय दात ओठ खात बोलला. नजर वाघवरच! आत्तापर्यंत त्याने एकदाही पापणी लवली नव्हती!

"हे बाकी तुम्ही चांगलं केलंत. खोटं बोलला नाहीत, की माझी तुमच्या बाबतची माहिती खोटी आहे, मी खूनी नाही वगैरे नाटकं तुम्ही केली नाही. आय सल्युट टू युअर ब्रेव्हरी!" वाघ खरंच पाठीत ताठ होत बसल्या जागेवरून सुजयला सल्युट करत म्हणाला.

"आता तुमचं काय म्हणणं आहे?" सुजय शांतपणे पण तोंडावरचा राग न निवळता दात खातच विचारत होता. पण त्याच्या आवाजातील ही शांतता तो मोठ्या वादळाची सूचक असावी.

"इथून पुढे तुम्ही जी सुपारी..." वाघ बोलत असतानाच...

"सुपारी?" सुजयने भुवई उडवत टोकलं.

"चिप वाटतं ना ऐकायला?" वाघ एक डोळा मिचकावत बोलला,

"बरं तुम्हाला ऐकायला गोड वाटेल असा शब्द वापरतो; कॉन्ट्रॅक्ट किलिंग! हा शब्द चालेल?"

"बोला!" सुजय चिडून ओरडला.

"तुम्ही इथून पुढे जी असाईनमेंट्स घ्याल त्यात फिफ्टी परसेन्ट माझे!" वाघ लोभी हसला.

"पण आता इथून पुढे असाईनमेंट्स कशा घेता येतील? आपण तर खूनी, खोटा का असेना पकडून देऊन केस क्लोज केलीत?" सुजय मख्ख चेहऱ्याने व जळजळीट नजरेने वाघला बोलला.

"ओह! मला खात्री आहे, तुम्ही दुसरा काही पर्याय शोधून काढालच! यामुळेच तर या खूनांच्या मागे लपून तुम्हाला हव्या त्या व्यक्तींना त्यांच्या जमिनींसाठी मारता येतं! मी जाणून आहे, या जमिनींवरच शाळा, कॉलेजेस, धर्मादायी संस्था, मंदिरं असलं उघडून आसपासच्या जमिनींचा भाव तुम्हाला वाढवायचा आहे. आणि त्या चढ्या भावाने तुम्हाला पुढे विकायच्या आहेत. हे सगळं लपवण्यासाठी तुम्हाला प्रशासकीय संस्थाना कुठं तरी गुतवणं गरजेचं आहे. तुम्ही मार्ग नक्की काढाल!" वाघ कुटील हसला.

"शिवाय हा साईड बिझनेस आणि यातून होणारा पार्ट टाईम इन्कम आपण हातून जाऊ थोडीच देणार आहेत?!" वाघ मुत्सद्दी हसला.

"आपणच काही सुचवा!" सुजय वाघची हेटाळणी करत बोलला.

"आपली अशीच इच्छा असेल, तर माझी ऑफर मी देतो. आपल्या आग्रहावरून हं! म्हणजे माझी तशी काही काही जबरदस्ती नाही. म्हणजे मी काही हे प्रपोसल घेऊनच आलोय असं काही नाही...?" वाघ आव आणत बोलत होता.

"ताकाला जाऊन भांडं लपवू नका मिस्टर वाघ; बोला!" सुजय आर्मरेस्टवर हात आपटत बोलला.

त्याला खरंतर वाघच्या कानशिलात मारायची असावी, पण ते शक्य नव्हतं ना...

"आपण असाईनमेंट्स घ्याव्यात. त्या मार्गी कशा लावायच्या हे मी बघेन! मी काय करू शकतो हे या बातमीवरून आपल्या लक्षात आलंच असेल! तुम्हाला मेटल कॅस्केट होमिसाईड, किंवा सिरीयल किलरचा चिल्लर बनाव करण्याची गरज नाही!" वाघ जरा थांबला.

नाही सुजय काही बोलणार नाही हे तो जाणून होता आणि त्याला सुजयचा कोणत्या फेशियल रिएक्शनची देखील अपेक्षा नव्हती. त्याने श्वास भरला,

"आणखी एक फायदा म्हणजे प्रत्येक काम मी एकटा मार्गी लावत जाईन. याने तुमचं गुपित फुटण्याचा धोका राहणारच नाही.

आपले बरेच हस्तक पोलिसांच्या हाती लागले आहेत. आणि त्यांतील प्रत्येक जण तुमच्याशी प्रामाणिक असेलच असेही नाही. कोणीही घाबरून तोंड उघडू शकतं. हे यामुळेच झालं आहे, कारण मिस्टर वाघ त्या कामांना मार्गी लावण्यासाठी तुमच्याकडे नव्हता!" वाघ हसत स्वतःची शेखी मिरवत बोलला.

"म्हणजे तुम्हीच माझी सगळी माणसं पकडून दिलीत तर?" सुजयचा आवाज आता रागाने खोल व घोगरा झाला होता.

"थँक्स फॉर द कॉम्प्लिमेंट!" वाघ असंबद्ध म्हणत हसला,

"आपल्याला कळलं पण नाही ना? तुम्हाला वाटलं पोलीस त्यांच्या डोक्याने कृती करत आहेत. आणि तुम्ही मला हातोहात सगळ्या प्रकरणापासून दूर ठेवले आहे. नाही?!" वाघने डोळा मारला व तो पुन्हा हसला,

"म्हणून तर तुम्ही माझी तुमच्या ऑफिसला एन्ट्री झाल्यापासून सावध झालात आणि मला मार्गातून दूर करेपर्यंत तुम्ही तुमची कॉन्ट्रॅक्ट्स बंद केलीत!" गुमान करत वाघ बोलला.

मिस्टर वाघ आपली कीव करतोय हे लक्षात येऊन सुजयने त्याची कोल्ड्रिंकची बाटली उचलली आणि ती मिस्टर वाघच्या दिशेने फेकली!

पण मिस्टर वाघ तिरका झाला नाही, की खाली वाकला नाही, की जागचा सरकला नाही...

बाटली आदळली; ती वाघच्या मागे भिंतीवर! मिस्टर वाघचं डोकं फोडण्याची हिंमत सुजय करू शकत नव्हता आणि हे मिस्टर वाघ चांगलंच जाणून होता. म्हणूनच वाघ हलला नव्हता. तो तसाच बसून होता, ओठांवर त्याचं नेहमीच लाघवी स्मित घेऊन!

त्या आवाजाने केबिन बाहेर उभा सुजयचा पीए धावत आत आला. त्याच्या हाती पिस्तूल होतं. ते त्याने मोठ्या तत्परनेने व चपळाईने सुजय समोर धरलं.

"मला मारणं इतकं सोपं नाही; मिस्टर बोरगांवकर. आणि हे तुमचे साहेब पण ओळखून आहेत आणि स्वतःच्याच हातांनी स्वतःच्या ऑफिसमध्ये मला मारून जेलमध्ये जायला तुमचे साहेब तुमच्यासारखे मूर्ख पण नाहीत! तुम्ही स्वतःच्या हातानी मला इथं मारलंत, तरी तुमचे मालक देखील अडकतात हे समजून घ्या!" शांत बसलेला वाघ थंड व शांत स्वरात हसून बोलला. त्याची मान सुजयकडे वळली,

"नाहीत ना?" तो मिश्किल भाव चेहऱ्यावर घेऊन मस्करीत सुजयकडे पाहत विचारता झाला.

सुजय शहाने देखील आपला हात वर केला. आणि पिस्तूलाला नकार दिला. नाराजीनेच मग पीए बोरगांवकरने पिस्तूल आपल्याकडील होलस्टरला ठेवून दिलं.

"मान्य आहे!" सुजय शहा मोठ्याने ओरडला. त्याचे दोन्ही हात त्याने तो बसलेल्या सोफ्यावर जोरात आदळले होते.

"आता तुम्ही माझं प्रपोसल मान्य केलंच आहे, तर सिक्सटी प्रसेन्ट!" मिस्टर वाघच्या चेहऱ्यावर तेच ते लोभी स्मित जे आणखी स्वार्थी होत लांबलचक झालं होतं...

मी स्तब्ध होतो. म्हणजे कळण्याच्या ज्या काही संवेदना, अवयव असतात ते सगळे सुन्न झाले होते. माझा फोन वाजलेला पण माझ्या लक्षात आलं नव्हतं... वायब्रेट होत असून तो जाणवतही नव्हता...

"सूरज!" वाघ ओरडला.

मी भानावर येत त्याच्याकडे पाहिलं. पण माझं लक्ष अजूनही माझ्या मोबाईलकडे नव्हतं. वाघने चिअर्स केल्यागत माझ्या खिशाकडे तोंडाला लावलेला ग्लास करत मला मोबाईल बद्दल खुणावलं.

मला मोबाईलची रिंग व वायब्रेशन आत्ता जाणवली. मी खिशातून मोबाईल काढला. फोन मिस्टर वाघपेक्षाही खतरनाक व्यक्तीचा होता.

माझ्या आईचा!!!

मी पटकन फोन उचलला.

"हा हॅलो आई, बोल!" मी मोबाईलमध्ये बोललो.

"कुठायस? कधीपासून पाऊस पडतोय. तुझा पत्ता नाही. जाताना कुठं जातोय ते सांगूनही गेला नाहीस!" पलिकडून आई बोलली. पण तिच्या आवाजात राग किंवा त्रागा नव्हता. होती ती निव्वळ काळजी...

"मी मित्राच्या घरी आहे. काळजी करू नको. बाहेर खूप पाऊस पडतोय. मी येईन उद्या. तू जेवून झोप." मी बाहेर दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न करत बाहेरील परिस्थितीचा अंदाज नसल्याने बोललो.

मोठा पाऊस होताच. ते तर आवाजावरून व मिस्टर वाघच्या घरात पडलेल्या गारव्याने ध्यानात आलंच होतं. पण दरवाज्यातून बाहेर पाहत असताना हे जाणवलं, की खूप अंधार पडला असणार. मी मोबाईलमध्ये पाहिलं. रात्रीचे साडे आठ वाजून गेले होते. मिस्टर वाघच्या घरी मोठं अँटिक ग्रँडफादर क्लॉक आहे जे माझ्या समोरच होतं, पण सवयीने मी वेळ मोबाईलमध्येच पाहिली होती हे पाहून वाघ खुदकला होता. रात्र झालेली, त्यात पाऊस आणि बाहेरच्या लाईट्स देखील लागल्या नव्हत्या. मिस्टर वाघचं घर म्हणजे आधीच भीतीचं माहेर घर तशात हे असं वातावरण!

कुठल्या मुहूर्तावर मी इथंच राहीन म्हणालो असं एका क्षणात मला वाटून गेलं. पण मी करू तर काय शकत होतो, पाऊस एव्हढा

'खुळ्यागत पडत हुता' आणि त्यात महत्त्वाचं म्हणजे माझी उत्सुकता चाळवली गेली होती...

मी सुजयबद्दल काय, कसं, का अशी प्रश्न विचारणं तूर्तास टाळलं, कारण मिस्टर वाघच्या सुजय शहा सोबतच्या संवादातच बरीच उत्तरे मला संक्षेपमध्ये मिळून गेली होती.

तरी पण अजून खूप प्रश्न मनात गलका माजवत होते. मिस्टर वाघने मला भानावर आणताच ते प्रश्न देखील डोक्यात उफाळून वर आले होते...

भूक... सत्य जाणून घेण्याची, ही घटना समजून घेण्याची माझी भूक वाढत चालली होती... आणि याच भुकेचं एक वेगळंच दर्शन मिस्टर वाघ मला आता घडवणार होता...!!!

"दादा म्हणाला तुम्हाला माझ्याशी बोलायचं आहे..." शांत जलाशयाकडे पाहत बसलेल्या मिस्टर वाघला रिद्धीमा म्हणाली.

ती त्याच्या जवळ येऊन उभी राहिली होती.

"बोलायचं तर तुम्ही आहे. या बसा." सूनक्षीत बाकड्यावर मध्यभागी बसलेला मिस्टर वाघ कडेला सरला.

रिद्धीमाला नाईलाज होता. आता ती येथून मागे फिरू शकत नव्हती. ती बसली. मिस्टर वाघपाशी बसली.

तिची नजर देखील त्या संथ जलाशयाकडे होती. रात्रीच्या काळोखात त्या विशाल जलाशयाचे पाणी काळेभोर दिसत होते. म्हणायला तिथे लाईट पोल्स होते, पण लोक प्रतिनिधींच्या कृपेने ते निकामे होते. प्रकाश पाडण्यासाठी मिस्टर वाघने त्याच्या गाडीच्या हेडलाईट्स लावून ठेवल्या होत्या. म्हणून ते बसलेत त्या जागेपुरता अंधाराचा विषय मिस्टर वाघने निकालात काढला होता.

मिस्टर वाघचे हेच तर काम आहे... असत्याचा अंधार नष्ट करणं आणि सत्याचा प्रकाश सर्वत्र पसरवणं!

असो; रिद्धीमाने काही गोष्टींचा खुलासा करायला सुरुवात केली...

"जोत्स्ना माझी एकमेव बेस्ट फ्रेंड. तिच्यासाठी बॅचलर्स पार्टी मी अरेंज केली. फक्त आम्ही दोघी. आमच्यात खूप सख्य होतं. अगदी सख्या बहिणींसारखं... पण जाताना मी निशांतला घेऊन गेले. मला तो माझी जबाबदारी वाटत होता म्हणून.

"मी आणि दादा ट्रिप वरून येत असताना तो आमच्या गाडीला धडकला होता, म्हणून त्याला बरं करणं मला माझं कर्तव्य वाटलं होतं... म्हणूनच त्याला सोबत घेतलं. दादाला ते नकोच होतं, पण आम्ही आठवडाभर बाहेर राहणार होतो. या दरम्यान त्याच्या

उपचारात खंड पडेल म्हणून मीच हट्ट केला आणि दादाला तो मान्य करावा लागला..." रिद्धीमा सांगत होती.

"तुमच्या गाडीला थडकल्याने तो जखमी झालेला?" वाघने विचारलं.

"जखमी तर तो आधीच होता. त्याचं तोंड कोणीतरी चेचण्याचा प्रयत्न केला होता. तशात रक्ताळलेला तो आमच्या गाडीला थडकला होता." रिद्धीमाने खुलासा केला.

"मग पुढे?" वाघने तिच्याकडे न पाहता तिला प्रोसिड करण्यास सांगितले.

"आम्ही एक रिसॉर्ट रेंटवर घेतलेला. दोन दिवस मजेत व्यवस्थित गेले. आणि तिसऱ्या दिवशी रात्री जेव्हा मी जोत्स्नाच्या खोलीत शिरले..." ती बोलायची थांबली.

"काय झालं? थांबलात का? बोला!" वाघने आग्रह केला!

"ही वॉज हॅविंग सेक्स विथ जोत्स्नाज् डेडबॉडी!"

खळळ्!!!

मी न संपवलेला व सुरवातीपासून तसाच धरून ठेवलेला कोकमचा ग्लास शेवटी माझ्या हातून घसरून माझ्या पायांत

फुटला! रक्त वाहवत जावं तसं ते गडद लाल पेय माझ्या पायांत वाहत गेलं...

मी सुन्न होतो! विषण्ण होतो! हा खरा आत्ता माझ्यासाठी मोठा धक्का होता! हे कसं शक्य आहे? म्हणजे असेही काही असते??? प्रश्नांचा हलकल्लोळ माजला होता माझ्या डोक्यात...!!!

"निक्रोफिलिया!" वाघ उच्चारला.

"अं?" मी जरा भानावर येत उद्गारलो. तो काय बोलला हे मला समजलं नव्हतं.

"ही एक मेडिकल टर्म आहे. सायकॉलॉजिकल डिसऑर्डर. निक्रोफिलिया असणारे लोक मृतदेहासोबत सेक्स करतात!" वाघने स्पष्ट केलं.

"ही वॉज म्हणजे..." मी अडखळलो.

"आणखीन कोण?" वाघचा मलाच प्रश्न.

"नि... निशांत...?" मी अडकत बोललो.

वाघने मानेनं 'हो!' खुणावलं.

"हॉ... हॉरीबल आहे हे!!!" माझे शब्द फुटत नव्हते. मी घशातून शब्दांना वाट करून देत ओरडलो.

"पुढचं तर त्याहीपेक्षा हॉरिबल असणार आहे तुझ्यासाठी!" वाघ कुटील हसला.

"म... म्हणजे?" मी कचरत विचारलं.

"जोत्स्नाला त्यानेच मारलं होतं! आणि मग तो तिच्या कॉर्प्स् सोबत सेक्स करत होता!" वाघने उत्तर दिलं.

मी डोळे मोठे करत एक मोठा आवंढा गिळला. माझ्या अंगावर शिरशिरी आली होती. माझं संपूर्ण अंग तापलं होतं. कानशिलं गरम झाली होती. माझी पाठ धरल्यागत झाली होती. कण्यात कळ मारत होती... उठायचं म्हंटलं तरी मला आता ते शक्य नव्हतं!

"गेली ना थंडी?!" वाघ मोठ्याने अट्टहास करत हसला!

मी काही विचारू शकणार नाही, मी त्या मनःस्थितीतच नाही हे लक्षात घेऊन वाघच माझ्या मनातील प्रश्नांची उत्तरं देत गेला...

"निशांतने रिद्धीमाला आपल्या धाकात ठेवलं होतं. म्हणून ती सुशांतला याबद्दल काही बोलली नाही. जोत्स्नाच्या मर्डरची केस सुशांतच हाताळत होता. तिची अटॉप्सी अर्थात रिद्धीमानेच केली." वाघ मला म्हणाला.

"आणखीन एक फनफॅक्ट सांगतो." वाघ आठवल्यासारखं बोलला,

"रिद्धीमा कोणत्याही हॉस्पिटलमध्ये काम करत नव्हती. ना तिचं आधीपासून घरी क्लिनिक होतं. सुशांतने नंतर रिद्धीमाला ते चालू करण्यास बाध्य केलं, ज्याने ती त्यात गुंतून जास्तवेळ घरीच राहील. " वाघ बोलला.

"मग?" मी गोंधळून विचारलं.

"ती पॅथेलॉजिस्ट अँड फॉरेन्सिक एक्स्पर्ट होती! सुशांतसाठी अटॉप्सिज् तीच ऑपरेट करत होती." वाघने उत्तर दिलं.

"मग सुशांत यांनी तुम्हाला खोटं का सांगितलं?" मी अधिक गोंधळलो.

"माझ्याकडून रिद्धीमा यांना काही त्रास होऊ नये म्हणून!" वाघ हसला.

"आणि तरी तुम्ही त्यांना त्रास दिलातच!" मी आरोप करत म्हणालो.

"तू मला ओळखत नाहीस का?" वाघ पुन्हा हसला.

"पुढे सांगण्याची कृपा कराल?" त्याच्या प्रश्नावर मी उखडलेला होतो.

"तिनेच जोत्स्नाची डेडबॉडी एग्झामिन केली असल्याने तिला सुशांतच्याही नकळत रिपोर्ट्समध्ये फेरफार करणं सहज शक्य झालं. आपल्या स्टेटमेंट्स निशांतला अनुकूल अशाच तिने दिल्या. त्यामुळे निशांतवर संशय येणंच घडलं नाही. एवढंच नाही, तर जेव्हा जोत्स्नाच्या डेडबॉडीशी सेक्स करताना रिद्धीमाने निशांतला पाहिलं, तेव्हा त्याने तिथंच तिच्यावरही बलात्कार केला! म्हणून त्याची भीती तिच्या मनात खोलवर रुजली. त्याला वाचवण्यासाठीच मग म्हणून तिने हा प्रकार केला. रिद्धीमाने त्याचं

नावं 'निशांत' ठेवलं; पण तोच तिच्या आयुष्यात अंधार पसवणारा ठरला.

"रिद्धीमाने स्वतःला त्याच्या तावडीतून वाचवण्यासाठी मग अटॉप्सीसाठी तिच्याकडे कोण्या सूंदर मुलीची डेडबॉडी आली, तर ती निशांतला ती डेडबॉडी ऑफर करायची!" वाघ सांगत होता...

आणि मी बधिर होऊन ऐकत होतो... वाघ पुढे बोलला...

"पण तिची ही कृती स्वार्थापोटी नव्हती. तिच्या हे करण्याने ती अनेक मुलींना निशांतच्या राक्षसी कामवासनेला बळी पडण्यापासून वाचवत होती. कारण तिनं त्याची ही भूक अशी मिटवली नसती, तर त्याने न जाणो किती मुलींचा खून करून त्यांच्या मृतदेहांशी संभोग केला असता!"

माझ्या डोळ्यांतून पाणी ठिबकलं. अश्रूबिंदू माझ्या हातांवर पडले. ते उष्ण होते! अतिउष्ण!

मी दीर्घ श्वास घेतला... हे सगळं पचवणं माझ्यासाठी खूप अवघड होतं... आणि ते आणखीन अवघड होतं चाललं होतं...

"पण जर एखाद्या सूंदर स्त्रीचा देह अटॉप्सीसाठी आला नाही, तर रिद्धीमा स्वतःला निशांतच्या स्वाधीन करायची. तो तिच्याकडून आपली वासना भागवून घ्यायचा..."

"बास!" मी किंचाळलो,

"बास मिस्टर वाघ! बास! नाही सहन होत आता..." मी काकुळतीला आलो!

"फेस इट सूरज! यू हॅव टू हॅव गट्स टू फेस दि ट्रूथ!" मिस्टर वाघ मला ठणकावत बोलला.

"स्वतःचं शरीर निशांतला ऑफर करणं हे तिच्या ट्रीटमेंटचा देखील भाग होता!" तो माझ्यावर अत्याचार करत पुढे बोलतच राहिला,

"पण मग रिद्धीमाची बिघडत चालली मानसिक स्थिती पाहून ती डेडबॉडीजच्या कमीत कमी संपर्कात रहावी म्हणून सुशांतने नंतर तिचं अटॉप्सीचं काम बंद करवलं. पण हीच त्याची मोठी चूक झाली. यामुळे ती निशांतच्या वासनेला अधिकच बळी पडली!" तो श्वास घेण्यासाठी थांबला व म्हणाला,

"आता तुझ्या हेही लक्षात आलं असेल, की माझ्यासोबत लंचला येण्यासाठी निशांतच रिद्धीमाला टोकत होता. मी रिद्धीमाला घेऊन बाहेर पडलो, तेव्हा तो तिच्या खोलीतील दुसऱ्या दरवाज्यातून तिच्या क्लिनिकमध्ये गेला होता आणि क्लिनिकमधून बाहेर पडून तो माझ्या समोरून निघाला होता. त्याच्या दृष्टीने मग जरी मला आतील बोलणं ऐकू आलं असतं, तरी मला तो बाहेर दिसला असल्याने आतमध्ये तोच बोलत होता असा मी त्याच्यावर

संशय कोणत्याही प्रकारे घेऊ शकणार नव्हतो. ना तो कोणत्या गुन्ह्यात सामील आहे अशी शंका मी घेऊ शकलो असतो!

"मला काही कळू नये म्हणून तो प्रिकॉशन घेत होता. आता तूला वाटेल, की त्याने मला कसं ओळखलं? तर त्याने मला ओळखलं होतं असं नाही, पण मला पाहून त्याला विचित्र वाटलं होतं. म्हणून तो माझ्याविषयी जास्तच काळजी घेत होता. सुशांत, रिद्धीमाच्या घरी कोणी आलं, की तो अशी काळजी घ्यायचाच. पण माझ्याबद्दल तो अधिकच अशी तोशीस करायचा की रिद्धीमा मला काही सांगू नये!

"त्या माऊलीने किती त्याग केला याला तोड नाही! पण ती चुकली इथंच, की न घाबरता तिने सत्य तिच्या भावाला सुरवातीलाच सांगायला हवे होते. जे तिने केले नाही!

"असो, निशांतला सुरवातीला आघाताने पार्शल डिमेन्शिया झाला होता, पण रिद्धीमाच्या ट्रीटमेंटने व काळ जाईल तशी निशांतची समरणशक्ती परत आली होती, जी त्याने कळू दिली नव्हती. त्याने पहिल्यांदा जेव्हा जोत्स्नाला पाहिलं, तेव्हाच तो तिच्याकडे आकर्षित झाला होता. तिच्यात त्याला त्याने गमावलेली त्याची प्रियसी दिसत होती म्हणे. पहिले दोन दिवस त्याने तिचं निरीक्षण केलं असणार. ती आपल्या प्रियसीसारखीच आहे असं भासून मग त्याने तिला मनवण्याचा प्रयत्न केला

असणार, पण ती ऐकतच नाही हे पाहून त्याने तिचा खून करून आपली इच्छा पूर्ण केली असणार!

"रिद्धीमाला सत्य कळलं, तेव्हा निशांतने तिच्यावरही बळजबरी केली आणि मग तो पुढे तिच्यातही गुंतत गेलाच. त्याच्या भीतीपोटी माईल्ड कॉग्निटीव्ह इम्पॅरमेण्ट या मेडिकल टर्मचा बनाव करून तिनेच त्याला वाचवले होते. तो इथून बाहेर पडला, तर खूप मुलींसाठी तो एक धोका बनेल हे ती जाणून होती म्हणून तिने हा त्याग केला. त्याच्या आजाराचा बनाव करून तिने त्याला स्वतःजवळच ठेवले.

"पण त्याची शरीरसुखाची व मृतशरीर सुखाची ही चटक नवी नव्हती! तुला आठवतंय, रिद्धीमा म्हणाली होती, की तो त्यांच्या गाडीला थडकण्यापूर्वीच जखमी झाला होता? ते कसं माहीत आहे?" वाघ डोळे बारीक करत मला विचारता झाला.

मी काहीच बोललो नाही! सगळंच सुन्न करणारं होतं...

"हा निशांत म्हणजे दुर्धर. त्याचं एका मुलीवर प्रेम होतं. नारायणी नांव तिचं. ती मुलगी देखील याच्यावर प्रेम करत होती. पण मग तिने अचानक दुसऱ्या मुलाशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. तिचा नाईलाज असेल किंवा आणखी काही, पण तिने दुसऱ्याशी लग्न केलंच!

"याच्या डोक्यात तिडीक गेली. ती माहेरी परतल्यावर तो तिच्या फार्महाऊसवर तिला एकटीला गाठून भेटला. त्याने तिला खूप मनवण्याचा प्रयत्न केला, पण ती त्याचे काही ऐकायला तयार नव्हती. मग काय? याने तिथेच तिला जीवे मारलं आणि तो तिच्या मृतदेहासोबत तिथंच सेक्स करू लागला. आता ती विरोध करण्याच्या पलिकडे गेली होती. तो तिच्यासोबत आता हवं ते करू शकत होता... हवं ते! आणि ती त्याला आडवू देखील शकणार नव्हती!"

"मिस्टर वाघ प्लिज बास करा! मला नाही सहन होत हे..." रडकुंडीला येऊन मिस्टर वाघकडे याचना करत होतो.

"सूरज; ऐक!" त्याने जबरदस्ती करत बोलणं चालूच ठेवलं,

"दुर्धरबद्दल त्याच्या प्रियसीच्या वडिलांना कळालं, तेव्हा त्यांनी त्याला मारण्याचा प्रयत्न केला. ते मोठे राजकारणी होते. हे कृत्य करून ते त्यातून सहज सुटू शकले असते. म्हणून त्यांनी तो कॉल घेतला होता. घाटात दरड कोसळून तो मेलाय असं चित्र त्यांना उभारायचं होतं. या योजनेनुसार त्यांनीच त्याला ठेचण्याचा प्रयत्न केला होता. पण दुर्धर त्यांच्यावरच जीवे हल्ला करून त्यांच्या तावडीतून सुटला. त्याला डोक्यात मार लागला होता, पण तो तक्षणी जीव जाण्याइतका घातक नव्हता. म्हणूनच तो पलटवार

करून सुटू शकला होता. पळून तो घाटात लपून बसला. रात्र होताच मग तो रोडवर आला. आणि सुशांतच्या गाडीला थडकला.

"तुला काय वाटतं, मी सुशांतच्या जिल्ह्यात आधीपासूनच कसा काय होतो?" मिस्टर वाघ माझ्या उत्तरासाठी थोडं थांबला.

माझ्या चेहऱ्यावर झालेला बदल पाहून त्याला समजले, की माझ्या लक्षात त्याच्या प्रश्नाचे उत्तर आले आहे. पण मी बोलू शकणार नाही हे पाहून तोच बोलला,

"बरोबर ओळखलंस! नारायणीच्या वडिलांनी म्हणजे दुर्धरच्या प्रियसीच्या वडिलांनीच मला दुर्धरला शोधून काढण्याची असाईनमेंट दिली होती! मी त्याला शोधतच त्या जिल्ह्यात गेलो होतो. मी दुर्धरला शोधून त्यांच्या सुपूर्द करावे अशी त्यांची इच्छा होती. मी हे काम केल्यावर ते स्वतःच्या हातांनी दुर्धरला संपवणार होते!

"पण दुर्धर मला सुशांतच्या घरी अनायासच सापडला असं नाही. तो त्याच्या घरी आहे याचा मला आधीच शोध लागला होता, म्हणून मीच मेटल कॅस्केट केस माझ्याकडे सुपूर्द करण्यासाठी सुशांतवर गृहमंत्र्यांकडून त्याला कळू न देता दबाव आणला होता." वाघने त्याचा खेळ माझ्यासमोर उलघडा केला.

आणि क्षणात त्याचा सूर बदलला. तो मृदू झाला,

"सूरज, मला माहित आहे हे तुला आत्ता सहन होत नाहीये, पण मी तुला हे सांगतोय याचे कारण तूच हे समजून घेऊ शकतोस! तुही असंच कोणावर तरी प्रेम केलं होतंस. पण तू तिच्या निर्णयाचा सन्मान केलास. यामुळे तू हे सगळं नक्की पचवू शकतोस याची मला खात्री आहे!" तो गंभीर बोलला.

"म्हणूनच तर मला हे असहनिय आहे!" मी ओरडलो,

"ज्या व्यक्तीवर आपण प्रेम करतो, तिच्याशी कोणी असं कसं वागू शकतं?" मी कळवळलो.

"ऑब्सेशन सूरज; ऑब्सेशन!" वाघ उद्गारला.

"अधिकारवाद! पण अशा लोकांना प्रेमात अधिकार नाही, तर समोरच्या व्यक्तीच्या सुखाचा, तिच्यासाठी त्यागाचा विचार असतो हे समजतच नाही! त्यांना सुख हवं असतं, स्वतःसाठी! आणि ही इच्छा जर समोरील व्यक्तीकडून पूर्ण होत नसेल, तर ते असं ओरबाडून घेतलं जातं!" वाघ अतिशय रागीट बोलत होता,

"प्रत्येकाला त्याच्या मनाप्रमाणे जगण्याचा, निर्णय घेण्याचा अधिकार आहे! आणि दुसरा कोणीही ते नाकारू शकत नाही हे लोक लक्षात घेत नाहीत!" चिडल्याने त्याच्या नाकपुड्या फुगल्या होत्या. पण बोलून झाल्यावर तो लगेचच कमालीचा शांत झाला. तो कोणत्याही एका मनःस्थितीत फार काळ राहत नाही हे त्याचं वैशिष्ट्य! तो म्हणाला,

"मी तुला मागे एका ऋषीबद्दल सांगितलं होतं, त्याची उजळणी करतो. ऐक! त्या विद्वानांचे नांव 'याज्ञवल्क्य'. त्यांचा त्यांच्या बायकोशी झालेला संवाद हा 'वृहदारण्यक' उपनिषदात दिला आहे. त्यांना दोन पत्नी होत्या. याज्ञवल्क्य यांनी निवृत्तीची तयारी केली व दोन्ही पत्नी मैत्रेयी आणि कात्यायनी यांना बोलावून सांगितले, की मी मिळवलेली संपत्ती तुम्ही दोघीही समान वाटून घ्या. मैत्रेयींनी संपत्ती घेण्यास नकार दिला आणि म्हटले, की 'जर या संपत्तीने संपूर्ण पृथ्वी माझी झाली, तरी त्याने मी अमर होईन का? त्यामुळे मला ज्ञानाची संपत्ती द्यावी...'

"याज्ञवल्क्य हे तत्वज्ञानी होते. त्यांच्या मते सर्व सांसारिक नाती ही स्वार्थापोटी आहेत. ते म्हणाले,

"हे मैत्रेयी! नवरा बायकोला पतीच्या उद्देशाने प्रिय नसतो, स्वतःच्या हेतूने, नवरा प्रिय असतो. एखादी पत्नी जीवन संगिनीच्या उद्देशाने नवऱ्याला प्रिय नसते, तर ती स्त्री स्वत:च्या उद्देशाने प्रिय असते.'

"येथे त्यांच्या उद्देशाचा अर्थ 'स्वार्थ' हा असल्याचे दिसून येते, परंतु मूळ संस्कृत वाक्यात थेट अर्थ आत्मा आहे. पण 'आत्म' हे स्वतःसाठी वापरलेलं आहे म्हणून ते 'स्वार्थ' हाच शब्दार्थ स्पष्ट करतं. हे माझं मत आहे...

"याज्ञवल्क्य पुढे म्हणाले, की पुत्रांवर पुत्रांच्या हेतूने प्रेम केले जात नाही, पुत्र केवळ स्वार्थासाठीच प्रिय असतात… देवांना सुद्धा त्यांच्या हेतूनेच प्रिय केले जाते. बरीच उदाहरणे दिल्यानंतर ते म्हणाले, म्हणून फक्त आत्माच दृश्यमान, ऐकण्यायोग्य, आनंददायक आणि लक्ष देण्यास योग्य आहे.

माझ्या मते इथे यावेळी 'आत्मा'चा अर्थ 'स्वबोध' असा आहे. याने आत्मज्ञान, श्रवण, चिंतन आणि विज्ञान या सर्वांचे ज्ञान होते. याज्ञवल्क्य म्हणतात, की आत्म्याच्या ज्ञानामुळे म्हणजे स्वतःला ओळखल्यामुळेच संपूर्ण जगाचे ज्ञान होते.

"तुला आता मी वर्तमान उदाहरण देतो...

"साधी गोष्ट आहे, आपण एका मुलीवर प्रेम करत असू आणि तिने नकार दिला, तर तिच्याविषयी आपल्या मनात राग उत्पन्न होतो. पण का? आपण तर प्रेम करतो ना तिच्यावर? मग तिचं उत्तर काहीही असो आपण तिच सन्मान करतच राहिलं पाहिजे... पण नाही! आपले आपल्यावर प्रेम असते. समोरच्या व्यक्तीवर नाही. तिच्याकडून आपल्याला सुख मिळावे ही आपली भावना असते म्हणून तर आपल्याला तिला गमवायचा नसते. म्हणून तिचा नकार आपल्याला आपला अपमान वाटतो. दुसरे म्हणजे आपल्या मनाच्या व शरीराच्या सुखासाठी तिचा सहवास हवा असतो आणि

तो मिळणार नाही हे समजताच आपण तिला दूषणं देतो... म्हणून आधी चांगली वाटणारी तीच मुलगी नंतर वाईट होऊन जाते.

"माणूस पण कुटुंब बनवतो ते त्याला सुख मिळावं म्हणून. मग त्या सुखाच्या अपेक्षापुर्ती मागून मग जबाबदारीचं ओझं येतं, जे नाईलाजाने वागवावं लागतं. एखादा मुलगा अपेक्षेप्रमाणे वागत नसेल, तर आई-वडिलांना देखील तो नकोसा होता. ते देखील त्याला झीडकारतात; ते आई वडील असून! आणि आई-वडिल निरुपयोगी झाले, तर पाल्यंही त्यांना त्यागतात. हे जग माणसांच्या अपेक्षांनी व कल्पनेनं बनलेलं आहे. आणि या अपेक्षा येतात त्या स्वतःच्या सुखासाठी. मग हा स्वार्थच...! कुटुंब उभा करणं व त्याची काळजी घेणं हे स्वतःसाठी असतं म्हणून तो स्वार्थ...! प्रेम करणं हे स्वतःला विशेष असण्याची भावना निर्माण करतं, म्हणून प्रेमात प्रिय कडून भ्रमनिरास झाला, की राग उत्पन्न होतो!

"क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः। स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति।।

"भगवद्गीता अध्याय दुसरा सांख्य योग्य, श्लोक त्रेसष्ठावा! अर्थ-

"क्रोधामुळे मूढता उत्पन्न होते. मूढतेमुळे स्मरणशक्ती भ्रष्ट होते. स्मरणशक्ती भ्रष्ट झाली, की बुद्धीचा, त्याच्या ज्ञानशक्तीचा नाश होतो आणि बुद्धीचा नाश झाल्यामुळे माणसाचा अध:पातन

होतो!" मिस्टर वाघ गुह्यज्ञान देत असल्यासारखा बोलला! व पुढे म्हणाला,

"पण तू वेगळा आहेस! तू पूर्णतः निःस्वार्थी प्रेम केलंस! तुझ्या प्रियसीच्या सुखासाठी तू तिचा त्याग केलास याने अनेकांनी तुला मूर्खात काढलं, पण तू तुझ्या निर्णयावर ठाम राहिलास. आणि म्हणून तू ही घटना समजून घेण्यास मला योग्य पात्र वाटतोस!" असे तो मला म्हणाला.

यावर मी काहीच बोललो नाही. बोलण्याच्या मनःस्थितीत मी होतो कुठे...

# ६. कटिंग दि थॉर्न्स्...

"तुम्हाला मदतीची गरज आहे असे मी कन्सिडर करतो!" म्हणत वाघ उठला.

तो त्याच्या गाडीकडे गेला. पॅसेंजर सीटकडील डोअर त्याने रिद्धीमासाठी धरून ठेवला.

रिद्धीमा काहीवेळ शांत होण्यासाठी तशीच जागी बसून होती. मग ती स्वतःला सावरून उठली आणि गाडीत बसली. वाघ पण मग ड्रायव्हिंग सीटवर विराजला आणि त्याने रिद्धीमाला तिच्या घरी सोडलं.

रिद्धीमाला लंचवेळी मिस्टर वाघ म्हणाला होता, की संधी असताना ती जर बोलली नाही, तर तिचे आयुष्य इथून पुढे अधिक कठीण व भयंकर होत जाणार आहे.

आणि झालेही तसेच होते. निशांत उर्फ दुर्धर त्या दिवसाच्या रात्रीपासून रोज तिच्यावर अत्याचार करत आला होता. तिचा शारीरिक व मानसिक छळ त्याने केला होता. ती कितीही नाही म्हणत असली, तरी दुर्धरचा तिच्यावर विश्वास नव्हता. तिने नक्की मिस्टर वाघला काही तरी सांगितले आहे असा ग्रह तेव्हा त्याच्या

मनात बसला होता. यातूनच जीवे मारण्याची धमकी देऊन तो रिद्धीमाचा रोज उपभोग घेऊ लागला होता...

मिस्टर वाघने पूर्ण प्रवासभर काही न बोलता रिद्धीमाला तिच्या घरी सोडले. तिला विचार करण्यासाठी त्याने दिलेला वेळ होता तो. ती उतरत असताना त्याने तिचा फोन तिच्या हातून काढून घेतला. त्यावर आपला नंबर डायल करून कॉल लावला. रिद्धीमाचा नंबर त्याच्या मोबाईलवर फ्लॅश झाल्यावर कॉल कट केला व तिच्या मोबाईलमध्ये स्वतःचा नंबर व स्वतःच्या मोबाईलमध्ये तिचा नंबर सेव्ह् केला.

"गरज पडेल!" तो म्हणाला.

रिद्धीमा तिचा मोबाईल घेऊन काही न बोलता आत निघून गेली. मिस्टर वाघ मात्र आत गेला नाही. बाहेरूनच तो तिला निरोप देऊन तेथून त्याच्या गाडीसह चालता झाला.

पण जाता जाता तो रिद्धीमाला एक वाक्य बोलला होता,

"शांत झोपेसाठी अँटीडिप्रेसंट इंजेक्शन कामी येईल; नाही?!"

ही मिस्टर वाघची रिद्धीमाला सूचना होती. आणि तिला ती लक्षात आली होती. तिने होकारार्थी मान डोलावली, पण तिच्या चेहऱ्यावरचा खिन्न भाव काही लोपला नव्हता!

मिस्टर वाघची गाडी त्याच्या हॉटेलकडे मार्गक्रमित झाली. तो हॉटेलला पोहोचेपर्यंत कमालीचा गंभीर होता. मिस्टर वाघला विचलित करणाऱ्या काही कमीच घटना आहेत आणि ही कदाचित त्यांतील एक असावी...!

मला रिद्धीमा इतकंच वाईट सुशांतसाठी पण वाटत होतं. त्या बिचाऱ्याला त्याच्याच घरात त्याच्या अपरोक्ष एवढं सगळं घडत होतं आणि त्याची त्याला कुणकुण देखील लागली नव्हती. बाहेरील लोकांना न्याय देण्यात तो इतका गढून गेला होता, की आपल्या घरातच एक मूर्तिमंत अन्याय निपजतोय हे त्याच्या गांवीही नव्हतं. मिस्टर वाघ त्याच्या आयुष्यात येण्याआधी त्याच्यासाठी सगळं कसं आलबेल होतं.

"नमस्कार शहा साहेब!" मिस्टर वाघ हात जोडून पुढे येत हसतमुखाने सुजयला बोलला.

"या या मिस्टर वाघ! काय ते म्हणता तुम्ही ते सत्याअण्णा काही तरी... ना? या!" शॅम्पेनची बाटली आईस बकेटमधून हाती घेत सुजय म्हणाला.

"सत्यान्वेषी! सत्यशोधक. सत्य शोधतो मी!" वाघ म्हणाला.

"आणि त्याच सत्याचा स्वतःच्या फायद्यासाठी वापर करता!" सुजय निर्भेळ मनमोकळं बोलला. जसे काही वाघने त्याच्या सोबत जे केले ते त्याला मान्य आहे.

वाघ हलकेच मान हलवत हसला.

"आपण घेणार?" कॉर्कस्क्रूने शॅम्पेनचे बुच खोलण्यासाठी जोर लावत सुजयने वाघला विचारलं.

"नको. मी घेत नाही!" वाघ हसत म्हणाला. तो सुजयने त्याला बसण्याची ऑफर न करताच खुर्चीत बसला होता.

पण आज सुजय वाघवर नाराज दिसत नव्हता. तो काढत असलेले बाटलीचे कॉर्क निघाले आणि फेसाळलेली शॅम्पेन फवाऱ्यासारखी उडाली.

"कमाल आहे! तुम्ही खरंच घेत नाही?" आपल्यासाठी ग्लास भरत सुजय वाघसमोर बसला.

"नाही!" वाघ हसला,

"मला जर काही प्यायला आवडतंच, तर ते आहे गुन्हेगारांचं रक्त!" वाघ डोळे तीक्ष्ण करत म्हणाला.

त्याच्या या वाक्याने सुजयचे हात थांबले. त्याने मिस्टर वाघकडे नजर टाकली. वाघ चेष्टेने हसला.

"आपण काळजी करू नका. कारण क्रिमिनल्सचे रक्त पिण्यापेक्षा मला पैसा खाणं जास्त आवडतं. त्यामुळे आपल्याला

माझ्याकडून काहीच धोका नाही! सध्यातरी!" मिस्टर वाघ हसत पुढे म्हणाला.

सुजय ग्लास घेऊन मागे रेलत बसला. त्याची नजर मिस्टर वाघला न्याहाळत होती.

"आज काय काम काढलंत?" सुजयने विचारलं.

"आपले सर्व सहयोगी अखेर पोलिसांनी जेरबंद केलेत! उद्यापासून प्रत्येकाची चौकशी व जबानी घेणं चालू होईल." वाघने नवीकोरी माहिती दिली.

"तुमच्या कृपेने!" सुजय नाराजीने म्हणाला.

"धन्यवाद!" वाघ हसला.

"तुम्ही माझी मदत करताय का मला संपवताय मिस्टर वाघ?" सुजय वाघच्या वरील प्रतिक्रियेने अजून नाराज झाला.

"मदतच करतोय." वाघ दोन्ही भुवया उंचावून पुढे मान करून सुजयला विश्वास देत म्हणाला.

"माझ्या प्रश्नाचं उत्तर द्याल?" सुजयने विचारलं.

"हो!" वाघ म्हणाला.

"इतके दिवस पोलीस मग का शांत होते? सगळी नाही, पण माझी काही लोकं त्यांनी पकडलीच होती." सुजयने प्रश्न केला.

"मीच त्यांना तसा सल्ला दिला होता. मी त्यांना सगळे एकत्र सापडल्यावरच प्रत्येकाचे एकेक करून इंटेरोगेशन करण्याविषयी सांगितले होते. याने त्यांची खोटं बोलण्याची शक्यता कमी होईल. आणि जरी त्यांच्या जबानीत तफावत असली, तर ती तक्षणी रेकग्नाईझ करणं सोपं जाईल असं पटवून मी त्यांना चौकशी करण्यापासून अडवलं होतं!" वाघने स्पष्टता दिली.

सुजय अजूनही वाघकडे अविश्वासाने बघत होता.

"माझ्यासारख्या माणसावर विश्वास कसा ठेवायचा असा तुम्हाला प्रश्न पडला असेल, तर एक गोष्ट समजून घ्या मिस्टर सुजय शहा, हा विजय वाघ पैशांशी बांधील आहे! आपण जोपर्यंत माझा भाग मला देऊ करताय तोपर्यंत तुम्हाला माझ्याकडून काहीच धोका नाही. मग तुम्ही कोणताही गैरव्यवहार केलात, तरी! आणि आपल्या फ्रेंडशिपचं गिफ्ट म्हणून तुमच्या सगळ्या माणसांची तोंडं उद्यापर्यंत बंद झालेली असतील!" वाघ सुजयला बोलला आणि तो जायला उठला,

"चला निघतो. एवढंच सांगण्यासाठीच मी आलो होतो." तो निघून गेला.

मिस्टर वाघ जाताना सुजयचा पीए बोरगांवकर त्याला क्रॉस झाला. मिस्टर वाघला टेरेसवर तोच घेऊन आला होता व तेव्हापासून तो इथं उभा होता. मिस्टर वाघने त्याला टाळून पायऱ्या

उतरण्यास सुरवात केली. जाणाऱ्या वाघला तो मागे वळून पाहत उभारलाय हे जाणवत होतं, पण तो त्याच्याकडे न पाहता निघाला. मिस्टर वाघ पायऱ्या उतरून दिसेनासा झाल्यावरच बोरगांवकर सुजयकडे वळला व तरातरा चालून तो सुजयकडे आला.

"साहेब याला संपवणं गरजेचं आहे!" पीए बोरगांवकर दात खात म्हणाला.

"आपली सगळी माणसं गेलीत! आता स्वतः आपण हे काम करू शकत नाही! म्हणून तर गप्प बसलोय. आपल्याकडून एक खून; आणि आपण बाराच्या भावात!" सुजय धुमसत कुठेतरी खोल शून्यात पाहत बोलला.

"पण या आधी आपण हे करू शकलो असतो!" पीए पुन्हा फडफडला.

"नाहीच बोरगांवकर! नाहीच! मान्य त्यावेळी आपल्याकडे काही माणसं होती, पण त्याकरवी हा वाघ मेला असता, तर पोलीसांनी तपासाचा जोर वाढवला असता आणि ते आपल्यापर्यंत पोहोचायला वेळ लागला नसता! शिवाय या वाघला मारणं सहज सोपं नाही. आपला डाव चुकला असता, तर याने पुढचा मागचा विचार न करता आपल्यालाच संपवलं असतं. मी विचार करतोय, याच्या डोक्यात नक्की काय चालू असेल...?" सुजय विचारात बोलला.

"पण मग याला असंच सोडून द्यायचं?" बोरगांवकरची परत तडफड.

"आपण याच्या खूनाची असाईनमेंट यालाच तर नाही ना देऊ शकत!" सुजय शहा असहाय्य ओरडला,

"बोरंगावकर, याने आपल्याला सगळीकडून अडकवलंय! आता याला सोबत घेऊनच जावं लागणार आहे! हा बेमालूमपणे खून करून सुटू शकतो हे आपण पाहिलं आहे. हा कधीही आपल्यावरच उलटू शकतो!" सुजय चरफडला.

वस्तुतः यानं सगळीकडनं सगळ्यांना ट्रॅप केलं होतं, म्हणजे ते मुक्त तर होते त्यांच्या नजरेत, पण तरी बंदिवान होते वाघच्या पिंजऱ्यात...!!!

"साहेब, काय खरंच हा आपल्या माणसांना उद्या मारेल? हो, तर कसं? आपली बरीच माणसं कस्टडीत आहेत. तिथं हा मास होमिसाईड कसं घडवून आणू शकेल?" पीए शंकेने बोलला.

"ही वॉज ब्लफिंग! त्याला चांगलंच माहीत आहे, की आपली माणसं चौकशीची पाळी त्यांच्यावर आली, तर स्वतःच स्वतःला संपवून घेतील. किंबहुना एव्हाना त्यांनी स्वतःला संपवून देखील घेतलं असेल. विसरू नका, आपण त्यांचं प्रोग्रामिंग तसं केलं आहे! म्हणून तर मी त्यांना कुठंही न लपवता पोलिसांच्या हाती लागू दिलं.

याने आपल्याला काही एक्शन घ्यायला थोडातरी वेळ मिळेल." सुजय बोलला.

"मग या वाघवर विश्वास ठेवायचा कसा? आपण खरंच याला जिवंत सोडणार आहात?" पीएने चिंतेने विचारलं.

चिंतेसोबतच रागातही असल्याने त्याने इतक्या जोरात दात एकमेकांवर घासत होता, की त्याच्या दातांच्या बारीक कण्या होत होत्या.

"नाही!" सुजय ओरडला. त्याचा तो आवाज तो खुल्या टेरेसवर असूनही घुमला!

सुजयच्या फार्महाऊस बाहेर मात्र आपल्या कारकडे चाललेला मिस्टर वाघ आपल्या मनाशीच हसत होता. त्याच्या कानातील इयरपीसमध्ये या दोघांचा संवाद तो 'याची देही याची कानी' ऐकत होता... त्याच्या रिस्ट वॉचमध्ये तो त्यांना लाईव्ह पाहू देखील शकला असता, फेक बोर्ड मेंबर्स सोबतच्या त्यांच्या कॉंफरन्समध्ये त्याने काही खटके दाबले होते, ते म्हणजे सुजयच्या संपूर्ण सिस्टीममध्ये शिरून त्याने सुजय शहाची सर्व सिस्टीम हॅक करून ठेवली होती. आणि हे स्वतःला हुशार समजणाऱ्या शहाला त्याच्या समोर घडलेलं असून समजलं देखील नव्हतं. वाघने तर सर्वियलन्स सॅटेलाईट्समध्येही इन्व्हेस्टमेंट करून ठेवली आहे.

असो, मिस्टर वाघ त्यांची चिडकी तोंडी पाहू शकता असता, पण सुजय शहाच्याच एरियात अजून असल्याने त्याच्यावर वॉच असू शकतो किंवा टेरेसवरून दोघे त्याच्याकडेच टक लावून असू शकतात हे लक्षात घेऊन मिस्टर वाघने तो मोह टाळला होता. नाही तर मला खात्री आहे, मिस्टर वाघला शहा व बोरगांवकर यांचे ते लालबुंद रागाने फुगलेले चेहरे पाहण्याची फार उत्सुकता लागली असणार... पण त्याने तो मोह खरंच टाळला होता. तसेही मिस्टर वाघ तर आहेच सर्व मोहांवर विजय मिळवलेला माणूस!

मिस्टर वाघची गाडी पोलीस हेडकॉर्टर्स बाहेर लागली. ती दारातच सोडून तो आत सूजयच्या केबिनकडे धावला.

"केस क्लोज करतोय. समअप करण्यापूर्वी आपला सल्ला घ्यावा म्हणून आपल्याला तसदी दिली." पेपर्स फाईलला कम्पाईल करत सुशांत समोर बसत असलेल्या मिस्टर वाघला म्हणाला.

"तुमचा तो पाच फूट सात इंच उंचीचा व्यक्ती सापडला बरं का?" सुशांत मस्करीत पुढे म्हणाला.

"असं का?" मिस्टर वाघ हसत म्हणाला.

"हो पण तुम्ही पूर्वी बोलून दाखवल्याप्रमाणे तो वाहत्या गंगेत हात धुणारा निघाला!" सुशांत हसला.

"आणि हे तुम्हाला कसं समजलं?" वाघने उगाचच विचारलं.

"न समजायला काय झालं? तुमच्या सूचनेनुसार आपण बरीच लोकं आत घेतलीत. त्यातील काहींनी एक दोन आडवे हात देताच सगळं कबूलायला सुरुवात केली, त्यात हा पाच सात उंचीचा इसम अग्रीम होता. पण हे मेटल कॅस्केट मर्डरर्स काही बोलतील तर शपथ." सुशांत बोलला,

"अगदी घाम काढला साल्यांनी, पण बधले नाहीत लेकाचे! शेवटी पहिल्या माणसासारखीच यावेळीही एकाने आत्महत्या केली. म्हणून सर्वांचीच चौकशी तूर्तास थांबवली मी." सुशांत म्हणाला.

"इजंट दॅट ऑब्वियस मिस्टर सुशांत?" वाघ हसत म्हणाला.

"म्हणजे?" सुशांत उडालाच.

"अहो शपथ आहे म्हणूनच तर बोलत नसतील?" वाघ म्हणाला.

"आपल्याला काय बोलायचं काय आहे?" सुशांतचा गोंधळ वाढला.

"ज्या अर्थी हे काम करणारे इतके लोक आहेत त्या अर्थी मर्डर्स करणारी ही एक कम्युनिटीही असू शकते?" वाघने विचार बोलून दाखवला.

"यू मिन रिलिजिअस कम्युनिटी?" सुशांत धक्कावला.

"कम्युनिटी! रिलिजिअस असावीच असे काही नाही!" वाघने स्पष्ट केलं,

"असो, त्यांच्या या वागण्याने सॅग्रीगेशन करणं तर सोपं झालं!" तो पुढे म्हणाला.

"तुम्हाला असं सुचवायचं आहे का, की ही केस अजून संपलेली नाही?" सुशांत जरा सावध होत विचारता झाला.

"हो!" वाघ थांबला.

शांततेकडून चिंताग्रस्त होत चाललेल्या सुशांतच्या चेहऱ्याचा वाघने काही काळ असुरी आनंद उचलला व म्हणाला,

"तुम्ही अजून माझं पेमेंट कुठं केलंय?" वाघ हसला.

सुशांतने निःश्वास सोडला.

"काय घाबरवलंत राव तुम्ही!" सुशांत सावरत म्हणाला.

"घाबरणार तर आत्ता तुम्ही?" वाघ कुत्सितपणे बोलला.

"का?" सुशांतच्या चेहऱ्यावर पुन्हा टेन्शन.

"कारण मेटल कॅस्केटचा बनाव करून झालेले खून देखील मी चार्ज करणार आहे. त्यांतील खूनी तसे बघायला गेले, तर या केसशीच सबंध ठेऊन आहेत नाही का?! आणि तुम्ही त्यांना माझ्या मदतीनेच पकडले आहे म्हणून!" मिस्टर वाघ लाघवी, परंतु लोभी हसला!

"तुमचा हावरटपणा काही जात नाही!" सुशांत वाघला घृणीत टोचून बोलला.

"कष्टाचे पैसे आहेत सर! ते कसे जाऊ देऊ? पण ते सोडून तुम्हाला चिंता करण्याची गरज काय? कॅस्केट मर्डर्स केसचा सूत्रधार तर मेलाय ना?" वाघने सुशांतला निरुत्तर केलं.

म्हणजे सुशांत पुढे काही बोलला नाही इतकंच. त्याला वाघशी वाद घालायचा नव्हता. तो खुश होता! त्याला सतावणारी मोठी होमिसायडल केस मार्गी लागली होती आणि त्याला कारणीभूत मिस्टर वाघ होता!

"बोला, तुमच्या शंका काय आहेत ते तर तुम्ही सांगितलं नाही!" वाघ मुद्यांवर सरकला.

"तुम्हाला त्या पाच फूट सात इंच व्यक्तीबद्दल काय वाटलेलं हे तुम्ही अजून क्लिअर केलं नाही! तो खरा मेटल कॅस्केट मर्डरर नाही हे तुम्ही आधीपासूनच ओळखून होतात का?" सुशांतने निवांत होत विचारलं.

"हो!" वाघ सुशांतला आश्चर्याचा धक्का देत बोलला.

"कसं?" सुशांत बुचकळ्यात.

"ते येडं कॅमेऱ्यांसमोर उभारून कॅमेरं फोडत होतं." वाघ बोलला.

सुशांतला हसू आवरलं नाही. पण आपण साधा असल्याने लक्षातही न घेतलेला इतका मोठा क्लू नजरेआड केला कसा हे देखील त्याच्या डोक्यात कुठेतरी वाजलं.

"मिस्टर वाघ..." मी बळ एकवटून बोललो.

त्याने सुशांत समोर शेवटी विनोद केल्याने मी जरा वितळलो होतो आणि माझ्यात जरा संवेदनांचा संचार झाल्यासारखा वाटत होता.

"हा बोलना!" वाघने दुजोरा दिला.

"यासाठीच तुम्ही त्या गवताळ भागात दडून बसलेल्या खूनी व्यक्तीला कॅस्केट मर्डरर म्हणून मारले ना?" मी विचारलं.

"तो होताच नाही का?" वाघ भुवई उंचवत बोलला.

"मित्च् हो, पण सुजय शहाच्या कम्युनिटी मधला तो नव्हता ना! त्याने फक्त या केसचा वापर आपल्या मार्गातील पथ्थर दूर करण्यासाठी केला होता.

"पकडलेल्या सर्वांची पुढे ही अशी चौकशी होणार म्हणूनच तुम्ही त्याला तेथेच संपवलंत, ज्यायोगे सत्य बोलण्यासाठी तो शिल्लकच राहिला नाही. आणि ज्याचा खून या माणसाकडून

झाला, तो तर काही सत्य सांगायला परतणार नव्हता! तुम्ही त्या खून्याला मारून सगळी शक्यताच संपवलीत!"

वाघ फक्त डावा गाल लंब खेचत हसला. चेहऱ्यावर भाव क्रूर, पाशवी!

मी याला उगाच 'गॉड ऑफ डेथ' नाही म्हणत!!!

आणि याला आत्ता 'एंजल ऑफ डेथ' म्हणण्याचीही इच्छा मला होऊ लागली होती.

शेतात वाघकडून मेलेल्या ज्या व्यक्तीला मी कधी पाहिलं देखील नाही, तरी त्याला अक्षरशः दोन मोठाले पांढरे शुभ्र पंख असलेला मिस्टर वाघ उचलून तो तितक्याच शुभ्र ढगांतून मौम्य किरणं चहूबाजूंनी फेकणाऱ्या सूर्याच्या दिशेने संथ झेपावताना मला दिसला.

मान्य आहे हे वर्णन जरा हास्यास्पद आहे, पण मला तसं इमॅजिन झालं, त्याला आता काय करणार...

या चित्रानेच मी जरा निवळलो. माझ्या ओठांवर अस्फुट स्मित उमटलं असावं, कारण ते पाहून मिस्टर वाघने 'काय झालं?' म्हणून मला विचारलं होतं. मी नाही अशी मान हलवून त्याला माझ्या या कल्पनेबद्दल सांगणे टाळले. अन्यथा त्यालाही हसू आवरले नसते.

"मेलेल्या माणसाबद्दल हळहळण्याऐवजी तू हसतोयस सूरज? किती संवेदनाहीन झाला आहेस तू?" त्याने माझी मस्करी केली.

"याला जबाबदार कोण?" मी त्याला निरुत्तर करण्याचा प्रयत्न करत बोललो,

"आपण तर माणसं मारता, तर मग आपण देखील संवेदनाहीन आहात का?" त्याला माझा आणखी जोड प्रतिप्रश्न झाला.

माझा प्रश्न बहुतेक त्याला लागला. स्वतःशीच हसत त्याने खाली मान घातली. मला असं बोलायला नको होतं हे मला जाणवलं. कारण माझ्या पाहण्यात जर सर्वांत जास्त संवेदनशील कोणी असेल, तर तो मिस्टर विजय वाघ आहे. त्याला सगळ्यांप्रती प्रेम आहे. जगत्मित्र आहे तो!

हा फक्त तो ते दर्शवत नाही! आपल्या लोभी, कपटी, स्वार्थी अशा नानाविध खोट्या नकली मुखवट्यांमागे त्याने त्याचे हे समाजाप्रती असलेलं प्रेम लपवून ठेवलं आहे!

नाही तर मग का कोणतीही किंमत मोजून तो समाजासाठी न्याय सिद्ध करण्यासाठी या अदृश्य आशा रणभूमीत उतरला असता?

पण तो लढतोय हे याचंच द्योतक आहे, की तो या पृथ्वीवर व पृथ्वीवरील प्रत्येक जिवाबद्दल किती प्रेमास्था ठेवून आहे ते!

"माफ करा!" मी खजील होत याचना केली.

"असू दे! मी देखील मर्यादा राखून तुझी चेष्टा करायला हवी होती. तू किती संवेदनक्षम आहेस हे मला ठाऊक आहे. मीच तुझी माफी मागतो. सॉरी." तो खिन्न म्हणाला.

"मिस्टर वाघ असं बोलू नका!" मी त्याला रोखत दुःखी अंतःकरणाने म्हणालो.

"नाही. हेच बरोबर आहे. एव्हरी एक्शन हॅज इट्स अपोसिट रिएक्शन! मी फेकलेलं बुमरँग फिरून माझ्याकडेच आलं. यात वाईट काय वाटायचं?" तो म्हणाला.

अगदी काही क्षणांपूर्वीच मी जरा स्थिर झालो होतो, तर आमच्या या संवादाने पुन्हा माझं मन घन गंभीर मेघांनी झाकोळून टाकलं...

"तुला हा प्रश्न पडला नाही का, की तो माणूस देखील या कम्युनिटी मधला नव्हता हे देखील मला आधीच कसं समजलं?" वाघनेच मला प्रश्न केला, जो मी त्याला करायला हवा होता.

पण वाघला लागेल असं बोलल्याने त्याच अपराधबोधात मी हे साफ विसरून गेलो होतो.

"हो. ते कसं?" मी विचारलं.

"ते असं, की मी सुजय शहाला पहिल्यांदाच भेटल्यावर त्याने त्याचे खूनी सत्र माझा काटा काढेपर्यंत थांबवलं होतं. त्याच्या

पीएला सगळं काम थांबवण्यासाठी त्याने सांगितलेलं. आठवतंय?" तो थोडा थांबला.

माझेही भाव बदलले. सुजयच्या त्यावेळच्या वाक्याचा अर्थबोध मला आत्ता झाला.

"राईट! म्हणून यापुढे जोपर्यंत तो मला मारत नाही, तोपर्यंत तो कोणालाही मारणार नव्हता हे उघड होतं. तरी कॅस्केट मर्डर झाला होता. म्हणून हे प्रकरण मुख्य कॅस्केट प्रकरणाशी संबंधित नाही हे आधीच माझ्या लक्षात आलं होतं!" वाघने खुलासा केला!

पण यावेळी आणखी एका प्रश्नाने माझ्या मनाचा ठाव घेतला. त्या प्रश्नाने आत्ता डोके वर काढले, ज्या प्रश्नाने आधीच आपली उपस्थित दर्ज करायला हवी होती. कारण तो खूपच महत्त्वाचा होता. तो असा...

की मुळात मिस्टर वाघ सुजय शहाकडे गेलाच कसा! त्याने त्यालाच का गाठले? केसबद्दल समजताच तो इतर काही तपास न करता सुजय शहा समोरच कसा जाऊन बसला?

माझ्या डोक्यात प्रश्नांचा हलकल्लोळ माजला. तो ओळखून मग मिस्टर वाघने थेट उत्तर न देता प्रसंग रंगवायला सुरवात केली...

सुजयसाठी काम करणारे त्याचे हस्तक एक वेगळ्या सेलमध्ये एकत्र करून बंद करण्यात आले होते आणि त्यांची कॉपी करून

खून केलेले वेगळे ठेवले होते. त्यांना वेगळं करणं कठीण नव्हतं, कारण जे पोपटासारखे कबूल करत होते ते मूळ कॅस्केट प्रकरणाशी संबंधित नव्हते हे साहजिक होतं.

मिस्टर वाघ दोन्ही सेल पाहण्यासाठी जेलमध्ये आला होता. जेलर त्याच्या पाठोपाठ होताच. सोबत सुशांत नेने देखील होता.

कॅस्केट मर्डर्सची कॉपी केलेल्यांचा सेल ओलांडून मग वाघ सुजयच्या हस्तकांच्या सेल समोर उभारला. कोर्टाकडून घेतलेल्या परवानगीचा कागद वाघच्या हाती होता.

"ते काही बोलणार नाहीत. आम्ही प्रयत्न करून पाहिला आहे. शिवाय केस मार्गी लागली आहे. का आपला वेळ घालवताय? तरी तुमचा आग्रहच होता म्हणून तुम्हाला घेऊन आलो." सुशांत नेने त्या खून्यांवर नजर लावून वाघच्या कानात बोलल्यागत बोलला.

"मी बघतो. तुम्ही व्हा बाहेर!" वाघ त्या लोकांच्याकडे पाहत स्मित करत सुशांत व जेलरला म्हणाला.

तरी ते हलले नाहीत. वाघने फक्त सुशांतकडे आश्वस्त पाहिलं.

"जशी तुमची इच्छा!" नेने नाईलाजाने बोलला,

"जेलर साहेब. चला. यांना काय ती चौकशी करू द्या!" नेने जेलर दिगंबर तांबेला बोलला व त्याने ती जागा सोडली.

जेलर जायला वळला असतानाच मिस्टर वाघने त्याला हाक मारली.

"जेलर साहेब! हा दरवाजा उघडून जा जरा!" वाघ त्या खूनी लोकांवरच नजर लावून जेलरला म्हणाला. त्याच्या बोलण्यात विनंती नव्हती. वाक्यरचना विनंतीची असली, तरी त्यात आदेश होता.

"सर पण? हे धोकादायक असू शकतं!" जेलरने त्याला सावध केलं.

"काही होणार नाही. उघडा!" वाघ म्हणाला.

मिस्टर वाघ काही ऐकणार नाही. आता या लोकांच्यात हा मेला तरी आपली जबाबदारी नाही असं ठरवून जेलरने स्वतः सेलचं मोठालं लॉक उघडलं आणि ते हातात घेऊनच तो बाहेर गेला. ते तिथं अडकवण्याचं भान त्याला नव्हतं.

मिस्टर वाघने मग कडी सरकवली आणि त्याने दार ढकलून आत प्रवेश केला.

हा 'कोण उपटसुंभ' असा प्रश्न चेहऱ्यावर घेऊन सगळे खूनी मिस्टर वाघकडे पाहत होते. प्रत्येकाच्या डोळ्यांत आग होती. ती खरी असती, तर वाघ भस्मसात झाला असता, इतकी ती धगधगती होती.

पण तो मरणार नव्हता हे नक्की होतं. कारण तसा आदेश नव्हता!

"मी तुमच्यातलाच एक आहे! माझं नांव विजय वाघ! सुजय शहा साहेबांचा आदेश घेऊन आलो आहे!" वाघ त्या सर्वांना उद्देशून म्हणाला.

"आम्ही हे खरं कसं मानायचं?" एकजणाने तडकून विचारलं.

तो जरा अतिशहाणाच होता. या टोळक्यांत कोणीतरी असा दीडशहाणा असणार हे वाघ आधीच ताडून होता व त्यामुळे त्याच्या शंकेचं निरसन होईल अशी तरतूद तो करून आलाच होता.

त्याने आपल्या मुडपलेल्या ब्लेझरची बाही अजून वर सारली. तेथे एक विशिष्ट टॅटू होता. तो टॅटू पाहताच सर्वांच्या डोळयांत विश्वास उतरला.

"पटली खात्री?" वाघ स्मित करत त्यांना म्हणाला.

आणि तो जरा पुढे झाला. त्याच्यावर अविश्वास दाखवायला पुढं सरसावलेल्या इसमाच्या कानाजवळ तो झाला आणि...

"इलिमीनेट युअरसेल्फ!" तो त्याच्या कानात बोलला.

वाघ मागे झाला. स्मित त्याच्या चेहऱ्यावर तसंच होतं. त्याच्या डोळ्यांत पाहणारे त्या अविश्वासी इसमाचे डोळे आधी मोठे झाले आणि मग त्यांत कमालीचा शांत भाव पसरला.

"जर तुम्ही हे केलं नाही, तर सुजय साहेब अडकतील. हे लोक त्यांना काय यातना देतील याची प्रचिती तुम्ही स्वतः घेतली आहे!" वाघ म्हणाला,

"तुम्हा लोकांना वाचवण्यासाठी साहेब स्वतः पोलिसांच्या हवाली व्हायचं म्हणत आहेत. त्याआधी तुम्हाला त्यांच्या रक्षणासाठी हे केलं पाहिजे! वेळ दुपारची जेवणाची!" वाघ एवढंच बोलला आणि त्याने तो सेल त्यागला, दरवाजा तसाच उघडा ठेवून.

आता हे इथून पळून जाणार नाहीत हे तो जाणून होता!

मी स्वतःला मागे झोकून दिले. हेडरेस्टवर माझं डोकं दानकन आदळलं आणि माझ्या डोक्यात झिणझिण्या आल्या. तशाही आधी त्या येतच होत्याच, पण या आघाताने त्या वाढल्या. पण मिस्टर वाघने दिलेला शाब्दिक आघात नक्कीच मोठी झिणझिण आणणारा होता हे मी मान्य करतो!

"काय झालं?" मिस्टर वाघने विचारलं.

त्याने आणखी ग्लास भरून घेतला. त्याचा हा कितवा कोकम ग्लास होता हे मला आता आठवतही नव्हतं. मी ते मोजणंच सोडलं होतं.

आणि हे एक याचं बरं आहे, म्हणजे एकतर एवढा लोड आमच्या इवल्याशा मेंदूला द्यायचा आणि वर तो न पेलवून आम्ही गरगरून खाली पडलो, तर हा वरून काय झालं असं विचारतो...

असो, विचारात पडलेला असतानाच मला काही क्लिक झालं!

"म्हणजे या टॅटूवरूनच तुम्ही सुजय शहापर्यंत पोहोचलात तर!" मी सळसळत उठून सरळ बसत विचारलं.

"आत्ता कसा बोलला आमचा राघू!" तो घोट गिळून म्हणाला.

"पण या टॅटूबद्दल तुम्हाला कसं समजलं?" माझा पुढचा उत्स्फूर्त उत्पन्न प्रश्न.

"आठवतंय? सुरवातीला एक माणूस सापडला होता? त्याच्या हातावर असा टॅटू होता. पण पोलिसांनी तो दुर्लक्षित केला. त्यांचं पूर्ण लक्ष कॅस्केटचं कोडं सोडवण्यात गुंतलं होतं."

"म्हणजे कॅस्केट कोड्स दिशाभुलीसाठी होती?" मी आवाक्.

"हो!" एकच ओठ लांब करत वाघ हसला.

"पण तो टॅटू विशेषच आहे असं तुम्हाला का वाटलं?" माझा आणखी एक प्रश्न.

"पोलिसांना जे प्रश्न पडत नाहीत ते तुला पडतात!" वाघ जरा वैतागून बोलला.

पण त्याचं हे वैतागणं खोटं होतं. हे त्याच्या उच्चारांवरून नक्की होतं. मला चिडवण्यासाठी तो बोलला होता.

"मी हे कॉम्प्लिमेंट म्हणून घेतो." मीही त्याच्या सारखाच कुत्सित हसण्याचा व त्याची कॉपी करण्याचा प्रयत्न करत म्हणालो.

मिस्टर वाघला त्याचं हसू आलं.

"तुला माझ्यासारखं व्हायचं नाही ना?" तो स्मित करत म्हणाला,

"आणि होऊही नको! तू आहे तसाच बरा आहेस. पापभिरू!" तो गोड हसला व पुढे म्हणाला,

"ऐक. त्या टॅटूमध्ये एक लोगो होता. तो लोगो खूप कल्पकतेने त्यात समाहित केलेला असल्याने तो सहज दिसणारा व लक्षात येणारा असा नव्हता." वाघ लगोलग म्हणाला.

"म्हणजे हा लोगो सुजय शहाशी निगडित होता?" मी विस्मयकारक पृच्छा केली.

"अगदी! त्याच्या अनाथाश्रमाचा व सेवाभावी संस्थेचा तो लोगो होता. जो त्या टॅटूत लपवला होता!" त्याने स्पष्ट केलं.

"आणि तोच टॅटू तुम्ही देखील गोंदवून घेतला होता?" मी विचारलं.

"हो!"

"पण मग तुम्ही स्टिकर लावले असते तर? टॅटूच काढायची काय गरज होती?" मी नकळता प्रश्न केला.

"स्टिकर हातावर लावले असते, तर माझा तोच हात उलटा फिरवून कस्टडीत असलेल्या लोकांनी माझ्या कानशिलात लावली नसती का?" वाघने माझ्या बुद्धीची कीव केली.

त्याचं म्हणणं रास्त होतं. टॅटू खोटा आहे हे त्या सुजयच्या हस्तकांनी सहज ओळखलं असतं. आणि मग त्यांनी मिस्टर वाघवर विश्वास का म्हणून ठेवला असता? ते सगळे तिथेच तुटून पडले असते त्याच्यावर एकाचवेळी!

"आणि जर हा टॅटू वगैरे काही नसता तर? तुम्ही सुजयपाशी पोहोचला असतात?" मिस्टर वाघच्या बुद्धीला मी टेस्ट करण्यासाठी त्याला प्रश्न टाकला.

"नक्कीच!" वाघ अगदी कॉन्फिडेंट्ली बोलली.

"कसं?" मी चटकन विचारलं. कारण खात्री होती तो पोहोचला असता. म्हणून त्याचा अल्टर्नेट प्लॅन मला जाणून घ्यायचा होता.

"एवढी लोकं मेलेलीत. तेही अशाप्रकारे. त्यांतील काही लोकांचे तरी मिसिंग रिपोर्ट्स आले असणार. त्याद्वारे मृतांच्या नातेवाईक व ओळखीच्या लोकांना भेटलो असतो, तर यांतील कॉमन धागा मिळाला असता. ज्याने मला लीड केलं असतं..." तो थांबला व हसला.

"सुजयकडे...?" मी अंदाज घेत म्हणालो. पुढील वाक्य मीच पूर्ण करण्यासाठी वाघने राखलं होतं. ते मी पूर्ण केलं.

"अगदी बरोबर!" तो उत्साहाने म्हणाला,

यात थोडा वेळ गेला असता एवढंच!" तो लगेच म्हणाला.

"काय मी तो टॅटू पाहू शकतो?" मी चाचरत विचारलं.

"सॉरी! युअर बॅड लक!" तो ओठ आवळून घेत मान नकारात हलवत बोलला. असं करताना त्याचे डोळे मिटले गेले होते.

"म्हणजे?" मी विचारलं.

"मी लेझर ट्रीटमेंटने तो काढून टाकला. तुला काय मला सुजयचा कायमचा नोकर करायचं आहे काय?" त्याने पुन्हा चेष्टा केली.

पण मला लक्षात आलं. हा सुजय नक्कीच मेला असणार म्हणूनच ती केस क्लोज झाल्यानेच त्याने ती उरलेली खूण मिटवून टाकली असणार!

मिस्टर वाघने आपली हॉटेल रूम सोडून एकट्यासाठी एक रिसॉर्ट बुक केलं होतं. पण हॉटेलमधून त्याने चेक आऊट केलं नव्हतं. हा त्याचा डिकॉय होता. आपल्यामुळे त्या हॉटेलमधील इतर लोकांना इजा होऊ नये म्हणून त्याने हे काम केलं होतं. हा पण साहजिक याचे बिल देखील तो पोलीस डिपार्टमेंटलाच जोडणार होता.

सुजय मिस्टर वाघला मारायचा एकदा व कायमचा प्रयत्न करणार ही शक्यता होती आणि म्हणून मिस्टर वाघला सर्वांची सुरक्षितता पाहणं हे आग्रणी होतं. तो कितीही म्हणत असला, की लोकांना वाचवण्यात त्याला काही इंटरेस्ट नाही, प्रत्येकजण कधी

न कधी मरणारच, पण हे फक्त तो म्हणायला म्हणतो. लोकांना वाचवण्यासाठी तो कोणत्या स्तरापर्यंत जावू शकतो, ते मी पाहिलं आहे!

मिस्टर वाघ सेंट्रल जेलमधून बाहेर पडला, तेव्हा काही अंतरावरूनच एक गाडी त्याचा पाठलाग करू लागलेली. चाणाक्ष वाघच्या ध्यानातून ही गोष्ट सुटली नाही. पण वाघ जोपर्यंत लोकवस्तीत होता; तो सुरक्षित होता. फिल्म थिएटर, रेस्टॉरंटमध्ये वेळ घालवून मिस्टर वाघ रात्रीचा आपल्या रिसॉर्टला गेला.

रिसॉर्ट मोकळ्या ठिकाणी होतं. वाघने मुद्दामच अशी जागा निवडली होती. इथं कोणी त्याच्यावर हल्ला केला, तर वाघ एकटा संकटात सापडणार होता. पण ती शक्यता कमीच! त्या उलट इथं वाघला देखील कोणतीही क्लिष्ट क्लुप्ती न वापरता त्याच्या हल्लेखोराला सपवणं सोपं जाणार होतं.

वाघने त्याची गाडी पार्क केली. पाठलाग करणारी गाडी मागे लागलेलीच होती. वाघ त्या गाडीकडे चालत गेला. थोड्या अंतरावर थांबला.

"या. बाहेर या!" वाघ हसून बोलला.

वाघच्या गाडीमागे गाडी पार्क केलेली व्यक्ती खाली उतरली, ते 'आय ओ एफ .32 रिव्हॉल्व्हर अनमोल' हाती घेऊनच. हॅमर

खेचून ठेवला होता. कोणत्याही क्षणी ती व्यक्ती गोळी चालवू शकत होती.

"टेक अ शॉट!" वाघ मंद स्मित ओठांवर घेऊन बोलला.

समोर चिडलेली व्यक्ती डोळे तीक्ष्ण करत वाघवर गोळी चालवण्यास सज्ज होती. तिने ट्रिगर ओढला. '.32' बोअर फायर झाली.

***फायर्ड्!!!***

त्या शांततेत जोराचा आवाज घुमला. पण ती गोळी रात्रीच्या अंधारात कुठे गडप झाली होती. समोर वाघ नव्हताच. त्याने क्षणार्धात बाजूला सरकून त्या व्यक्तीची 'अनमोल' रिव्हॉल्व्हर डाव्या हातात धरून बाजूला केली होती.

"आता माझी बारी!" म्हणत त्याने एकच ठोसा त्या व्यक्तीच्या दाडवाणावर मारून तिला नॉक आऊट केलं.

ती व्यक्ती तिच्याच गाडीला थडकून खाली कोसळली. तिची रिव्हॉल्व्हर मिस्टर वाघच्या हाती आली होती.

"गुड टेस्ट, बट रॉन्ग चॉईस..." वाघ ती रिव्हॉल्व्हर पाहत बोलला.

त्याचा डावा पाय खाली पडलेल्या व्यक्तीचा उजवा पाय चिरडत होता. ती व्यक्ती मात्र उफ् सुद्धा न करता वाघकडे पाहत होती. तिचा हात आपसूक चिरडल्या जाणाऱ्या तिच्या पायाकडे

गेला होता. वाघची शिकारी नजर त्या व्यक्तीवर गेली. ओठी क्रूर स्मित तरळलं.

"...टू किल मिस्टर वाघ!" वाघ म्हणाला.

आणि त्याने तीच रिव्हॉल्व्हर चालवली. गोळी दोन्ही भुवयांच्या मधून कवटी भेदून गाडीच्या पत्र्यात अडकली होती.

"रिकॉईल रेट लोव्ह असणारी गन निवडायला हवी होती मिस्टर बोरगांवकर!" वाघ हसत म्हणाला व त्याने ती रिव्हॉल्व्हर स्वतःकडे ठेवली.

आता ती इंडियन ऑर्डिनन्स फॅक्टरीमध्ये बनलेली ही 'अनमोल' नामक रिव्हॉल्व्हर मिस्टर वाघच्या कलेक्शनला जमा होणार होती. आणि कदाचित त्याची गाडीही. ही गाडी त्याने नंतर जंकयार्डमध्ये विकली होती व स्वतःच्या डोळयांदेखत तिला कार क्रशर खाली चिरडायला लावली होती. रिव्हॉल्व्हर मात्र त्याने ठेवून घेतली!

दिवस उजाडताच मिस्टर वाघ सुजय समोरच, पण सुजयच्या राहत्या घरी बसला होता. ऐटीत! उजवा पाय डाव्या पायावर घेऊन एक हात आर्मरेस्टवर व एक सोफ्यावरच कडेला. चेहऱ्यावर मंद मोहक स्मित!

"तुमचं म्हणणं खरं ठरलं, तर मिस्टर वाघ! माझ्या लोकांनी खरंच जेलमध्ये आत्महत्या केल्या!" स्वतःसाठी मोठाला ग्लास मद्याने काठोकाठ भरत सुजय मिस्टर वाघला बोलला.

त्याला आता मद्याची खरंच गरज होती. यावेळी खरं त्याने मिस्टर वाघला मद्य ऑफर केलं नाही. कारण मिस्टर वाघ ते घेत नाही हे त्याला माहित आहे म्हणून? की मिस्टर वाघ सतत नडतोय हे पाहून त्याला त्याचा राग आला होता? की मिस्टर वाघला जिवंत पाहूनच त्याची तळपायाची आग मस्तकसुळ उठवत होती???

ग्लास ओसंडून ते जे काही स्ट्रॉंग अल्कोहोल होतं ते सुजयच्या हातावरून खाली गळू लागलं आणि सुजय भानावर आला. नाहीतर आत्तापर्यंत मिस्टर वाघला खाऊ का गिळू याविचाराने, पण चेहऱ्यावर हसू घेऊन तो मिस्टर वाघकडे पाहत होता फक्त.

"हो. आणि तुम्हाला जे वाटतंय, की ते तसं करणारच होते; पण नाही! मीच त्यांना आत्महत्या करायला भाग पाडले आहे!" मिस्टर वाघ त्याला बोलला.

सुजय मिस्टर वाघवर नजर टाकून हसला. नकळत त्याची मान हलली.

"मला तुमच्या मनातील शंका कशी समजली ते बाजूला ठेवूयात. परंतु ती निरसण्यासाठी तुमचं म्हणणं खोटं कसं ते मी तुम्हाला सांगतो." मिस्टर वाघ सुजयच्या प्रतिक्रियेसाठी थांबला.

सुजय काही बोलला नाही. मग मिस्टर वाघच बोलू लागला,

"तुमच्या लोकांना ते पकडले गेल्यास लगेच त्यांनी स्वतःचं आयुष्य संपवायला हवं होतं, पण तसं झालं नाही. तुम्हाला त्यांच्या मृत्यूबद्दल समजलं, याचा अर्थ तुम्ही न्यूज वाचली, पाहिली किंवा ऐकली आहे हे मी खात्रीशीर धरतो. त्यात स्पष्ट आहे, की विजय वाघ त्या लोकांना भेटून गेल्यावर जेलमध्ये लंच टाईमला ते हत्यासत्र घडलं.

"आणि आता तो विजय वाघ कोण असा प्रश्न तुम्हाला पडू नये!" वाघ कुटील हसला.

"माझ्या एका प्रश्नाचं उत्तर द्याल?" इतका वेळ मिस्टर वाघ समोर उभा सुजय मिस्टर वाघ समोर बसत बोलला. मद्यप्याला तसाच हातात.

"पोलिसांनी तुम्हाला चौकशीसाठी आत नाही घेतलं? तुम्ही अजून बाहेर कसे?" सुजय शांत भावाने विचारत होता.

"तुम्ही कदाचित विसरत नसाल, मी विजय वाघ आहे! मला पकडणं कोणालाही शक्य नाही! या पोलिसांना तुमच्या बिनडोक माणसांना पकडता आलं नाही, तिथं ते मला कसे पकडू शकणार आहेत!" मिस्टर वाघ मुद्दाम स्वतःची बढाई मिरवत बोलला,

"पण तुम्हाला ऐकायचंच असेल, तर सांगतो, पण मग तुम्हालाही माझ्या काही शकांचं निरसन करावं लागेल. कबूल असेल, तरच बोलेन!" वाघ खांदे उडवत म्हणाला.

"बोला!" मद्य रिचवत सुजय बोलला.

"तत्वतः मला पोलिसांनी चौकशीसाठी बोलावलं होतं. पण ती अनौपचारिक होती. एसपी सुशांत नेनेच्या केबिनमध्ये..."

मिस्टर वाघ त्याच्याकडे वळलेल्या डेस्कटॉप स्क्रिनवर हत्याकांडाचं चित्रमुद्रण पाहत होता. जेवणाच्या वेळी रिफेक्ट्री (एकत्र जेवणाचं ठिकाण) येथे सुजयच्या हस्तकांनी एकमेकांना निर्घृणपणे जीवे मारलं होतं.

पण त्यांनी तिथं उपस्थित व त्यांना अडवायला आलेल्या कोणत्याही जेल कर्मचाऱ्याला मारले नव्हते. त्यांच्या हातापाईत ते काही कर्मचारी जखमी व इजावलेले झाले होते, पण त्यांची जीवित हानी होईल ऐसी त्यांची स्थिती नव्हती.

व्हिडिओ पाहून पूर्ण झाल्यावर...

"एक्स्प्लेन युअरसेल्फ मिस्टर वाघ!" खुर्ची मागे खेचून वाघ समोर बसत सुशांत नेने बोलला.

मिस्टर वाघची नजर सुशांतकडे वळली.

"मला कोणत्याही चार्ज अंडर आत घेण्याअगोदर मी तुम्हाला हे सांगू इच्छितो, की जर मला काही झाले, तर तुमची बहीण नीट जगू शकणार नाही! त्यामुळे जरा निवांत!" वाघ त्याला रोखून पाहत बोलला.

सुशांतचा क्रुद्ध चेहरा जरा निवळला.

"आणि तुम्हाला उत्तरच हवं असेल, तर एक लक्षात घ्या, की मी भेटून गेल्यावर लगेच त्यांनी स्वतःला संपवले का? तर नाही! मग दोष माझ्यावर कसा येतो? या सगळया गडबडीत तुम्ही एक गोष्ट विसरत आहात, की त्यांची चौकशी होत असल्याने आपल्याकडून सत्य बाहेर पडू नये म्हणून त्यांनी दुपारच्या जेवणावेळी एकमेकांना संपवले! हे सूर्याच्या स्वच्छ प्रकाशाइतकं स्पष्ट आहे.

"यापूर्वी देखील अशीच एक केस घडली होती आणि म्हणूनच तुम्ही मला यात इन्वॉल्व्ह करून घेतलं होतं. सर्वांना एकत्र पकडल्यावर देखील एक स्वतः मेला हे तूम्ही विसरता कसे?" मिस्टर वाघ थांबला.

सुशांत नेने विचारांत होता. त्यांतून स्वतःला बाहेर खेचून तो बोलला,

"याह! यु आर राईट! माफ करा! पण त्यांनी तुम्हाला काही सांगितले होते?"

"नाही! तुम्ही म्हणालात तसेच झाले... आपण त्यांना बोलण्यासाठी जबरदस्ती तर करू शकत नव्हतो. याचाच त्यांनी फायदा उचलला आणि आपण त्यांच्याकडून काही माहिती घेण्याअगोदरच त्यांनी आपापल्यात मॅसेकर् घडवून आणलं."

"तुम्ही जे काही सुजयला सांगत होतात, तसं तुमचं बोलणं खरंच घडलं होतं सुशांत नेनेशी?" मी डोळे बारीक करून मिस्टर वाघला जाब विचारला. तो सुजयला खोटं तर बोलला नाही ना हे मला तपासायचे होतं.

"पार्शली!" तो हसला,

"तू खोटं किती लवकर पकडतोस ना?" तो हसून मला म्हणाला.

"ते मला माहित नाही! पण नेने सोबत तुमचं काय बोलणं झालं, हे तंतोतंत सुजय शहाला सांगाल इतके साधे तर तुम्ही नक्की नाही आहात हे मला बरोबर माहीत आहे!" मी त्याला म्हणालो.

"तू मला हरामी म्हणतोयस का?" त्याने मला हसत विचारलं.

"माझी हिंमत आहे का?"

"हो! म्हणूनच तो एक शब्द वापरण्याऐवजी तू इतकी लांबड लावलीस!" तो अजूनही हसतच होता.

"मी एक प्रश्न विचारू?" मी विचारले!

"हे काय? विचारलास की!" तो म्हणाला.

"च्च! आणखी एक!"

"तोही आत्ता विचारलास!" तो पुन्हा म्हणाला.

"कट इट आऊट मिस्टर वाघ!" मी वैतागून बोललो.

"बरं बोल. तुझा आत्मा थंड व्हायचा नाही त्याशिवाय!"

"सुशांतसोबत तुमचं नक्की काय बोलणं झालं?" मी वाघ सारखे बेरकी डोळे करत वाघलाच विचारलं.

हत्याकांडाची ती चित्रफीत पाहून संपल्यावर सुशांत नेने तसाच बसून राहिला. एकदम शांत... काय बोलावे ते त्याला सुचत नव्हते! मिस्टर वाघ देखील शॉक बसल्याचे नाटक करत स्क्रिनवर डोळे रोवून होता.

सुशांत नेनेने एक दीर्घ श्वासोच्छवास सोडला...

"आता ही आणखी एक नवी समस्या!" स्वतःशी कुढत नेने बोलला,

"केस संपली असं वाटत असताना हे नवीन!" तो हताश झाला होता!

"पण यात तुम्हाला त्रास काय आहे?" मिस्टर वाघने जणू काही झालंच नाही अशा अविर्भावात स्वतःला बळेच सारवरलेलं दाखवत नेनेला विचारलं होतं.

मिस्टर वाघच्या या प्रश्नावर सुशांत नेने बावळटासारखा त्याच्याकडे पाहत राहिला.

"काय?" मिस्टर वाघने अगदी सहज विचारलं.

"तुम्हाला यात काहीच समस्या वाटत नाही?" सुशांतने वैतागून विचारलं.

"कसली समस्या?" वाघ सहज चेहऱ्याने विचारता झाला.

"अहो! त्यांनी जेलमध्ये एकमेकांना जीवे मारलं आणि तेही जेलर व इतर गार्ड्स व कर्मचारी असताना! त्यांना पकडण्यात हात आपला. असं असताना हे आपल्यावर शेकणार नाही का?" सुशांत चिंतित विचारत होता.

"का आपण जाऊन मारलं त्यांना? त्यांनी स्वतः स्वतःला संपवलं आहे आणि ते रेकॉर्ड देखील झालं आहे. जेलरसह सर्व त्यांना अडवायला मधे पडले होते. या लोकांनी त्यांना देखील जखमी केले यात आपली चूक काय? आणि वैयक्तिक तुमच्या माझ्याविषयी तुम्ही म्हणत असाल, तर हे घडलं त्यावेळी आपण तिथं उपस्थित नव्हतोच. मग आपल्यावर जबाबदारी ती कशी? जे यात मारले गेलेत त्यांची मानसिक अवस्था ठीक नव्हती आणि तसे

रिपोर्ट्स देखील आपल्याकडे आहेत. सो वी आर क्लीन!" वाघने सुशांतची समस्या निकालात काढली.

पण तरी सुशांतचे समाधान झाले नव्हते.

"तुम्ही म्हणता तितकं हे साधं असणार नाही..." तो अजूनही चिंताक्रांत होता.

"आणि तुम्ही म्हणता तितकं अवघड पण असणार नाही!" वाघ त्याला बोलला.

"तुम्हाला कोणी दोष देणार नाही हो! पण हे माझ्यावर शेकेल. मी ऑफिशियली इंचार्ज आहे!" सुशांत शून्यात होता.

"काही झालेच, तर सगळं मी निस्तरेन. मग तर झालं?" वाघ आश्वासन देत सुशांतला बोलला.

"असं आहे तर सगळं! हे सत्य आहे तर!" मी बोललो.

"तू मला मघाशी पकडलास कसं खरं?" वाघ हसून म्हणाला.

"बीकॉज युआर अ वेरी बॅड स्टोरी टेलर!" मी त्याला म्हणालो.

"बघ! आणि तू मला तुझी स्टोरी लिहायला सांगत आहेस!" वाघ माझी इच्छा जी आतापर्यंत माझ्या ध्यानातही राहिली नव्हती ती आठवून देत बोलला.

"मी त्यातून तुम्हाला सुट्टी देणार नाही!" मी त्याला आधिकारवाणीत बोललो.

"बघू!" तो हसून म्हणाला.

"तूर्त एका प्रश्नाचं उत्तर द्या!" मला मात्र हसू आलं नव्हतं.

"हो! त्यासाठीच आमचा जन्म आहे! ईचारा!" तो माझी खिल्ली उडवत म्हणाला.

"जेलमध्ये सुजयच्या लोकांनी स्वतः एकमेकांचा खून केला, पण त्यांनी इतर कोणा कैद्याला मारले नाही, की मधे पडलेल्या कर्मचाऱ्यांना देखील फक्त इजा करून सोडून दिले.

"जे लोक इतक्या निर्घृणपणे खून करून मृतदेहाचे तुकडे तुकडे करून ते पेटीत बंद करून सोडून देण्याची निर्घृणता दाखवतात, त्यांनी स्वतःच्या लोकांना सोडून इतर कोणाला का मारले नाही?" मला जे विचारायचं आहे ते विचारण्यासाठी व्यवस्थित वाक्यरचना करता येत नव्हती.

पण मिस्टर वाघ मला काय विचारायचं आहे ते समजला व बोलला,

"कारण सुजय शहाचा त्यांना तसा आदेश होता!" वाघ पुन्हा कुटील कुत्सित व राक्षसी स्मित करत हसला.

"म्हणजे तुमची?" मी गंभीरपणे विचारलं.

"हो! मी सुजयचा आदेश पोहोचवतोय असं भासवून त्यांना जो आदेश दिला होता, त्यात फक्त मी त्यांना स्वतःला संपवण्याविषयी सांगितले होते म्हणून त्यांनी इतर कोणाला मारले नाही. हा फक्त मधे पडणाऱ्या व त्यांना तसे करण्यापासून अडवू पाहणाऱ्यांना त्यांनी जखमी केलं इतकंच!" वाघ सहज बोलला.

इतकंच! हा इतकंच म्हणतो...?! त्याने सरळ सरळ या निर्दोष लोकांच्या आयुष्याचा जुगार खेळला होता! पण निर्दोष तरी तिथं कोण होतं म्हणा जेल कर्मचारी सोडले तर... परंतु ते तरी निर्दोष कसे? त्यांनीही काही ना काही पापं आयुष्यात केलीच असतील की... त्यामुळे ते मेले तर मिस्टर वाघला काय फरक पडणार होता?

"असा विचार करू नको सूरज! ते लोक यांना मारणार नाहीत याची मला खात्री असल्याशिवाय मी हे पाऊल उचललं नसतं याची खात्री बाळग!" वाघ माझ्या मनातील विचार ओळखून गंभीर होत बोलला.

"म्हणजे तुम्हाला खरंच लोकांच्या जीवाची चिंता वाटते तर?" मी विचारलं.

यावर तो शांत बसला. उत्तर त्याने टाळले. पण तो समाजाची किती काळजी करतो हे मी जाणून आहे!

"पण जेवणाचीच वेळ तुम्ही का निवडलीत? ते एकत्र एका सेल होते मग बाहेर हे हत्याकांड घडवून इतरांना धोक्यात

घालण्यापेक्षा त्यांना तेथेच आपापल्यांना संपवण्याचे आदेश तुम्ही का नाही दिले?"

"कारण ते त्या सेलमध्ये जरी एकत्र असले, तरी एकमेकांना मारण्यासाठीची साधने जेवणावेळीच त्यांना उपलब्ध होणार होती! आणि ते पण एकाच ठिकाणी एकत्रित असणार! शिवाय मला ती घटना रेकॉर्डवर यायला हवी होती. सेलमध्ये कॅमेरे नसल्याने जेवणाची वेळ व ठिकाण मी साधलं.

"जशी जेवणाची ताटं त्यांच्या समोर सारली गेली व कर्मचारी तेथून गेले, काही काळ गेल्यावर त्यांतील एक जो मला प्रश्न करत होता, त्यानेच स्क्रूड्रायव्हरने त्याच्या साथीदारांचे गळे चिरायला सुरवात केली. मग इतर दोघे असेच त्यात सामील झाले.

"जेवण वाढण्याची साहित्यं सुद्धा मग हत्यारांमध्ये परावर्तित झाली. आपल्या कामाच्या ठिकाणाहून लपवून आणलेली अवजारे होतीच. एव्हना सेल बाहेरील गार्ड्सना हे समजलं होतं व ते आत आले होते, त्यांना मारून बेशुद्ध करण्यात आलं. त्यांची डोकी फोडली होती, पण त्यांचा मृत्यू होण्याइतकी इजा त्यांना करण्याचे टाळले होते.

"सुजयच्या हस्तकांपैकी काही जण आपला जीव वाचवण्यासाठी मग भांडू लागेल. त्यांनीही स्वतःचे जीव वाचवण्यासाठी त्यांचा खून करू पाहणाऱ्यांना संपवले. मग सुरू

झाले खूनी सत्र! आणि यात सर्वच मारले गेले. शेवटी उरलेल्या व्यक्तीने आपला गळा स्वतः चिरला होता!" शंकेचे वाघने निराकरण केले.

"तुम्हाला हे सगळं बोलवतं तरी कसं?" ऐकत असताना माझ्या अंगावर काटे उभा राहिले होते.

"मीच घडवून आणले ते सांगण्यात कसली लाज?" वाघ निर्लज्ज हसून म्हणाला.

"क्रूर आहात तुम्ही!" मी ओरडलो.

"मान्य! पण हे बोलून तू थकत नाहीस?" त्याने पुन्हा माझा हशा केला.

पण माझ्या मनात आणखी एक प्रश्न त्याच्या उत्तराने उफाळला.

"तुम्ही सांगितलेली बनावट घटना ऐकून सुजयची काय रिएक्शन होती? त्याला ती पटली असणार हे गृहीत धरून मी विचारतोय!" मी म्हणालो.

"मी तुम्हाला तुमच्या प्रश्नांचं उत्तर दिलं. आता माझ्या प्रश्नाचं उत्तर!" वाघ सुजयला बोलला.

"विचारा!" शांत चेहऱ्याने सुजय बोलला.

त्याने मद्यघुटिका घेतली.

"याची सुरवात कशी झाली? म्हणजे शिक्षण महर्षी असलेला आणि अनाथों का नाथ असलेला सुजय शहा मौत का सौदागर कसा झाला?" वाघने खास त्याच्या स्टाईलमध्ये प्रश्न केला.

"यातून मिळणाऱ्या पैशांसाठी मी हे करतोय असं नाही! यातील पैसा माझ्यासाठी चिंच्चोक्याच्या किमतीचाही नाही!" तो म्हणाला.

"मग का?"

"सांगतो! म्हंटलं आधी आपली काही शंका असली, तर ती मिटवावी. आधी थोडी प्रस्तावना द्यावी!"

"शिक्षण महर्षी साहेब, ही काही आपली परीक्षा चाललेली नाही. त्यामुळे संदर्भाची आवश्यकता नाही. स्पष्टीकरण दिलेत तरी पुरेसं आहे!" मिस्टर वाघ हसून म्हणाला.

"एका जमिनीची डील चालू होती. ज्याची जमीन होती, त्याचा जमीन विकण्यास नकार होता! मला कोणत्याही परिस्थितीत ती जमीन हवीच होती! म्हणून मी त्याच्यावर थोडं प्रेशर टाकलं, आणि मग तो मला शिव्या देऊ लागला...

"ते माझ्या एका माणसाला आवडलं नाही. त्याने त्या माणसाला दिलेला चहाचा कप फोडला आणि त्याच्या काचेने माझ्यासमोर त्या माणसाचा गळा चिरला!

"मी स्तब्ध होतो! अविश्वासाने माझ्या त्या माणसाकडे पाहत होतो... पण लगेच भानावर येत पुढं होऊन मी त्या व्यक्तीच्या डाव्या हाताचा अंगठा कागदपत्रांवर घेतला." सुजयने इति केली.

"म्हणजे एनजीओज् व इन्स्टिट्यूट्ससाठी तुम्ही आशा जमिनी गोळा करता तर?" वाघने मस्करीत विचारलं.

"रियल इस्टेटमध्येच सगळं प्रॉफिट आहे हे तुम्हालाही माहीत आहे!" सुजय कुचकट हसला.

"हो बरोबर आहे!" वाघ पण हसला,

"आणि इथून पुढे तुम्हाला ही आयडिया सापडली. आणि मग उभा राहिला मेटल कॅस्केट सिनारीओ! पोलिसांच्या दिशाभूलीसाठी. हो ना?"

"तुमच्यापासून काय लपून राहिलंय?" सुजय वाघला म्हणाला.

"हो! आणि माझ्या पासून हेही लपून राहील नाही आहे, की तुम्ही मला मारायला एक माणूस पाठवला होता!" वाघने बॉम्ब फोडला!

"आणि तुम्ही त्याला संपवलंत!" सुजय निवांत बोलला!

"मी तुमच्यासमोर आहे!" वाघ हसला!

माझ्या गाडीच्या डीक्कीतून तुमचा माणूस कलेक्ट करा! आणि काळजी करू नका! मी त्याचे तुकडे केले नाहीत! त्याचे तोंड देखील शाबूत आहे. तुम्हाला त्याची ओळख पटायला सोपं जावं यासाठी ही सुविधा!"

सुजय शहा अट्टहास करत मोठ्याने हसला!!!

"तुम्ही तुमच्या लोकांना खून करण्यासाठी प्रवृत्त कसं केलंत? ते म्हणजे तुमची अक्षरशः पूजा करतात!" वाघने आता गंभीर झाल्याचं दाखवलं.

"मिस्टर वाघ!" सुजयने मद्य प्राशन केलं व पुढे बोलला,

"एव्हरी सिंगल पर्सन निड्स टू बी ट्रीटेड् वेल! एकवेळ तुम्ही लोकांना अन्न देऊ नका, पण योग्य तो मान द्या! त्यांची मनं जपा आणि मग ते तुमचे!" सुजय बोलला.

"भक्त!" वाघ हसला.

"सॉर्ट ऑफ! माझ्यासाठी काम करणारे लोक हे माझ्या वेगवेगळ्या अनाथाश्रमात वाढलेले. जगाने लाथाडलेले, समाजाविषयी आधीच त्यांच्या मनात राग! मी त्यांना चांगलं जीवन दिलं. त्यांना सन्मान दिला. आणि त्यामुळे ते माझ्यासाठी काहीही करायला तयार झाले. वर सांगितलेल्या घटनेने माझ्या हे लक्षात

आलं, दॅट व्हेन यू गिव्ह फूड अँड रिस्पेक्ट टू पीपल; दे'ल् डू व्हॉटएव्हर् यू वॉन्ट!

"आणि मग मी फक्त त्यांचा जगावर असलेला राग व माझ्याबद्दल असलेला आदर युटीलाईझ केला, माझ्या प्रॉफिटमध्ये! रिस्पेक्ट इज ए ग्रेटेस्ट मॅनीप्युलेशन मिस्टर वाघ!" सुजय टोस्टसाठी मद्याचा ग्लास उंचावत हसत बोलला.

हा येडा मिस्टर वाघला 'मॅनीप्युलेशन' बद्दल शिकवत होता! याने इतके वर्ष घालवून ज्या लोकांमध्ये त्याच्या विषयी विश्वास निर्माण केला होता, त्यांना फक्त काही सेकंद भेटून मिस्टर वाघने त्यांना एकमेकांत लढवून संपवलं होतं!

पण यावरूनच माझ्या मनात एक मोठा प्रश्न उभा राहिला...

"इतक्या सहजासहजी सुजय शहाच्या माणसांनी तुमच्यावर विश्वास ठेवलाच कसा? ते लोक इतके बिनडोक तर नक्कीच नसतील." मी मिस्टर वाघला प्रश्न केला.

"टॅटूमुळे. सांगितलं ना तुला. मग पुन्हा का विचारतोयस?" वाघने विचारलं.

"नाही एवढंच नसणार! तुम्ही त्यांच्यावर हिप्नॉसिसचा उपयोग केला होता का?" मी विचारलं.

यावर वाघ किती मोठ्याने हसला.

"तसं काही नाही, पण तू म्हणतोस तर हिप्नॉटीसम शिकायला काहीच हरकत नाही!" वाघ हसू आवरतं घेत बोलला,

"पण तुला असं का वाटतं?" त्याने मला विचारलं.

"नाही तुमचं काही सांगता येत नाही. तुमच्या पोतडीत काय काय दडवून ठेवलं आहे याचा अंदाज देवालाही यायचा नाही. म्हणून म्हटलं." मी त्याला थंड चेहऱ्याने बोललो.

मिस्टर वाघ त्याच्या ठेवणीतील हसला.

"आता खरं सांगण्याची कृपा कराल?" मी तेवढ्याच थंड भावनेने पुन्हा विचारलं.

"ते लोक कधीना कधी ते करणारच होते. कारण आपल्यामुळे सुजय पकडला जाऊ नये अशी त्यांची भावना होती. ते जवळजवळ सुजय शहाची भक्ती करत होते. आणि भक्तांची अवस्था काय असते हे तुला चांगलंच ठाऊक आहे!" वाघ हसला!

शेवटचं वाक्य हा त्याचा मला टोमणा होता, कारण त्याने हे मला उद्देशून बोलले होते... मी ज्या मुलीवर प्रेम केलं होतं, तिची मी भक्तीच तर केली होती! आणि म्हणूनच तिच्या सुखासाठी, सुरक्षिततेसाठी मी कोणत्याही पातळीपर्यंत जाऊ शकत होतो... तिच्या सुखासाठीच तर मी तिला गमावलं... जाऊ दिलं

माझ्यापासून दूर... म्हणूनच तो मला त्याची आठवण करून देत बोलला.

आणि यावरूनच माझ्या लक्षात आलं, की त्या लोकांनी मिस्टर वाघवर विश्वास ठेवला असेल नसेल, पण त्यांना सुजय शहाला सुरक्षित ठेवायचं होतं! म्हणूनच त्यांच्या सुरक्षेसाठी सुजय पोलिसांच्या हवाली होतोय ही बातमी वाघकडून ऐकून सुजयला वाचवण्यासाठी म्हणून त्यांनी हे पाऊल उचललं होतं...

"सुजय शहा जिवंत राहिला, तर त्यांच्यासारखी किती तरी मुलं समाजाच्या अवहेलनेला बळी पडणार नाहीत व त्यांना चांगली वागणूक देखील मिळेल या विचारातून ते सर्वजण सुजयची सुरक्षितता सांभाळून होते! आपल्यावर सुजयने केलेल्या उपकारांची परतफेड ते यांतून करण्याचा प्रयत्न करत होते. म्हणून मग सुजयची कोणतीही इच्छा मग ती रास्त असो वा नसो ते ती पार पाडत होते." वाघने स्पष्टीकरण देत होता,

"आधी सापडलेल्या माणसाने आत्महत्येचा प्रघात घालून दिलाच होता. मी फक्त यांना एक दिशा दिली." वाघ कुत्सित हसला.

"सो बेसिकली दे वेअर लाईक ह्युमन अँड्रॉईड्स ऑपरेटिंग बाय इमोशन्स!" मी बोललो.

"एक्च्युअली! तू बरोबर ओळखलंस!" वाघ म्हणाला.

"सुजयच्या ओव्हरऑल व्यक्तिमत्त्वावरून तो कोणाचचं भलं करणाऱ्यातला आहे असं वाटत नाही. मग तो देशभर अनाथाश्रम, एनजीओज् इतकी वर्षे का चालवत होता?"

"एकतर रिअल इस्टेटचा धंदा. म्हणजे या सगळ्या जमिनी, रिवॉर्ड म्हणून किंवा मग खूप कमी भावात त्याला मिळवता येत होत्या व यावर त्याला कोणताही मिळकत कर भरावा लागत नव्हता. याच्या अंडर तो त्याचे सर्व बिझनेस वेल्फेअर फंड्स म्हणून रन करायचा. मग या बिझनेससाठी येणाऱ्या इन्व्हेस्टमेंट्स, अनाथाश्रम, शिक्षण संस्था, एनजीओजसाठी येणारे फंड्स देखील याच्या खिशात!" वाघने मला समजेल इतपत एक्स्प्लेन केलं. पण यामागे सुजयचा अजून बराच विचार असणार हे मला समजलं.

मिस्टर वाघ सुजय शहाच्या रेसिडेन्सी बाहेर त्याच्या गाडीपाशी उभा होता. सुजय त्याच्या सोबत होताच.

मिस्टर वाघने त्याच्या गाडीची डिक्की उघडली. आणि त्यात कोंबून भरलेला शहाचा पीए बोरगांवकर जो मिस्टर वाघला मारायला गेला होता, त्याला खेचून मिस्टर वाघने पेव्हमेंट ब्लॉक्सवर लुढकवला. शहाच्या पायांत!

"याची विल्हेवाट कशी लावायची ते तुमचं तुम्ही ठरवा. हा पण कॅस्केट प्रकरण करू नका! नाही तर मिटलेली केस रिओपन व्हायची!" मिस्टर वाघ सुजयला अक्कल शिकवत हसला.

आपण पकडले गेल्याचा लवलेशही शहाच्या चेहऱ्यावर नव्हता. उलट तो हसत होता. बहुदा मिस्टर वाघच्या हुषारीवर तो खुश असावा!

त्याला आता अनेक व्यक्तींवर त्याच्या कामासाठी अवलंबून राहण्याची आवश्यकता राहिली नव्हती. मिस्टर वाघ त्याच्या कामासाठी पर्याप्त होता. आणि वाघने अनेकवेळा आपली योग्यता सिद्ध केली होती. पण मिस्टर वाघला आपला एम्प्लॉई समजण्याची त्याने चूक करू नये हे देखील तो आता ओळखून होता. त्याला तसं समजण्याची गरजही नव्हती. जोपर्यंत तो मिस्टर वाघला योग्य पेमेंट करणार होता, तोपर्यंत मिस्टर वाघ त्याचे हवे ते काम करणार होता. आणि कोणी त्यांना पकडू देखील शकणार नव्हतं! या विचारानेच सुजय गालातल्या गालात हसत असावा.

"येतो!" वाघ म्हणाला व तो ड्रायव्हिंग सीटकडे चालला.

"मिस्टर वाघ!" सुजयने भानावर येत हाक मारली.

"हं!" वाघ त्याच्याकडे वळला.

"तुम्ही त्या सुशांत नेनेच्या बहिणीबद्दल काही बोललात..."

"मी तुम्हाला कुठे काय बोललो?" वाघ म्हणाला.

"मला नाही, पण नेनेनं तुम्हाला चौकशीसाठी बोलावलं, तेव्हा तुम्ही त्याला काही म्हणाला होतात." सुजयने कुटील भावाने विचारलं.

"तिचं तुम्हाला काय करायचं?" वाघने स्मित करून विचारलं.

"इन केस ऑफ इमर्जन्सी. नेनेचा त्याच्या बहिणीवर खूप जीव दिसतोय. त्याशिवाय तुम्ही तिचा विषय काढल्यावर तो मवाळ झाला नसता. आपल्या शत्रूची बलस्थानं व अबलस्थानं माहीत असल्यास उत्तम असतं म्हणून." सुजय कुचकट हसला.

"त्याच्या बहिणीचं माझ्यावर प्रेम आहे. मला काही झालं, तर ती जगू शकणार नाही. असं मी त्याला सुचवलं." वाघने थाप मारली.

"अरे व्वा हे तर भारीच झालं. म्हणजे सुशांतचे हात तुम्ही असे दगडाखाली ठेवले आहेत तर!" सुजय खुश होत उद्गारला.

"हो!" मिस्टर वाघ लाडिक हसला.

मिस्टर वाघने मग अजून पुढे जात त्याला रिद्धीमाचा फोटो दाखवला.

"कडक माल आहे पण!" रिद्धीमाला पाहत सुजय बोलला.

तसा मिस्टर वाघने त्याच्याकडे एक कटाक्ष टाकला. त्याच्या नजरेत राग स्पष्ट दिसत होता. एका स्त्रीचा अनादर त्याच्यासमोर या सुजयने केला होता. आता तरी तो नक्कीच जिवंत राहणार नव्हता.

मिस्टर वाघच्या डोक्यात सुजय शहाच्या मृत्यूची पत्रिका लिहिली गेली होती. आणि ती जरी चित्रगुप्ताच्या चोपडीशी जुळत नसली, तरी सुजयचा मृत्यू अटळ होता, तो मिस्टर वाघने ठरवलेल्या प्रमाणेच! त्याने ठरवलेल्या वेळी, ठरवलेल्या प्रकारे!

मी मागे रेललो! माझे डोळे छतावर होते. ते छत माझ्या डोळ्यांभोवती अक्षरशः फिरत होते! की मलाच गरगरत होते...?

"बास्स? अरे अजून तर खूप बाकी आहे!" वाघ बोलला.

"आता नाही पेलवत! आता खरंच नाही पेलवत!" मी वर पाहतच बोललो.

"ठीक आहे तर; ऐक!" तो म्हणाला...

मी माझं डोकं आदळून घेतलं...

"सॉरी! तुमच्या पाहण्यावरून वाटतंय, की तुम्ही पण यांच्यावर प्रेम करता." सुजय बोलला.

"हो!" वाघने दुजोरा दिला.

"असे असेल, तर माझ्याकडून यांना इजा होणार नाही. तुम्ही त्यांच्याशी प्रेम सबंध जोडून आधीच विषय निकालात काढलाय. त्यामुळे मला काही करण्याची गरजच राहिली नाही. " सुजय हसला.

"थँक्स! शिवाय तुम्ही तिच्या सुरक्षेसाठी तिच्यावर वॉच ठेवालाच!" वाघ पण हसला.

सुजय वाघच्या या टिप्पणीवर चाचरला.

मिस्टर वाघने बरोबर ओळखलं होतं, की सुजय नक्कीच इथून पुढे रिद्धीमावर लक्ष ठेवून राहण्याची कसरत करणार होता. कारण तिच्यामुळे सुशांत व वाघ दोघे त्याच्या मांडीखाली येतील असा त्याचा विचार होणे साहजिक होते. हे दोघे डोईजड झालेच, तर रिद्धीमाचा उपयोग करून सुशांत व मिस्टर वाघ दोघांना मार्गातून काट्याप्रमाणे दूर करायला त्याला सोपे झाले असते.

"अच्छा, चला येतो!" वाघ सुजयला बोलला.

आणि त्याने पुढं होत शेकहँडसाठी हात पुढे केला व तो तोल जाऊन सुजयवर आदळला. सुजयने पडणाऱ्या वाघला सावरले.

"आह!" तो जरा विव्हळला.

"काय झालं?" स्वतःला सावरत व सुजयला पण नीट उभा राहण्यास मदत करत वाघ त्याला विचारलं.

"काही नाही. काही तरी टोचल्यासारखं झालं." सुजय बोलला.

"माझ्या हातोब्याचे बटन किंवा घड्याळाचा बेल्ट टोचला असावा. सॉरी फॉर दॅट." वाघ बोलला.

"एनिवे! थँक्स मला सावरल्याबद्दल!" वाघ स्मित करत सुजयला बोलला.

"सावरलं तर तुम्ही आम्हाला. आणि इथून पुढेही सांभाळाल याची खात्री आहे!" वाघला उगाचच आश्वासत सुजय खोट्या हसूने बोलला.

"नक्कीच. येतो!" वाघ त्याच्या गाडीत बसला आणि निघाला.

सुजय त्याच्या घराकडे वळला. त्याच्या डोक्यात वाघला संपवण्याचे काही तरी प्लॅनिंग अवश्य चालू असणार यात शंका नाही... पण तो रिद्धीमाच्या मागे इतक्यात कोणालाही धाडू शकत नव्हता व तशी त्याला गरजही पडली नाही...

मी काहीही विचारायच्या आधी मिस्टर वाघने मला टोकायची संधी न देता पुढे सांगायला सुरुवात केली होती. याने मी थोडा हिरमुसलो, पण माझ्या मनातील प्रश्नांची पुढे कधीतरी उत्तरं मिळणार हे पक्के असल्याने मी काही न बोलता ऐकू लागलो...

मिस्टर वाघ त्याची गाडी स्ट्रिट फूडची लाईन असलेल्या फुटपाथला लावून उभा होता.

एका रसवंतीगृहाच्या मालकाने एक थंडगार उसाचा रस भरलेला व त्यात मस्त मसाला टाकलेला ग्लास वाघला आणून दिला. गाडीच्या खिडकीतून वीसच्या नोटेसहित हात बाहेर काढून त्याने तो घेतला व त्याच हातातील नोट घेऊन दुकानदार आपल्या काऊंटरकडे गेला. थर्माकॉलचा डिस्पोसल ग्लास असल्याने तो परत घेण्याची तसदी मालकाला नव्हती.

वाघ पिऊ लागला. शेवटचा घोट घेत आताना त्याचा फोन वाजला. वाघ तोंड विचकून हसला. त्याला या फोनची अपेक्षा होती. म्हणूनच तो सुजयच्या घरापासून जास्त दूर गेला नव्हता.

मिस्टर वाघने फोन घेतला. पण तो काही बोलला नाही. पुढील व्यक्ती म्हणजेच सुजय बोलण्याची तो वाट पाहत होता. त्याला जास्त वाट बघावी लागली नाही. फोन उचलला गेलाय हे लक्षात येताच पलिकडून कऱ्हत सुजय ओरडला,

"तुम्ही काय केलंत मला मिस्टर वाघ?"

"काही नाही. तुम्हाला असं का वाटतंय, की मी तुम्हाला काही इजा केली आहे?" वाघ त्याला काही समजत नाही असा आव आणत बोलला,

"आणि तुमचा आवाज असा कापरा का येतोय? तब्येत बिघडी आहे का तुमची?" वाघ काळजीच्या नकली आवाजात बोलला.

"नाटकं बंद करा वाघ! तुम्ही मला जीवे मारण्याचा मनसुबा आखला असेल, तर सांगून ठेवतो, मी मरणार नाही! तुम्हाला मारल्याशिवाय तर नाहीच...!" सुजय जिवाच्या आकांताने ओरडला.

"तुम्हाला माझी खात्री कशी व कधी पटेल माहीत नाही. मी अजून काय करायला हवंय तुमचा विश्वास संपादन करायला मला कळत नाही. असो, तुमची तब्येत ठीक वाटत नाही. मी रिद्धीमाला पाठवतो तुमच्या उपचारासाठी आणि देखभालीसाठी. ती डॉक्टर आहे." वाघ बोलला.

"हो म्हणजे ती येऊन मला मारण्याची उरली सुरली कसर पण भरून काढेल! नाही? एक तर ती तुमची प्रियसी आणि वर ती त्या सुशांत नेनेची बहीण. माझ्या विरुद्ध पुरावे गोळा करायला तर तुम्ही पाठवत नाही ना तिला? की ती थेट मला संपवायचा घातच घालेल,

नाही?!" तिकडून बोलता येण्याच्या परिस्थितीत नसून देखील आवसान आणून त्यावरही उत्तेजनाने ओरडत सुजय बोलत होता.

"तिने जर तसं काही केलं, तर त्याबद्दल काय बंदोबस्त काय करायचा हे मी तुम्हाला शिकवू नये. नाही?! माझ्या मनात तसे काही नाही. मला फक्त तुमची काळजी वाटते म्हणून बोलतोय!" वाघ लटक्या आत्मियतेने बोलला.

पण असं बोलला, की ऐकणाऱ्या सुजयला ते खरं वाटावं.

"तुम्ही माझ्याबद्दलचा अवग्रह मनातून काढावा. मी पाठवतो रिद्धीमाला. ती तुमच्या सोबत काही दिवस तिथंच राहील. ती तुम्हाला कोणत्याही प्रकारे इजा करणार नाही याचा विश्वास राखा. उलट ती तुमच्या सोबत असल्याने तुमचा फायदाच आहे!" वाघ विश्वास देत सुजयला म्हणाला.

"फायदा? तो कसा?" सुजयने बळ एकवटून विचारले.

"असं होणार नाहीच! पण जर सुशांत नेने तुमच्यापर्यंत पोहोचलाच, तर तिला वेठीस धरून तुम्ही त्याला हवे तसे खेळवू शकता!" वाघ कुटील हसला!

"आणि तुम्हाला जर वाटत असेल, की मीच तुम्हाला काही केलं आहे, तर याची खात्री बाळगा, की ते तुमच्या भल्यासाठीच असेल!

"सो, जर तुम्ही दुसऱ्या कोणत्या डॉक्टरला बोलावले असेल, तर त्याला कॅन्सल करा. रिद्धीमाला पाठवतोय!" वाघने फोन कट केला.

"एक नारळ पाणी!" वाघ ओरडला!

## ७. विविंग अ वेब...

"तुम्हाला काही अक्कल?" मी ओरडलो!

माझ्या रागाला पारावर सीमा उरली नव्हती. समोर विजय वाघ आहे आणि मी त्याला उद्देशून हे बोलतोय हे तात्काळ माझ्या त्यावेळी ध्यानी देखील आलं नव्हतं.

मी; मिस्टर वाघची अक्कल काढली होती!!!

मिस्टर वाघ मात्र रागावला नाही. मी असं का बोललो हे तो जाणून होता त्यामुळे तो फक्त हसला.

त्याचं ते स्मित पाहून मी चाचरलो. माझी चूक माझ्या लक्षात आली. मी त्याच्या बुद्धीकौशल्याला हिणवलं होतं. आता माझं काही खरे नाही असं एका क्षणासाठी मनात वाटून गेलं आणि छातीत जराशी कळ आल्यासारखं झालं.

"स... सॉरी!" मी स्वतःची चूक सुधारण्यासाठी माफी मागून टाकली.

"नाही. बोल काय म्हणायचं आहे तुला?" वाघ निवांत भावनेने बोलला. चेहऱ्यावर तेच लाघवी हसू जे अजून लोपलं नव्हतं.

"माफ करा पण तुम्ही रिद्धीमाला या घोर आणि भयंकर जाळ्यात का अडकवलं? ती या दरम्यान..." मला पुढं बोलावलं नाही...

"नाही! तू समजतोस तसं काही झालं नाही! मी असताना कोणत्याही स्त्री सोबत काही वावगं मी कसं होऊ देईन? स्त्रीच तर शक्तीस्रोत आहे.

"रिद्धीमाची इन्वॉल्व्हमेंट आवश्यक असल्याशिवाय मी हे करेन का सूरज? शिवाय तू तिची क्षमता ओळखून घेतली आहेस. ती सक्षम होती कोणत्याही प्रसंगाला सामोरे जायला. दुर्धरबद्दल विसरलास तू?" वाघ स्पष्टीकरण देत म्हणाला.

वास्तविक याने मला स्पष्टीकरण द्यावे इतका मी मोठा नाही. आणि मिस्टर वाघच्या तुलनेत तर मी कुठेच नाही. पण तो मला स्पष्ट करत होता... कारण कुठेतरी तोही स्वतःला दोषी समजत असणार...

तो मला त्याचा कन्फेशन बॉक्स म्हणतो. म्हणून तो मला हे सांगतोय... जे त्याला स्वतःच्या गळी उतरवायचं आहे तेच तो मला सांगून स्वतःला कंन्व्हिन्स करू पाहतोय...!

"तरी पण... तिच्यासोबत तिथे काय होईल या काळजीने..."

"जे व्हायचं ते आधीच झालं आहे सूरज!" वाघ मला आठवण करून देत म्हणाला.

बरोबर आहे... ही केस निपटवल्याशिवाय मिस्टर वाघ मला ती का सांगत असता...?

पण... पण मघाशी तो बोलताना म्हणाला, की 'रिद्धीमा कसल्याही प्रसंगाला सामोरे जायला सक्षम होती...'

'होती...!' म्हणजे... म्हणजे आत्ता ती नाही...?

मला हा धक्का होता. मोठा धक्का! एक मुलगी... एक स्त्री... जिने न जाणो किती मुलींचे प्राण व अब्रू आपल्या महान व धीरोदात्त त्यागाने वाचवले, तिचा अंत झाला आहे...? की आणखी काही...?

पण मिस्टर वाघ आत्ता माझ्या मनातील प्रश्नांची उत्तरे देणार नाही हे मी जाणले. पण ती मिळणार हे देखील नक्की होते त्याशिवाय मिस्टर वाघचे कन्फेशन पूर्ण कसे होणार...?

मिस्टर वाघ शांत बसला होता. माझ्या मनातील प्रश्नरुपी गांजिण्या शांत होऊन त्यांचा मोहोळ स्थिर होण्याची तो वाट पाहत असावा. पण तो देखील आत्यंतिक गंभीर होता...

"प्... पुढे काय झालं...?" मी हिंमत एकवटून विचारलं.

मिस्टर वाघसाठी मला त्याच्या अपराधबोध भावनेत सामील होणे क्रमप्राप्त होते...

"रिद्धीमा, आत्ताच मी मेसेज केलेल्या त्या पत्त्यावर पोहोचा. अर्जंट आहे. सुजय शहा म्हणून एक पेशंट आहेत, त्यांचे ब्लड प्रेशन लोव्ह झालं आहे. स्ट्रोक्स किंवा हार्ट प्रॉब्लेम देखील संभवू शकतो. तर प्लिज घाई करा! तुम्हाला कदाचित तेथे रहावे लागेल. तुमच्या भावाला मी समजावेन. तुमचं सामान घ्यायची गडबड करू नका. सध्या तुमचं ट्रीटमेंट किट सोबत घेतलंत तरी पुरे. नंतर आपले समान आपल्यापर्यंत पोहोचवले जाईल!" मिस्टर वाघ बोलला.

आणि रिद्धीमाच्या उत्तराची वाट न पाहता त्याने कॉल कट केला. मघाशी जी अगतिगता व गडबड त्याच्या आवाजात होती, ती क्षणात कुठच्या कुठे नाहीशी झाली आणि मिस्टर वाघ मस्तपैकी शहाळ्याचा आनंद घेण्यात गर्क झाला...

"आणि तिने तुमच्यावर विश्वास ठेवला?" मी शंकीत नजरेनं विचारलं.

"का ठेवणार नाही?" त्याने माझी खिल्ली उडवणारी माझ्या सारखीच शंकीत नजर बनवून मलाच उलट प्रश्न केला.

"नाही म्हणजे त्या आपल्याविषयी चांगल्या मताच्या नव्हत्या म्हणून..." मी वाक्य पूर्ण केलं नाही.

"पण मी तिला तिचं आयुष्य सुखकर करण्याचं आश्वासन तिला दिलं होतं. म्हणूनच तर ती माझ्याबाबतीत जरा निवळली

होती हे तुझ्या लक्षात यायला हवं होतं. शिवाय एक पेशंट आहे म्हंटल्यावर व त्याची अवस्था क्रिटिकल आहे म्हंटल्यावर तिने कितीही माझा दु:स्वास केला, तरी तिचा वैद्यकीय धर्म तिला निभवावा लागणारच होता. नाही का?!

"आणि जरी तिचा माझ्यावर राग पूर्ववत कायम असता, तरी मी तिच्याशी असं खोटं बोलणार नाही हे ती समजून असणार, कारण तिला वैयक्तिक मी माणूस म्हणून आवडला नसलो, तरी तिच्या भावाचा माझ्यावर विश्वास आहे हे तिने पाहिलं होतं. आणि त्यामुळे मी तिच्या पसंतीच्या कॅटेगरीत बसत नसलो, तरी मी अविश्वासपात्र आहे असे नाही हे तिने लक्षात घेतलेच असते. त्यामुळे तिने माझ्या सांगण्यावरून सुजयकडे न जाण्याची शंका मोडीत निघते." वाघने स्मित केले.

याला बरोबर समजलं होतं, की मला नेमकं काय विचारायचं आहे. त्याचं त्यानं मला पटेल असं निरसन केलं.

"पण माझ्या मघासच्या प्रश्नाचं उत्तर द्याल?" मी जरा कचरतच विचारलं.

"कोणत्या?"

"की रिद्धीमाला त्या क्रूरकर्म्या सुजय शहाकडे का पाठवलंत?" मी विचारलं.

"तिच्या रक्षणासाठी!" कोणतेही इतर आढेवेढे न घेता तो एका दमात बोलला.

पण त्याच्या या उत्तराने मी चक्रावलो! सुजय शहा सारख्या माणसाकडे रिद्धीमाचं काय रक्षण होणार होतं? आणि कसं? तोच उलट तिच्या जीवावर उठला असता!!! तिला त्याच्याकडे पाठवणं म्हणजे एका पापहीन सशाला हिंस्र वाघाच्या गुहेत धाडण्यासारखं झालं. आणि हा म्हणतो, की त्या सशाचं या वाघाकडेच संरक्षण होणार आहे...

मी नक्की कोकमच आणलं होतं ना? का त्या कोकमची एक्सपायरी डेट जवळ आली होती, की ज्याने त्यात काही बिघाड झाला आहे?

असला तर असला, पण तो तर हे आत्ता पित आहे आणि याने ही गडबड आधीच करून ठेवली आहे... त्यामुळे कोकमचा त्याच्या बोलण्यात काही प्रभाव असण्याचं कारण नाही...

"काय? ते कसं?" मी किंचाळलो!

"दुर्धरपासून तिची सुटका झाली म्हणजे तिचं रक्षणच झालं नाही का?" तो भुवई उडवून स्मित करत बोलला.

आत्ता माझ्या डोक्यात जरा प्रकाश पडला. पण तो प्रकाश पुन्हा लगेचच एका प्रश्नाच्या अंधःकाराने झाकोळला गेला...

"पण ती सुजयकडे अडकलीच ना पण?" मी विचारलो.

"तुझे प्रश्न काही संपत नाहीत! तू गप्प ऐकून का घेत नाहीस?" वाघ मला वैतागून म्हणाला.

"नंतर वाचक मला विचारतात हे असं कसं? म्हणून मी आधीच आपल्याला विचारून ते बांधणीत घालतो! तुम्ही वाचत नाही का?" मी त्याला बोललो.

"आपल्या कर्माचा पाढा स्वतःच कोणी कधी वाचतो का सूरज?" त्याने विचारलं.

म्हणजे याने आजपर्यंत मी याच्यावर लिहिलेलं काहीच वाचलं नाही हे स्पष्ट झालं. असो माझा जीव भांड्यात पडला. नाहीतर त्याच्या माघारी मी त्याच्याबद्दल काय काय लिहितो हे त्याला कळालं, तर पहिल्या घटनेनंतर पुढील कुठलीही घटना सांगायला मी आत्तापर्यंत राहिलोच नसतो... असो...

"पण तुम्हाला चिंता नाही वाटली असं करताना?" मी कळवलो.

"नाही. कारण जरी रिद्धीमाला काही करण्याची सुजयची इच्छा असलीच असती, तरी तो तिला इंस्टंट्ली काही न करता तिचा बेट म्हणून उपयोग करणार हे मला माहित होतं."

"ते कसं?" मी भोळेपणाने विचारलं.

"इतक्यात विसरलास? अरे मीच नाही का त्याला आयडिया दिली, जेव्हा त्याने विव्हळत धमकी द्यायला मला फोन केला होता.

साला! मरायला टेकला होता, पण अहंकार काही मेला नव्हता साल्याचा! त्यातनं पण मला धमकी देत होतं!" वाघ हसत बोलला आणि शेवटचं वाक्य उच्चारता त्याने रागाने दात खाल्ले.

तो रागातच जरा पुढे झुकला. मला वाटलं आता हा मलाच काही करतोय की काय... पण नाही, त्याचा हा राग सुजयबद्दलच होता हे समजून मी सावरलो.

"मग त्याने नक्की काय तरतूद केली होती हे तुम्हाला समजलं नंतर?" मी विचारलं.

"हो. जर ती काही तरी सस्पिशियस वागली असती, तर ती मेली असती. पण जोपर्यंत ती काही संशयी वागत नाही किंवा तिने सुजयला इजा करण्याची शक्यता नाही तोपर्यंत सेफ होती. तोपर्यंत तो तिला माझ्या व सुशांत विरुद्ध वापरू शकला असता!"

"आणि हीच तुम्ही त्याला दिलेली अप्रत्यक्ष आयडिया!" मी डोळे बारीक केले.

"हो!" वाघ हसला.

"आणि हाच रिद्धीमाला सुरक्षित ठेवण्याचा तुमचा प्लॅन!" मी जड अंतःकरणाने म्हणालो. माझं डोकं तापलं होतं.

"अरे हो रे हो!" वाघ चेष्टेत बोलला.

म्हणजे अशा प्रकारे त्याने रिद्धीमाला दुर्धर व सुजय या दोघांपासून सुरक्षित ठेवलं तर...!

मी एक दीर्घ श्वास सोडला. हे मला झेपण्यासारखं नव्हतं. पण पर्यायही नव्हता. याला अनेकदा नाही, नको म्हणून झालं होतं. याने माझी प्रत्येक याचना उधळून लावला होती... त्यामुळे काही न बोलता जो प्रवास याच्यासोबत चालू केला तो संपवणे एवढंच माझ्या हातात होतं...

"रिद्धीमा स्वच्छ नितळ होती. मी तिला चुकूनही सुजयच्या जीवाशी खेळण्यास सुचवलं नाही. मी सुचवलं असतं, तरी तिनं ते केलं नसतं. तिच्या वर्क इथिक्स आणि स्वभावतही ते बसणारं नव्हतं. म्हणूनच ती इमाने इतबारे आपलं कर्तव्य पार पाडणार होती. आणि तिनं तेच केलंही. म्हणूनच माझं काम होईपर्यंत ती सुजय कडूनही सेफ राहिली. दुर्धर पासून आणि सुजय पासूनही!" वाघने सर्व चित्र आणि माझ्या मनातली तूर्तास जन्मलेलं मळभ दूर केलं.

म्हणजे रिद्धीमा सुरक्षित होती... नव्हे... आहे...!

मी रिलॅक्स झालो! एक अस्फुट हास्य माझ्या चेहऱ्यावर उमटलं. रिद्धीमाबद्दल वाटणारी माझी काळजी आता मिटली होती...

ती सुरक्षित आहे! सुरक्षित आहे ती!!!

माझ्या चेहऱ्यावरचे भाव पाहून वाघ देखील हसला!!!

मिस्टर वाघ सुशांतच्या घरी आला. त्याने स्वतः रिद्धीमाचा बॅग भरली आणि तो बाहेर पडला.

आपल्या बापाचं घर असल्यासारखा किंवा रिद्धीमा त्याची पत्नी असल्यासारखा आपल्या सासुरवाडीत असल्यासारखा वाघला त्या घरात वावरताना पाहून दुर्धरचा चांगलाच जळफळाट झाला होता. पण तो तूर्त तरी वाघला काही करू शकत नव्हता. त्याने काही केले असते, तर त्याचा कव्हर ब्रेक झाला असता आणि मग तो सरळ जेलमध्ये नाहीतरी यमसदनी. हे ओळखून तो गप्प बसला. पण तो गप्प बसणाऱ्यातला नक्कीच नव्हता!

जाता जाता मिस्टर वाघने दुर्धरला अजूनच खिजवण्यासाठी त्याच्याकडे पाहून स्मित केलं. दुर्धर मात्र डोळयांतून आग ओकत त्याच्याकडे पाहत राहिला.

"काय? तुम्ही एका मुलीच्या बिलॉन्गिंग्स् ना हात कसे लावू शकता? त्यांच्या घरी कोणी काम करणारी स्त्री नव्हती?" मी तडकलो.

"होती ना. पॅकिंग करत असताना भांबावल्यासारखी ती माझ्या मागेच घुटमळत होती. पण काय आहे ना सूरज, मनात दुर्भावना नसली, तर समस्या काय आहे?" तो मला हसून म्हणाला.

"तरी पण... माझी तर अशी हिंमत होणार नाही." मी कचवचत बोललो.

"कारण तू इन्ट्रोव्हर्ट आहात." वाघ बोलला.

"का तुम्ही नाही आहात? तुम्हीही इन्ट्रोव्हर्ट आहात म्हणून तर असे एकटे राहता, मग तरी तुम्ही असे कसे वागू शकता?" माझा विचलित प्रश्न.

"समाजासाठी काही गोष्टी कराव्या लागतात." तो म्हणाला.

आता एका स्त्रीच्या अतिखाजगी गोष्टींना हात घालण्यात समाजाचं कसं व काय भलं आहे ते काही मला कळेना... मी मूर्खासारखा त्याच्याकडे पाहत राहिलो. माझ्या सुमुखावरील ते मख्ख वेडगळ भाव पाहून त्याला समजलं, की मला काही समजलं नाही. तो पुन्हा ठेवणीतलं हसला. म्हणाला,

"मी तुला स्पष्ट केलं आहे मला तसं का वागावं लागलं. स्त्रियांच्या विषयी माझ्या मनातील आदर, सन्मान तसूभरही कमी झालेला नाही. मी कोणत्याही वाईट भावनेने तसे केले नाही हे जाणून रहा.

"मी तुझा संकोच समजतो. पण मी तसं केलं नसतं, तर दुर्धर चिडवला व त्यामुळे डिवचला गेला नसता ना!" तो आता कुटील हसला. त्याने माझी शंका दूर करण्यासाठी अजून स्पष्टीकरण दिलं होतं.

असं होतं तर...

मिस्टर वाघची गाडी सुजयच्या घराबाहेर लागली. त्याने रिद्धीमाला फोन करून बोलावून घेतलं.

काहीवेळात रिद्धीमा आली. वाघने तिला गाडीत बसण्यास सांगितले. ती त्याच्या शेजारी बसली.

"थँक्स!" वाघ तिला म्हणाला.

"कशाबद्दल?" रिद्धीमाने विचारलं.

"बोलावल्यावर आलात म्हणून." वाघ हसला,

"कशी आहे तब्येत?" वाघने विचारलं.

"ठीक आहे. आयव्ही दिलीय. रिकव्हर होतायत." तिने उत्तर दिलं.

"आणि तुम्ही?" वाघने हसत विचारलं.

ती त्या प्रश्नवर गप्प राहिली. पण सुजय संबंधी बोलली,

"ते खूप घाबरले होते. मृत्यूची भीती वाटली असावी त्यांना. पण लवकर बरे होतील." ती माहिती देत म्हणाली.

"ओके!" वाघ बोलला.

दुसऱ्यांना नृशंसतेनं मारणारा स्वतःच्या मृत्यूची कल्पना करून घाबरला होता हे पाहून वाघ नक्कीच मोठ्यांदा अट्टहास करत हसला असता, पण रिद्धीमा सोबत असल्याने त्याने तो विक्षिप्तपणा टाळला होता. बाकी त्याच्यासाठी हे गंमतीदार होतं हे त्याच्या मुखमंडलावर स्पष्ट होतं.

त्याच्या त्या भावमुद्रेमुळे तिने वाघकडे एक कटाक्ष टाकला. तिनं अनपेक्षित असं काही विचारलं...

"सुजय शहा यांना तुम्ही काय केलंत?"

"काय? मी का काही करू?" वाघ भोळा साळसूद चेहरा करून विचारत होता. त्याला नक्की माहीत होतं ती काय बोलत होती ते.

"त्यांचं तसं म्हणणं आहे. म्हणून." ती वाघला अविश्वासनं एवढंच बोलली.

"ते तसं स्पष्ट बोलले तुम्हाला?" वाघने प्रश्न केला.

"अगदी स्पष्ट नाही. पण त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीवरून मला जाणवलं.

वाघ फक्त हसला.

"तुम्ही डॉक्टरकी करा मिस रिद्धीमा. ही डिटेक्टिव्हगिरी माझ्यावर सोडा." तो तिला म्हणाला.

"बरं. तुम्ही सुजय शहा यांना सांगितलंत, की आपण रिलेशनमध्ये आहोत?" ती जरा रागात बोलली.

"ते यासाठी की त्यांनी तुमची योग्य बडदास्त ठेवावी. माझ्या मनात काही नाही!" वाघ तिच्याकडे न बघता आपली भूमिका स्पष्ट करत म्हणाला.

"का ते वाईट आहेत?" रिद्धीमाचा त्याला प्रश्न.

"वाईट नाही. पण जरा रागीट आहेत. रागाच्या भरात तुम्हाला ते काही बोलू नयेत म्हणून तसं सांगितलं. माफ करा!" वाघ बोलला.

"इट्स ओके!" ती समजुतीने बोलली.

"पण तुम्ही नाहीच म्हणाला असाल?" वाघने तिच्याकडे हसून पाहिलं.

"हो." ती उतरली.

"पुढे जर काही विषय काढला, तर कृपया हो म्हणा. हे श्रीमंत लोक विक्षिप्त असतात. त्यांनी तुम्हाला काही वाईट वागणूक देऊ नये एवढ्याच भावनेने मी त्यांना तसे सांगितले होते." वाघ म्हणाला.

ती गप्प बसली. सो, वाघने तिची संमती गृहीत धरली.

"थँक्स!" वाघने पुन्हा आभार मानले.

"एक्च्युअली मी तुम्हाला थँक्स म्हणायला हवं आहे." ती संकोचत खाली पाहत बोलली,

"मी आपल्याशी इतकं तुसडेपणाने वागून तुम्ही मला इतकी मदत केलीत." ती त्याला आभाराच्या सौम्य सुरात म्हणाली.

"मी काय केलंय? की तुम्ही माझे आभार मानत आहात?" मिस्टर वाघ काही समजलं नाही असं दाखवत म्हणाला.

"तुम्ही दादाला सांगितलंत, की मी इथं थांबतीए?" वाघ त्यावर बोलणे टाळतोय हे पाहून तिनेही मग विषय बदलला.

आपण एखाद्याला केलेली मदत लक्षात ठेवू नये हे मानणारा मिस्टर वाघ म्हणूनच तो विषय टाळून रिद्धीमाच्या आभाराला अस्वीकृत करत होता.

"नाही पण सांगेन. आधीच कल्पना दिली असती, तर ते कदाचित नाही म्हणाले असते. आणि मग खरं कारण त्यांना सांगावं लागलं असतं. म्हणून कल्पना दिली नाही. आता सांगेन." वाघ बोलला.

"तो तुमच्यावर चिडेल." रिद्धीमा सचिंत बोलली.

"आतापर्यंत खूपदा चिडलेत, पण त्याचा काही उपयोग झालाय का?" वाघने तिची चिंता निवळावी म्हणून कोडगेपणाने विनोद केला व स्वतःच हसला.

"तुम्ही तिला सावध का केलं नाही, की सुजयपाशी देखील तिचा जीव धोक्यात आहे?" मी विचारलं.

"केलं असतं, तर ती काँशियस झाली असती आणि तिच्या डोक्यात तेच घुमत राहिलं असतं. आणि ती मग काहीतरी चूक करून बसली असती. आणि मग तिच्या चुकीची किंमत तिला तिचा जीव देऊन चुकवावी लागली असती म्हणून मग नाही सांगितलं." त्याने निरसन केलं.

हा प्रत्येक गोष्टीचा, तो करू पाहणाऱ्या हरेक कृतीचा किती बारीक विचार करतो याचं नेहमीच मला आश्चर्य व कौतुक दोन्ही वाटत आलं आहे. मी याला दिलेलं 'विजय वाघ' हे नांव तो कायम सार्थ ठरवतो.

"आता, तुम्ही सुजयला टोचलं काय होतं तेही सांगून टाका!" मी त्याला म्हणालो.

"तुझ्या लक्षात आलंय तर!" तो कुटील हसला.

"तुम्हीच म्हणता माझ्या इतका तुम्हाला कोणी ओळखत नाही म्हणून." मी बेरकी नजरेने पाहत वाघला बोललो.

माझ्या या गेश्चरने वाघ मोठ्यांदा हसला.

"नायट्रोग्लिसरीन! नायट्रोग्लिसरीन मी त्याच्या वेनमध्ये इंजेक्ट केलं होतं." वाघ हसू आवरतं घेऊन बोलला.

"म्हणजे त्या मेडिकेशनमुळे सुजय आजारी पडला?" मी उडालो.

"हो." तो नेहमीच्या सहजतेने म्हणाला.

"कसं?" मी विचारलं.

"नायट्रोग्लिसरीनमुळं त्याचं ब्लडप्रेशर डिक्रीज झालं. हाय ब्लडप्रेशन असणाऱ्यांना हे कन्सिडर केलं जातं." वाघ उत्तर देत बोलला.

"त्याला हाय ब्लडप्रेशरचा त्रास होता?"

"नाही."

"मग?"

"लो ब्लडप्रेशरचा!" मिस्टर वाघ कपटी हसला.

हा माणूस आहे का सैतान???

"आणि तो तुमच्या इंजेक्शननेच मेला असता, तर थेट संशय तुमच्यावर आला असता." मी आरोप करत म्हणालो.

"कसं? त्याला लो ब्लडप्रेशनचा त्रास आहे हे त्याच्या निकटवर्तीयांना माहीत असणार त्यामुळे त्याच्या या नैसर्गिक दिसणाऱ्या मृत्यूसाठी पोलिसांत मुळात कोणी गेलं नसतं. तो हार्टफेल होऊन किंवा स्ट्रोकने मेलाय हेच सगळ्यांनी गृहीत धरलं असतं. आणि इन्वेस्टीगेशन झालंच असतं, तरी मीच त्याला

इंजेक्शन दिलं आहे हे सांगणारा सुजय शहा तर लुढकला होता ना!" वाघ कपटी हसला.

"रिद्धीमाला तुम्ही तिथं पाठवलं होतं. तिच्याकडून घरातील लोकांनी, नोकरांनी चेक केलं असतं तर? किंवा स्वतः रिद्धीमानेच पुढं होऊन सुजयला खरंच तो मेलाय का हे पाहिलं असतं तर?"

"मग काय? तिला तो मेलेलाच आढळला असता. आणि तेच तिने डिक्लेअर केलं असतं. खरं कारण शोधण्यासाठी तिनं काही तिथं त्याचं डिसेक्शन चालू केलं नसतं. मी तिला कल्पना दिली होती, स्ट्रोक किंवा हार्टफेलची शक्यता संभवते. यापैकी काही होऊनच तो मेला असता, पण जर माझ्याकडून डोस जास्त झाला असता तर!" वाघने क्लिअर केलं.

कळलं?! म्हणून मी याला 'गॉड ऑफ डेथ' किंवा 'सैतान' म्हणतो. म्हणजे जे नायट्रोग्लिसरीन हाय ब्लड प्रेशर लोव्ह करण्यासाठी उपयोजित होतं व स्ट्रोक व हार्ट फेल्युअरवर औषध म्हणून काम करतं, तर त्याचाच उपयोग करून या महाभागाने सुजयचं ब्लड प्रेशर आणखी लोव्ह करून सुजयला स्ट्रोक वा त्याचं हार्टफेल होण्याची सोय केली होती... दानव कुठला!

"आता सीसीटीव्हीचं विचारू नको. कारण ते रेकोर्ड्स मी कधीही इरेज करू शकत होतो!" वाघ मला म्हणत जोराने हसला.

याला सगळं माझ्या मनातलं कसं अगदी तंतोतंत कळतं...! माझ्या चेहऱ्यावर हसू खेळलं.

तो पुढे म्हणाला,

"शिवाय, त्याला मी प्रमाणातच डोस दिला होता. रिद्धीमा त्याच्या घरी पोहोचून त्याचा उपचार चालू करेपर्यंत तेवढा पुरेसा होता. तो मरणार नक्कीच नव्हता. त्याला आत्ताच मारणं माझ्या प्लॅनसाठी बाधक होतं. मग मी त्याला का मारू? मी त्याला कसा मरू देऊ शकणार होतो?" वाघ मला प्रश्न करत होता.

मला हे मुळात आधीच समजायला हवं होतं... पण त्याच्याविषयी वाटत असलेल्या काळजीपोटी मी त्याला तो प्रश्न केला होता. आणि त्याला ही ते समजलं होतं. त्यामुळे तो मोठ्या आत्मविलासाने माझ्याकडे पाहत होता, की कोणीतरी आहे त्याची चिंता करणारा...

"मघासच्या प्रश्नाचं उत्तर द्याल?" रिद्धीमाने वाघला प्रश्न केला.

"कोणत्या?" कोणत्या ते माहीत असून वाघ उगाच बोलला.

"तुम्ही सुजय यांना खरंच काही केलंत का?" रिद्धीमा शंकीत भावाने विचारत होती.

"असं तुम्हाला का वाटतं?" वाघने स्मित चेहऱ्यावर घेऊन विचारलं.

"नाही. तसं नाही. मी केस हिस्ट्री समजून घेण्यासाठी त्यांना काही प्रश्न केले, तर त्यांनी सांगितलं, की तुम्ही त्यांना भेटून गेल्यावर त्यांना त्रास चालू झाला. तुम्ही पडताना त्यांनी तुम्हाला सावरलं तेव्हा त्यांच्या दंडात काही तरी घुसलं."

"त्याच्याशी तुम्हाला काही करायचं नाही." वाघ मोहक हास्य मुखमंडलावर उजळवत बोलला.

"जीएनटी!" ती पुढे पाहत उद्गारली.

मिस्टर वाघची भुवई उंचावली.

"ग्लिसरील ट्रीनीट्रेट! नायट्रोग्लिसरीन आढळलं आहे त्यांच्या रक्तात." तिने वाघकडे संशयी नजर फेकली.

"तुम्ही सुजयची ब्लड टेस्ट केली?" वाघने रिद्धीमाला विचारलं.

"हो. माझ्या पेशंटच्या स्वाथ्याची चिंता मीच केली पाहिजे, नाही?" रिद्धीमा रुक्ष बोलली.

"पण ही चिंता करण्याच्या नादात तुम्ही खूप वाहवत जाता. नाही?" वाघ ओठ एका दिशेला लांबवत तिला म्हणाला. त्याच बाजूची त्याची भुवई देखील वर गेली होती. त्याचे चमकणारे पाणीदार दिले रिद्धीमाला निहाळत होते.

वाघला काय म्हणायचंय ते कदाचित तिला समजलं असेल. तो दुर्धर बद्दल बोलतोय हे तिच्या लक्षात नक्की आलं असेल. ती होतीच तेवढी हुशार. मिस्टर वाघने तिचं जे व्यक्तिमत्त्व उभं केलंय त्यावरून तरी ती अपार बुद्धिमतेची धनी असल्याचंच समोर येतंय. बुद्धी सोबत अमित करुणा रिद्धीमाच्या मनात भरली होती आणि म्हणूनच ती सगळं सामावून घेत होती एका तटस्थ समुद्रासारखी...!

रिद्धीमाने मात्र वाघचा रोख लक्षात येऊनही तो विषय टाळला.

"मी त्यांना हे सांगितले नाही आहे." रिद्धीमा म्हणाली.

"थँक्स फॉर सेव्हिंग मी!" वाघ तिला म्हणाला.

"पण तुम्ही हे का केलंत?" तिने प्रश्न केला.

"त्यासाठीच, त्यासाठी तुम्ही मला थँक्यू म्हणालात!" वाघ मनमोकळा स्मित करत म्हणाला.

"माझ्यासाठी तुम्ही यांच्या जीवाशी खेळलात?" तिने आणखी एक प्रश्न केला.

"तुमच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. मी न देता मिळतील. सध्या जे होतंय ते होऊ द्या!" वाघ तिला सांत्वना देत म्हणाला.

"या आता." तो तिला म्हणाला,

"तुमचं सामान मागे आहे!" असं सांगून त्याने बटन दाबून डिक्की उघडली.

"पुन्हा एकदा थँक्स!" ती गाडीचा दरवाजा उघडत म्हणाली.

"तुम्हाला धन्यवाद द्यायचेच असतील, तर मी ते स्वीकारीन. पण तोपर्यंत ते तुमच्याकडेच सांभाळून ठेवा. त्याची अजून वेळ आली नाही." वाघ पुन्हा गोड हसला.

रिद्धीमा गंभीरच होती. तिने फक्त मान डोलावली. ती उतरली आपले समान मागील डिक्कीतून घेऊन ती सुजयच्या घराकडे चालू लागली...

वाघने पण गाडी वळवली. आणि त्याला दुर्धर दिसला!

तो जरा दूर आडोशाला उभा राहून रिद्धीमाला मिस्टर वाघच्या गाडीत बसून व नंतर बऱ्याच वेळाने उतरून जाताना पाहत होता. यामुळे त्याच्या रागाला पारावार सीमा राहिली नव्हती...

मिस्टर वाघने गाडी दुर्धर समोर थांबवली. दुर्धर जळत्या नजरेने मिस्टर वाघला पाहत होता. मिस्टर वाघ त्याच्या या पाहण्याला नुसता हसला आणि त्याने दार उघडले.

चिडलेला दुर्धर मग मिस्टर वाघच्या शेजारी बसला. गाडी धावू लागली...

"त्याने तुम्हाला काही..." मी अडखळलो.

"केलं असतं, तर मी तुझ्या समोर असतो का?" मिस्टर वाघ सहज बोलला.

"तेही खरंच!" माझ्या तोंडून गेलं आणि लक्षात येऊन मी लगेच जीभ चावली.

वाघ हसला.

"सॉरी!"

"हरकत नाही. बरोबरच आहे!"

"मग तो काय बोलला?"

"तो बोलत असून बोलू कुठे शकत होता? त्याला सोंग जे करायचं होतं. म्हणून मग मीच बोललो..." वाघ पुढे सांगू लागला...

"तू इथं कसा?" वाघने ड्राइव्ह करत दुर्धरला प्रश्न केला.

दुर्धर फक्त बसून होता. त्याने जळती नजर मान वळवून पुन्हा मिस्टर वाघवर टाकली.

"अरे हो तुला बोलता येत नाही, नाही का?" वाघ म्हणाला,

"भाषा वगैरे काही कळत नाही... मी बोललेलं पण तुला कळणार नाही... मिच्च! देव पण कसा काही जणांवर अन्याय करतो..." वाघ खोटं हळहळला.

मग त्याने समोरील स्क्रिनवरून कॉल लावला. तो उचलला जाताच...

"हा हॅलो! वाघ बोलतोय. माझ्या ओळखीत एक इमर्जन्सी केस होती. म्हणून तुमची परवानगी न घेता मी रिद्धीमा यांना त्यांच्या देखभालीसाठी त्यांच्या सोबत ठेवलं आहे."

"मी काही बोलत नाही म्हणून तुमची मनमानी चाललीये मिस्टर वाघ! रिद्धीमाची..." सुशांत चिडून तिकडून बोलत होता, पण मिस्टर वाघने त्याला मध्येच टोकलं,

"तुम्हाला ज्या काही शिव्या घालायच्या आहेत, त्या भेटून घाला. म्हणजे मलाही माझं म्हणणं मांडता येईल! दोन तासांत तुमच्या घरी भेटू. काम आटोपून या!" असं बोलून मिस्टर वाघने फोन नेव्हीगेशन स्क्रिनवरून कट केला.

सुशांत असं काही बोलू नये जे दुर्धरला कळू न देण्यासारखं असेल, म्हणून मिस्टर वाघने सुशांतचा असा दु:स्वास केला होता. पण रिद्धीमा सुजयकडे आहे, ही माहिती दुर्धरला तर पोहोचवायची होती म्हणूनच त्याने सुशांतला फोन केला होता.

आणि जी माहिती त्याला दुर्धरला द्यायची होती ती त्याने सुशांतच्या माध्यमातून दुर्धरपर्यंत पोहोचवली होती.

मिस्टर वाघ्स् अनादर मूव्ह टूवर्ड्स दि लास्ट फेज् ऑफ हिस हिनीयस प्लॅनिंग...

पण मिस्टर वाघच्या अशा वागण्याने सुशांतने नक्कीच त्याच्या केबिन मधला फोन रिसिव्हर डायल पॅडवर पटला असणार!

मिस्टर वाघला दुसऱ्यांना सतवायला का मजा येते तेच कळत नाही... असुरी आनंद घेतो हा लोकांना झालेल्या त्रासाचा. बरं मान्य, की त्याने हे दुर्धरसाठी केले, पण त्यामुळे सुशांत चिंतेत पडला आणि रिद्धीमा; तर संकटात...!

## ८. एन अब्डीट्री...

मिस्टर वाघने गाडी मध्येच थांबवली. रसाळ फळांचा एक गाडा त्याला दिसला होता. समोर पाहत असलेल्या दुर्धरचं डोकं मिस्टर वाघने थोपटलं. दुर्धरने भानावर येत वाघकडे रागानं पाहिलं. मिस्टर वाघने त्याच्या समोर नोट केली आणि त्याला खाली उतरून सफरचंद घेण्याची खूण केली.

"अर्धा किलो सफरचंद!" तो वाकून फळ विक्रेत्याला ओरडला.

त्याने दुर्धरला उतरण्यासाठी परत मानेने व डोळ्यांनी खूण केली. दुर्धर पैसे घेऊन रागातच मिस्टर वाघकडे पाहत खाली उतरला. मनात नसलं, तरी त्याचं सोंग उलगडू नये म्हणून त्याला मिस्टर वाघचं सांगणं ऐकावं लागणार होतं, तसं तो करत होता.

मघाशी थोपटल्यावर वाघच्या हाती दुर्धरचे केस आले होते. वाघने त्याच्या हातात लपवलेल्या छोट्या कटरने ते कापून घेतले होते. मिस्टर वाघ या केसांचा कुठे व कसा उपयोग करून घेणार होता? ते त्यालाच माहीत. दुर्धर सफरचंद घेतोय बघून वाघने त्याचे केस एका छोट्या डिस्पोसेबल प्लस्टिक बॅगमध्ये टाकून कम्पार्टमेंटमध्ये ठेऊन दिले.

फळ विक्रेत्याने वजन करून सफरचंद पिशवीत बांधली.

अर्धा किलो अगदी २ ते ३ सफरचंदं खरेदी करून दुर्धर पुन्हा गाडीत येऊन बसला आणि गाडी रवाना झाली ते थेट सुशांत नेनेच्या निवासस्थानी...

वाघ सुशांतच्या घरी डायनिंगवर बसून होता. त्याने सफरचंदाची पिशवी समोर ठेवली होती. आणि दुर्धरला देखील समोर बसवून घेतले होते.

'कापून दे' अशी त्यांने दुर्धरला खूण केली. दुर्धर देखील रागाने पाहतच मिस्टर वाघसाठी मग पिशवीतील सफरचंद काढून कापू लागला...

एकेक फोड जशी दुर्धर डिशमध्ये ठेवत होता, तशी वाघ ती फस्त करत होता...

ऐकताना मला आश्चर्य वाटले, की हातात चाकू असताना त्याचा उपयोग सफरचंद कापण्यासाठी न करता दुर्धरने मिस्टर वाघचा गळा कापण्यासाठी का केला नाही? किंवा गाडीत देखील तो मिस्टर वाघला मारू शकला असता, पण तो गप्प नेमका का बसला?

हा! तो वाघ समोर हरलाच असता आणि आपल्या प्राणाला मुकला असता, पण ते त्याला कुठे माहीत होतं? का नाही त्याने वाघला संपवण्याचा प्रयत्न केला...??

तर त्याचे खूप विचारांती मला मिळालेले उत्तर हे, की जर दुर्धरने तसा उपाय करून पाहिला असता आणि वाघ त्याच्याकडून मेला असता, तर दुर्धर अडकला असता. सुशांतने नक्कीच त्याला आत टाकला असता आणि तो रिद्धीमाच्या सहवासाला मुकला असता.

शिवाय पूर्वी केलेल्या गुन्ह्याचे खापर उघडकीस येऊन त्याच्या मस्तकी फुटले असते ते औरच! म्हणूनच तो मिस्टर वाघ त्याच्या सोबत एकटा असून गप्प बसला असणार हे मला माझ्या समाधानासाठी माझ्या मस्तकी पृथक झालेलं उत्तर! अर्थात हे पटण्यासारखे आहे व अर्थात मी मिस्टर वाघला असा प्रश्न केलाच असता, पण पुन्हा मी त्याच्या कथनीत खंड पडाला असता म्हणून मी न काही विचारता शांत राहिलो होतो.

त्याचे पूर्ण सांगून झाल्यावर माझे मला मिळालेले उत्तर कितपत योग्य आहे हे तपासण्यासाठी मी त्याला वरील प्रश्न केला होता आणि अहो आश्चर्य, की त्याने तेच उत्तर दिलं जे मला सुचलं होतं... पण यात आश्चर्यासारखेही काही नाही. कोणालाही हे सहज लक्षात येण्यासारखंच नितळ होतं... असो...

मग मिस्टर वाघने पाण्यासाठी खूण केली. दुर्धर चरफडतच वाघसाठी पाणी आणण्यास गेला आणि इकडे वाघने दुर्धर सफरचंद कापत असलेली सूरी सफरचंदाच्याच पॉलिथिनमध्ये सरकवली व ती सील करून ब्लेझरच्या खिशात ठेवून घेतली.

मिस्टर वाघने सुशांत नेनेच्या घरची किचन मधली सूरी चोरली होती! आणि जरी ही गोष्ट दुर्धरच्या लक्षात आली असती, तरी तो ते सुशांतला सांगू शकत नव्हता. आणि सुशांतला कशी तरी सूरी हरवण्याची ही गोष्ट कळाली असतीच, तर तो दुर्धरचा किंवा जेवण करणाऱ्या मावशींच्या हलगर्जीपणा ठरला असता जो नगण्य असल्याने सुशांतने तिकडे जास्त लक्ष दिले नसतेच. म्हणून सूरीची सुशांतच्या म्हणजे एका सुपेरिंटेंडेड ऑफ पोलिसाच्या घरची ही 'सूरीची चोरी' खपून जाणारी होती...

टेबलवरील साफसफाई करण्याची काही गरजच नव्हती, कारण बिया न थूकता तो चक्क त्या गिळला होता. दुर्धरने जरी त्याला त्या काढून फक्त गर दिले असते, तरी त्याने बिया खाऊन टाकल्या असत्या हे मी शपथेवर सांगू शकतो, कारण आपण इथं काही खाल्लं आहे असा त्याला पुरावा मागे सोडायचा नसणार हे ज्या अर्थी त्याने सूरी उचलली त्याअर्थी ते उघड होतं.

तो जो काही करणार होता, ते त्याने सफल मार्गी लावले, तरी दुर्धर सत्य माहीत असून वाघ विरुद्ध साक्ष देऊ शकणार नव्हता. कारण त्याने केलेला बनाव मग उघड पडला असता. त्यामुळे वाघने तेथील त्याच्या खाण्याचे पुरावे नष्ट करणे फक्त पर्याप्त होते, जे त्याने केले.

पण तो नक्की करणार काय होता...???

मिस्टर वाघ मग दुर्धर येण्याची वाट न पाहता घराबाहेर पडला आणि सुशांतची वाट पाहत आपल्या कारमध्ये बसून राहिला.

खिशातील चाकू असलेली पॉलिथिन बॅग वाघने डॅशबोर्ड कंपार्टमेंटमध्ये टाकून दिली. पोलिसांची नजर कशी तीक्ष्ण असते हे वाघ जाणून होता, त्यात सुशांत त्याच्या बाजूला बसणार होता. वाघच्या चेस्ट पॉकेटमध्ये काहीतरी लांब अनुकुचीदार आहे हे त्याच्या नजरेतून कदाचित सुटू शकलं नसतं म्हणून वाघने ती शक्यता लक्षात घेऊन चाकू सुशांत येण्याआधी लपवला होता.

पंधरा मिनिटं ते अर्ध्या तासाच्या अंतरात सुशांत आपल्या गृही परतला. वाघची गाडी बाहेरच असल्याने व तो गाडीतच असल्याने घराचा रुख न करता तो मिस्टर वाघच्या गाडीकडे आवेशाने आला. वाघने मात्र त्याला शांतपणे स्मित करत आत बसण्याची खूण केली.

वाघ सुशांतच्या घरातही सुशांतची वाट पाहत बसून राहू शकला असता, पण सुशांत येण्याआधी आपण त्याच्या घरी प्रवेश

केला नाही हे सुशांतच्या मनावर ठसवण्यासाठी व तसे दर्शवण्यासाठी त्याने असे केले होते.

सुशांत गाडीचा दरवाजा जोरात आपटत मिस्टर वाघ शेजारी बसला.

"तुम्ही माझ्या परवानगीशिवाय माझ्या बहिणीला कोणाकडे पाठवूनच कसे शकता?" तो ओरडला.

"तुमची बहीण लहान नाही आणि त्याही उपर ती एक डॉक्टर आहे हे तुम्ही लक्षात घ्या." वाघ शांतपणे म्हणाला.

"तिची अवस्था ठीक नाही हे तुम्ही लक्षात घ्या! तिची मानसिक स्थिती काय आहे हे माहितीये ना तुम्हाला? तुम्ही स्वतः बोललायत तिच्याशी! तरी?" सुशांत ओरडला.

"त्या कामात गुंतल्या, तर त्यातून त्या मोकळ्या होतील असं मला वाटलं म्हणून. शिवाय मी इथं तुमच्या बहिणीशिवाय दुसऱ्या कोणत्याही डॉक्टरला ओळखत नाही आणि ती एक इमर्जन्सी होती!" वाघ तेवढ्याच शांततेत म्हणाला.

"मग मला सांगायचंत. मी केली असती व्यवस्था एखाद्या डॉक्टरची!" सुशांतचा आवेश ओसरला नव्हता.

"आणि मग तोपर्यंत माणूस हातचा गेला असता!" वाघ हसून म्हणाला.

"तुम्ही चेष्टा करताय?" सुशांत आणखीनच चिडला.

"नाही. पण मी क्विक एक्शन घेऊन तुमच्या बहिणीला बोलावलं नसतं, तर त्या माणसाच्या आयुष्याची चेष्टा झाली असती." वाघ हसून म्हणाला.

"ओह! तुम्ही..." सुशांतला पुढं काय बोलावे सुचेना, पण त्याचा राग निवळत होता...

वाघने मस्करीत का होईना पण पटण्यासारखा युक्तिवाद केला होता. तेही शांतपणे. जळत्या लाकडावर पाणी मारून ते विझवावे तसा मिस्टर वाघने आपल्या शांत स्वभावाने सुशांत नेनेचा क्रोधाग्नि विझवला होता.

"आणि तुम्ही काही काळजी करू नका. त्या एका सभ्य, सज्जन माणसाच्या घरी आहेत. सुजय रमाकांत शहा! आता तरी तुमची काळजी मिटली ना?" वाघने विचारलं.

"म्हणजे मिस्टर शहा आजारी आहेत?" सुशांतने विचारलं.

"तुम्ही ओळखता तर त्यांना."

"या जिल्ह्यात तरी त्यांना ओळखत नाही असा कोणी भेटणार नाही. माझंही बऱ्याच सार्वजनिक कार्यक्रमात त्यांच्याशी भेटणं झालं आहे. चांगला माणूस आहे." सुशांत बोलला.

"म्हणजे मग तुमचा माझ्या निर्णयाला विरोध नाही हे मी खात्रीशीर धरतो." वाघ हसला.

सुशांत विचारात हरवून होकारार्थी मान हलवू लागला. त्याचं डोकं शांत होत होतं. डोक्यात आता इतर विचारांसाठी जागा निर्माण होत होती... त्याने मिस्टर वाघकडे पाहिलं,

"मिस्टर वाघ!" तो उद्गारला.

"अं?" वाघने ही उद्गार काढत भुवया उंचावल्या.

"रिद्धीमा तुम्हाला एकांतात भेटली, तेव्हा तिने तुम्हाला काय सांगितले? तुम्ही अजून मला काही बोलला नाहीत..." सुशांत स्वतःला सावरत शांत होत बोलला,

"तुम्ही वेळ पाहून मला सांगाल म्हणून विचारायचं थांबलो होतो. पण तुम्ही काही बोलला नाहीत." तो म्हणाला.

"त्या कशा मितभाषी व अंतर्मुखी आहेत तुम्हाला माहीत आहे. त्या काही बोलल्या नाहीत. म्हणून मग मी देखील त्यांना शांत बसू दिलं, त्यांना हवं तितकं... त्यांना काही न विचारता. त्यांना त्यांचा वेळ दिला. म्हणूनच त्यांना माझ्याविषयी थोडा का होईना विश्वास निर्माण झाला." वाघ बोलला.

"चला. एवढं तरी पुरेसं आहे. आय गेस मलाही माझे निर्णय तिच्यावर न थोपवता तिच्याशी असंच वागायला हवं..." सुशांत विचारात बोलला.

मिस्टर वाघ सारख्या अनोळखी माणसावर विश्वास ठेवून रिद्धीमा कोणा व्यक्तीकडे गेलीच कशी असा सुशांतचा प्रश्न त्याच्या डोक्यातही उत्पन्न होण्याआधीच मिस्टर वाघने मारला होता.

मग सुशांत मिस्टर वाघकडे पाहून बोलला,

"मी तुम्हाला बोललो होतो; जर ती मला काही सांगत नाही, तर ती तुम्हाला एक अनोळखी माणसाला काही बोलेल हे शक्यच नाही."

"मी प्रयत्न केला." वाघ नितळ हसून म्हणाला.

"असो तुमच्या या प्रयत्नानेच तिला स्वतः सोबत निवांत वेळ तरी मिळाला. थँक्स!" सुशांतने कृतज्ञता व्यक्त केली.

मिस्टर वाघ मनात काही असल्यासारखा हसला.

"का काय झालं?" सुशांतने विचारलं.

"तुम्ही मला झापायला आला होतात आणि मला धन्यवाद देऊन चर्चेची सांगता करता आहात!" वाघ गोड हसत बोलला.

सुशांतच्या रागाच्या छटा मोकळया होऊन नीट होत त्यामुळे चेहऱ्यावर आलेल्या सुरकुत्यांची जागा हसण्याच्या सुरकुत्यांनी घेतली.

"तुम्ही बोलताच असे, की राग निवळतोच!" सुशांत स्मित करून बोलला.

"आह! अगेन इन्फॅच्युएशन!" वाघ सुशांतला चिडवत बोलला.

यावर सुशांत नुसताच हसला.

"बरं चला आत. चहा घेऊ." तो म्हणाला.

"नको. घाई आहे. तुमचीच वाट पाहत होतो. तुमची शंका, राग दूर करायचे होते, केले. निघतो आता." वाघ बोलला.

"ठीक!" सुशांतने संमती केली.

सुशांत उतरला.

"तसं नेमकं काम काय आहे?" त्याने खिडकीत वाकून विचारलं.

"वाट बघायची आहे." वाघ बोलला.

"कोणाची? कोणी गर्लफ्रेंड आहे?" सुशांतने वाघची मस्करी करण्यासाठी विचारले.

"नाही. सध्या तुमच्या ड्यूटीची वाट पाहतोय!" वाघ सुशांतच्या मस्करीचीच मस्करी करत बोलला आणि त्याने गाडी झरकन तेथून काढली.

सुशांत मात्र न चिडता हसून जाणाऱ्या गाडीकडे पाहत राहिला...

इथे गाडीत मात्र मिस्टर वाघचा हसरा मुखवटा दूर होऊन त्याचा खरा चेहरा उमटत होता... दाट गंभीर, उग्र, असे भाव त्याच्या सर्वांमुखी व्यापले. तो अत्यंत क्रूर भाव घेऊन गाडी चालवू लागला... तरी या संमिश्र भावांमागे त्याच्या चेहऱ्यावरची गूढता काही लपत नव्हती... तो काय करणार होता...? काय प्लॅनिंग होतं त्याचं...? जे तो सर्वांना सांगत होता ते सत्य नक्कीच नसणार. मग काय...?

# ९. कम्पेअर्स् मर्डर...

रात्रीची वेळ... मिस्टर वाघ एका झोपण्याच्या प्रशस्थ खोलीत बसून होता. पण ती खोली त्याची नव्हती.

तो एका सेटीवर बसलेला असून समोर बेडवर पडलेल्या इसमाकडे अत्यंत निर्दयी भाव चेहऱ्यावर घेऊन पहात होता.

चाकू; किचन नाईफ खोलीत जी काही मंद लाईट डोकावत होती, त्या प्रकाशात वाघच्या उजव्या हातात तळपत होता. मिस्टर वाघ स्वयंपाक घरातील सूरी आपल्या बोटांत सौम्य फिरवत असल्याने त्या सुरीची तळप खोलीत व समोर झोपलेल्या माणसावर पडत होती. पण ती इतकी प्रखर नव्हती, की तिने तो माणूस विचलित करून त्याला जाग आणावी.

मिस्टर वाघने हातात लेदरचे गल्व्ह्ज घालण्याची दक्षता घेतली होती. याचा अर्थ स्पष्ट होता. तो इथे कोणत्या अपेक्षेने, हेतूने आला होता ते उघड होते. फक्त तो आता योग्य वेळ येण्याची वाट पाहत त्या खोलीत बसून होता...

खोलीची खिडकी उघडी होती. पडदे रात्रीच्या थंड वाऱ्याने फडकत होते. रात्रीच्याच शांततेमुळे ती लयदार फडफड अगदी स्पष्ट ऐकू येत होती.

खिडकी आता बराचवेळ उघडी असल्याने आता खोलीतील गारवा वाढला होता. आणि यामुळे मिस्टर वाघला हवी असलेली ठराविक योग्य वेळ जवळ येऊन ठेपली होती...

जसजसा खोलीच्या हवेतील गाराव वाढला, तसा तो सहन न होऊन त्या बेडवर पडलेल्या व्यक्तीला जाग आली. जराही थंड सहन न होणाऱ्या त्या व्यक्तीचे नाक त्या झोंबणाऱ्या गार वाऱ्यामुळे चोंदले जात होते आणि त्या व्यक्तीला श्वास घेण्यास त्रास होत होता आणि याच अगतिकतेपोटी श्वास गुदमरल्याने त्याला जाग आली होती.

ती व्यक्ती खिडकी बंद करण्यासाठी उठली आणि जेव्हा झोपेची माया थोडं हलकी उतरली, तेव्हा त्या व्यक्तीला लक्षात आलं, की आपल्या समोर कोणी बसले आहे...

"हॅलो मिस्टर सुजय!" आवाज घुमला.

"मिस्टर वाघ?!" सुजयला वाघचा आवाज ओळखायला वेळ लागला नाही. तो आश्चर्याने ओरडला,

"तुम्ही इथं?" त्याने विस्मयतेनं विचारलं.

"हो!" वाघ उद्गारला.

"आत कसे आलात?" सुजयचे आश्चर्य!

"जिथून थंडशार वारा आत येत आहे!" वाघ बोलला.

"आत्ता यावेळेला काय करताय तुम्ही माझ्या खोलीत?" सुजयचा निरर्थक प्रश्न.

वाघ त्याला याचे उत्तर शब्दांतून नाही; तर कृतीतून देणार होता...!

ते कसं...?

तो उठला. त्याने दिवे लावले. मिस्टर वाघच्या चेहऱ्यावरील ते क्रूर भाव पाहून सुजय शहा काय समजायचं ते समजला. आणि त्याने जवळच असलेली त्याची 'चिअप्पा रायनो ट्वेन्टी डीएस' इटालियन मेड रिव्हॉल्व्हर घेतली. ती त्याने मिस्टर वाघवर पॉईंट केली...

***'क्लिक!'***

ब्लॅन्क!

मिस्टर वाघच्या ओठांवरील हसू अधिकच रुंद झालं.

मिस्टर वाघने काही तरी लबाडी केली आहे हे सुजयला न समजण्याइतका तो मूर्ख नव्हता. पण बुडणारा व्यक्ती जसा आपण चक्रीवादळात सापडलो आहे आणि आता वाचण्याची अगदीच शक्यता नाही हे जाणूनही हातपाय हलवण्याची निर्थक चेष्टा करतोच, त्याचप्रमाणे सुजय देखील हडबडीत ट्रिगर दाबत गेला. हॅमरची प्रत्येक हिट ब्लॅन्क गेली. षटकोनी सिलेंडर फक्त जोराने

फिरत होते. पाच राऊंड्स फिरले. एकातूनही बुलेट बाहेर आली नाही.

मिस्टर वाघ अधिकच रुंद हसला. त्याने जर्कीनच्या खिशात हात घातला. सहा 'पॉईंट थर्टीएट स्पेशल' राउंड्स त्याने खिशातून बाहेर काढले. सुजयला दिसतील असे हात थोडा खाली करून त्याने समोर धरले. सुजयच्या दृष्टीक्षेपात त्या नीट आल्या आहेत पाहून त्याने त्या गोळ्या मग जमिनीवर सोडून दिल्या.

'खण्ण्! खण्ण्'! आवाज करत त्या बुलेट्स फ्लोअरवर विखुरल्या.

त्या शांततेत त्या गोळ्यांचा खणखणीत आवाज भीषण जाणवत होता.

सुजय समजला काय समजायचं ते. त्याने पिस्टल फेकून दिली. पण आवेशाने नाही. समोर साक्षात मृत्यू उभा असताना त्याचा आवेश गळून पडला होता.

"मग कशी विल्हेवाट लावू? तुकडे करून? की असेच कुठेतरी कोंबून? का कुठेतरी फेकून? की जाळून? कशी?" वाघने क्रूरतेने निर्दयी हास्य करत विचारलं.

"ठरवलं असेलच की!" सुजय अजूनही अशा परिस्थितीतही तुसडेपणाने बोलला.

वाघ हसला.

'स्वतःच्याच मदात मदमस्त हत्ती कसा असेल याचं मूर्तिमंत उदाहरण होता हा सुजय शहा' आणि याच विचाराने वाघला हसू आलं होतं.

समोर वाघ उभा होता; त्याला फाडायला!

समोर साक्षात मृत्यू! आणि तरी तो असा आपला हेकेखोरपणा सोडवायला तयार नव्हता.

अजूनही वाघला प्रतित्युत्तर करण्याची तो हिंमत करत होता. पण ही हिंमत साहसी नव्हती, केविलवाणी होती आणि याचीच मिस्टर वाघला गंमत वाटून हसू आलं होतं.

"नाही आपली इच्छा विचारावी म्हंटलं. शेवटची असेल ना ती!" वाघ क्रूर स्मित करत बोलला.

"माझी शेवटची इच्छाच जर पूर्ण करायची आहे, तर एक कर; तू मर!" सुजय दातोठ खात बोलला.

"ठीक. गोळ्या माझ्या पायातच आहेत. घ्या आणि मारा मला! या!" वाघ त्याला डिवचत आमंत्रण देत बोलला.

सुजय काही जागचा हलला नाही.

"याआ!" वाघ पुन्हा सौम्य हसत लयबद्ध गरजला.

यावेळी मात्र सुजय हलला. तो त्याची रिव्हॉल्व्हर उचलून हळूहळू मिस्टर वाघच्या दिशेने सरकला.

"तूझ्यावर विश्वास कसा ठेवायचा?" तो म्हणाला.

"त्चू त्चू! तुम्हाला का माझा विश्वास वाटत नाही हेच मला समजत नाही." वाघ भोळा चेहरा करून बोलला.

"विश्वास ठेवण्यासारखी तुमची वर्तणूक कुठे आहे वाघ?" सुजय सावध पुढे सरकतच होता.

"इतकं विश्वासू वागून तुम्ही मला हे उत्तर देताय मिस्टर शहा? मित्च् माय बॅड लक." वाघ खोट्या दुःखद अंतःकरणाने बोलला.

"हो म्हणून आता तुम्ही माझ्या खोलीत आहात मला मारायला!" सुजय बोलला.

"नो! तसं असतं, तर तुम्हाला मी झोपेतच मारलं असतं. तुमच्या जागे होण्याची मी वाट पाहिली नसती. आय वॉन्टेड् टू गिव्ह यू दि फेअर् चान्स!" वाघ हसून बोलला.

आणि तेच मोहमयी स्मित अधरांवर घेत डोळयांत चमक आणत मिस्टर वाघने हातातील चाकू पायांत त्यागला.

"नाऊ आय एम अनआर्म्ड्, अँड सो हार्मलेस्! टेक युअर चान्स सुजय सर्!" वाघ दोन्ही हात समानांतर उंचावत बोलला.

मग सुजयने हडबडीत बाजूला असलेल्या भिंतीलगतच्या टेबलाचा खण जोरात ओढला. गोळ्या घरंगळत समोर येतील अशी त्याची अपेक्षा... पण तसे काही झाले नाही. खण रिकामा होता.

सुजयची मान झर्र्कन मिस्टर वाघकडे वळली. नजर घातक आणि जहरी...!

"सॉरी!" मिस्टर वाघ दोन्ही ओठ दातांखाली दाबत आपला डावा खिसा चाचपत बोलला. त्याचा उजवा हात हवेतच होता.

त्याने त्या ड्रॉव्हर मधील गोळ्या देखील आपल्याकडे घेऊन ठेवल्या होत्या.

"बास्टर्ड्!" सुजय पुटपुटला. आवेशात असल्याने त्याचे ओठ हलले.

लीप रिडींग एक्सपर्ट वाघला कळले तो त्याला काय म्हणाला. पण न रागावता तो हसला.

'मरणाऱ्यावर रागवायचे ते काय?' असे त्याच्या मनी आले असेल...

मग हातातील खण तसाच उगडा ठेवून सुजय पुन्हा वाघच्या दिशेने चालू लागला. संथ... सावध...

वाघच्या पायांतील राऊंड्स कलेक्ट करण्याशिवाय त्याला आता पर्याय उरला नव्हता. आणि वाघ समोर जाणे म्हणजे त्याच्या जबड्यांत तोंड देण्यासारखे होते. अर्थात पर्याय नव्हता. स्वतःचा जीव वाचवावा तर हे धाडस करणे आवश्यक होते.

आणि ते तो करणार होता! मुत्युच्या जबड्यात तो जात होता, मृत्यू पासून स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न करण्यासाठी! कदाचित शेवटचा प्रयत्न...!

सुजय वाघ पासून केवळ अंतरावर पोहोचला होता. त्याची जळती नजर वाघला भस्मसात करण्याच्या इराद्याने वाघला बोचत होती. पण वाघवर त्याचा काही परिणाम झाला नाही. वाघ नितळ स्मित करतच होता हात हवेत ठेवून.

सुजय वाघच्या डोळयांत डोळे ठेवूनच खाली वाकला. वाघपासून थोडी दूर आलेली एक बुलेट तो उचलण्याच्या विचारात होता. याने वाघपासून सुरक्षित अंतर त्याला राखता येणार होतं. त्याने ती 'पॉईंट थर्टीएट स्पेशल' मॅग्नम बुलेट वाघवर नजर ठेवूनच उचलली.

आता ही 'रायनो' मध्ये लोड केली की झालं. हॅमर ओढून ड्रीगर दाबला, की वाघ धराशाही!

मिस्टर वाघवर नजर ठेवूनच ती बुलेट तो 'रायनो'च्या सिलिंडर चेंबरमध्ये सरकवू लागला. तो इतका गांगरला होता, की त्याला ती बुलेट चेंबरमध्ये नीट लोड करता येईना. त्यासाठी त्याला खूप स्ट्रगल करावं लागत होतं.

वाघ मात्र हात वरच ठेवून त्याची गंमत बघत होता.

दुसऱ्यांना आपल्या स्वार्थापायी मरताना पाहत असताना याचे हात कधी कापले नाहीत. पण आज आपला काळ समोर दिसत असताना याची कशी भंबेरी उडाली आहे ते पाहून वाघला हसू येत होतं.

अखेर सुजय यशस्वी झाला. त्याने गोळी चेंबरमध्ये ढकलली. सिलेंडर आत सारून नीट बसवले. वाघवर त्याने नेम धरला. हॅमर खेचला. चाप ओढला...

गोळी सुटली. पण ती वाघला थडकली नाही. वाघ कधीच खालचा चाकू उचलून वाघाच्याच चपळाईने सुजयपाशी पोहोचला होता अन् त्याने ती सूरी सुजयच्या पोटात खुपसली देखील होती!

सुजयचे डोळे इतके बाहेर आले होते, की ते बाहेर गळून पडतील की काय असे झाले होते. ते बाहेर आलेले डोळे लालबुंद झाले होते. डोळयांच्या सर्व नसांत रक्त उतरले होते. त्याच्या ओठांतून रक्त उसळलं. त्याने रक्ताची उलटीच केली असावी.

"अक्क्!" एवढंच काय ते सुजयच्या तोंडून रक्तासह बाहेर पडलं.

अन् सुजयला मागे सरकवत नेत मिस्टर वाघने त्याला त्याच्या पलंगावर ढकलून दिलं. सुजयच्या हाती केस ठेवून त्याने सुजयची मूठ बंद केली. दरम्यान त्याची 'रायनो' उचलायला वाघ विसरला नव्हता!

आणि मग त्याने तो आलेल्या वाटेवरून बाहेर पळ काढला. म्हणजे दारातूनच!

आता मात्र माझ्या हातून गळून पडायला माझ्या हाती ग्लास पण नव्हता. माझे हातच आर्मरेस्ट वरून खाली गळले. माझ्या अंगातले सारे त्राण नष्ट झाले होते. मी निस्तेज डोळ्यांनी पापणीही न लावता समोर छद्मी हास्य घेऊन बसलेल्या मिस्टर वाघकडे पाहत होतो.

त्याने मला त्याच अवस्थेत बसू दिलं. मला हे सगळं पचवायला बराचवेळ जाणार हे तो जाणून होता!

आणि काही वेळ गेल्यावर...

"काही विचारणार नाहीस?" वाघने हसतच विचारलं,

"मला माहित आहे बरेच प्रश्न तुझ्या कवटीत नव्याने उपजून वळवळत असणार!" तो म्हणाला.

"मला जाऊ द्या!" मी सावरत उठत बोललो.

प्रश्न तर खूप होते. पण आता खरंच हे मला झेपण्यासारखं नव्हतं. पण मला दाराकडे एक पाऊलही न टाकू देत तो माझ्यासमोर झेपावून उभा राहिला.

मी ज्या दिशेने सरकेन त्या दिशेने तो सरकत मला जाण्यापासून अडवायचा. आम्ही जसे काही वाघच्या बैठकीत कबड्डी खेळत

होतो. मला मिस्टर वाघची चौखट ओलांडायची होती आणि तो काही त्याची सीमारेषा मला ओलांडू देत नव्हता.

आता हे हास्यास्पद वाटतंय, पण त्यावेळी माझी हालत खराब झाली होती.

मी पळण्याचा प्रयत्न करतोय हे पाहून मग मिस्टर वाघ माझ्या समोरच थांबला. त्याने 'रायनो' होलस्टर मधून बाहेर काढली. ती माझ्यावर एम केली. मग काय? मला जागीच गोठण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. मला पॉईंटवर घेत तोही स्थिरावला काहीकाळ... एक डोळा बंद करून... आणि मग...

त्याने तीच रायनो माझ्या समोर धरली. ती फिरवली. त्याचे हँडल माझ्या बाजूला. मी ती घ्यावी अशी त्याची इच्छा होती. हे घाबरलेल्या मला जरावेळाने लक्षात आलं. मी तिर्थासाठी ओंजळ करावी तशी दोन्ही हात जोडून ओंजळ केली व ती मिस्टर वाघ समोर धरली. मिस्टर वाघने प्रसाद हाती द्यावा तशी ती रायनो रिव्हॉल्व्हर माझ्या ओंजळीत घातली. मला ती जरा जड वाटली.

"लोडेड आहे?" मी आवंढा गिळत विचारलं.

"हो!" तो हसून म्हणाला.

"आणि तरी ही तुम्ही माझ्या हाती देताय?" मी जरा धिटाईने विचारलं.

"मला माहित आहे ही तू माझ्यावर नाही चालवणार!" तो ओठ लांबट करत हसून म्हणाला.

"मी घाबरट आहे. माझ्यात हिंमत नाही असं तुम्हाला वाटतं म्हणून?" मी जरा रागात विचारलं.

हातात भरलेली रिव्हॉल्व्हर असल्याने ही धिटाई कदाचित माझ्यात आली असावी, की मी मिस्टर वाघला असे प्रश्न करत होतो. आणि यातूनच मिस्टर वाघ माझा स्वाभिमान दुखवत असल्याची एक भावना आणि अहंपणा माझ्यात आला होता बहुदा.

हातात सत्ता असली, की असा उन्माद चढतोच. माझ्या हातात देखील आत्ताच्या घडीला सत्ता होती. पॉव्हर होती मिस्टर वाघला कोणत्याही क्षणी संपवण्याची! एक चाप ओढला की झालं! नेम चुकण्याची शक्यता अगदीच कमी. वाघ माझ्या एवढ्या जवळ जो उभा होता. मी एकदम पॉईंट ब्लॅन्क रेंजने त्याला संपवू शकणार होतो. आणि तरी हा म्हणतो, की मी त्याला मारू शकत नाही! का? असे त्याला का वाटावे???

"तुझा तो स्वभाव नाही. गुन्हेगारांविषयीही सहानुभूती ठेवणारा तू मला नाही मारणार. तुझ्या नजरेत मी कितीही मोठा गुन्हेगार असलो तरी!" तो हसून म्हणाला,

"शिवाय तुला माझ्याविषयी आस्था आहे. प्रेम व काळजी आहे हे मी तुझ्या डोळ्यांत सतत वाचतो. तू मला नाही मारणार!" तो म्हणाला व मनमोहक हसला.

मीही मात्र मग रिव्हॉल्व्हरची सिलेंडर सेफ्टी रिलीज करून हॅमर खेचला. आणि डाव्या बाजूला हृदयाचा वेध घेत ती रायनो मिस्टर वाघच्या छातीवर रुतवली. मी ट्रिगर ओढू लागलो. हळुवार माझ्या बोटांचा दाब मी त्या ट्रिगरवर वाढवत नेत होतो. माझी नजर माझ्या हातूनच खेचल्या जाणाऱ्या त्या ट्रिगरवर व हळूवार गोल फिरणाऱ्या रिव्हॉल्व्हरच्या सिलेंडरवर होती.

माझे संपूर्ण लक्ष त्या रिव्हॉल्व्हर होते आणि मिस्टर वाघचे माझ्याकडे! तो अजूनही हसतच माझ्याकडे पाहत असल्याचं मला जाणवत होती. पण स्वतःला वाचवण्यासाठी त्याची कसलीशी हालचाल होत नव्हती. तो कसलाच प्रयत्न करत नव्हता.

आज माझ्या हातून मिस्टर वाघ मरणार का??? मी स्वतःला मनातल्या मनात प्रश्न केला.

आणि माझे बोट सुटले!!!

ट्रिगर पुढे ढकलले गेले.

***कट्ट्!!!***

आवाज झाला! ट्रिगर पूर्वजागी आला होता. सिलेंडर मागे फिरून 'कर्र् ' आवाज करून तेही पूर्ववत झाले होते.

मी हॅमर पूर्वी सारखा केला. सेफ्टी लॉक लावले. हॅन्डगन खाली घेतली. मी... मी मिस्टर वाघवर गोळी नाही चालवू शकलो...!

माझी... माझी नजर खाली होती.

"सी? टोल्ड यू! तुझ्या हिंमतीवर माझी शंका नव्हती. कधीच नसणार आहे. पण तो तुझा स्वभाव नाही!" वाघ हसला.

"मिस्टर वाघ! माझं काही चुकतंय का?" मी डोळ्यांत पाणी आणून विचारलं.

मिस्टर वाघच्या खांद्यावर मी माझं मस्तक टेकवलं होतं. माझे उष्ण अश्रू जमिनीवर पडले. माझे संपूर्ण शरीर भट्टीसारखे तापले होते.

"नाही!" यावेळी खरंच मिस्टर वाघ गंभीर झाला! तो मला प्रेमाने थोपटत होता.

"तू खरा आहेस! म्हणून फक्त! फक्त म्हणूनच मी तुला योग्य समजतो!" तो मला म्हणाला.

त्याने माझ्या खांद्यावर हात ठेवला. मला माझ्या पूर्व जागेकडे वळवत तो म्हणाला,

"बस!" तो अतीव गंभीर होता.

त्याने काही पावले चालून मला माझ्या आधी बसलेल्या जागी आणलं. मला बसवलं. जरावेळ माझ्यापाशीच उभारला. माझी मान

खालीच. मग तो ही खाली मान घालून त्याच्या पूर्व ठिकाणी गेला. तोही बसला. माझ्यासमोर; माझ्याकडे पाहत.

"काय होतंय सूरज?" त्याने विचारलं.

"मलाच माहीत नाही. समजत नाही. माझ्या मनात काय चाललंय ते कळत नाही..." मी कसासा बोललो.

"मला माहित आहे तुझ्या मनात काय चाललं आहे!" वाघ बोलला,

"पूर्वकर्मांनी तुला अजूनही घेरलं आहे. त्याच दोषभावनेत तू अजूनही आहेस. पण आत्ताचं म्हणायचं, तर...

"रिद्धीमा! तिचं काय झालं असेल? हेच ना?" माझ्यावरची नजर जरा करडी करत तो बोलला,

"ही सहानुभूती तुझा गौरवांकीत दागिना आहे सूरज, पण हाच दागिना तुला अतिबोचणारा व क्लेशदायक आहे तुझ्यासाठी. हे माहितेय सूरज तुला?" तो मला म्हणाला,

"मघापासून रिद्धीमाचं जे चित्र तुझ्यासमोर आलं त्यातून तू तिला तुझ्या प्रियसीच्या समकक्ष ठेवलंस हो ना? म्हणूनच तुला आता तिच्या काळजीपोटी तुझी तू गमावलेली प्रियसी देखील आठवली. हो ना?" त्याने विचारलं.

मी काही बोलू शकत नव्हतो. मी खाली पाहत फक्त होकारार्थी मान हलवली.

"रिद्धीमा बद्दल ऐकून तिच्या प्रेमात पडलायस?" त्याने प्रश्न केला.

मी मान डोलावूनच नकार दिला. पण मी हे नक्कीच नाकारणार नाही, की तिच्या उल्लेखाने अलबत माझी प्रियसी मला आठवली होती. त्यांचा स्वभाव असाच होता, सर्वांची काळजी घेणारा, त्यासाठी हवा तो त्याग करणारा... त्यागमूर्ती... आणि हे पाहूनच माझ्यासाठी त्यांनी त्याग करू नये म्हणून मीच त्यांचा त्याग केला होता...

माझी सदिच्छा कितीही उदात्त वाटत असली, तरी मनात खोल कुठेतरी मी त्यांच्या प्रेमाची अवहेलना केल्याची अपराधबोधी दुःय भावना मनाला सतत डाचत, डागण्या देत असते...

हो! मी कबुलतो, मला त्या रिद्धीमाची काळजी वाटत होती. सुजय मेला, तर रिद्धीमा देखील मरणार होती. सुजयने तशी योजना व तरतूद करून ठेवलीच असणार होती...!

पण तिच्याविषयी वाटणारी माझी ही काळजी तिच्या आसक्तीपायी नक्कीच नव्हती. त्यात निव्वळ निखळ करुणा होती हे मी खात्रीशीर सांगतो!

आणि म्हणूनच रिद्धीमा विषयी विपरीत काही समजण्यापूर्वी मला तेथून काढता पाय घ्यायचा होता...

मी हातातली चिअप्पा रायनो समोरील टी-पॉयवर भिरकावली व डोक्याला हात लावून बसलो.

"ही तीच रिव्हॉल्व्हर, जी सुजयने माझ्यावर एम केली होती!" वाघ बोलला.

"काय?" मी फुटलो.

"हो!" वाघने डोके हलवले.

"तुला ती माझ्या कलेक्शनमध्ये एड झाल्याचे दाखवण्यासाठीच मी ती बाहेर काढली होती." तो म्हणाला आणि त्याने पुढे होत ती रिव्हॉल्व्हर आपल्या हाती घेतली. तिचे सिलेंडर बाहेर घेऊन तो ते फिरवत बोलू लागला...

"तुझी हीच सहानुभूती तुला वल्नरेबल बनवते सूरज. इतकं हळवं असून चालत नाही. तू तुझं कर्म कधीच मार्गी लावू शकणार नाहीस अशाने..." तो बोलत असताना त्याचे सारे ध्यान तो फरवत असलेल्या रिव्हॉल्व्हर सिलेंडरवर होते. तो अगदीच गंभीर झाला होता. तो पुढे म्हणाला,

"तुझ्या भूतकाळातून बाहेर पड. जे होऊन गेलं, त्याचे दुःख का? आणि निर्णय; तो तर तुझाच होता मग तर तुला दुःख करण्याचा अधिकार नाही!

"जगात घडलेल्या प्रत्येक गोष्टीसाठी तू स्वतःला दोषी ठरवू शकत नाही!" तो मला म्हणाला.

"तुम्ही म्हणालात तसा निर्णय तर माझाच होता!" मी कळकळलो.

"पण अंमलबजावणी माझी होती. दोष, तुझा कसा?" त्याने प्रतिवाद केला.

यावेळी आमचं बोलणं दुसऱ्या एका घटनेवर सरकलं होतं, ज्याविषयी आम्ही सुरवातीला बोलत होतो... पण जोपर्यंत मिस्टर वाघ माझी मागणी पूर्ण करत नाही तोपर्यंत कदाचित ती तुम्हाला समजणार नाही...

वातावरण अधिकच गंभीर व क्लिष्ट होत चाललं होतं... ते निवळण्यासाठी...

मिस्टर वाघने रिव्हॉल्व्हरची माहिती पुरवली,

"चिअप्पा फायरार्म्स कंपनीची रायनो ट्वेन्टी डी एस! इटली. माझ्या आवडीचे पॉईंट थ्री फिफ्टीसेव्हन मॅग्नम, पॉईंट थर्टीएट स्पेशल, नाईन इंटू नाइंटिन परॅबेलम, पॉईंट फॉर्टी स्मिथ अँड व्हील्सन आणि नाईन इंटू ट्वेन्टीवन एमएम कार्टेजेसना ही सपोर्ट करते. आहे ना ऑलराऊंडर! स्मॉल येट हॅन्डी. याचे बॅरल बघ. क्युट आहे ना? फक्त दोन इंचाचे. पण मला याची डिझाईन आणि हँडल सर्वांत जास्त आवडले. बिलकुल साय-फाय लूक आहे. नाही? दोन हजार आठचे मॉडेल असून इट लुक्स क्लासी. नाही?!

"हा सुजय माणूस कसाही असू दे. बट आय हॅव टू एडमीट दॅट ही हॅड ए ग्रेट टेस्ट!" एक विजयी स्मित त्याच्या ओठांवर तळपलं.

याने हीच रिव्हॉल्व्हर मघाशी माझ्यावर रोखली होती. त्याचं असं करणं म्हणजे काहीतरी भयंकर समजण्याची चाहूल...

याचा अर्थ अजूनही याहीपेक्षा गूढ गहन असं काहीतरी समजणं बाकी होतं हे त्याचंच प्रतीक होतं...

ज्या पायऱ्या उतरून मिस्टर वाघ काल रात्री गेला होता, त्याच पायऱ्या चढून तो आज सुजयच्या घरात प्रवेशला होता...

"या मिस्टर वाघ!" बाहेरून एक झंझावात आल्याचं लक्षात येताच त्या दिशेने वळून सुशांत बोलला होता.

वाघ आपला वेग कमी न करता त्याच्याकडेच आला. सोबत रिद्धीमा उभी होती. तिला मिस्टर वाघने सोयीस्कर दुर्लक्षित केलं होतं.

"काय झालं?" वाघने माहीत नसल्यासारखं सुशांतला विचारलं.

"सुजय रमाकांत शहा यांच्या खून!" नेने बोलला,

"तुम्ही त्यांचे निकटचे. म्हणून तुम्हाला बोलावले."

"म्हणजे मी त्यांच्या जवळचा नसतो, तर बोलावले नसते?" भुवया वर करत वाघने खोचक विचारले.

"मिस्टर वाघ, बी सिरीयस! तुमच्या ओळखीचे आणि शहरातील इतके मोठे प्रस्थ असलेले गृहस्थ मेलेत आणि तुम्हाला चेष्टा सुचते आहे?" सुशांत नेने जर वैतागतच बोलला.

"माफ करा तुमच्या अपेक्षेप्रमाणे वागलो नाही." वाघने पुन्हा मस्करीची 'री' ओढली.

"इकडे!" सुशांत मिस्टर वाघला सुजयच्या खोलीकडे लीड करत म्हणाला.

जाता-जाता सुशांतने रिद्धीमाला तिथंच थांबण्यास इशारा केला होता.

"मला वाटले तुम्ही तुमच्या गावच्या निम्म्या वाटेवर असाल." मिस्टर वाघशी तंडून उपयोग नाही हे समजून सुशांतने विषय बदलला होता.

"तुमची राहिलेली रक्कम घेतल्याशिवाय नाही जाणार. आणीबत त्यात हेही एड होईलच!" वाघने यातूनही मस्करीसाठी विषय शोधलाच.

"हे तुमच्या ओळखीचे असून..." सुशांत बोलत असतानाच...

"घरातली व्यक्ती गेली म्हणून कोणी जेवायचं राहतं का मिस्टर सुशांत?" वाघने त्याला तोडले.

सुशांतने 'याला काही बोलून उपयोग नाही' अशा अर्थाने मान झकटली. यावर मिस्टर वाघ हसला,

"काही काम होते म्हणून थांबलो आहे. तसंही तुम्हाला कळवल्याशिवाय कसा निघेन?" यावेळी वाघ नीट बोलला.

दोघे स्टेअर केसच्या हाल्फ राऊंड शेप्ड् पायऱ्या चढून वर आले होते.

"या!" खोलीच्या दिशेने हात करत सुशांत बोलला आणि त्याने पुढे होऊन दरवाजा उघडला.

आत सुजय तसाच पडून होता. पोटात सूरी देखील तशीच...

"अजून पंचनामा नाही?" मिस्टर वाघने मागून येत विचारलं.

"नाही. तुम्ही येईस्तोवर थांबलो. बघा तुम्हाला काही सापडतं का?"

"प्राथमिक तपास?" वाघने खोलीभर नजर फिरवत विचारलं.

"नाहीच! मला फोन आल्याआल्या तुम्हाला फोन केला आणि तुम्ही येण्याची वाट पाहत बाहेरच थांबलो."

"म्हणजे तुम्हीही प्रथम पाहताय?" मिस्टर वाघने सुशांतवर नजर स्थिर केली.

"हो!"

"एवढं प्रेमपण बरोबर नाही!" वाघ कुचकट हसत बोलला.

"म्हणजे?"

"तुम्ही खोलीत आला नाही, तर तुम्हाला खोली कुठे ते कसं माहीत? बिसाईड्स तुम्ही अगदी सहज वावरत हा दरवाजा उघडलात. काय लपवताय काय?" वाघने हसून विचारलं.

"मी... मी काय लपवू?" सुशांत चपापला.

"ते आता तुम्हाला माहीत!" वाघ छद्मी हसला,

"फोन कोणी केलेला?" वाघने विचारलं.

"अनोन!" सुशांतचं उत्तर.

"ठीक. आणि खूनाची बातमी समजूनही तुम्ही एकटेच आलात!" वाघ कुटील हसला,

"ना फॉरेन्सिक डिपार्टमेंट, ना इतर ऑफिरर्स, ना पंचनामा? तुम्हाला माझ्याकडून काही फेवर हवं आहे का?" वाघने नजर बारीक केली.

"तुम्हाला असं का वाटतं?" आपल्यावर आरोप होतोय हे पाहून सुशांतने सावध होत विचारलं.

"त्या खेरीज तुम्ही तुमच्या डिपार्टमेंटला डावलून फक्त मला नाही बोलावणार." वाघ नजर रोखत बोलला.

अरे हा नक्की काय माणूस आहे? खून केला यानेच आणि तो सुशांत नेनेला गिल्टी फिल करवतोय...?!

"बोला काय हवंय." वाघने सुशांतला विचारलं.

सुशांत शांत उभारला. काय बोलावे ते त्याला समजत नव्हते.

"लेट मी गेस!" वाघच बोलला,

"ती किचनची सूरी ज्याने खून झाला, ती तुमच्या घरची आहे! नाही?" वाघ कुटील हसत ठामपणे बोलला.

"मिस्टर वाघ..." सुशांत काही बोलणार तोच वाघने त्याला टोकले,

"फोन तुमच्या बहिणीने केला होता. तुम्ही आलात. पाहिलंत, की मृत व्यक्तीच्या पोटात खुपसली गेलेली सूरी तुमच्या घरची आहे. तुमची बहीण इथे रहायला. संशय साहजिक तुमच्या बहिणीवर येणार. तशात मेलेलं प्रस्थ प्रतिष्ठित. म्हणून तुम्ही मला वैयक्तिक बोलावलं. हो ना?" वाघ म्हणाला.

"तुम्ही म्हणता तसं काही नाही. तिने काही केलेलं नाही!" सुशांतही ठाम ओरडला.

"मला माहित आहे. पण कोणीही तुमच्या बहिणीवर थेट संशय घेऊ शकतो म्हणूनच तुम्हाला ऑफिशियल काही नकोय. होय ना?" वाघने पुन्हा सुशांत सोबत 'सायकीक खेळ' खेळण्याचा प्रयत्न केला.

"तुम्ही शहांच्या जवळचे म्हणून तुम्हाला बोलावले आहे या उपर काही कारण नाही. तुम्हाला मदत करायची नसेल तर निघा! पण उगाच नाही त्या स्टोऱ्या बनवू नका!" सुशांत खूपच चिडला.

"माफ करा. चला सर्च करू." वाघ बोलला आणि तो सुजयच्या मृत शरीराकडे गेला.

मृतदेहाजवळ एक गुडघा टेकवून तो निरीक्षण करू लागला.

"खोल घाव आहे. खूपच इंटेन्सिटीने वार केलेला दिसतोय. मारणाऱ्याचा जबर राग असणार यांच्यावर!" वाघ बोलला.

"तुम्हाला कोणी असं माहीत आहे का मग, ज्यांचा त्यांच्यावर राग असावा?" नेनेने वाघला विचारलं.

"मी यांना ओळखत होतो याचा अर्थ मला यांच्या सगळ्या गोष्टी माहीत असल्याचं पाहिजेत असं नाही ना मिस्टर सुशांत?" वाघ नेनेकडे वळत बोलला.

"पण तुम्हाला त्यांच्या आजाराबद्दल माहीत होतं!" सुशांतने वाघला अपराधीच्या जाळ्यात उभा करत स्टेटमेंट केलं.

"हो पण ते साहजिक नाही का? एखाद्याचा आजार इतकाही खाजगी नसतो, जितके त्याचे हित-अहित संबंध. अजून खुलासेवार माहिती तुम्हाला हवी असेल, तर सांगतो, की त्यांना त्रास झाला तेव्हा त्यांनी मला फोन केला होता. म्हणून मी रिद्धीमा यांना तातडीने बोलावून घेतलं." वाघ बोलला.

"पण त्यांनी तुम्हालाच का फोन केला?" सुशांतचा पुन्हा वाघला संशयी प्रश्न.

"ते मला काय माहीत?" वाघचं उत्तर,

"यांना उठवा आणि विचारा." मिस्टर वाघने मेलेल्या सुजयकडे हात केला.

सुशांतने डोळे मिटून राग गिळला आणि पुढं विचारलं,

"सुजय यांची आणि तुमची ओळख कशी? इथं तुमच्या ओळखीचं जास्त कोणी नाही असं तुम्ही म्हणाला होतात!"

"यू हॅव अ वेरी शॉर्ट मेमरी आय गेस! मागे आपल्याला मी माझ्या एका महत्त्वाच्या कामाबद्दल बोललो होतो. ते यांच्या सोबतच होतं. यांच्या इन्स्टिट्यूट्स व एनजीओजना मी डोनेशन देणार होतो." वाघ बोलला.

"खरं?" सुशांतने अविश्वासाने विचारलं.

वाघ सुशांतच्या अविश्वासाची कीव करत हसला...

"ही सूरी माझ्या घरची हे तुम्हाला कसं समजलं?" सुशांत मिस्टर वाघला कचाट्यात पकडत विचारत होता.

हा प्रश्न त्याच्यासाठी 'बुल्सआय' होता!

"म्हणजे आता मी अपराध्याच्या कटघऱ्यात उभा आहे तर!" वाघ हसत बोलला.

"उत्तर द्याल?" सुशांत गंभीर.

"ठीक! रिद्धीमा यांना मी इकडं पाठवलंय हे सांगण्यासाठी तुम्हाला भेटायला मी तुमच्या घरी आलो, तेव्हा तुमचा निशांत या सुरीने सफरचंद कापून खात बाहेर वरांड्यात बसला होता. ती सफरचंदं मीच त्याच्यासाठी आणली होती. ती त्याला दिली व बाहेरच माझ्या गाडीत आपली वाट बघत थांबलो." वाघने खोटं उत्तर दिलं.

आता खरंच दुर्धरने सफरचंद खाल्ली होती का हे पाहण्यासाठी सुशांत इतक्या दिवसांचा कचरा तर शोधू शकला नसता ना...

परंतु मला समजेना की याने सूरी सुशांतच्या घरची आहे असा उल्लेख करण्याचा शहाणपणा म्हणजे चूक केलीच कशी? की त्याने हे मुद्दाम केलं होतं? सुशांतला काही सुचविण्यासाठी?

"हवे असल्यास निशांतकडून कन्फर्म करून घ्या!" वाघ हसला.

आणि निशांत उर्फ दुर्धर तर वाघला दुजोरा देत 'होच' म्हणाला असता. तो हे तर सांगू शकत नव्हता, की तो बाहेर फिरत होता... आणि तेही इथे सुजयकडे! आणि तो काही म्हणाला असता, तरी त्याच्या स्टेटमेंटला महत्त्व होतं कुठे? स्मृतिभ्रंशाचं व त्यामुळे बोलताही न येण्याचं नाटक करून बसला होता ना तो... हे प्रकरण वाघवर फिरलं असतं, तरी त्याचं हातवारे करून केलेलं कोणतंही

म्हणणं कोर्टात कदाचित ग्राह्य धरलं गेलं नसतं, म्हणून वाघने त्याचं नांव घेण्याचा खेळ केला होता.

"मिटली शंका? की अजूनही मी गुन्हेगारच आहे?" वाघने सस्मित विचारलं.

"आता कळलं? कारण नसताना कोणी तुम्हाला गुन्हेगार ठरवत असेल तर कसं वाटतं? हो! माझ्या बहिणीने फोन करून मला यांच्या मृत्यूची बातमी सांगितली. हो! इथे माझ्या घरातील चाकू आहे. हो! माझी बहिण इथंच रहायला होती! याचा अर्थ तीच खूनी आहे असा होत नाही मिस्टर वाघ!" सुशांतने मुद्दा स्पष्ट केला.

वाघ केवळ हसला.

"मी सॉरी म्हंटलं आहे." मिस्टर वाघ बोलला.

"असो, खूनाबद्दल अजून काही समजतंय तुम्हाला? की माझा मी तपास करू?" सुशांतने रुक्षपणानंच विचारलं.

मिस्टर वाघने मनगटी घड्याळ पाहिलं.

"नऊला पाच कमी आहेत. 'रिगर् मॉर्टीस'साठी लागणारा वेळ लक्षात घेता व घाव आणि मृताची स्थिती पाहता खून रात्री दोन तीनच्या दरम्यान झाला असावा. बॉडी स्टीफ झाली आहे. रक्त पण वाळलं आहे." वाघ बोलला.

वाघ तर खात्रीशीर ठराविक वेळ सांगूच शकत होता. खून त्यानेच जो केला होता... पण त्याने अंदाज वर्तवल्यासारखा घोषा दिला होता.

"डावी मूठ वळली आहे. बॉडी स्टीफ आहे. आपली इच्छा असल्यास मी मूठ उघडू म्हणतो." आणि सुशांतच्या परवानगीची वाट न पाहता मिस्टर वाघने सुशांत समोरच सुजयच्या डाव्या हाताची बंद बोटे काडकन मोडली व सरळ केली.

ते दृश्य पाहून सुशांतला कसंकसंच झालं. त्याचा डावा हात वेदनेची कल्पना करूनच फडफडला व तळवा आवळला गेला. मग खालच्या खालीच त्याने स्वतःशी त्याची बोटं हालवून ती कार्यरत असल्याची खात्री केली.

"डोन्ट वरी सुशांत. मेलेत हे! आणि ते तुम्हाला पण माहीत आहे." वाघ त्याच्याकडेच पाहत असलेल्या सुशांतला हसून बोलला.

"जरा रिस्पेक्टफुली... आफ्टर ऑल तुमचे रिलेशन्स होते म्हणून तरी..." विचलित सुशांत बोलला.

"मेलेल्या शरीराशी माझा काही संबंध नाही. माझी सलगी सुजय शहा या जीवंत माणसाशी होती! कळलं?" वाघ हसला.

आणि बोलतच त्याने सुजयच्या उघडलेल्या मुठीतील काही केस उचलून सुशांत समोर धरले.

"हा तुमचा पुरावा!" आणि त्याने आपली नजर हटवून सुशांतकडे केली.

अचानक सुशांतच्या मागे काही जाणवल्यासारखी त्याची तिकडे नजर फिरली. त्याच्या कपाळावर आठ्या जमा झाल्या. सुशांत पण मग कपाळावर आठ्या घेऊनच वाघ बघत असलेल्या गोष्टीचा वेध घेण्यासाठी मागे वळला.

एक छिद्र! भिंतीत! मघाशी सुशांत एकटा आत घुसला होता, तेव्हा सूरी बघूनच त्याला सुचणं बंद झालं असावं. म्हणून त्यानं इतर तपास केला नव्हता व म्हणूनच हे छिद्र देखील त्यावेळी त्याच्या नजरेतून सुटलं असावं.

वाघ त्या छिद्राकडे जाताना त्याने केस सुशांतच्या हाती ठेवले आणि तो निरीक्षणाच्या पवित्र्यात तसाच पुढे सरकला. सुशांत देखील त्याकडे टक लावून पाहत होता. जाता जाता वाघने त्याच्या हाती केस दिले हे त्याला ध्यानात देखील आलं नव्हतं. त्याच्या जाणिवेनेच हात आपसूक वर आला होता. हातात ते केस पडताना देखील त्याची नजर त्या छिद्राकडेच होती. हातात काही जाणवतंय एवढंच लक्षात घेऊन त्याने मूठ आवळली होती.

मिस्टर वाघ भिंतीपाशी उभा होता. त्याने आपल्या खिशातून मल्टी पर्पस स्विस आर्मी नाईफ काढला व तो ते छिद्र टोकरू लागला,

"पॉईंट थर्टीएट स्पेशल!" चाकूने त्या छिद्रात अडकलेली गोळी बाहेर काढत तो म्हणाला.

छिद्रातून पडलेली गोळी त्याने झेलली आणि मागे येऊन उभा राहिलेल्या सुशांतच्या हाती टेकवली.

"कुणी चालवली असेल?" सुशांत कन्फ्युज्ड्.

"ऑफकोर्स सुजय! आणखी कोण? खून्याकडे बंदूक असती, तर त्याने चाकूने का खुपसलं असतं?" वाघ खुदकत बोलला व तो सुजयच्या डेडबॉडीकडे गेला.

त्याने सुजयच्या उजव्या हाताचा वास घेतला.

"गन पावडर सेरिड्यु यांच्या हातावर व यांच्या कुर्त्याच्या बाहीवर आहे. यांनीच ती गोळी चालवली आहे." वाघ खात्रीशीर सांगत होता.

सांगणारच. त्याच्यावरच तर ती गोळी चालवली गेली होती!

"म्हणजे खूनी जखमी झाला असेल." सुशांत उत्साहाने बोलला.

नाही! तो साबूत तुमच्या समोर आहे!

"मला नाही वाटत." वाघ म्हणाला,

"इतक्या जवळून चालवलेली गोळी त्या खून्याला छेदून भिंतीत खुसली असं म्हणता येणार नाही. तसं असतं, तर तो सुजय

यांना मारूच शकला नसता! तो इथं तुमच्या पायांत पडलेला असता." वाघने सुशांतच्या मनात खून्याला पकडण्यासाठी उसळलेली आशा मारून टाकली.

शिवाय तसं काही होणार नव्हतं. कारण खूनी जखमी कुठे झाला होता.

"आणि सुजय यांना चाकू खुपसल्यावर त्यांनी रिव्हॉल्व्हर चालवली असेल तर?" गोळी निरखून पाहत सुशांत शंका विचारता झाला.

"तसं कसं होऊ शकतं? तो जागीच किंवा या घराच्या आवारातच इथं मरून पडला नसता का? आणि सुजय तरी त्यांच्याकडे गन असताना समोरील माणूस त्यांना चाकू मारेपर्यंत वाट पाहत बसले असते का? मिळालेल्या गोळीवर देखील रक्तामांसाचे काही ट्रेसेस नाहीतच." वाघने स्पष्ट केलं.

गोळीवरील नजर वाघवर स्थिर करत सुशांतने हात खाली घेतला.

"आणि गन?" सुशांतला पडलेला प्रश्न.

"खूनीने पळवली असेल!" एवढ्यात वाघ पहिल्यांदा खरं बोलला होता.

"ओके. पोर्टमार्टमला पाठवू या?" सुशांतने विचारलं.

"एटॉप्सी कोण ऑपरेट करणार? ऑफकोर्स तुमची बहीण नक्कीच नाही!" वाघने डोळा मारला.

"म्हणजे तुम्हाला तिच्याबद्दल सगळं माहीत आहे तर?" सुशांतने विचारलं.

"हो. त्या प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये प्रॅक्टिस करत होत्या हे तुम्ही मला खोटं सांगितलं आहे हे मला माहित नाही असं समजू नका!" वाघ कुटील हसला.

"असं असलं तरी याच्याशी तिचा काही संबंध नाही!" सुशांत जरा रागातच ओरडला.

"हो. मी फक्त एवढ्यासाठीच स्पष्ट केलं, कारण तुम्ही माझ्यावर डाऊट घेऊ नये. एक गुन्हे अन्वेषक म्हणून सर्व शक्यतांचा विचार करणं हे माझं कामच आहे हे एक पोलीस म्हणून तुम्हाला तरी समजायला हवं. त्यासाठी तुम्ही रागावण्याची काहीच आवश्यकता नाही!" वाघने सुशांतला ठणकावलं.

"आणि हेही विसरू नका, की आधीची तुमची जटिल केस मीच सॉल्व्ह केली आहे!" वाघ स्मित करत सुशांतला उपकाराची जाणीव करून देत बोलला.

"येस आय नो." सुशांत समजुतीने शांत होत बोलला.

"रात्री घरी कोण कोण होतं?" वाघने त्याला विचारलं.

"काही नोकर. बस. आणि रिद्धीमा." सुशांत बोलला.

"त्यांची चौकशी केलीत?"

"नाही. तुम्ही आल्यानंतरच सर्व प्रोसेस करावी म्हंटलं."

"बरं. करा चौकशी करा. मी येतो!" वाघ बोलला.

आणि त्याने नेहमीच्या सवयीने खोली आणि सुजयचं घर सोडलं.

सुशांत आवाक्! हा नेहमी असा का करतो हेच त्याला न उलगडलेलं कोडं.

पण सुजयला तर वाघनेच मारलं होतं, वाघ इन्वेस्टीगेशन करणार काय होता? खूनी कोण हे त्याला ठाऊकच होतं! तो स्वतः!!!

सुशांतच्या कपाळावरील आठ्या मात्र सुट्या झाल्या होत्या. कारण त्याच्यासाठी हे पर्याप्त होतं, की मिस्टर वाघने ही केस सॉल्व्ह करावी. आणि तो कसाही विक्षिप्त वागला, तरी तो अखेर तसे करणार यात त्याला शंका नव्हती. तो मग आपल्या कार्यवाहीकडे वळाला.

पण एक प्रश्न किंतु त्याच्या डोक्यांत ठणकला, तो म्हणजे जर हा रिद्धीमाची एवढी माहिती ठेवून आहे, तर सुजय शहा ओळखीचे असून त्यांच्याबद्दल त्याला माहिती तोकडी आहे हे त्याच्या पचनी पडेना... मिस्टर वाघ आपल्यापासून काही लपवून ठेवत आहे का?

हाच प्रश्न डोक्यात घोळवत मग तो घरात उपस्थित सर्वांची चौकशी करू लागला...

"चौकशी दरम्यान काय माहिती हाती लागली?" मी मिस्टर वाघला विचारलं.

मी माझं दुःख विसरून परत त्या घटनेत पूर्णतः गढून गेलो होतो.

"छान वाटलं तू तुझ्या विषादातून बाहेर आलास!" वाघ मोहक हसला.

"उत्तर द्याल?" मी विषय भरकटू नये म्हणून घाई करत त्याला विचारलं.

"मी प्रत्यक्ष तेथे नव्हतो म्हणून सुशांतला काय माहिती मिळाली हे मी तंतोतंत सांगू शकणार नाही. मी तुला सुजयच्या अंतिम प्रस्थानानंतरची घटनाच सांगतो!" तो हसून म्हणाला.

मिस्टर वाघ सुजयच्या खोलीतून बाहेर पडत असताना त्याने गॅस मास्क लावला होता.

सुजयच्या बंदुकीतून सुटलेल्या गोळीने घरातील लोक सावध झाले होते.

मिस्टर वाघ घराबाहेर पडला, पण जाता-जाता त्याने त्याच्याकडील एक कॅन फोडला आणि तो खाली टाकून घराबाहेर पडला. त्यानं बाहेरून मेन डोअर लावून घेतलं.

मिस्टर वाघने काही पावलांतच सुजयच्या घराचा एरिया सोडला.

वाघने जे काही आत फेकलं होतं, त्याचा इफेक्ट व्हायला तीन चार मिनिटं गरजेची होती. तेवढा वेळ मिस्टर वाघला सुटून जाण्यास पर्याप्त होता.

आतून दरवाजा उघडण्याचा संघर्ष संपून दार धडकण्याचे आवाज बंद झाले. इकडे मिस्टर वाघ घरापासून थोडी दूर उभी केलेली गाडी घेऊन फरार झाला होता...

"यापेक्षा वेगळं त्यांनी काही सांगितलेलं नसेल आय गेस!" वाघ कपट चेहऱ्यावर आणत बोलला.

"तुम्ही आत काय फेकलं होतं?" मी विचारलं.

"सेवोफ्लोरेन!" वाघने उत्तर दिलं,

"सर्जिकल एनेस्थेटिक. श्वसनामार्गे दिलं जातं. मी ते कम्प्रेस्ड् कॅनमध्ये स्टोअर करून घेतलं होतं."

"याचे ट्रेसेस त्या नोकरांच्या रक्तात सापडले असतील ना?" मी भीत विचारलं.

"मला तेच हवं होतं!" वाघ हसला.

मी आवाक्!

"का?" आपसूक मी किंचाळलो.

"प्लॅनिंग!" त्याने डोळा मारला.

"तुम्ही खरंच रिद्धीमाला यात अडकवलंत?" माझा आवाज चढला.

"तुला तिची लय काळजी रे? खरं सांग प्रेमात पडलायस तिच्या?" वाघने कुचेष्टा केली.

"नाही. पण त्या निष्पाप मुलीला काही होऊ नये इतकंच वाटतं." मी ठाम म्हणालो.

"पण तू विसरतोस, की मी सांगतोय ते घडून गेले आहे. तुझी कोणतीच इच्छा इथं किंमत ठेवत नाही!" वाघ बोलला.

आणि माझ्या काळजाचा ठोका चुकला! त्या अजाणत्या मुलीच्या काळजीत मी खरंच हे विसरून गेलो होतो, की जे घडायचं किंबहुना जे मिस्टर वाघला घडवायचं होतं ते त्याने घडवलं होतं...

आणि मी कोणाची काळजी करून ते आता बदलू शकणार नव्हतो...

आणि या मिस्टर वाघची काळजी करून देखीलही उपयोग नव्हता. कारण तो म्हणतो तसंच; जर त्याला काही झालं असतं, तर तो मला सांगण्यासाठी माझ्या समोर नसता!

या विचारांवरच मी आतून शांत झालो. पण तरीही प्रश्नांची उत्तरे मिळवणे हे आवश्यक होते. म्हणून मी त्या प्रश्नांवर हट्टून बसलोच!

"नाही!" त्याने मग उत्तर दिले,

"पण मी जे काही केलं, ते तिच्याशी संलग्न होतं एवढं खरं!" वाघने स्पष्टता आणली.

"तुम्ही अजून क्लिअर केलं नाही, की तुम्ही मुळात सुजयच्या खोलीत पोहोचलातच कसे?" मी विचलित बोललो.

"त्याची संपूर्ण सिस्टीम मी हॅक केलेली हे विसरलास का? त्याचे घर एआयने ऑपरेट होत होतं. मला ब्रेकथ्रू मिळवणं सोपं होतं, तेही काही आवाज न करता! आणि तसं नसतं तरी मी ते केलंच असतं हे तू जाणून रहा!" तो कपटी हसला.

'कुणाला समजलं नाही?' या माझ्या पुढील प्रश्नाचं उत्तर मी तो प्रश्न न विचारताच लक्षात घेऊन त्याने शेवटच्या वाक्याने दिलं होतं.

प्रश्न विचारायला उघडलेलं माझं तोंड उघडच राहिलं होतं.

"अरे माझ्या तोंडून माहिती पूर्ण बाहेर तर पडू देत जा ना! पुढचं विचारायला आधीच तोंड काय पसरतोस? जरा डोक्यात जाणारी माहिती प्रोसेस तर होऊन देत जा मित्रा. तुला सगळी उत्तरं मिळतील." त्याने उपहास केला.

"सॉरी!" मी खजील झालो.

वाघ हसला. माझी किंबहुना लोकांची मस्करी करून त्यांना तोंडघशी पाडणे हा तर याचा नेहमीचा मोठा विरंगुळा! असो,

"आता सर्वांत महत्त्वाचा प्रश्न. तुम्ही टोकणार किंवा टोचून बोलणार नसाल, तर विचारतो." मी नाराजीने बोललो.

"विचार." तो हसून बोलला.

"तुम्ही सुजयला कोणालाही न माहीत होता मारू शकला असता, मग असं का? आणि चाकू? तुम्ही तसं तर कोणाला मारत नाही. मग का?" माझा काळजी करायची नाही ठरवून पण चिंतेचा प्रश्न.

"चाकू माझ्या घरचा होता?" वाघचा मला तिरकस प्रश्न होता.

"नाही!" मी वेंधळ्यासारखा आपसूक बोललो.

"मग?" त्याचा उपप्रश्न.

मी बावळट चेहऱ्याने पाहत राहिलो. मला अजून उलगडलं नव्हतं, की चाकू त्याच्या घरचा नसल्याने काय फरक पडणार होता? शेवटी खून यानेच केला होता ना!!!

"तुम्ही चौकशीसाठी का थांबला नाही? तसंही तुम्ही गॅस मास्क लावला होता. कोणी सहसा तुम्हाला ओळखलं नसतं. आणि फर्स्ट हॅन्ड इन्फॉर्मेशन पण तुम्हाला त्या नोकरांकडून मिळाली असती." मी विचारलं.

"कोणीच ओळखलं नसतं हे म्हणणं रास्त होणार नाही. चेहरा लपला, तरी बाकीचे बॉडी फीचर्स लपतात का? मी त्यांच्या समोर जास्त काळ थांबलो असतो, तर त्यांनी मला खात्रीशीर ओळखलं असतं. म्हणून मी होता होईल तेवढ्या लवकर बाहेर पडलो."

यार... याने सगळ्याचा विचार करून ठेवलेला होता. त्याचे बरोबरच आहे. एखाद्या फिल्ममध्ये ऐक्टर्सनी गेटअप चेंज् केला, तरी आपण ओळखतोच ना!

"पण तुम्ही मुळात एवढा गाजावाजा केलाच का?" मी अगतिक होऊन ओरडलो.

"मला तो तसाच हवा होता. पुरावे तयार करायचे होते ना!" तो म्हणाला.

"कोणाविरुद्ध?" मी चमकून विचारलं.

"समजेल!" तो एवढंच म्हणाला.

"दुर्धरविरुद्ध?" मी अंदाज लावला.

"बिंगो!" वाघने उत्साहात टाळी वाजवली.

"तू पण डिटेक्टिव्ह झालास तर!" तो चिडवत बोलला.

"बी सिरीयस मिस्टर वाघ!" मी यावेळी खरंच दुखावलो गेलो.

"बरं बोल!" तो सिरीयस टोन करून बोलला.

"हा गॅस वापरून दुर्धर कसा अडकला असता?" मी चकित व असमंजस होतो.

"सुशांत रिद्धीमाला तर गुन्हेगाराच्या लिस्ट मधून बाहेर ठेवणार होता. मग 'सेवोफ्लोरेन' एक्सेस होऊ शकेल असा आणखी कोण होता?" वाघने मलाच प्रश्न केला.

"दु... दुर्धर..." मी अडखळत बोललो.

"कारण?" वाघने उत्तराच्या अपेक्षेने विचारलं.

"तो रिद्धीमा सोबत तिच्या घरी राहत होता..." माझा तर्क.

"एब्सल्युट्ली!" वाघ उद्गारला.

"पण दुर्धरला तुम्ही कसेही मारू शकला असता, मग त्याला अडकवण्याचा त्रास का घेत होतात? शिवाय तुम्ही त्याला हॅन्ड ओव्हर करणार होतात. तो पोलिसांच्या हाती लागला, तर तुम्ही त्याला त्याच्या प्रियसीच्या वडिलांच्या हाती कसे सोपवणार होतात?" मी एकाला एक जोडून प्रश्नांची लडी लावली.

"समजेल!" त्याचं नेहमीचं ठेवणीतील उत्तर! तो जोडून म्हणाला,

"अजून खूप काही होणं बाकी आहे. कदाचित हा प्रश्न तुला पुन्हा विचारावा लागेल."

मला पेशन्स ठेवण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता.

"पुढे." मी बोललो...

# १०. डेट विथ डेव्हील...

मिस्टर वाघ त्याच्या गाडीत बसून होता. सोबत बाजूच्या सीटवर रिद्धीमा...

सुशांत सुजयच्या घरातील चौकशी आटोपून जाईपर्यंत वाघ त्याच्या हॉटेल रूमवर विश्रांती घेऊन परत फिरला होता. 'सुजय अँड को.' यमस्थानी मार्गस्थ केल्याने आता रिसॉर्टची भूलावणी करण्याचं वाघला कारण नव्हतं. म्हणून तो हॉटेलला परतला होता.

"तुम्ही मारलंत त्यांना?" सोबत बसलेल्या रिद्धीमाने वाघला उदासीन विचारलं.

"हो! पण जोपर्यंत पुरावे मिळत नाहीत तोपर्यंत मी गुन्हेगार नाही!" वाघ कुटील हसला.

"पण खून तर तुम्हीच केलात! मी पाहिलंय तुम्हाला काल रात्री पळून जाताना..." ती उदास बोलली.

"निशांतला हा नियम लागू होत नाही?" वाघच्या या प्रश्नावर रिद्धीमा गप्प बसली...

तिचंच गिल्ट पुन्हा तिला सतावू, खावू लागलं...

"फर्गेट इट! तुम्ही मी सांगितलेल्या लॉजवर काल रहायला का गेला नाहीत?" वाघने प्रश्न केला.

"माझ्या पेशंटला सोडून मी जाऊ शकत नव्हते." ती बोलली.

"की माझ्यावर पूर्णतः विश्वास नव्हता?" वाघने विचारलं.

तिने त्याच्याकडे पाहिलं.

"तुम्हाला सुजयना मारायचं होतं, म्हणून तुम्ही मला त्या घरातून बाहेर काढत होता?" तिचा प्रश्न.

"हो!" वाघने हुंकार भरला.

"पण याने मीच संशयाच्या भोवऱ्यात अडकले असते असं नाही वाटलं तुम्हाला?" तिचा वाघला प्रश्न.

"ते कसं?" वाघ समजत नसल्यासारखा बोलला.

"खून झाला त्यावेळी मी त्या घरी नव्हते हे लक्षात घेता मी त्या खूनात सामील होते असा संशय कोणीही घेतला असता!" रिद्धीमाचा तर्क.

"तुमच्या भावाने घेतला असता?" वाघचा सस्मित तिरका प्रश्न.

ती चपापली. काही बोलली नाही. एक उसासा टाकला.

"तुम्हाला माहीत होतं, मी सुजयचा खून करणार आहे?" वाघने उलट तिला विचारलं.

"मला कसं माहीत असेल?" ती बोलली.

"आणि तरी तुम्ही मी सांगितलेल्या ठिकाणी गेला नाहीत!" वाघ ओठ तिरका करत हताशेने हसला.

"तुम्ही काय करत आहात हे माझ्या समजाच्या बाहेर आहे!" ती बोलली.

"विश्वास ठेवा. जे काही होईल ते तुमच्या हिताचं होईल. सुजय मरणारच होता. त्यामुळे तुम्हाला त्याच्या घरून बाहेर पडावे लागणार होते. तुमच्या घरी परतावे लागणार होते. आतापर्यंत निशांतची भूक चाळवली गेली असेल. वासना भडकली असेल. त्याच्या पासूनच वाचवत होतो मी तुम्हाला." वाघने त्याची भूमिका स्पष्ट केली,

"पुढच्यावेळी जर मी काही सांगितले, तर प्लिज ऐका!" अशी विनंती करत रिद्धीमाच्या बाजूला कलत वाघने तिच्या बाजूचा दरवाजा उघडला.

ती समजली, की वाघ तिला आता जायला सांगतो आहे. ती काही न बोलता उतरली.

"आशा आहे निशांतला जसं तुम्ही प्रोटेक्ट करता आहात, तसेच मलाही करत रहाल! या!" वाघ तिला बोलला.

रिद्धीमा काही न बोलता निघाली. पण ती मिस्टर वाघचं गुपित नक्कीच गुपित ठेवणार होती. आणि तिनं ते ठेवलंही होतं. वाघ येण्याआधी ती सुशांतला सत्य सांगू शकली असती, पण तिनं

सांगितलं नव्हतं. याचं कारण, तिच्या ठायी असलेली करुणा. आणि असं जरी नसतं, तरी तिने ती गुपितं गुपितंच ठेवली असती, कारण मिस्टर वाघला तिची बरीचच गुपितं ठाऊक होती...

यावेळीही दुरून निशांत उर्फ दुर्धर हे पाहतच होता. त्याचा चेहरा लालबुंद झाला होता. त्याने नक्कीच या दोघांना एकत्र बघून वेगळा ग्रह करून घेतला असणार. हाच वाघचा प्लॅन असेल तर... त्याच्या मनात काही गोष्टी वाघ पेरत होता... त्यांतील ही प्रमुख!

रिद्धीमा जाताच मग वाघ गाडी घेऊन दुर्धर लपून उभ्या जागी गेला. तो गाडीतून उतरला.

"चीड येत असेल नाही?" वाघ कुत्सित हसला.

दुर्धर काही बोलला नाही. त्याच्या चेहऱ्यावरील रागाने अंतिम टोक गाठलं. जोराने त्याने एक चाकू आपल्या डाव्या स्लीव्ह मधून ओढला. इथं वाघला मारलं, तर दुर्धर सेफ राहणार होता. निदान पटकन तरी सुशांतचा संशय दुर्धरवर जाणार नव्हता. म्हणून इथं दुर्धरनं ते धाडस केलं होतं. दुसरं ठिकाण तरी त्याला कुठं माहीत होतं, मिस्टर वाघला शोधण्याचं? इथं राहणाऱ्या माणसाकडं वाघ येतो. रिद्धीमा इथं असल्याने तो येतोच येतो हे त्यानं पाहिलं होतं. म्हणून त्याने ही जागा निवडली होती. इथून पाठलाग करत वाघला निवांत ठिकाणी गाठून मारणं हा त्याचा विचार असावा. सुशांतही आता इथं सतत येत असल्याने त्याला वाट पहायची होती योग्य

वेळेसाठी. पण रिद्धीमा वाघ सोबत दिसल्यानं दुर्धरचा मानसिक तोल ढळला व कोणताही विचार न करता त्याने वाघवर हल्ला केला होता!

मिस्टर वाघने तो वार अडवला. वाघ समोर दुर्धरचा टिकाव लागणार तो काय! झटकन वाघने आपला ब्लेझर काढून दुर्धरच्या हाताभोवती गुंडाळला व हिसका देऊन त्याच्या हातातील चाकू खाली पडला. मग तोच ब्लेझर त्याने मागे होऊन दुर्धरच्या तोंडावर गुंडाळला. दुर्धर स्वतःच्या सुटकेसाठी तडफडू लागला. वाघला कुठंही गाठून दुर्धरने हे धारिष्ट केलं असतं, तरी त्याची परिणीती हीच झाली असती! एखादा मासा पाण्याबाहेर काढल्यावर तडफडवा, तशी त्याची अवस्था झाली होती...

"म्हणजे शेवटी तुम्ही दुर्धरला...?" मी प्रश्न पूर्ण केला नाही. नेहमी सारखीच त्याची आवश्यकता नव्हती.

वाघ समजला होता. तो हसला.

"काही खायचंय?" त्याने विचारलं.

मी नकारार्थी मान हलवली.

"झोप! मध्यरात्री उलटून गेली आहे. उद्या बोलू." तो म्हणाला.

झोपच काय मी तर भूकसुद्धा विसरलो होतो... सकाळी केव्हा मी घराबाहेर पडलो होतो, तेही न खाता... दुपारपर्यंत वाघच्या

घराबाहेर पावसात बसून होतो. वाघ आला ती संध्याकाळ करूनच. मग त्याचे हे कन्फेशन चालू झालं...

रात्र उलटली होती. तरी त्याचे सांगून संपले नव्हते... ना ते माझे पचवून झाले होते... अजून खूप बाकी होते... खूप काही बाकी होते...

"प्लिज बोला..." मी आग्रह केला.

दुर्धरच्या डोक्यावर गुंडाळलेल्या ब्लेझरला वाघने गाठ मारली होती व त्याला डिक्कीत टाकून तसाच मिस्टर वाघ गाडी चालवत होता. पाच पंधरा मिनिटांनी दुर्धरची निरर्थक हालचाल डिक्कीत थांबली होती. दुर्धरला झोपवण्यासाठी त्याने लिक्विड सायकीयॅाटिक ड्रगचा वापर केला होता. (त्याचं नांव मुद्दाम देत नाही, कारण बलात्कारी बऱ्याचदा या ड्रगचा वापर करतात...)

श्वास घेण्यासाठी उघडल्या गेलेल्या तोंडात ब्लेझरमधूनच मिस्टर वाघने ते औषध दुर्धरच्या गळी उतरवलं होतं. ब्लेझरचा आणखीन एक फायदा असा झाला, की हे ड्रग जमिनीवर सांडलं गेलं नाही. यावरून हे लक्षात येतं, की मिस्टर वाघ दुर्धरला उचलणारच होता. तो त्याला इथं घावला नसता, तर तो जिथं असता तिथून...

वाघचा मोबाईल वाजला. फोन त्याला अपेक्षित व्यक्तीचाच होता...

"हॅलो मिस्टर वाघ, तुम्ही काय बोललात रिद्धीमाला? ती किती चिंतेत आहे याची तुम्हाला काही कल्पना? मला न सांगता विचारता तुम्ही तिच्याशी बोलताच कसे? माझंच चुकलं! मला आधीच तुम्हाला तिच्याशी बोलण्यास परवानगी द्यायला नाही पाहिजे होती. आधी ती जेवढी डिप्रेस्ड् नव्हती तेवढी तुमच्यामुळे आता ती डिप्रेशनमध्ये राहू लागली आहे. प्लिज तिच्यापासून दूरच रहा!" सुशांत कावून बोलत होता.

"केसबद्दल काही प्रोग्रेस?" विषय टाळत मिस्टर वाघने विचारलं.

"अजून नाही!" सुशांत वैतागाने बोलला.

"मला कळालं खूनी कोण!" वाघ बोलला.

"काय?" पलिकडून सुशांत किंचाळलाच!

"पण तुम्ही विश्वास ठेवणार नाही!" वाघ ठामपणे बोलला.

"तुम्ही रिद्धीमाचं नांव घेणार असाल, तर नक्कीच नाही!" सुशांत.

"आणि मी निशांतचं नांव घेतलं तर?" वाघ वाकडं बोलला.

"काय? तुमची मती फिरली आहे का? त्याला साध्या गोष्टी समजत नाहीत आणि तो खून करेल?" सुशांतने वाघची अक्कल काढली.

"सुजय यांच्या हाती मिळालेल्या केसांची निशांतचे केस सॅम्पल सापडले, तर डीएनए टेस्ट करून पहा. तुमचं उत्तर तुम्हाला मिळेल." वाघ बोलला.

"हं! त्यात जमायचं काय आहे? तो घरीच आहे. आता त्याचे सॅम्पल्सच काय त्यालाच मागवतो!" सुशांत फणकाऱ्याने बोलला.

"तुम्हाला तो मिळाला तर ना?" यावेळी वाघ सुशांतची अक्कल काढत होता,

"जा घरी जाऊन शोध घ्या." वाघ त्याला हसून म्हणाला.

काही क्षणांतच मिस्टर वाघला सुशांतच्या केबिनचे फोल्डिंग दार उघडून बाहेर धावल्याचा आवाज आला आणि त्याच्या चेहऱ्यावरचं हसू अधिकच ब्रॉड झालं. सुशांत त्याच्या ट्रॅपमध्ये अडकत चालला होता...

"लड्डे गाडी काढा!" सुशांतने आपल्या एका ऑफिसरला दिलेली ऑर्डर मिस्टर वाघला रिसिव्हर मधून ऐकू आली. आणि त्याचं हसू रुंदू लागलं.

"निशांतचा फोटो सुजयच्या घरातील नोकरांना दाखवा. त्यांनी त्याला इथं घुटमळताना देखील पूर्वी अनेकदा पाहिलं असणार.

मला खात्री आहे ते त्याला नक्की ओळखतील. आणि त्याचे फिंगर प्रिंट्स तर तुम्हाला तुमच्या घरी मुबलक मिळतील. ते सुजयच्या छातीत घुसवलेल्या तुमच्याच सूरीवरील प्रिंट्सशी जुळवून पहा. त्याचे केस देखील मिळवायला तुम्हाला कष्ट पडणार नाही. तुमच्या घरात कुठे ना कुठे ते सापडतीलच. सुजय यांच्या घराबाहेरच अजून एक चाकू पडला आहे तोही लगेच ताब्यात घ्या. मला खात्री आहे त्यावरील फिंगर प्रिंट्स सुजयच्या पोटातील सुरीशी आणि निशांतशी नक्की जुळतील." वाघ थांबला.

"हे तुम्ही ठाम कसं सांगू शकता?" सुशांत विस्मित होता.

"कारण त्याने तो माझ्यावरच ट्राईक केला होता. मला मारता आलं नाही म्हणून तो पळून गेला. तुमच्या भाषेत, फरार झाला." वाघ बोलला,

"मला वाटतं एवढे एव्हीडेन्स पुरेसे असतील तुम्हाला!" वाघ त्याला विश्वस्त करत बोलला.

"तो खरंच खूनी असेल, तर... आणि तुम्ही म्हणता तसा तो फरार झाला असेल तर... त्याला शोधायचं कसं?" सुशांत आत्ता खरंच घाबरा झाला होता.

"ती तुमची जबाबदारी आहे. मी आता एका दुसऱ्या असाईनमेंटवर निघतो आहे. मला आशा आहे तुम्ही माझं पेमेंट

योग्य कराल. माझे ऑनलाईन बँक डिटेल्स आहेतच तुमच्याकडे. गुड बाय!" वाघने फोन कट केला आणि स्वतःशीच हसला.

कुटील! महाकुटील!! हा मिस्टर वाघ सैतानाला सुद्धा हातोहात गंडवेल आणि त्याला ते कळायचं सुद्धा नाही!!!

## ११. इंसाईड आऊट...

मला जाग आली, ती कुठून तरी सूर्यप्रकाश चमकत होता तो सरळ माझ्या तोंडावर आल्याने.

मी कुठे आहे हे समजायला व परिस्थितीचं आकलन व्हायला मला काही काळ गेला. आणि मग माझ्या लक्षात आलं, की मिस्टर वाघ बोलत असतानाच मी ऐकतच झोपी गेलो होतो... कधीतरी त्यानेच माझ्या अंगावर एक गोधडी आणून टाकली होती. मी ती बाजूला केली आणि मिस्टर वाघला शोधण्यासाठी त्याच्या घरभर हिंडलो.

मी हे करू शकत होतो, कारण आता मला विषारी सापांची भीती नव्हती. मिस्टर वाघने त्यांना पाळणे बंद केल्याचे काल सांगितले होते. आणि म्हणून मी त्याच्या या भयाण व सुमसान घरात असं फिरण्याची थोडीशी हिंमत करू शकलो होतो. मी फिरत होतो, पण बिचकत बिचकतच.

आणि अचानक तो माझ्या समोर आला. क्षणभर माझ्या काळजाचा ठोका चुकला.

"तुम्ही होय!" छातीवर हात ठेवून दाराला रेलत मी उद्गारलो.

"मग माझ्या घरात आणखी कोण असेल?" तो हसत म्हणाला.

"कोणी सांगावं तुम्हाला शत्रू काही कमी आहेत?" मी बोललो,

"आयता विनाकारण त्यांच्या तावडीत सापडेन." मी डोळे मिटत बोललो.

"म्हणजे मला कोणी टपकवून गेला असा तुझा भास झाला होता की काय?" त्याने थट्टा करण्याचा प्रयत्न केला.

"तसे असते तर मीही जिवंत राहिलो नसतो. तुम्हाला मारणारा मला पण कॉम्प्लिमेंट्री मारूनच जाईल." मी त्याचीच चेष्टा करत बोललो.

"म्हणजे मृत्यूचं भय वाटत नाही तर तुला?" त्याने विचारलं.

"मी तसे म्हणार नाही. जोपर्यंत माझं कार्य पूर्ण झालंय असं मला वाटत नाही, तोपर्यंत मी मृत्यूला घाबरत राहीन." मी थोडा हिरमुसलो,

"प्रिया आयुष्यातून निघून गेल्यावर वाटलं होतं, की आयुष्यातील सर्वांत मोठी भीती त्यांना गमावण्याची, ती सत्य झाली आता घाबरण्यासारखं असं काही राहिलं नाही; पण मग रियलाईझ झालं, की अजून खूप काही करणं बाकी आहे..." मी पुढे काही बोललो नाही.

मिस्टर वाघने नेहमीप्रमाणे समजून घेतलं.

"बरं आवर. तुला एका ठिकाणी यायचं आहे." तो बोलला.

"मला जायला हवं. आई खूप काळजीत असेल." मी बोललो.

"त्यांना सांग तुझं कामच चालू आहे. काही काळजी करू नको म्हणावं. काम झालं, की येशील." त्याने सल्ला दिला.

त्याला डावलून व झुगारून जाणं शक्य नव्हतं. त्यानं जाऊच दिलं नसतं. आणि तसंही त्याचं कथन अजून पूर्ण झालं नव्हतं. बरोबर होतं त्याचं. माझं काम अजून पूर्ण झालं नव्हतं. सत्य अजून माझ्या समोर उघडायचं होतं.

सत्याचे अनेक पदर माझ्यासमोर अनुत्तरितच पडले होते. ते एकएक करून उलगडल्या शिवाय मला तरी कुठे चैन पडणार होते?

"फोनवरून सांगण्यापेक्षा घरी जाऊन सांगतो. म्हणजे मला समोर बघून तिची रुखरुख व्हायची नाही." मी पर्याय काढला.

"तसंही चालेल." तो म्हणाला,

"जा आवर!" तो लिव्हिंगमध्ये गेला.

मी माझ्या समोरच असलेल्या मिस्टर वाघच्या खोलीत शिरलो.

ओल्या मातीचा आल्हाद मृद्गंध पसरला होता. सगळं कसं स्वच्छ, नितळ, निर्भेळ झालं होतं. आकाशातील काळे मेघ फिटले होते. झाडांवरील पाणी असंख्य पानापानांतून वाट काढीत धरणी जवळ करत होतं व वाट मिळेल तेथे स्वच्छंदी वाहत जात होतं. माणूस देखील असाच भरकटत जातो. नाही?! असाही एक विचार

माझ्या मनाला शिवला. पण त्या आल्हाददायक वातावरणात तो घनगंभीर विचार कुठेतरी क्षणात मागे पडला. आणि रोमरोम प्रसन्नतेनं भरून गेलं.

वाटत होतं, जणू सर्वत्र शांतीचे साम्राज्य प्रस्थापित झाले आहे. गारवा होता; पण तो बोचणारा, झोंबणार नाही, तर मन प्रसन्न करणारा होता. अंतरबाह्य खूप मोकळं झाल्याचा भास होत होता. मिस्टर वाघशी काल मोकळेपणाने बोलल्यामुळे असेल म्हणून असं प्रसन्न वाटत असेल कदाचित...

आणि अचानकच माझं मन पुन्हा निराशेने पूर्ण भरलं. कारण कालचा विचार माझ्या मनाने करताच काल मिस्टर वाघने सांगायला सुरवात केलेली घटना पुन्हा माझ्या स्मृतिपटलावर आच्छादू लागली...

आणि जरी वातावरण मोकळं झालं असलं, तरी माझं मन पुन्हा कुंध होत गेलं... प्रसन्नतेची जागा पुन्हा उदासीने घेतली...

मी घरी पोहोचलो. वाघ गाडीतच थांबला होता. तो आईसमोर येत नाही. मग मीच काम आहे व कामाची गाडी सोबत असल्याचं सांगून आईला काळजी न करण्याविषयी बोलून घरातून बाहेर पडलो. आणि गाडी मिस्टर वाघ मला नेत असलेल्या ठिकाणाकडे मार्गस्थ झाली.

आम्ही पुन्हा मिस्टर वाघच्या निवासाकडे परत चाललो होतो. कदाचित तो नेत असलेली जागा त्याच्या घरापासून जवळ असावी. फक्त मला आईला भेटायचं आहे म्हणून तो माझ्यासोबत इतक्या लांब आला होता. आणि आता आम्ही परत त्याला मला ज्या ठिकाणी न्यायचे होते, तिकडे चाललो होतो...

मी उभा होतो... त्या दुर्धर समोर...

"सूरज! हाच तो!" वाघ मला म्हणाला. त्याचे दोन्ही हात जर्कीनच्या खिशात होते.

माझी मान त्या दुर्धरकडे वळली. त्याच्या चेहऱ्यावर अतिक्रूर असे भाव होते. तोंडावर काही टाके होते. त्याचा चेहरा ठेचण्याचा प्रयत्न झाला होता म्हणून असतील. त्याची नजर एकदम करडी व गोठवणारी! मी शॉक्ड् होतो... तो फार नाही... पण जरा कमी माझ्यासारखाच दिसत होता... मी तो धक्का न सहन होऊन खाली कोसळलो!!!

मिस्टर वाघ तसाच उभा होता लेदर जर्कीनच्या खिशात हात घालून. त्याची नजर फक्त फिरली दुर्धरवरून पडलेल्या माझ्यावर.

"बोल!" तो मग दुर्धरकडे पाहून म्हणाला.

तो गप्पच बसला. मीही काही बोलण्या-विचारण्याच्या मनःस्थितीत नव्हतो.

जर्कीनमधून हात न काढताच मिस्टर वाघने बांधून ठेवलेल्या दुर्धरच्या पायावर ठोकर मारली.

"नाटकं बंद कर आणि बोल!" वाघ गुरगुरला,

"का मारलंस रिद्धीमाची मैत्रिण जोत्स्ना कर्णिकला. तुझ्या स्वतःच्या प्रियसीला पण तू मारून टाकलीस. नाही? आणि त्यांच्या मृतदेहांसोबत..."

"मिस्टर वाघ!" मी ओरडलो. अंगात त्राण नसताना ओरडलो! कारण मला त्याला त्याचं वाक्य पूर्ण करू द्यायचं नव्हतं.

तोही समजला आणि त्याने ते वाक्य तसंच अपुरं ठेवून तो पुढे म्हणाला,

"बोल!" त्याच्या आवाजात कठोरता पण सोबत थंडपणा होता.

"तुम्हाला माहीत आहे? या जगात फक्त निर्जीव वस्तूच विरोध करू शकत नाहीत!" तो अगदीच विकट असं विभत्स हास्य चेहऱ्यावर घेत बोलला.

त्याचे डोळे भयानक प्रकारे चमकत होते आणि तोंडातून लाळ गळत होती...

"म्हणून मी त्यांना प्राणहीन केलं. मारून टाकलं! आता करतील का त्या मला विरोध!" तो दात विचकत वेडगळ हसला. स्वतःच्याच विश्वात होता तो...

"मग रिद्धीमाला का अजून जिवंत ठेवलंस?" वाघचा दुर्धरला प्रश्न.

"ती जिवंत आहेच कुठं? चालतं प्रेत केलंय मी तिला! ती पण आता एक निर्जीव वस्तूच तर आहे. मी हवा तसा तिला वापरू शकतो!" त्याने त्याची विभत्स व भयानक अशी शून्यात असलेली नजर मिस्टर वाघवर फिरवली.

वाघ शांत उभा होता. दुर्धरचं हे बोलणं मला मात्र सहन झालं नाही. मी उठून त्याच्या मुस्काटात भिरकावली. तरीही राग शांत न होऊन मी त्याला भान हरपून हवा तसा मारू लागलो. मलाच समजत नव्हतं, की मी हे काय करतोय... ही माझी स्वाभाविक प्रतिक्रिया होती. रिद्धीमाबद्दल मला सहानुभूती वाटत होती, पण ती मला माझ्या प्रियसीची आठवण करून देत होती म्हणून नाही, तर ती एक खूपच शक्तिशाली स्त्री होती म्हणून पण. दुसऱ्या कोणत्याही स्त्रीवर दुर्धरमुळे बालंट येऊ नये म्हणून ती इतका त्रास सहन करत होती! तिने सर्वस्वाचा त्याग केला ही तिची महानता! आणि हा... हा त्याला आपला विजय समजतो आहे! जी तिची सर्वांत मोठी शक्ती आहे त्याला हा तिची कमजोरी समजत आहे!

याने दोन निष्पाप मुलींना ठार केलं. एवढं करून थांबला नाही, तर त्यांच्या मृत शरीराचं शोषण केलं. तसंच विडंबन असंख्य स्त्री मृतदेहाचं करून याने रिद्धीमा सारख्या अश्राप मुलीला जिवंतपणीच मरण देऊन तिचंही शोषण चालवलं होतं. इतकं करून हा शांत नाही. याची भूक अजून वाढतच चालली आहे...

माणूस म्हणून स्त्रियांची तो किंमत करत नव्हता. ना हे समजत होता, की त्यांना स्वतःच्या इच्छा आहेत. आणि त्यानुसार वागण्याचे त्यांना पुरेपूर स्वातंत्र्य आहे! याचीच तिडीक माझ्या डोक्यात विजेसारखी चमकली होती! त्याचाच झटका सहन न होऊन मी असा स्वतःचा मानसिक समतोल व त्यामुळे स्वतःवरील नियंत्रण हरवून बसलो होतो...

मला आवरून मिस्टर वाघने बाजूला खेचलं. मला शांत करण्यासाठी गट्ट धरून ठेवलं.

आता मला समजलं, मिस्टर वाघ या अशा लोकांची का गय करत नाही... मिस्टर वाघ या गुन्हेप्रवृत्ती असणाऱ्या लोकांच्या बाबतीत योग्यच वागतो असं काही क्षण मला वाटून गेलं... पण नंतर शांत झाल्यावर माझ्या लक्षात आलं, की माझा हा विचार तितकाच विभत्स आहे जितका एखादा गुन्हेगार! असंच जर वागायचं असेल, तर माझ्यात आणि एका गुन्हेगारात फरक तो काय राहील? म्हणून तर मी मिस्टर वाघला देखील गुन्हेगाराच्या

पिजऱ्यांतच नेहमी उभा करतो! त्याचं वागणं सामान्य बुद्धीला कितीही योग्य वाटत असेल, तरी ते संवैधानिक नाही म्हणून अयोग्यही आहे. हे मला क्षणात लक्षात आलं आणि आता मीच असा विचार करतोय... याची मला लाज वाटून गेली...

मी दुर्धर व माझे विचार दोन्ही असह्य होऊन तेथून बाहेर पडलो. वाघ देखील दुर्धरला डांबून ठेवलेलं ते वेअर हाऊस लॉक करून माझ्या मागून आला. मी काही न बोलता त्याच्या गाडीत बसलो. वाघने स्टेअरिंगचा चार्ज घेतला.

"तू आणि तो दिसायला किती सारखे म्हणजे अगदी फार तंतोतंत जरी नसले, तरी सारखेच. वयंही तीच. पण जिथे एकीकडे तू स्त्रीला शक्तीस्रोत व म्हणून प्रेरणास्रोत आणि आदरणीय म्हणून पाहतोस, तिथे हा फक्त एक उपभोग्य वस्तू म्हणून त्याच स्त्रीकडे पाहतो...

"एखादी स्त्री आवडली, तर तिला विचारा. जरूर विचारा! पण जर ती नाही म्हणाली, तर पुन्हा तिच्या वाऱ्याला पण उभा रहायचं नाही! आपल्यामुळे कोणाला त्रास होऊ नये इतकी साधी गोष्ट माणसाच्या कशी लक्षात येत नाही कोण जाणे...

"मान्य की प्रत्येकवेळी पुरुषच चुकीचा आहे असं असणार नाही. त्यांचाही कधी स्त्रियांकडून अपमान झाला असेल व त्या अपमानाची धग न सोसवून त्यांनी संबंधित स्त्रियांवर हल्ले केले

असतील. असं जरी असलं, तरी कोणत्याही परिस्थितीत स्त्रियांचं शोषण, विद्रुपीकरण, विटंबन करणं, त्यांना मारहाण करणं व त्यांचा जीव घेणं हे कदापि क्षमापात्र व क्षमाप्राप्त ठरत नाही. अखेर अशा संबंधित गुन्हा तो गुन्हाच! आणि त्याची शिक्षा एकच!" वाघने पुर्ती केली. तो स्वतःतच हरवून बोलत होता.

"हा पण ती संवैधानिक असावी!" मी माझ्या मूळपदी अडलेला!

गाडी तेथून हलली...

"तू आता घरला जा." तो मला वाटेत सोडत म्हणाला,

"मला माहीत आहे, तुझ्याकडे अजून बरेच प्रश्न आहेत. पण त्याची उत्तरे मी आत्ताच तुला नाही देऊ शकणार. कारण त्या घटनाच अजून घडायच्या आहेत!" तो पुढे म्हणाला.

परंतु मला हे माहीत होतं, की त्याने जरी सांगितलं असतं, तरी ते खोटं नसतं. कारण तो जे बोलला असता, तेच तो घडवणार होता!

पण 'आधी केले मग सांगितले' या उक्तीच्या तत्वज्ञानानुसार तो कृती करण्याआधी काही सांगणार नव्हता म्हणून मी त्याला बाध्य केलं नाही. शेवटी तो सांगणारच! आणि सांगण्यासाठी माझ्याचकडे येणार! तूर्त, त्याने आत्ताच दिलेला धक्का

पचवण्यासाठी मला वेळही मिळणार होता. म्हणूनच मी आग्रह नाही केला...

मिस्टर वाघची गाडी देखील त्याच वेअर हाऊसकडे पुनः मागे वळली होती...

खाली मान घालून मी वळलो व रिक्षा शोधण्यासाठी मार्गस्थ झालो...

# १२. एन एन्काऊंटर विथ अ गॉडेस...

मी स्वतःतच हरवून घरी पोहोचलो. मला काय झालं म्हणून आई देखील चिंतित. मधले चार-पाच दिवस माझे नीट बोलणे नव्हते आईशी. ना कुणाशीच... सर्व कामं तशीच पडली होती... ना जेवण जात होतं. ना झोप इतके दिवस आपलं गारुढ माझ्या भोवती टाकू शकली होती.

आणि एक दिवस मिस्टर वाघचं बोलावणं आलं. मी आईला निरोप देऊन लगेच निघालो. मी इतका तडख बाहेर पडलो होतो, की आई नक्कीच काळजीत पडली असणार हे मी जाणत होतो. मी जाण्याचे कारणही सांगितले नव्हते. पुढील गोष्टीचा वेध घेणं एवढंच माझ्या डोक्यात होतं.

मिस्टर वाघची ही केस माझ्यासाठी विशेष होती. कारण हे घडत असताना मिस्टर वाघने मला त्यात सामील करून घेतलं होतं. यावरून मला ही खात्री आहे, की मिस्टर वाघ देखील या घटनेने आतून तुटला असणार आणि म्हणून ती भीषणता सहन न होऊन त्याने ही केस पूर्ण होण्याआधी मला त्याबाबत सांगितले असेल. मिस्टर वाघ त्याच केसेस मला ऐकवतो, ज्या त्याला इमोशनली व मेंटली ब्रोक करतात. म्हणून हा माझा तर्क आहे. मिस्टर वाघ तसा

सहसा कशाने विचलित होत नाही म्हणा... पण जे घडत होतं ते विलक्षणच होतं... पण अपवाद नाही! कारण ते घडत तर होतंच ना!

मी मिस्टर वाघच्या घरी पोहोचलो. नेहमीप्रमाणे त्याचे घर मला उघडेच सापडले. दार फक्त पुढं लोटलं होतं. ते ढकलून मी पुढे गेलो.

"ये!" मिस्टर वाघची मला साद.

मी त्याच्या समोर जाऊन उभारलो.

"बस!" तो म्हणाला तसा मी बसलो.

"आज नाही आणलंस कोकम?" त्याने प्रश्न केला.

त्यावर मला आठवलं, की याने त्या दिवशी लिटरचा पूर्ण कॅन एकट्याने संपवला होता.

"गडबडीत आलो म्हणून..." मी काहीतरी उत्तर दिलं.

त्यावर मिस्टर वाघ हसला. त्याचे इतका वेळ समाधिस्त असलेले डोळे उघडले ते माझ्यावर रोखले गेले. डोळ्यांत कमालीची शांतता...

"नीलकंठ घोडके! हा तुमचा गुन्हेगार!" मिस्टर वाघ बांधलेल्या दुर्धरकडे हात करून बोलला.

तो नीलकंठ घोडके या दुर्धरच्या प्रियसीच्या मृत नारायणीच्या वडिलांसोबत त्या वेअर हाऊसमध्ये उभा होता, जेथे मिस्टर वाघने दुर्धरला डांबून ठेवलं होतं.

"पण लक्षात ठेवा, जर हा तुमच्या तावडीतून सुटून गेला, तर मग हा माझी शिकार असेल!" वाघने नीलकंठ घोडके यांना ताकीद दिली,

"घेऊन जा!" म्हणून ऑर्डर दिली.

नीलकंठ घोडके यांच्या दोन माणसांनी मग दुर्धरला त्या लाकडी खुर्चीतून मुक्त करत बाहेर फरफटवलं.

"धन्यवाद मिस्टर वाघ. तुमचं बिल तुमच्या इच्छेनुसार पेड केलं आहे. आणि माफ करा, हा तुमच्या हाती लागणार नाही!" हस्तांदोलन करत नीलकंठ वाघला बोलले.

मिस्टर वाघ फक्त हसला. त्याचं कोणाच्या खात्रीवर असं हसणं म्हणजे त्यांचे वचन सत्यात न उतरण्याचे द्योतक. म्हणजे दुर्धर नीलकंठ घोडके यांच्या हातून निसटणार होता. पण कसा? आणि त्याहीपेक्षा का???

मी आता जास्त काही विचारायचं नाही असं ठरवलं असल्याने गप्पच राहिलो. मिस्टर वाघलाच बोलू दिलं. हे समजून पण तो स्वतःशी हसलाच होता.

मिस्टर वाघ त्यांच्या मागून बाहेर येऊन उभारला. त्याने पुन्हा नीलकंठ घोडके यांच्याशी हस्तांदोलन केलं.

"बाय." तो म्हणाला.

"बाय." ते म्हणाले.

नीलकंठ घोडके गाडीत बसले व निघून गेले. थोडावेळ गेल्यावर मिस्टर वाघने देखील त्याची गाडी काढून त्यांच्या मागून घेतली.

तो खूप अंतर राखून गाडी चालवत होता. त्याची नजर घोडकेंच्या गाडीवर असल्याने ती त्याच्या नजरेआड जाणे शक्य नव्हते.

आणि एक अचानक नीलकंठ घोडके यांच्या गाडीचा मागचा टायर बस्ट झाला! फुटला! गाडी चळली गेली. एका बाजूला कलली, पण न उलटता ती पुन्हा सरळ धावू लागली. ड्रायव्हरला गाडी थांबवावी लागली. गाडी थांबताच दुर्धर त्याच्या बाजूच्या माणसाला मारून उतरला. आणि त्याने घाटातून खाली उडी घेतली. नीलकंठ व त्यांचे दोन्ही हस्तक बाहेर आले होते. ते घाटाच्या कठड्यापाशी गेले देखील, पण दुर्धरच्या मागे उडी घेण्याची कोणाची छाती धजावली नाही.

नीलकंठने तरी त्याच्या माणसांना घाटाच्या खोलीत उतरण्यास भाग पाडलेच. तो मात्र हात चोळत चरफडत वर उभा होता. मिस्टर वाघने मात्र ते दृश्य त्याच्या चालत्या गाडीतूनच पाहून आपली गाडी ३६०° फिरवली होती.

गाडी चालवता चालवता त्याने त्याच्या मोबाईलवरील एक सेव्हड् मेसेज सेंड केला आणि मोबाईल बाजूच्या सीटवर फेकला.

मिस्टर वाघची गाडी सुशांतच्या जिल्ह्याला रवाना झाली होती. बाहेर धोधो पाऊस पडत होता. वायपर चालू असून त्याचा फारसा उपयोग होत नव्हता. वाघ कॉल गाडीतील ब्लुटूथ स्पीकरशी कनेक्ट करून सुशांतशीच बोलत होता.

"सुशांत सर, निशांत तिकडे येण्याची शक्यता आहे. मी येतोय तिकडे. भेटू!" वाघ बोलला.

"हे तुम्हाला कसं माहीत?" सुशांतने शंकी प्रश्न केला.

"त्याने पुन्हा मला मारण्याचा प्रयत्न केलाय. यावेळी देखील त्याची ताकद अपुरी पडली. आता मला खात्री आहे, त्याचा रोख तुमच्या व रिद्धीमाच्या दिशेनेच येईल!" वाघ बोलला.

"पुरावा?" सुशांतने पलिकडून प्रश्न केला.

"आहे. आल्यावर आपल्यासमोर सादर करेनच! आणि जरी तो आला नसेल, तरी दक्षता घायला तुमचं काही जाणार नाही!" वाघने दटावत फोन कट केला. घडी घडी पुरावा मागण्याच्या सुशांतच्या सवयीचा त्याला राग आला होता.

त्याच्या बाजूला बसून मी त्याचं संभाषण ऐकत होतो. सुशांतचा सजीव आवाज मी प्रथमच ऐकत होतो. मी आश्चर्यचकित चेहऱ्याने व घाबरट नजरेने मिस्टर वाघकडे पाहत होतो. मिस्टर वाघने त्याच्या या खेळात मलाही सामील करून घेतला होता. पण का?

आधीच त्या दुर्धरने माझं तोंड बघितलेलं. त्यात मी त्याला कांफाडवलेलं. त्याच्या तावडीत मी सापडलो, तर काही खरं नाही... मी भीतीने गारठलो. मिस्टर वाघ सोबत असल्याने ती शक्यता शून्यच होती म्हणा खरं! पण त्याने मला यात का ओढलं?

गप्प त्याचं काय आसंल ते काम करून मला सांगितलं असतं ना?! पण नाही! मी म्हटलं यानं चार दिवसानं फोन केलाय म्हणजे काम निपटवलं असेल, पण याने तर मलाच यात ओढून घेतला. पण का???

सुशांतच्या गावी जाण्याआधी आम्ही माझ्या घरी परतलो होतो. मिस्टर वाघने मला वेळ लागेल म्हणून आईला सांगायला

सांगितलं. आणि 'जास्त प्रश्न करू नको सांगेन तितकं कर!' एवढी ताकीद दिली होती जी माझ्यासाठी पुरेशी होती.

किती वेळ लागेल मला कल्पना नव्हती. मी हाताला येईल ते कपडे गुंडळे. बॅगेत भरले व काम आहे दोन चार दिवस लागतील सांगून मी घाईने बाहेर पडलो. आताही मी काही खाल्लं नाही म्हणून आई काळजीत... मागे ओरडून काळजी न करण्याविषयी मी तिला बोललो आणि रस्त्याच्या कोपऱ्यावर उभ्या मिस्टर वाघच्या गाडीत मी चढलो.

"पिकनिकला चाललायस?" माझी बॅग बघून वाघ म्हणाला.

"तुम्ही म्हणालात वेळ लागेल म्हणून." मी उतरलो.

"इतकाही वेळ लागणार नाही. आता आणलायसच, तर टाक मागे." तो म्हणाला.

मी माझी बॅग मागील सीटवर भिरकावून दिली. वाघने गाडी काढली...

"मिस्टर वाघ, एक विचारू?" मी घाबरत प्रश्न केला.

"हं." तो गाडी चालवत हुंकरला.

"दुर्धरला तुम्हीच पळवलं असणार इतपत मी समजतो. पण का? आणि महत्त्वाचं म्हणजे कसं?" मी बिचकत विचारलं.

"नीलकंठरावांच्या गाडीच्या मागील उजव्या बाजूच्या चाकात मी जिलेटीनचा एक मायक्रो टाईम बॉम्ब फिक्स केला होता." तो गाडी चालवतच पुढे बघत म्हणाला.

"काय?" मी उडालोच.

"हे कसं शक्य आहे? तुम्ही ते केलंत कधी? आणि कसं?" मी प्रश्नांची माळ लावली.

"बॉम्बला लांबलचक निडल होती. यासाठी मला जास्त काही करावं लागलं नाही. मी आणि नीळकंठराव वेअर हाऊसच्या जवळ भेटलो, तेव्हा ते दरवाजाकडे जात असताना त्यांच्या मागे राहून मी त्यांच्या गाडीच्या टायरमध्ये तो घुसवला होता. घोडकेंचं लक्ष गेलंच खरं मी सोबत नाही म्हणून. आणि त्यांनी मागं देखील पाहिलं होतं, पण मी तोपर्यंत काम पूर्ण केलं होतं. मी त्यांना पहिल्यांदा भेटलेलो, तेव्हाच मला लक्षात आलं होतं, की ते कारमध्ये ट्युबलेस टायर्स वापरतात.

"बॉम्बच्या डायलवर मी सेट केलेल्या टायमिंगला तो बॉम्ब फुटला. त्या घाटात जाण्यास किती वेळ लागतो याचा अंदाज बांधूनच मी वेळ सेट केली होती. त्यावेळीच तो ट्युबलेस टायर फुटला.

"आता हे विचारू नको, की जर त्यांनी ट्यूबलेस टायर वापरले नसते, तर मग मी काय केलं असतं? मग काय मी गोळी घातली असती!" तो बोलला.

मी धास्तावलो. माझा चेहरा बघून त्याला समजलं, की मी काहीतरी वेगळं समजलो आहे.

"अरे टायरवर." त्याने क्लिअर केलं,

"आणि हे नीलकंठला न कळता कसं करायचं हे मला चांगलंच माहीत आहे. नाही?!" त्याने हसत माझ्याकडे बघितलं.

मी ओशाळून पुढे पाहू लागलो.

"आणि नीलकंठराव व त्यांची माणसं मेली असती तर?" मी कचरत बोललो.

"मग काय? पाच माणसं मेली असती आणखी काय?" तो सहज म्हणाला. त्याचा रोख नीलकंठ, त्याचा ड्रायव्हर, त्याची दोन माणसं व दुर्धर यांच्याकडे होता.

"तुमचा दुर्धरबद्दलचा प्लॅन फसला असता. शिवाय चार निष्पाप लोकं दुर्धर सोबत मारली गेली असती!" मी जरा चिडून बोललो.

"निष्पाप?" तो फुटून हसला.

"मी त्याच्याकडे जरा विखारी नजर फिरवली. तो पुढेच पाहत होता,

"या जगात कोणी निष्पाप नाही सूरज! आणि हे तुझ्याशिवाय कोण जास्ती चांगलं जाणू शकतं?" तोच हसरा चेहरा घेऊन त्याने माझ्याकडे बघितलं. त्याच्या नजरेत मला काही वेगळेच भाव जाणवले. जे मला वर्णनही करता येत नाही आहेत...

मी पाप भावनेने पुन्हा झाकोळून गेलो, पण मनात वाजले,

अरे हे किती कॉन्ट्रॅडीक्टरी आहे, म्हणजे हा काही दिवसांपूर्वीच मला 'इनोसंट' म्हणाला होता आणि आता म्हणतोय या जगात कोणीच निष्पाप नाही. मग काय याच्यासाठी 'निरागस' आणि 'निष्पाप' या शब्दांचे दोन भिन्न अर्थ आहेत की काय?

बरोबरच आहे म्हणा, निरागस दिसणारी व्यक्ती गुन्हेगार असू शकत नाही असं थोडीच आहे? शेवटी 'सद्कृती' व 'दुष्कृती' हा दिसण्याचा नाही, तर प्रवृत्तीचा भाग आहे. माणसाच्या मानसिकतेचा भाग आहे!

तसंही माझ्या बाबतीत खरंच आहे त्याचं. तो मला पहिल्यांदा भेटला होता तेव्हा तो मला 'निष्पाप' म्हणाला होता. पण आता मीही 'पापी' झालोय! त्याच्या नजरेत नसलो कदाचित, तरी माझ्या स्वतःच्या नजरेत नक्कीच!!! आणि म्हणूनच त्याने अशी नजर माझ्यावर टाकली होती.

म्हणजे हा आता मला 'निष्पाप' समजत नाही का? म्हणजे या प्लॅनमध्ये मला गोवून मला देखील संपवण्याच्या याने घाट घातला

आहे का? म्हणून हा मला सोबत नेत आहे का? त्या दुर्धर सोबत माझाही काटा एकाचवेळी याला काढायचा असेल का? की मग मला मारून मेला तो दुर्धरच आहे असा भास त्याला निर्माण करायचा आहे? तसं जर याने केलं, तर हा दुर्धर सोबत काय करणार आहे? एक ना दोन असे अनेक... अनेक विचित्र प्रश्न माझ्या डोक्याचा भनका उडवू लागले. मी गर्भगळीत झालो होतो. तसाच त्याच्या शेजारी बसून होतो...

"आणि विसरू नको; मी माणसं वाचवत नाही. मी फक्त गुन्हेगारांना शिक्षा देतो!" तो पुढे पाहत म्हणाला.

आता काही न बोलता याचा हा खेळ पाहणं माझ्या हाती होतं फक्त... जे होणार ते मी आता डोळ्यांनी पाहणारच तर होतो प्रत्यक्ष. आणि अनुभवणार होतो...! यानंतरही जर काही समजलं नाही, तर तो त्याचे खुलासे करायला असणारच होता... पण मी असणार होतो का? असा विचार माझ्या मनात डोकावला आणि हृदयातून कळ गेल्यासारखी वाटली. माझा हात आपसूक छातीपाशी गेला. मिस्टर वाघने नक्कीच हे पाहिलं असणार. कारण तो हसला होता...

माझ्या डोक्यात अनेक प्रश्न हेही ऐकताना उभारले होते, पण मी ते राखून ठेवले.

मिस्टर वाघचा सुशांतशी फोन चालूच होता...

"सुशांत, रिद्धीमाची काही खबरबात?" त्याचा प्रश्न.

"नाही!" पलिकडून आवाज.

रि... रिद्धीमाची खबरबात नाही म्हणजे? काय झालंय तिच्यासोबत...? मिस्टर वाघने दुर्धरला सोडून दिल्याने रिद्धीमावर हा प्रसंग ओढवला गेलाय का...? तिचं काय होईल आता? नाही! काय झालं असेल...?

"निशांतबद्दल अजूनही तुम्हाला शंका आहे, की पटली खात्री?" वाघने त्याला विचारलं.

"चांगलीच! मला तर शंका आहे. रिद्धीमाला त्यानेच तर पळवलं नसेल?... तुम्ही म्हणालात तसं त्यानेच सुजय शहा यांना मारलंय हे कन्फर्म झालंच आहे!" तो म्हणाला.

"त्यात मला शंका नव्हतीच!" वाघ माझ्याकडे पाहून स्माईल करत म्हणाला.

मी एक डिस्गास्टिंग लूक त्याला दिला.

"त्याचा मोटिव्ह काय असेल हे अजून समजत नाही? त्याने सुजयला मारण्याचं काय कारण?" सुशांतची शंका.

"मी तुम्हाला आधीही बोललोय. ही हॅस अ स्ट्रॉंग अफेक्शन टुवर्ड्स युअर् सिस्टर्. त्यातूनच त्याने हे गुन्हे केलेत." वाघ सुशांतच्या गळी उतरवत होता.

"म्हणजे?" सुशांतचा गोंधळ वाढला.

"असूया! रिद्धीमा यांची माझ्याशी जवळीक असल्याच्या गैरसमजातून त्याने माझ्यावर हल्ला केलाय. मेबी त्या सुजय यांच्या घरी रहायला गेल्याने सुजय व रिद्धीमाबद्दल त्याच्या मनात विचित्र संशय निर्माण झाला असेल." वाघने त्याचा बनावट तर्क बोलून दाखवला.

दुर्धरच्या मनात वाघनेच हा दुर्विचार रुजवला होता. दुर्धर रिद्धीमासाठी गुन्हा करू शकत होता. हा! हे बनावट नक्कीच नव्हतं!

"मिस्टर वाघ!" सुशांतचा आवाज कातरकापरा झाला,

"तुम्ही म्हणता ते खरं असेल, तर रिद्धीमा देखील संकटात असू शकते..." तो घाबरा बोलला...

मी मात्र पूर्ण प्रवासात शांत बसलो होतो. या भागात प्रवेशल्यापासून इथं पावसाचा टिपूस देखील नव्हता. एका हॉटेलच्या पार्किंगला गाडी थांबली.

"बॅग?" मी म्हणालो.

"घे सोबत." वाघ उतरत म्हणाला.

आम्ही उतरलो तेव्हा, मी हिंमत करून बोललो,

"मिस्टर वाघ, सिरियस्ली एक विचारायचं होतं. खरं सांगाल?" मी त्याला गाडीचा दरवाजा बंद करत म्हणालो.

"त्याशिवाय तू दुसरं काही करतोस का? बोल!" तो माझ्या पुढे चालत म्हणाला.

"मघाचाच प्रश्न. तुम्ही टायर बस्ट केलात दुर्धरला सोडवायला हे ठीक. पण यात नीलकंठ व त्याची दोन माणसं व ड्रायव्हर मारले गेले असते, तर?" मी चिंतित मुद्रेने विचारले.

"मग काय? मेले असते तर मेले असते. चांगल्या कॉजसाठी त्यांचा मृत्यू झाला असता आणि काय?" वाघ सहज बोलला.

"तुम्हाला दुःख झालं नसतं?" त्याच्या उत्तराने चक्रावून मी विचारलं.

"सत्यत: झालं असतं, माझा प्लॅन फसला असता ना!" त्याने मागे न पाहता न थांबता उत्तर दिलं,

"पण मी काही करत असताना त्यात शक्यतांची शक्यता नसते हे माहीत नाही का तुला?" त्याने मागे पाहून माझ्याकडे पाहत स्मित केलं.

खरं आहे! मिस्टर वाघ को-इनसिडेंस व इन्स्टिन्क्टवर विश्वास ठेवत नाही! तो त्याला हव्या तशा गोष्टी घडवण्यावर विश्वास ठेवतो! आणि जेव्हा तो त्याला हव्या तशा गोष्टी घडवत असतो, तेव्हा त्याने ठरवल्यापेक्षा वेगळं काही घडणं शक्यच नसतं!

आम्ही उभे होतो, एका सुईटच्या बाहेर. मिस्टर वाघने एका विशिष्ट प्रकारे नॉक केलं. दरवाजा उघडला गेला. समोर एक अत्यंत सूंदर मुलगी उभी होती. तिच्या सौंदर्याचं वर्णन शब्दांत होणं कठीण आहे आणि एवढा शब्दसंभार माझ्या गाठी नाही म्हणून मी ते टाळतो. पण ती कोण असेल याचा मला अंदाज यायला वेळ लागला नाही.

ती रिद्धीमा होती!

हा मला खूप मोठा धक्का होता. रिद्धीमाला पळवलं वाघने. आणि तो बिल फाडत होता दुर्धरवर. नक्की करणार काय होता हा...???

बावरलेली अशी ती माझ्याकडे बघत होती. तिच्या मुखावर घाबरलेल्याच्या छटा उत्पन्न होऊ लागल्या. ते पाहून,

"माझा मित्र, सूरज." मिस्टर वाघ तिला म्हणाला.

ती जरा रिलॅक्स झाल्यासारखी झाली. असा अचानक कोणी अनोळखी तिच्या रूम समोर उभा पाहून तिचं असं विचलित होणं साहजिक होतं.

"सूरज, तुला भेटायचं होतं ना, ती रिद्धीमा ही!" तो मला म्हणाला.

आणि रिद्धीमाच्या आमंत्रणाची वाट न पाहताच स्वतःच जागा करत रिद्धीमा व दरवाजा यांच्या मधून तो आत सरकला. मी मात्र दारातच उभा रिद्धीमाशी नजर चोरत. तिच्या परवानगीशिवाय मी आत कसा जाणार होतो? तीही मग बाजूला झाली. हे तिचं मला आत येण्याचं निमंत्रण. मी आत झालो.

"इथून पुढे काही दिवस हा इथंच राहील!" मिस्टर वाघने सेटीचा ताबा घेऊन त्यावर पैस पसरत त्याने हुकूम सुनावला.

रिद्धीमा बिचकली आणि मी धक्कावलो. माझ्या हातातली बॅग माझ्याही न कळत खाली घसरली व त्याचा धप्पकन आवाज झाला.

अरे हा काय करतोय... काय म्हणतोय...? हा इकडे येताना आपलं डोकं घरी ठेऊन आला आहे का? एका मुलीकडे पाहणं देखील मला जड जातं आणि हा म्हणतो हिच्या सोबत मला इथं रहावं लागणार आहे... माझा नाही तरी किमान याने हिचा तरी विचार करावा. काय वाटेल हिला...

माझा प्रश्नवाचक चेहरा पाहून त्याने रिद्धीमाकडे पाहिलं. मग माझी घाबरी नजरही तिच्याकडे वळली. तिची नकळत होकारार्थी मान हलत होती. याने तर मला अधिकच धक्का बसला. आणि त्या धक्क्याने मग मीही बसलो!

मिस्टर वाघ उठला. त्याच्या विंटेज कलेक्शन मधली 'नगंट एम 1895' रिव्हॉल्व्हर शोल्डर होलस्टर मधून काढून सप्रेसर बसवून त्याने माझ्या समोर धरली. ही एकमेव अशी रिव्हॉल्वर आहे जीस सप्रेसर (सायलेन्सर) अटॅच होतं.

"कशी चालवायची हे तुला माहीत आहेच." तो बोलला.

म्हणजे मागे त्याने मला मुद्दाम त्याच्यावर गोळी चालवायला उकसावलं होतं!!!

हा मला टेस्ट करत होता, मला गन हाताळता येते का ते तो पाहत होता, तर... त्याने ही रिस्क घेतली होती. कारण त्याला माहित होतं, मी त्याच्यावर गन नाही चालवणार!!! हा खरंच सैतान आहे!!!

"कोणत्याही परिस्थितीत हिची रक्षा करायची!" तो मला म्हणाला.

मी वाघकडे बावरलेल्या व घाबऱ्या नजरेने पाहत होतो.

"काळजी करू नको." तो बोलला,

"ट्रिगर दाबल्यास याचं सिलेंडर पुढं झुकतं. त्यानं सिलेंडर आणि बॅरल मधील गॅप कमी होतो. त्यामुळे आवाज सप्रेस होतो. जास्त आवाज नाही करायची ही. रिकॉईल रेट देखील बराच कमी आहे. बिकट परिस्थिती आलीच, तर तू यावर विसंबू शकतोस! मेक ऑल दि सेव्हन राऊंडस एम्टी!" वाघ लीलया बोलला.

मी ती रिव्हॉल्व्हर हाती घेतली. न घेऊन कोणाला सांगणार होतो. ही याची कोणती लीला हे काही मला समजेना...

"पुढच्या इन्स्ट्रक्शन्स नंतर करतो." सांगून वाघ निघून गेला.

तो जाताना मी आधारासाठी स्वतःच्याच गुडघ्यांवर हात टेकवून उभा राहिलो होतो. तो गेल्याने त्या खोलीत रिद्धीमासह एकटा असणारा मी खूप अवघडलेला उभा होतो.

"बी कंफर्टेबल!" तिचा मंजुळ आवाज कानात घुमला.

पण मी इथं या अनोळखी आणि त्याहीपेक्षा मुलीच्या खोलीत कंफर्टेबल कसा होऊ शकणार होतो?

तरी मी बॅग बाजूला कोपऱ्यात सारली आणि मिस्टर वाघ मघाशी बसलेल्या जागी सेटीवर बसून राहिलो. मोबाईलशीच माझा चाळा चालू होता. आतापर्यंत घडलेल्या गोष्टी मी टाईप करून घेत होतो.

तीही तिच्या मोबाईलशीच काही खेळत बेडवर बसली होती.

मधूनच माझी नजर तिच्या दिशेने जायची. आणि मला ती माझ्यावरच तिने मृगाक्षी पाणीदार टपोरे डोळे रोखून पाहत असलेली दिसायची. मग आम्ही दोघे नजर चोरायचो. चुकून नजरानजर झाली असे एकमेकांना उगीचच भासवायचो. वातावरण दोघांसाठीही अवघडलेलं... ऑक्वर्ड्... अनकंफर्टेबल...

"तुम्ही नक्की कोण?" तिने अनपेक्षित प्रश्न विचारला.

तिने पुढाकार घेतला म्हणून. नाही तर मी वर्षानुवर्षे जरी तिच्यासोबत या खोलीत कोंडला गेलो असतो, तरी मी तिच्याशी एक शब्द बोललो नसतो.

"मी सूरज गाताडे. फ्रिलान्स लेखक आहे. कदाचित तुम्ही काही वाचलं असेल मी लिहिलेलं." मी धाडस एकवटून बोललो.

तिने जर माझं काही वाचलं असेल, तर ही मला ओळखेल आणि तिच्यात व पर्यायाने माझ्यात थोडी सहजता येईल म्हणून मी तसे विचारले. बाकी मी स्वतःला लेखक समजत नाही.

"नाही. पण काही असेल तर द्या वाचायला. वेळ जाईल." ती म्हणाली.

इतकं रुक्ष? म्हणजे मी वेळ जाईल अशाप्रकारचं म्हणजे टुकार लिहितो का? मिस्टर वाघने वर्णन केलेली ही आणि आता मी अनुभवत असलेली ही किती भिन्न आहेत. मिस्टर वाघने हिच्याबद्दल जे सांगितलं त्याप्रमाणे ही ममत्व असणारी नक्कीच भासली नाही तिच्या या रुक्ष बोलण्याने.

मग आठवलं. मिस्टर वाघशी पण तर ही अशीच वागली होती, जोपर्यंत तिचा त्याच्यावर विश्वास बसला नव्हता. कदाचित दुर्धरमुळे ती अतिदक्षता पाळत असेल, कोणाला अगदी जवळ येऊ देत नसेल तिची खात्री होईपर्यंत. असो, ठीक आहे. हे ठीकच आहे!

स्त्रियांनी स्वतःची रक्षा स्वतःच करावी. त्या कमजोर थोडीच आहेत? त्याच तर स्वतःच शक्तीस्रोत आहेत!

मी तिला 'अ मिटिंग विथ मिस्टर वाघ', 'अ स्ट्रेंज थिंग - दि सायरन कॉल्स', 'एजंट एक्स', 'फ्लेम', 'वृत्र', 'अ प्योर् वन - दि एप्रिल चेज्' 'अंतःपुर', 'डेथ विल', 'अ हेवी प्राईझ्', अशा काही कथा वाचायला दिल्या. या माझ्याकडून लिखित सिक्वेन्स नुसार नाहीत. आधी पाठवलेली रिद्धीमा आधी वाचून पाहिलं या अंदाजाने मी तसे सिक्वेस तिला पाठवले होते.

लहान व स्त्री सुरक्षेविषयीच असलेली पहिली 'अ मिटिंग' वाचून तिला इंटरेस्ट निर्माण होईल व माझ्याकडे बघण्याचा तिचा दृष्टिकोनही स्वच्छ होऊ लागेल म्हणून मी आधी तीच सेंड केली आणि हेच विचार पुढील गोष्टींसाठी...

आपण म्हणाल मी इतका विचार का करत होतो. तर रिद्धीमा हिने इतकं काही पाहिलेलं असताना तिला माझ्याविषयी इंसिक्युरिटी वाटणं साहजिक होतं आणि तिच्या मनात जर तसा माझ्याविषयी विचार आला असेल, तर मला तो काढून टाकायचा होता म्हणून. नाही तर मला त्या खोलीत थांबणे शक्य झाले नसते. माझ्या मनात काही नसताना समोरच्या मुलीला माझी नाहक भीती वाटावी असं माझं म्हणणं नव्हतं. माझी नजर स्वच्छ आहे, मन साफ आहे हे मला तिला ठसवायचं होतं म्हणून...

या कथांमधील काही जरी हिने वाचल्या, तरी माझे विचार लक्षात घेऊन हिला माझ्याविषयी थोडी तरी शाश्वती वाटेल अशी मी आशा केली.

मला हे माहीत होतं, की हिने मला इथं थांबू दिलंय ते मिस्टर वाघ मला घेऊन आलाय म्हणून. त्यामुळे तिच्या मनात मला स्वतःविषयी विश्वास निर्माण करणं गरजेचं वाटलं. त्यासाठीच मी तिला काही कथा ब्लुटूथने सेंड केल्या. निदान या वाचून तरी मी स्त्री या शक्तीचा किती आदर करतो हे तिच्या ध्यानात येईल ही माझी समजूत होती... त्या इबुक्समध्ये माझे फोटोही असल्याने मी खोटं बोलत नाही हेही तिला समजेल याद्वारे मी ते केलं होतं. माझ्या बाजूने तिला सुरक्षित वाटावं याचा मी जमेल तसा प्रयत्न केला होता.

ती वाचत होती. अगदी मन लावून. नाही तरी मन लावायला या खोलीत दुसरं होतं तरी काय? नाही तर मी काही इतकं चांगलं लिहीत नाही, की कोणी त्यात इतकं रमून, हरवून जावं. खोली अतिशय कॉम्पॅक्ट होती. पण सुविधा मात्र सर्व होत्या. तरी मी वेळ घालवण्यासाठी टीव्ही पाहू शकत नव्हतो. कारण या परिस्थितीत मी काय टीव्ही पाहू शकणार? शिवाय तिला वाचनात व्यत्यय आला असता. माझं लिखाण कधीच थांबलं होतं. सर्व रेकॉर्ड्स

लिहून झाले होते. आता अजून पुढे काही घडलेच नाही तर काय लिहिणार... माझी कथाही रिद्धीमा आणि मी एका खोलीत बंद झाल्या ठिकाणी थांबली होती.

माझी नजर राहून राहून रिद्धीमावर चालली होती. या कृत्रिम खोलीत तीच तर एक सजीव होती. तिला याची जाणीव होत असणार त्यामुळे तिला विचित्र वाटू नये म्हणून मग मी खोलीतून बाहेर पडण्याचा विचार केला. मी उठलो. तिने माझ्याकडे पाहिलं.

"मिस्टर वाघना फोन लावून येतो." मी बोललो आणि बाहेर पडलो.

"खोली लॉक करून पार्किंगला ये!" मला वाघने फोनमधून सांगितले.

रिद्धीमाला कळवून मी ती रूम व्यवस्थित लॉक करून खाली उतरलो.

काही वेळातच मी त्याच्या शेजारी त्याच्या गाडीत बसलो होतो. आमच्या सुरक्षेसाठी तो इथेच थांबला होता. त्याने स्वतःसाठी रूम बुक केली नव्हती. कारण जे घडणार आहे तो त्याचा प्लॅन आहे हे कुणाच्या लक्षात येऊ नये म्हणून.

दुसरीकडे जिथं मी दुर्धरने रिद्धीमाला पळवलं आहे हे समजून बसलो होतो; तिथं मला कळतं काय, तर मिस्टर वाघनेच तिला इथं हॉटेलवर आणलंय. आणि मीच तिच्यासोबत राहणार आहे...

"तुमचा नक्की काय प्लॅन आहे?" मी काही समजण्याच्या पलिकडे गेलो होतो.

"का? तुला माहीत नाही?" त्याने हसून माझ्याकडे पाहिलं.

"दुर्धरला संपवणार आहात?"

"हो."

"मग त्याला संपवण्याचे खूप चान्सेस होते तुमच्याकडे, तरी तुम्ही प्रत्येकवेळी त्याला सोडून दिले. ते का?"

"कळेल."

मला माहित होतं हेच उत्तर मिळणार होतं. आधीही त्याने हेच उत्तर तर दिलं होतं.

"तू फक्त एक कर. दुर्धर इथे येणार हे नक्की! त्याला रिद्धीमा सोबत हवं ते करू दे!" तो शांत बोलला.

"तुमचं डोकं फिरलंय का? आणि हेच करायचं होतं, तर मग मला इकडं का आणलं आणि का सांगितलं तिचं रक्षण करायला?" मी ओरडलो,

"तो तिच्याशी काहीही करू शकेल. याचं तुम्हाला काहीच वाटत नाही. मी पण ते पाहत राहावं असं तुमचं म्हणणं आहे?" माझी कानशिलं गरम झाली होती.

"इसी बॉय!" तो मला म्हणाला,

"काय सांगतोय ऐकून घे. तो मरेल, पण तुझ्या किंवा माझ्या हातून नाही!"

"मग? रिद्धीमा?" मी विचारलं.

"कळेल." तो परत एवढंच बोलला.

"तो येईलच कशावरून?" माझा प्रश्न.

"कारण त्याला मीच मेसेज करून लोकेशन पाठवलं आहे." वाघने बॉम्ब फोडला.

"काय?" मी मोठ्याने ओरडलो.

"ए! ओरडू नको रे!" तो वैतागला.

"त्याच्याकडे मोबाईल कुठला आला?" मी विचारलं.

"नीलकंठकडे त्याला सुपूर्द करताना मीच तो त्याच्या खिशात टाकला होता."

"आणि तो मोबाईल?"

"दुर्धरचाच आहे. नीलकंठ यांनी त्याला शोधण्याचं काम माझ्याकडे दिलं, तेव्हा त्याचं सर्व सामान त्यांनी मला सुपूर्द केलं होतं." वाघ खुलासा करत होता,

"त्याला मारण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी त्यांनी त्याचे आयडी, फोन, वगैरे त्याच्याकडून जप्त केले होते. त्याची डेडबॉडीची ओळख पटू नये म्हणून." वाघने कथन पूर्ण केलं.

यामुळेच वाघला दुर्धरबद्दल सर्व काही आधीपासूनच माहीत होतं तर...

"अच्छा! पण नीलकंठ घोडके यांचं दुर्दैव, की दुर्धर त्यांच्या प्रयत्नांत वाचला आणि त्यांच्यापासून पळताना सुशांत व रिद्धीमा यांच्या गाडीला धडकला..." मी धागे जुळले.

"राईट! आता तुला एवढंच करायचं आहे, की दुर्धर जेव्हा रिद्धीमाच्या खोलीत येईल, तो नक्की तिच्याशी गैरवर्तन करू पाहिलं. पण त्या आधी तो तिला ठार मारण्याचा प्रयत्न करेल. जोपर्यंत ती मरत नाही, तो तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा विचार करणार नाही! त्यामुळे ती जिवंत असे पर्यंत तिच्या अब्रूची चिंता नाही. म्हणून तो तिला मारण्याचा प्रयत्न करत असताना, जोपर्यंत तुला अगदीच गरज वाटत नाही तोपर्यंत तू काही एक्शन घ्यायची नाहीस! फक्त सज्ज रहा! मी जर वेळेत पोहोचलो नाही, तर आणि रिद्धीमाचा जीव अगदीच धोक्यात वाटला, तरच

दुर्धरला ठार कर. तेव्हा अजिबात त्याला मारण्यास कचरू नको!" सूचना करत असताना मिस्टर वाघ अतिशय गंभीर होता. त्याने त्याचा 'नो नॉनसेन्स' अवतार धारण केला होता. कित्येक दिवसांनी मी खऱ्या मिस्टर वाघला पाहत होतो!

"माफ करा यावेळी विचारतोय, कारण एक शंका मनात आहे, ती मला शांत बसू देणार नाही. विचारू?"

"हं!"

"दुर्धर रिद्धीमाला मारायलाच येईल हे तुम्ही कसं ठरवलंत?" मी विचारलं.

"त्याला नाकारलेलं सहन होत नाही. विसरलास?"

"पण रिद्धीमानं त्याला उघड कुठं नाकारलं आहे?"

"त्याशिवाय का ती तुझ्यासोबत एका रूममध्ये राहत आहे?" वाघ क्रूर हसला.

आणि मी तंतरलो. म्हणजे यासाठी त्याने मला इथं असं आणलं तर...

**'ही इज अ प्योर् डेव्हिल सोल!!!'**

"रूम कुणाच्या नांवे आहे? माझ्या?" मी विचारलं.

"रिद्धीमाच्या! ती एका मुलासोबत एकत्र राहण्यासाठी स्वतः रूम बुक करते हा दुर्धरसाठी अधिक चिडण्याचा विषय ठरेल!" वाघ म्हणाला.

"या रागापायीच तो रिद्धीमावर हल्ला केल्याशिवाय राहणार नाही. हं?" मी विचारलं.

"हो!" तो म्हणाला.

"आणि माझ्याकडून तो मारला गेला तर? मी जेलमध्ये जाईन, की तुम्ही माझा न्याय कराल?" मी कोरड्या चेहऱ्याने विचारले. 'तुम्ही' वर माझा जोर होता.

"तशी वेळ येणार नाही याची मी काळजी घेईन!" तो मला म्हणाला.

तसाही मिस्टर वाघचा प्लॅन अयशस्वी कसा होईल? तो होऊ नये म्हणूनच तो इथे थांबला आहे...

"आता निघ. तुझं सामान लपवून ठेव. सुशांतला कळता काम नये, की तू तिथं राहला आहेस. तू रिद्धीमाच्या खोलीतच बसून रहा. कोणाची चाहूल लागली, तर लगेच लपायचं 'नगंट' तयारीत ठेऊन. माझी खूण लक्षात आहे ना? त्या व्यतिरिक्त कुणीही नॉक केलं, तर समज मी नसून दुसरे कोणी आहे. जा!" तो बोलताना माझ्याकडे पाहत देखील नव्हता.

'नगंट'चा विषय निघताच मी ती चापचली. शर्टात ती सायलेन्सर लावलेली भली मोठी रिव्हॉल्व्हर अगदीच उठून दिसत होती. म्हणूनच मला वाघने माझी बॅग त्याच्या कारमध्ये ठेवण्यास न सांगता जवळ ठेवल्यास सांगितले असावे, वेळप्रसंगी लपवता यावी म्हणून. तरी मी ही शंका दूर करण्यासाठी वाघला विचारलं,

"दुर्धर मेल्यावर पोलीस आलेच, तर ही दडवू कशी?" मी धास्तीने विचारलं.

"तुझ्या बॅगेत ठेवून दे." तो शांत बोलला.

"बॅग तपासली तर?" माझी भीती.

"माझ्यावर विश्वास ठेव! ये! रिद्धीमा एकटी आहे."

वाघने मला तेवढंच सांगितलं होतं, जेवढं त्याला माझ्याकडून अपेक्षित होतं. जे मला करायचं होतं. त्यापेक्षा एक शब्दही त्याने जास्तीचा सांगितला नव्हता, ज्यात मी भाग घेणार नव्हतो. मी पॅनिक होऊ नये म्हणून त्याने हे केले असेल वा प्लॅन पार पडल्या खेरीज पूर्णतः त्याला मला व रिद्धीमाला देखील कळू द्याचा नसावा म्हणून लपवून ठेवला होता.

तो काय घडवून आणणार आहे ते मला आधी कळालं असतं, तर मी नाहीच म्हणालो असतो! ही वाघला खात्री असणारच! म्हणूनच अधिक काही त्याने त्यावेळेस सांगितले नव्हते. मीही

विचारले नव्हते. विचारून तो सांगणार नव्हता! मला त्याचं मान्य करण्यावाचून मार्ग नव्हता...

मी मग काही न बोलता गाडीचा दरवाजा उघडून खाली उतरलो. एक नजर वाघकडे टाकली. तो अजूनही माझ्याकडे पाहत नव्हता. त्याची चर्या अधिकच तीव्र झाली होती.

# १३. लिडिंग... मिस्लिडिंग...

मी माझं सामान उचललं. तसं रिद्धीमाने प्रश्नार्थक माझ्याकडे पाहिलं. तिच्या नजरेत आता अनोळखीपणा नव्हता. एक-दोन कथा तिच्या वाचून झाल्या असाव्यात.

"मिस्टर वाघनी सांगितलं आहे." मी म्हणालो.

'वाघ' इतकं उत्तर तिच्यासाठी पुरेसं होतं. मला आणखी काही सांगावं लागलं नाही, कारण तिला आणखी काही विचारावं वाटलं नाही.

"आलोच." मी समानासहित बाथरूम मध्ये घुसलो.

बॅग तिथं सोडून मी पुन्हा रिद्धीमा असलेल्या खोलीत. शर्टाच्या आत ठेवलेली नगंट मी बाहेर काढून हातात घेतली. रिद्धीमाची पुनः प्रश्नवाचक नजर.

"मिस्टर वाघनी सांगितलं आहे!" माझं परत तेच उत्तर.

मी बसून राहिलो. माझा हात नगंटलाच लागलेला.

संध्याकाळ झाली, तरी काही घडले नाही. दरम्यान आम्ही चहा नाश्ता केला. ऑर्डर रिद्धीमानेच दिली होती. मी कितीही वेळ उपाशी बसू शकतो. पण तिने माझ्यासाठीही ऑर्डर दिलीच होती.

तिच्या ममत्वाचा अनुभव तिच्या या वागण्याने मीही अखेर घेतला. पण या दरम्यान मी अवघडेलाच होतो.

'ममत्व' या शब्दांचा कुणी लक्षपूर्वक विचार केला आहे का मला माहित नाही... पण मी जेव्हा या शब्दापाशी घुटमळलो, तेव्हा माझ्या ध्यानात आलं, की ममत्व हा शब्द एखाद्याला माझे म्हणजे 'स्वतःचे' समजण्याचा भाव. यातूनच उत्पन्न होतो निःस्वार्थ सेवाभाव. 'वसुध्यैव कुटुंबकम्' या उक्तीचा समूळ अर्थ 'ममत्व' एका छोट्या शब्दात सामावला आहे.

मला आग्रहानं खाऊ घालणारी रिद्धीमा खरंच वात्सल्याने ओतप्रोत भरली होती...

या सगळ्या दरम्यान मिस्टर वाघ सुशांतच्या हेडकॉर्टर्सला धडकला होता.

त्याने कोणाचीही तमा न बागळता सरळ सुशांतच्या केबिन गाठली होती. त्याने एक काळा शर्ट असलेली पिशवी सुशांतसमोर त्याच्या टेबलवर आपटली.

"हे काय आहे मिस्टर वाघ?" सुशांतने चिडून विचारलं.

"हा शर्ट ओळखत नाही? निशांत माझ्यावर हल्ला करण्यासाठी आला होता त्याचा हा पुरावा. त्याचाच शर्ट आहे हा!

त्याच्याशी हातापाईत माझ्या हाती लागला. तो मात्र निसटला." वाघ सुशांतच्याच आवाजाच्या टोनमध्ये बोलला.

मिस्टर वाघचा गंभीर चेहरा व आवाज पाहता मिस्टर वाघ खोटं बोलत नसल्याचा सुशांतचा समज झाला.

"रिद्धीमा?" वाघचा सुशांतला प्रश्न.

"सापडली नाही अजून." सुशांतचं हताश उत्तर.

"तरी तुम्ही रिलॅक्स आहात?" वाघने विचारलं.

"तुमच्याकडे काही पर्याय असेल तर सांगा!" सुशांत ओरडला.

"निशांतला शोधा. रिद्धीमा मिळेल." वाघने प्रश्नच निकालात काढला.

"तेच करतोय. त्याला शोधायला संपूर्ण जिल्ह्यातील पोलीस मी कामाला लावले आहेत."

"तुमचे डॉग स्कॉड कामाला लावा. या शर्टाचा उपयोग करा. त्याचे ताजे ट्रेसेस असतील याच्यावर. तो याच शहरात असेल. सापडेल." वाघ म्हणाला.

"हे तुम्ही कशावरून ठरवताय?" सुशांतने विचारलं.

"रिद्धीमा कुठे राहते? इथेच ना?" वाघ तिरकस प्रश्नातून उत्तर देत बोलला.

"पण तीच गायब आहे आणि माझ्या अंदाजाप्रमाणे तोच तिला घेऊन गेला आहे!" सुशांत अंदाजे बोलला.

"तुमचा तर्क मान्य केला, तरी तुम्ही निशांतचा शोध घेताय तेव्हापासून तो तुम्हाला सापडला आहे का? तर नाही! याचा अर्थ तो शहरातून बाहेर पडला नाही! समजतंय!" वाघने तर्क सांगितला.

सुशांतच्या डोक्यात प्रकाश पडला.

"या! राईट!" म्हणत सुशांतने रिसिव्हर ताब्यात घेतला,

"हॅलो कंट्रोलरूम, सर्च रद्द करण्यास सर्व डिव्हिजन्सला कळवा. मी स्वतः तपासास निघतोय." त्याने रिसिव्हर आपडला आणि तो ती शर्ट असलेली पॉलिथिन बॅग घेऊन बाहेर धावला.

मिस्टर वाघ निवांत त्याच्या मागून गेला.

काही वेळातच डॉग स्कॉड तयार होती. सुशांतने हाती गल्व्हज परिधान केले होते. त्याने तो शर्ट कॅरीबॅग मधून बाहेर काढून त्याचा वास कुत्र्यांना हुंगवला. मिस्टर वाघ मागे उभा होताच. तो वास लक्षात येताच ती कुत्री हरकतीत येऊन माग काढू लागलीत.

डॉग स्कॉड दुर्धरला हुंगत हुंगत शहरभर फिरू लागली. दुर्धर शहरात आला त्या जागेपासून ते तो जिथून हॉटेलच्या मार्गाला लागला ती ठिकाणं सुशांत व मिस्टर वाघ डॉग स्कॉडच्या

माध्यमातून पालथी घालू लागली. ठरवलेली वेळ गाठणं अशक्य झालं असतं. कदाचित आता माझ्यावरच भिस्त होती...

यात खूप वेळ जात होता. मिस्टर वाघने त्याचा मोबाईल पाहिला.

"हॉटेल ब्लू व्हेन्यू!" वाघ बोलला.

"काय?" मागे पाहत सुशांतने विचारलं.

"निशांतचं लोकेशन!" वाघ सहज बोलला.

सुशांत फुटललाच!

"काय? तुम्ही त्याला ट्रॅक करताय?" तो वैतागाने ओरडला.

"हो!" वाघ निरागस भावाने बोलला.

याने सुशांतला अधिकच तिडीक गेली.

"मग आम्हाला कुत्र्यागत का हिंडवलं?" सुशांत चिडला.

"कुत्र्यागत नाही. कुत्र्यांसोबत हिंडवलं." वाघने तेव्हढ्यातही मस्करीची जागा काढलीच.

"मिस्टर वाघ!" सुशांत ओरडला.

त्याच्या आवाजाने कुत्र्यांसोबत त्यांना आवरणारे ऑफिसर्स देखील जाग्यावरच थांबले.

"न जाणो माझी बहिण कोणत्या परिस्थितीत आहे आणि तुम्ही इथं चेष्टा चालवली आहे?" सुशांत चिडून ओरडला.

"कारण तुम्हाला निशांत या शहरात आहे हे पटावं म्हणून." वाघ निवांत बोलला.

"तुम्हाला परिस्थितीची गंभीरता समजतीए मिस्टर वाघ?" सुशांतने त्राग्याने विचारले. त्याचे हात मिस्टर वाघच्या कॉलरला पोहोचले होते.

तो काय परिस्थितीचं गांभीर्य समजणार? परिस्थिती त्यानेच तर गंभीर करून टाकली होती!

"तुमची बहीण तुम्हाला सुरक्षित भेटल्याशी कारण. मी रिद्धीमा यांना त्यांच्या रक्षणाचं वचन दिलं आहे ते मी फोल जाऊ देणार नाही!" वाघ अतिगंभीर बोलला.

त्याने सुशांतचे हात त्याच्या कॉलर पासून अलगद दूर केले, सुशांतच्या नजरेत पाहत.

असो, मिस्टर वाघने सुशांत अँड टीमला गांवभर फिरवण्याचं खरं कारण हे होतं, की तो फक्त दुर्धर त्या हॉटेलपर्यंत पोहोचावा यासाठी वेळ खर्ची घालत होता. नेमकं काय करायचं मनात आहे याच्या? काही समजत नाहीये...

# १४. फायनल शूट आऊट.. वन्स अँड फॉर ऑल..

दारावर टकटक झाली... मी सावध झालो. रिद्धीमाचीही सावध नजर दारावर फिरली. मी पुढे झालो. नगंटवर माझी पकड घट्ट झाली. ती हृदयाशी धरून मी पुढे झालो. सेफ्टी कधीच रिलीज करून ठेवली होती. पीपहोलमधून मी पाहिलं. बाहेर तो होता... दुर्धर होता... !!!

मी... जणू स्वतःला आरशात पाहत होतो... माझा स्वतःचाच टाक्यांनी शिवलेला अतिक्रूर चेहरा माझ्यासमोर उभा असल्याचा काही क्षण मला भास झाला...

पण मला गोठून चालणार नव्हतं. मी झटकन बाजूला झालो. मिस्टर वाघला तो आल्याचं मी टेक्स्ट केलं. दार उघडण्याचा संदेश देणारा रिप्लाय मला आला. रिद्धीमाला ते काम करायचं होतं. मी मागे झालो. तिला दार उघडण्याची खूण केली. आणि एक लहान पॅसेज पार करून मी बाथरूम मध्ये जाऊन लपलो. दार लॉक केलं नव्हतं. थोडं उघडच ठेवलं होतं. कोणत्याही क्षणी मला बाहेर येण्याची आवश्यकता पडली असती...

खोली शांत होती. त्यामुळे दरवाजाचा लॅच फिरल्याचा आवाज मला स्पष्ट आला. दरवाजा हळू उघडला गेला. मग पावलांचे आवाज... दुर्धर आत आला होता. पण रिद्धीमाच्या

पावलांचा आवाज मला आला नाही. कदाचित ती संथ पावलांनी चालत असावी. रिद्धीमाला दुर्धरने अजून तरी काही केलं नव्हतं, कारण अजून तरी काही मोठी हालचाल नव्हती. मी आत सावध होतो... माझी बोटं मिस्टर वाघच्या नगांटवर वळली जात होती, माझ्याही नकळत... मला दरदरून घाम फुटला होता... एक... एक अमानवी व्यक्ती या खोलीत घुसली होती... आणि मिस्टर वाघ वेळेवर आला नाही, तर तीस रोखण्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर होती... कधी असं काही न केलेला मी... मी हे करू शकणार होतो...?

शिवाय खरी वेळ... दुर्धरला रोखण्यासाठीची खरी वेळ कोणती हे मी कसं ठरवणार होतो...? सगळं... सगळं कसं अनिश्चित होतं...

मी कानोसा घेत होतो. दार झाकलं गेलं होतं. दुर्धरनेच पुढं येता येता दार ढकललं असणार. नाही तर रिद्धीमा तो सोबत असताना दरवाजा बंद करण्याचा वेडेपणा करणार नव्हती. किंवा मग दुर्धरने तिला तसं करण्यास भाग पाडलं असणार. म्हणूनच ती दार ढकलून पुढं आली असणार...

माझं टेन्शन वाढत होतं आणि अजून काही घडलं देखील नव्हतं.

दार बंद झालं, तसं दुर्धरने तिला बेडवर ढकलल्याचा आवाज आला. तिच्या गालावर दुर्धरचा सणसणीत हात पडला होता. मी झटकन बाहेर आलो.

"कुठाय तुझा..." दुर्धर ओरडला. त्याच्या रागाला पारावर नव्हती.

तो पुढं जे उच्चारला होता ते टाळतोय. कारण ते इथं सांगण्यासारखं नाही... तो माझ्याबद्दल बोलत होता...

"त्यो सूरज का कोण कुठाय?" त्याने ओरडत आणखी एक हात रिद्धीमाला जोराने लगावला.

सहज फिरावी अशी तिची नजर माझ्याकडे फिरली फक्त. मी तिला गप्प बसण्याविषयी खुणवून सांगितलं. तिने मग पुन्हा दुर्धरकडे पाहिलं. आणि मी मागे होऊन भिंतीशी लपलो. दुर्धरने मागे पाहिलं, तर मी त्याला दिसू नये म्हणून माझी ही दक्षता. ती गप्प राहिली. माझ्याविषयी तिने काही सांगितलं नाही.

इतका दंगा होऊनही मी समोर येत नाही यामुळे मी खोलीत नसल्याची दुर्धरची खात्री पटली असावी. किंवा त्याची 'सावज' त्याच्या समोर असल्याने त्याला माझी तमा नसावी. त्याने जराही माझ्यासाठी शोध घेण्याचा प्रयत्न केला नव्हता. मिस्टर वाघने याला बरोबर ओळखला होता. त्याचा रोख थेट रिद्धीमा असणार होती!

"त्याला नंतर बघतो, आधी तुझा बंदोबस्त करतो!" तो म्हणाला व तिला ढकलून दिलं.

मी पाहत होतो. भिंतीलगत उभारून मी त्याला पाहत होतो... त्याने रिद्धीमाला बेडवर टाकलं होतं. तो तिच्यावर रेलला होता. तिला निसटण्यासाठी त्याने मार्ग ठेवला नव्हता. त्याने तिचा जबडा जोराने दाबून धरला होता. ते असहनिय होऊन तिच्या डोळ्यांतून पाणी येत होतं. मला देखील हे दृश्य सोसण्यापलिकडं होतं. पण माझ्या हाती रिव्हॉल्व्हर असून मी काही करू शकत नव्हतो. कारण मिस्टर वाघचा आदेश नव्हता. हाती शस्त्र असून, माझ्या डोळ्यांसमोर एका मुलीशी एकजण असभ्य वर्तन करत असून मी काही करू शकत नव्हतो. शस्त्र असून दुर्बल होतो मी... हतबल होतो... मी रडत होतो. डोळ्यांतून असंख्य धारा आपसूकच बाहेर पडू लागल्या होत्या...

दुर्धर तोंडाला येईल त्या असभ्य, अभद्र भाषेत तिला बोलत होता... तिच्या चारित्र्याचे वाभाडे काढत होता... मी त्याचे उद्धोषण इथे देऊ शकत नाही... देणार नाही... म्हणून पूर्ण वर्णन टाळतोय. पण तो जे तिच्याशी वागत होता, बोलत होता ते रिद्धीमा सारख्या सद्शील मुलीबद्दल किंबहुना कोणत्याही मुलीबद्दल बोलणं कधीही क्षमेस पात्र नाही!

तो तिचा गळा जोरात आवळू लागला. रिद्धीमाचा जीव गुदमरत होता... ती धडपड करत होती त्याच्या तावडीतून सुटण्याची... स्वतःला वाचवण्याची... ती त्याला जमेल तसे जमेल तिथे मारू लागली. त्याला बोचकारू लागली... पण तो तिला सोडायला काही तयार नव्हता. त्याची पकड तिच्या गळ्याभोवती अजूनच घट्ट होत होती...

कोणत्याही क्षणी रिद्धीमाचा जीव जाणार होता आणि मी... मी काही करू शकत नव्हतो... असहाय्य होतो मी... माझं संपूर्ण शरीर तापलं होतं... मिस्टर वाघ वेळेत पोहोचेल की नाही माहीत नव्हतं... काय होईल कळत नव्हतं... रिद्धीमा माझ्या डोळ्यांसमोर मेली, तर तिच्या मृत्यूपेक्षाही आणखी एक भयंकर घटना मला असहाय्य होऊन पाहत राहावी लागली असती...

की... की दुर्धरला मारण्याची हीच ती वेळ... याला आता संपवला, तर मीही संपेन. मी थेट जेलमध्ये जाईन. असू देत! मला पर्वा नाही! एका मुलीला वाचवण्यात माझं आख्खं आयुष्य खर्ची पडलं तरी ते सार्थ झालं! असा विचार मनात कुंधला.

मी रिव्हॉल्व्हरची सेफ्टी आधीच अनलॉक केली होती. आता फक्त दुर्धरवर नेम धरून चाप ओढला, की विषय संपला!

पण मी नेमबाज नाही! मिस्टर वाघवर मी पॉईंट ब्लँक रेंजला रिव्हॉल्व्हर ताणली होती. तेव्हा चाप ओढला असता, तर तो

जागीच मेला असता, पण आता दुर्धर थोडा लांब आहे. नेम चुकला तर... त्याहूनही गोळी रिद्धीमाला लागली, तर... जिला वाचवायला प्रपंच करावा तिचाच जीव जाईल... काय करावं... काय करावं... मी रडत होतो... कुढत होतो...

दुर्धरचं रिद्धीमाचा गळा आवळतच स्वतःची पँट अनझीप करणं चालू होतं... याचा अर्थ... याचा अर्थ... रिद्धीमा आयुष्याच्या शेवटच्या घटका मोजत होती... आणि मी पाहत होतो... डोळ्यांतून आसवं गाळत फक्त पाहत होतो...

माझे हुंदके बाहेर पडणार होते. मी एका हाताने नाक-तोंड दाबून धरून थरथरत दुर्धरवर रिव्हॉल्व्हर रोखून होतो. पण ती चालवण्याची मुभा वाघकडून नसल्याने मी हतबल होतो... दुर्धरवर ताणलेली रिव्हॉल्व्हर माझ्या हाती थरथरत होती फक्त...

आणि अखेर; मला या घोर संकटातून मुक्त करण्यास मृत्यू देवता धावली! दार उघडलं गेलं होतं. मी मिस्टर वाघला अपेक्षित करत होतो, पण ही मृत्यू देवता कोणी वेगळीच होती. स्पेअर कीचा उपयोग करून दार दुसऱ्याच कोणी उघडलं होतं. दुर्धरला ते अक्षम्य दुष्कर्म करताना ती व्यक्ती आपली मानसिक स्थिती ढळल्यासारखी अतीव रागाने ओरडली...

"निशांत!"

एका कळसूत्री बाहुलीप्रमाणे त्याचं अर्धं शरीर वर येऊन आवाजाच्या दिशेनं वळलं. आपलं सोंग त्या वासनेच्या धुंदीत विसरलेला व त्याहीपेक्षा आपण पकडलो गेल्याच्या भावनेने दुर्धरने मागे आवाजाच्या दिशेनं पाहिलं होतं. सुपेरिंटेंडेड ऑफ पोलिसच्या वर्दीतील ती व्यक्ती दुसरी कोणी असूच शकत नव्हती. एक्सेप्टलेस, या नांवाने त्याला एकच व्यक्ती हाक मारणार होती. ती म्हणजे सुशांत! त्यामुळे ती हाक कानी पडताच विजेच्या गतीने दुर्धरने वर होत मागे पाहिलं होतं. त्याचा भेद उघडा पडल्याचा भाव साफ त्याच्या चेहऱ्यावर होते.

डोक्याचा भणका उडालेल्या सुशांतने मग क्षणाचाही विलंब न लावता स्वतःकडील ग्लॉक सेवेन्टीन सर्व्हिस पिस्टलने दारातूनच दुर्धरची कवटी छेदली होती. मिस्टर वाघ त्याच्या मागे होता. काही तरी मिळवल्याचे भाव त्याच्या मुखावर झळकत होते. ओठी विजयी स्मित तरारले होते आणि डोळे बारीक तीक्ष्ण होऊन मेलेल्या दुर्धरवर रोखलेले!

मिस्टर वाघला सुशांतकडून हेच तर घडवून आणायचं होतं. म्हणूनही त्याने सुशांतशी वाकड्यात शिरून त्याला संतापवलं होतं, ज्याने तो स्वतःचा कंट्रोल गमावले व दुर्धरला रिद्धीमाशी दुष्कृत्य करताना पाहून त्याच्या संतापाचा प्रमोच्च बिंदू गाठाला जावून कोणताही विचार न करता मग त्याने दुर्धरचा जीव घ्यावा...

वाघने त्याच्या या प्लॅनला सार्थ करण्यासाठीच दुर्धरला मुक्त करून, त्याला इथला पत्ता दिला व त्याला ट्रॅक करत राहिला. त्यामुळेच दुर्धर हॉटेलपर्यंत पोहोचण्याची व सुशांतला इथं घेऊन येण्याची मिस्टर वाघने एकच पक्की उचित वेळ साधली होती...! आह्... माझा जीव भांड्यात पडला...

**एका पिशाच्याने कटकारस्थान करून दुसऱ्या पिशाच्याला संपवले होते...!!!**

दुर्धर रिद्धीमाच्या अंगावर पडला होता. त्याला कसासा बाजूला सारून रिद्धीमा उठण्याचा प्रयत्न करत होती. सुशांत साहजिक तिच्या मदतीला आणि तिला सांत्वना द्यायला समोर येणार होता.

मी सुशांतच्या डोळयांत येऊ नये म्हणून तो पुढे होण्याआधीच पुन्हा बाथरूममध्ये शिरलो. नगंट आपल्या बॅगेत कपड्यांखाली गडबडीने लपवली व बॅगची चेन आवळून ओढली. अगदी शेवटच्या टोकापर्यंत!

तो पुढे झाला हे मी बाथरूमच्या किलकिल्या दरवाज्या आडून पाहिलं आणि परत त्याच्या मागे येऊन उभारलो, माझ्या सामानासकट. मला त्याच्या समोर येणं क्रमप्राप्त होतं, कारण जर त्याला माझ्याविषयी समजलं असतं, तर कदाचित त्याने मला

दुर्धरचा साथी समजण्याची चूक देखील केली असती. हो, वाघ सोबत असताना त्याने तसं होऊ दिलं नसतं हे जरी खरं, तरी मी खोलीतच दडून बसलो आहे, तरी मी रिद्धीमाला मदत केली नाही हे पाहून त्याने माझ्यावरही वक्रदृष्टी टाकली असती.

सुशांतने रिद्धीमाला आपल्या प्रेमळ कवेत घेतलं होतं. ती हमसून हमसून रडत होती. तिच्या डोळ्यांतील अश्रू मला पाहवत नव्हते. मी अपराधी भावनेने मान खाली घातली.

सुशांत देखील हबकला होताच.

दोघांनी स्वतःला सावरलं. यात थोडा वेळ गेला होता. सुशांतने मागे मिस्टर वाघकडे पाहिलं. पण त्याची नजर वाघ समोर उभ्या माझ्यावर प्रथम गेली. त्याच्या चेहऱ्यावर मोठे प्रश्नचिन्ह उभारले. त्याच्यासाठी खोलीत अचानकच मी प्रकट झालो होतो.

"माझा असिस्टंट आहे!" सुशांतने काही विचारण्याआधीच वाघने उत्तर देऊन टाकलं.

"तुमच्या निशांतच्या मागावर मी याला लावलं होतं." वाघ स्पष्ट करत पुढं म्हणाला.

आणि या वाक्याने माझी खोलीतील उपस्थिती ग्राह्य झाली. माझं सामान चेक होण्यापासून वाचलं आणि पूर्वी मी येथे हजर होतो ही शक्यता संपुष्टात आली. किमान तोपर्यंत, जोपर्यंत रिद्धीमा सुशांतला काही सांगील...

रिद्धीमाने नंतर स्टेटमेंट देताना मी हे सगळं घडत असताना त्याच ठिकाणी हजर होतो असे सांगितले तर?... तशी ती शक्यता कमीच होती!

तसंच झालं. करुणेची मूर्ती ती! तिने तसं काही सांगितलं नाही. ना नंतर ना त्यावेळी... ती फक्त माझ्याकडे पाहत होती... तिच्या डोळ्यांतले भाव वाचण्यास मी असमर्थ होतो... तिच्या नजरेला नजर देण्याची माझी हिंमत नव्हती... माझी मान पुन्हा खाली गेली...

तिने माझ्याविषयी काही सांगितले नाही. मी तिथे असून तिची मदत केली नाही म्हणून तिच्यासाठी मी तिथे नव्हतोच. म्हणूनच माझी उपस्थिती तिने मान्य केली नसावी... ती नक्कीच माझ्यावर रागावली असावी... की तिने मला या प्रसंगात अडकण्यापासून वाचवलं होतं...? मला अजूनही याचं उत्तर मिळालेलं नाही. मी अपराधी आहे तिचा हे मी जाणतो... आणि यासाठी मी स्वतःला कधी क्षमा करणार नाही!!!

"मला वाटतं, तुम्ही इथून पुढे सगळं सांभाळून घ्याल! कसं कव्हर अप करायचं याचे तुम्ही अभ्यस्त आहात!" वाघ बोलला,

"आणि हो. सर्व ड्युज् माफ!" तो म्हणाला आणि माझ्या खांद्यावर हात टाकून मला घेऊन तो बाहेर पडला...

## १५. फायनल वर्डीक्ट...

मी बसून होतो... अगदी सुन्न... संवेदनाशून्य... सर्व चेतनांनी बधिर...

"काही विचारणार नाहीस?" वाघनेच मला प्रश्न केला.

"काय बोलू? काय विचारू? सगळंच अविश्वनीय आहे..." मी भानावर येत बोललो.

"स्वतः बघून!" वाघ हसत बोलला.

"हा..." मी करकरलो.

"काहीच प्रश्न नाहीत?" त्याने भुवई उडवत स्मित करून विचारलं.

"खूप आहेत. पण आता तेच आठवत नाहीयेत. किती काही घडलंय एवढ्याशा वेळेत..." मी बडबडलो.

"थोडा वेळ घे! आणि बोल!" तो म्हणाला.

"दुर्धर आजाराचे नाटक का करत होता?" मी प्रश्न केला.

"दुर्धर नाही. सोहम कोकाटे!"

"अं?" मी गोधळलो.

"दुर्धरचं खरं नांव. वाघ बोलला. दुर्धर हे मी त्याला दिलेलं नांव आहे. मी पण एक चांगली आत्या होऊ शकतो ना. तुझ्यासारखा?" वाघने चेष्टा केली.

कारण त्याला 'मिस्टर विजय वाघ' हे मीच दिलेलं नांव आहे.

"दुर्धरचा अर्थ सांगण्याची गरज नाही तुला." तो हसला.

"दुर्बोध! ज्याला पकडणं कठीण आहे असा, प्रबळ, प्रचंड. जो समजण्यास अवघड आहे असा..." मी पुटपुटलो.

वाघ हसला.

"पण तुम्ही माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाही..." मी अडलो.

"कारण त्याची स्मृती गेल्याने त्याला पूर्वीचे काही आठवत नाही याचा अर्थ तो न्यायव्यवस्थेसमोर एका नवजात शिशु इतकाच निरागस व निष्पाप होता. त्यामुळे त्याचे पूर्वायुष्य जरी सुशांतच्या समोर काही कारणाने आले असते, तरी त्याला शिक्षा करणं शक्य नव्हतं!" वाघचं स्पष्टीकरण.

"असा दुर्धरचा प्लॅन होता तर नाटक करण्यामागे?" मी भन्न...

मिस्टर वाघची मान हलली.

"एमसीएम ही टर्म दुर्धरसाठी जरी रिद्धीमाने ठरवली असली, तरी तो प्लॅन दुर्धरचाच. त्याच्या भीतीपोटी व त्याहूनही इतर स्त्रियांना त्याचं भक्ष्य होण्यापासून वाचवण्यासाठी त्याने नंतर केलेले गुन्हे रिद्धीमा तिच्या पदराआड लपवत गेली. त्यामुळे पुरावेच नसल्याने ते कधी समोर आले नसते!" वाघ बोलला.

"म्हणून तुम्ही दुर्धरला असं संपवलंत?" माझा रुक्ष चेहऱ्याने प्रश्न.

"अलबत!" तो मोहक हसला.

"एकच विचारतो. दुर्धरला तुम्ही कधीही मारू शकला असता. मग हा सगळा व्यापार का?" मी कळवळलो.

"कारण मला त्याला सुशांतच्या हातूनच मारायचं होतं. तो रिद्धीमाचा जेवढा गुन्हेगार होता, त्याहीपेक्षा तो सुशांतचा मोठा गुन्हेगार होता. ज्याने इतके उपकार केले, त्याच्याच विश्वासाला खीळ बसवली होती त्याने. आणि त्याच्याच बहिणीचा आपल्या वासनापूर्तीसाठी वापर करत होता साला!" वाघची छटा भयंकर क्रोधायमान झाली.

"निक्रोफिलियाक..." मी दुर्धरची तिडीक येऊन पुटपुटलो.

"आणि महत्त्वाचं म्हणजे सुशांतनंच त्याला मारणं माझ्यासाठीही उचित होतं. सुशांत दुर्धरच्या खूनाला चांगल्या रीतीने कव्हर करू शकतो! नाही?!" वाघ कुटील हसत बोलला.

"पण तुमच्या या प्लॅनसाठी तुम्ही रिद्धीमाच्या जीवाशी, तिच्या अब्रूशी खेळलात हे कसं इंग्नोर करताय तुम्ही?" मी चिडून ओरडलो.

"मला वाटतं त्यासाठीच मी तुला तिच्यासोबत ठेवला होता. नाही? तिच्या रक्षणासाठी!" वाघ बोलला.

मी थोडा थांबलो मग,

"रूम बुक करायला तुम्ही रिद्धीमाला भाग पाडलंत?" मी विचारलं.

"अर्थात." वाघ बोलला,

"तिला विश्वासात घेऊनच मी हा प्लॅन रन केला होता. त्याशिवाय हे होणारच नव्हतं. रूम तिच्या नांवे होती म्हणुनच तर दुर्धरचा अधिकच संताप झाला. एक मुलगी, जिला आपण आपली संपत्ती मानतो, ती हॉटेलमध्ये स्वतःच्या नांवे एक रूम बुक करते आणि तेही आपल्या प्रियकराला घेऊन तेथे राहते हे दुर्धरसारखा सनकी सहन करू शकेल?" वाघ आपला परफेक्ट प्लॅन पुन्हा ऐकवत परत कुत्सित हसला.

"म्हणजे दुर्धर व माझी भेट घेडवणे हा देखील तुमच्या प्लॅनचा भाग होता...?" मी धक्क्याने ओरडलो.

"इंडीड!" वाघ हसला,

"म्हणून तर रिद्धीमा तुला घेऊन राहते आहे हे रिसेप्शन काऊंटरला समजल्यावर त्याने आपला ताबा सोडला. मला त्याच्याकडून तीच रिएक्शन काढून घ्यायची होती. त्याशिवाय सुशांतला त्याला मारण्याची निकड वाटली नसती ना!" वाघ हसला.

"तुम्ही क्रूर आहात! अत्यंत क्रूर आहात! आपलं ध्येय फलित होण्यासाठी तुम्ही कोणालाही पणाला लावू शकता! नाही?!" मी संतापून बोललो.

"पण कोणाला इजा होऊ देत नाही. नाही?!" वाघने शांतपणे मलाच उलट प्रश्न केला.

मी जाण्यास उठलो. या माणसाला आता इथून पुढे मी सहन करू शकणार नव्हतो. निदान काही दिवस तरी...

"आता तुला समजलं असेल अपराध बोध खरा काय असतो!" माझ्या पाठमोऱ्या आकृतीला त्याने ताकीद दिली.

आणि माझ्या काळजाचा ठोका चुकला. म्हणजे त्याने मला मुद्दाम यात गोवलं होतं? मला अपराधबोधाचा खरा अर्थ समजावा म्हणून त्याने हा खेळ माझ्यासोबत घडवून आणला?! मी एवढी मोठी चूक केली होती का, की म्हणून त्याने मला ही अशी शिक्षा दिली...?

नसेल... मी काहीतरीच विचार करतोय. तो मस्करी करत असणार! तो मला म्हणाला होता, मीच त्याला विश्वासू वाटतो म्हणून त्याने मला या त्याच्या मिशनमध्ये सोबत घेतले होते...!!!

मी खात्री करण्यासाठी त्याच्याकडे वळलो.

"मीही याच अपराधी भावनेने रोज क्षणक्षण जगतोय सूरज! आणि हे तू डोळ्यांनी पाहतोयस. यामुळेच तर तुझ्याकडे मी

मनमोकळं करतो. तू माझी बाजू जगाला सांगावीशी अशी आशा करतो..." तो खिन्न होता. त्याची मान खाली गेली होती. नजर धरणीला लागली होती,

"सूरज, आपल्याकडे गुन्हे प्रवृत्तीच्या विचारांना काही शिक्षा नाही. गुन्हा आधी घडावा लागतो. आणि म्हणून मी ते होऊ देतो!" तो त्याची बाजू मांडत म्हणाला.

म्हणजे हा माणसं मरू देतो कारण त्याला त्या माणसांना संपवायचं असतं, जे या लोकांना मारण्याची इच्छा बाळगतात? हे किती अनाकलनीय आहे... पण त्याचं याच्यावरचं स्पष्टीकरण वेगळंच. एखाद् दुसरी व्यक्ती मरू देऊन, जर असंख्य प्राण वाचवता येत असतील तर, का नाही? असं तो म्हणतो. माझ्या तर बुद्धीला हे कधीही न पटणारं आहे व म्हणून मी कधीच त्याच्याशी सहमत होणार नाही हे त्रिवार सत्य आहे!!!

म्हणजे याच्या या विचारसरणीमुळेच रिद्धीमाला याने दावणीला लावले का? म्हणजे त्यायोगे याला सुशांतकडून दुर्धरला संपवता येईल? तसंच आहे! त्याशिवाय का सुशांतने कोणतीही शहानिशा करण्याची तमा न बाळगता समोर बहिणीवर गुदरलेला घोर प्रसंग पाहून दुर्धरला रिद्धीमावर अत्याचार करताना पाहून त्याला जीवे मारलं होतं!

## वाघ... निव्वळ क्रूरकर्मा!!!

मी ठरवल्याप्रमाणे बरेच दिवस; म्हणजे आज तागायत त्याच्याकडे अजून गेलो नाही. माझी मानसिक तयारी अजून त्याच्याकडे परत जाण्याइतपत स्थिर झाली नाही. दरम्यानच्या काळात नीलकंठ घोडके व त्यांचे कच्चेबच्चे एका स्फोटात मेल्याच्या बातम्या आल्या. मला माहित आहे हे कोणी केलं असेल.

सुजय शहाचे नोकर पण यमाच्या भेटीस यमधाम यात्रेस गेले. सुजयबद्दल माहिती असून ते गप्प राहिले याने ते मिस्टर वाघच्या दृष्टीक्षेपात सुजयच्या वाईट कर्मात साथीदार होते. सुजयला काही इजा झाली, तर कदाचित रिद्धीमाला संपवण्याचे काम त्यांच्यावरच सोपवले असू शकते हा माझा तर्क. म्हणून वाघने त्यांचीही खास योजना केली होती. पण हे सगळं त्याने कसं घडवलं ते विचारायला काही मी त्याच्याकडे गेलो नाही. विचारलं असतं तरी त्याने सांगितलं नसतं. कारण मुख्य घटना पार पडली होती. आता तो निव्वळ कचरा साफ करत होता.

सुजय शहाची देखील सर्व प्रॉपर्टी व व्यवसाय, संस्था व एनजीओज् मिस्टर वाघने स्वतःच्या वेगवेगळया कंपन्यांच्या मार्फत खरेदी केल्या. आता तो एनजीओचा उपयोग एनजीओ म्हणूनच

करणार होता. आणि शिक्षण संस्थेचाही उपयोग गरजू, होतकरू व महत्वाचं म्हणजे अभ्यासू विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठीच होणार होता...

यासर्वांतून येणारा एकही जुना-नवा रुपाया वाघच्या खिशात जाणार नव्हता!

पण एक दिवस एक मनहूस खबर आली. मिस्टर वाघचाच मेसेज होता...

'रिद्धीमा गेल्याचा...'

मी दुःखाने तुटून गेलो. माझ्या प्रियसीला गमावण्याची एक दुःख मी कसंतरी पेललं होतं. ते मला पुन्हा सहायचं नव्हतं. मी रिद्धीमाच्या प्रेमात नसलो, तरी तिच्या मृत्यूने आणखी काहीतरी मौल्यवान गमावल्याची जाणीव मनमस्तिष्कात खोल रुजली... ती आता कायमची...


पण मला एक शंका आहेच! जी मी मिस्टर वाघला विचारली नाही. कारण त्याचं उत्तर काय असेल याचा मला अंदाज आहे. आणि तो अंदाज, माझी ती शक्यता मला सत्यात उतरताना पहायची नाही... ती ही, की मिस्टर वाघने अँटी डिप्रेसंटची जी सूचना रिद्धीमाला दिली होती, ती फक्त दुर्धरला बेशुद्ध ठेवण्यासाठी? व रिद्धीमाला वाघने सुजयकडे पाठवेपर्यंत तीची


त्याच्यापासून सुरक्षा व्हावी म्हणून फक्त? की रिद्धीमाला तो तिच्या गुन्ह्यांचं प्रायश्चित्त तिने कसं घ्यावं याबद्दल तिला कळवत होता...???

मी हबकलो. हा माझ्यासाठी खूप मोठा आघात होता... तिच्या समोर जाऊन तिची माफी मागण्याची संधी मला मिळाली नव्हती. आणि आता; ती मिळूही शकणार नाही!


मिस्टर वाघने रिद्धीमाला सूचना केली होती, की तिने दुर्धरला अँटी डिप्रेसंट देऊन रात्रीचं झोपवून ठेवावं म्हणजे ती त्याच्यापासून सुरक्षित राहील. तिने त्याच अँटी डिप्रेसंटचा ओव्हर डॉस घेऊन स्वतःला संपवून घेतलं होतं. अपराध बोधाने ग्रस्त अशी ती, तिला ते ओझं सहन झालं नाही. म्हणून मग तिने हे भलतं धाडस केलं होतं. पण असं धाडस करण्याचं धारिष्ट माझ्या अंगी नाही... म्हणून मी जिवंत आहे अपराधबोध घेऊन... मिस्टर वाघमुळे माझ्या माथ्यावर आणखी एक पापाचा तुरा खोवला गेला होता...


मी रिद्धीमाला मदत करू शकलो नव्हतो. करू शकलो असतो, पण केली नव्हती. तिची माफी मागून काही अंशी तरी पापक्षालन करावं अशी माझी इच्छा आता कायमस्वरूपी अपुरी राहणार होती... ही तिने मला दिलेली शिक्षा होती... मी तिची मदत न केल्याबद्दलची... आयुष्यभर त्या दुःखाच्या डाचण्या मला बसणार होत्या. पण ही शिक्षा मला मान्य... मला मान्य...!!!


सूरज गाताडे
दि डेथ ऑफ लिंकन्स मदर



सूरज गाताडे
डेथ विल


सूरज गाताडे
द
किस
बाय मिस्टेक



सूरज गाताडे
द पॅरासाईट



सूरज गाताडे



सूरज गाताडे
फ्लेम


सूरज गाताडे


सूरज गाताडे
X



अ हेवी प्राईझ


सूरज गाताडे
'अ प्योर् वन-दि एप्रिल चेज्!'


सूरज गाताडे


सूरज गाताडे
अंतःपूर

सूरज गाताडे यांची ई पब पुस्तके. हे वाचण्यासाठी lithium या app चा वापर करा.



**सूरज गाताडे यांची पूर्व प्रकाशित पुस्तके (अनुक्रमे)**

१) द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक/क्राईम/ सस्पेन्स/ थ्रिलर)

२) डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक/ सायकॉलॉजिकल/ क्राईम/सस्पेन्स/थ्रिलर)

३) दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)

४) द पॅरासाइट (सायन्स फिक्शन/सस्पेन्स/थ्रिलर)

५) फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजिकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)

६) अ हेवी प्राईझ्-(सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/क्राईम/ सस्पेन्स / थ्रिलर)

७) डेडली मिटिंग्स् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/ क्राईम/सस्पेन्स/थ्रिलर)

८) एजंट - X - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/ क्राईम/सस्पेन्स/थ्रिलर)

९) तू माझा सांगाती - (सायन्स फिक्शन/ह्युमन सायन्स/स्पेन्स/ सायकॉलॉजिकल/सस्पेन्स/थ्रिलर) PDF - EBUP

१०) वृत्र - दि लास्ट असाईनमेंट (फॅमिली/क्राईम/एक्शन/ सायकॉलॉजिकल/ सस्पेन्स/थ्रिलर)

११) अ प्योर् वन - दि एप्रिल चेज् (सायकॉलॉजिकल/एक्शन/सस्पेन्स/ थ्रिलर/ ड्रामा/लव्हस्टोरी)

१२) अंतःपुर (जीओ-पॉलिटिकल/सायकॉलॉजिकल/एक्शन /क्राईम/ सस्पेन्स/ थ्रिलर)

**ई साहित्य प्रतिष्ठानचं तेरावं वर्षं.**

**सुरज गाताडे यांचं ई साहित्यवरचं तेरावं पुस्तक.**

तीन वर्षांत तेरा पुस्तकं. प्रत्येक पुस्तक वेगळं. प्रत्येक पुस्तकाचा वेगळा विषय, वेगळा बाज, वेगळी मांडणी. प्रत्येक पुस्तक सुपरहिट. आता तर त्यांचा स्वतःचा असा एक फॅन ग्रुप हजारांच्या घरात गेलेला आहे. जेव्हा त्यांनी आपलं पहिलं पुस्तक प्रकाशनासाठी पाठवलं तेव्हा "प्लीज किमान एकदा वाचून घ्या!!!" अशी विनंती केलेली होती. लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. तेव्हा सूरज यांची ही विनंती साहजिक होती. त्यांना या दुष्टचक्रातून बाहेर पडायचं होतं. या दुष्टचक्रातन अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

आता नेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही.

भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्याची ई साहित्यची इच्छा आहे. नवीन उत्कृष्ट लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले, अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र शेळके, पुर्वा राउत,

धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर, बाळासाहेब शिंपी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

मराठीत हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे, आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com